# बोरकरांची कविता

संपादक : मंगेश पाडगांवकर

म. ग्रं. सं. ठाणे
क्रं. ९७९२
REFBK-0011248


मौज प्रकाशन गृह
मुंबई ४

# बोरकरांची
# कविता

अनुक्रमांक 28228 दि. 10-2-69
क्रमांक 70893

रससिद्ध प्रतिभेचें वरदान बोरकरांना जन्मजात लाभलेलें आहे. रंग, गंध, रस, रूप यांचा लावण्यमहोत्सव म्हणजेच बोरकरांची कविता. या नदीच्या पार असलेलें यौवनाचें झाड ज्याने पाहिलें, त्याच्या पालवीमागच्या अमृताच्या चंद्राला ज्याने स्पर्श केला, त्याची कविता अशी चिरतरुण असावी हें अगदी स्वाभाविक आहे. बोरकरांच्या कवितेंत निसर्ग अनुभवांशीं एकरूप होऊन येतो. कधी तो स्वतःचें रूप न्याहाळीत स्वरशृंगार करतो, तर कधी युगें युगें चालणाऱ्या मुशाफिरासारखा आपल्या खिन्न एकलेपणाने भारून टाकतो. आकाशमाउलीच्या भाळावरली बिलोरी कोर तो हलकेच रेखतो. 'रत्नांचे द्रव स्रवती : स्वप्निल रस लवलवती' अशी शब्दांच्या हातीं न लागणारी किमया बोरकरांच्या निसर्गप्रतिमांतून साकार होते. बोरकर हे प्रेमाचे कवि आहेत. 'जीवें भावें कुणावरी तरि प्रीतीची अतिवृष्टि करा रे' अशी उत्कट समर्पणाची शक्ति त्यांच्या प्रेमकवितेंत आढळते. शरीराचें अस्तित्व नाकारून लटक्या अध्यात्माचे गहिवर काढणें त्यांच्या प्रेमकवितेला ठाऊक नाही. ती रंगेल आहे, रंगेल आहे. पापणीच्या दाट काळ्या जाळ्यांत गुंतून धुंद होणें जसें तिला जमतें तसेंच या जाळ्यांतून मुक्त होऊन अलिप्तपणें आपल्या अनुभवाला सौंदर्यरूप देणेंहि तिला जमतें. जिथे शब्दांचा प्रपंच कमळासारखा मिटतो तो निःशब्दाचा सोहळाहि भोगून त्यांची ही प्रेमकविता कृतार्थ होते.

कविवर्य बोरकर यांच्या वयाला ३० नोव्हेंबर १९६० या दिवशीं पन्नास वर्षे पूर्ण झालीं. या निमित्ताने १९२६ ते १९६० या गेल्या चौतीस वर्षांत त्यांनी लिहिलेल्या बहुतेक कवितांचा हा संग्रह प्रकाशित केला आहे.



# बोरकरांची कविता

संपादक मंगेश पाडगांवकर

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम वि:
क्रमांक नों: दि:

मौज प्रकाशन गृह
मुंबई ४

मौज प्रकाशन : ५० ■

प्रथमावृत्ति : ३० नोव्हेंबर १९६० ■

© १९६०, सौ. रुक्मिणीबाई बोरकर ■
१८ रानडे ब्लॉक्स, पुणें ५

■ वेष्टन :
दीनानाथ दलाल

■ किंमत १५ रुपये

■ मुद्रक :
वि. पु. भागवत
मौज प्रिंटिंग ब्यूरो
खटाववाडी, मुंबई ४

■ प्रकाशक :
वा. पु. भागवत
मौज प्रकाशन गृह
खटाववाडी, मुंबई ४

प्रिय रुक्मिणीस—

# अनुक्रमणिका


| | | | |
|---|---|---|---|
| पुनवेची रात | १ | नेत्रमीलन | ३७ |
| तोड ही माळ | २ | जळता संदेश | ३८ |
| एक मागणें | ३ | राजसा पुरुषप्रीति क्षणभरी | ३९ |
| फुलाची कहाणी | ५ | संगम | ४० |
| शाहिरी पोपटास | ६ | श्रीकृष्णवंदन | ४१ |
| नवलाई | ८ | कोळी | ४१ |
| बाष्पसमर्पण | ९ | पहिलें चुंबन | ४२ |
| भृंगास | १० | आशा | ४३ |
| कुंकूं लावूं काय ? | १२ | तोडूं नको माळ | ४४ |
| बाल्कास | १३ | कातरवेळेनंतर | ४५ |
| हास्याचा पाळणा | १५ | पराधीन जीवास | ४६ |
| चिमणें जगत् | १५ | दोन अंगणांत | ४७ |
| लीला | १७ | पांखरास | ४७ |
| विरहोत्सुक | १८ | माझी आगबोट | ४८ |
| जादूची फुलबाग | १९ | स्थानभ्रष्ट फुलास | ४९ |
| ताई | २१ | शेषशायी | ५० |
| चल वेड सोड आतां | २२ | अव्यक्त भाव | ५० |
| निसर्गदेवतेस | २३ | प्रीतीचा तिळगूळ | ५२ |
| एक कहाणी | २४ | मुक्तीचें गाणें | ५३ |
| गरिबाची पुष्पांजलि | २६ | कविता म्हणजे काय ? | ५४ |
| आळवणी | २७ | पूर्णचंद्र | ५५ |
| कवि कोण ? | २८ | काळास | ५६ |
| खादीगीत | २९ | शर्वरी | ५७ |
| महाराष्ट्रगीत | ३० | निर्वाणीचा संदेश | ५८ |
| शोध | ३२ | सागरास | ५९ |
| विहगास | ३३ | मातृभूमीची भूपाळी | ६० |
| स्मशानांत | ३५ | नंदन | ६२ |

माझें जग ६३
हृदय-निवेदन ६५
विपत्तीस ६६
प्रतिभेस ६७
प्रणयमुग्धेस ६८
शेज ६९
परिचयें प्रेम तव जाइल का ? ६९
वेड ७१
मन मार ७१
तीन सांजा ७२
सायुज्यमुक्ति ७३
मालवणारी वात ७४
आणि मज माउलीच्च जाहली ७५
आकांक्षा ७६
विरोधी भक्ति ७७
कशि तुज समजावुं सांग ? ७८
येइं सखी ७९
इतुक्या लौकर येइं न मरणा ८०
जादुगार ८२
वास्तव्य ८३
कारागीर ८४
सांजवेळ ८५
तेथें कर माझे जुळती ८६
गोड कळ ८७
ऐक्यगान ८८
सुहृदास ८९
करिं सुंदरि स्वरशृंगार ९०
तुझी माझी प्रीत ९१
नवी भूपाळी ९२
पारिजात ९४
आकाशाचें मनोगत ९४
कणव ९५
वारुणी रात ९६
तुझ्या तेजें ९८
अमृतघट ९९
किति दयाघना करितोस ऋणी ? १००
वैभव १०१
मुशाफिरा १०२
प्रसादाची वाट १०३
हिमालयास १०४
गेलें मिउनि मनांत १०५
माउलीचा खेळ १०५
दवरणें १०६
यापुढें १०७
रे, फुलेंच्च जड गमती हृदया। १०९
तेजोदेवतेस ११०
संधिकाल १११
हिरकणी ११२
हुषार भाई ११२
कवण तूं ११५
—स ११६
उरलें घरटें दूर ११७
विशाल भारत ११७
लोकसागरा ११८
सागरा १२१
क्षणभंगुर जरि जीवन १२१
निरोप १२२
माझ्या गीतांस १२३
फसवणूक १२३
कविवर भास्करास १२४
प्रमादाचा पिंगा १२५
माझ्या हिऱ्यास १२७

माझे अश्रू १२७
बाळ जन्मा आलें १२८
आपण दोघें लहरी ग १२९
तूं १३०
दूधसागरास १३१
पाण्याला ओढ लागली थोर १३२
मृगया १३३
ये पुढल्या दारानें १३४
राजा-राणी १३५
सावल्यांचें नृत्य १३६
संध्याकाळीं उमललेली कळी १३६
* कवि आणि कविता १३७
जलद भरुनि आले १३९
माता काली १४०
सूर्याचें प्रेमगीत १४१
ते कर मन्मातेचे १४२
* अमर सुंदरता १४३
अशि मारिशील न कुणाला ग १४४
उर्वशीच तूं जाया १४५
* भाताचें रोप २४६
* सोन्याची द्वारका २४७
* सानुल्या फुला २४८
विश्वामित्रास २४९
पांढऱ्या ढगास २५०
* भर सखि भर सखि
पुनश्च ओंजळ २५१
जन म्हणोत तुज दुसऱ्याची ग २५२
सुर्मेवाला २५३
बांगड्या १५५
पाठमोरी पौर्णिमा १५६
माझी बेगम १५८
* दीपजागृति १५८
धांवा ऐकून १५९
तुझें आगमन १६०
घरांतलें चांदणें १६१
* सांत्वन १६२
नवल १६३
व्याकुळ कर्णधार १६४
प्रीति तूझी १६५
सखि ये गे १६६
* भृंग १६७
स्मृति १६८
* गड्या उद्यांच्या दिसा १६९
रमणी आणि धरणी १७०
मुखवट्यास १७१
इमानी कुत्र्यास १७३
* कोठवरी सांग खुळे १७४
हरिच्या स्मरभुवनीं १७५
काळोखांतलें वाचन १७६
एक सायंचित्र १७७
आगीचें पांखरूं १७८
दुखणाइत दिवा १७९
काळास १८०
लाव दिवा १८१
* दे वर दे हृदयस्थ चिरंतन १८१
माझा छंद १८२
* असशिल जरि रसनिधि तूं १८३
* कशास येसी दारीं ! १८४
समुद्रकाठच्या चांदरातीस १८५
विफलतेंतील सफलता ! १८६
वृद्ध होऊं तेव्हां १८७
* तूं येणार म्हणून १८८

| | |
|---|---|
| *मी चढुनी येतां | १८९ |
| सागराला आली जाग | १८९ |
| सांध्यसुंदरी | १९० |
| स्त्रीस | १९१ |
| *कुसुमाग्रजास | १९३ |
| सागरास | १९४ |
| आमचें निशाण | १९६ |
| *हें नभ नक्षत्रीं भरलेलें | १९७ |
| *मनमोरास | १९८ |
| *गुरुवरमूर्तीस | १९९ |
| नकोच पाहुं वळून | २०० |
| *द्राक्षांचा घोस | २०१ |
| उर्वशीस | २०२ |
| जपानी रमलाची रात्र | २०४ |
| अशांतीचें गाणें | २०६ |
| घास भरवतांना | २०७ |
| निजल्यावर | २०७ |
| श्रावणदर्शन | २०८ |
| सायुज्य | २०९ |
| जीवनानुभूति | २११ |
| साद | २१४ |
| भिडली रात्र पहाटे | २१५ |
| *घालुं नको मज जन्मा तेथें | २१६ |
| सायंप्रार्थना | २१७ |
| गृहलक्ष्मीस | २१८ |
| स्पर्श | २१९ |
| सजवूं कार्तिकमास | २२० |
| *आंसवांचीं गाणीं | २२१ |
| कृतार्थ जीवित | २२२ |
| शांतीचा जयजयकार | २२३ |
| भंग्यांच्या घरीं | २२५ |
| रसवंतीस | २२६ |
| माडाचें भावगीत | २२७ |
| *स्वातंत्र्याची सिंहगर्जना | २२८ |
| *शांता-दुर्गा | २२९ |
| *हुतात्म्यांची जागृति | २२९ |
| सोळा वर्षांनंतर | २३० |
| *धृतराष्ट्रास | २३१ |
| *मरायचें नाहीं, उरायचें आहे | २३३ |
| खंजीर हे मारीत जा | २३४ |
| आकाशमाउलीस | २३५ |
| पंढरीस वाजे घंटा | २३६ |
| अंतरींच्या अश्रुंनो ! | २३७ |
| रात निळी रात निळी | २३८ |
| स्वातंत्र्याचा दीपोत्सव | २३८ |
| भगवती स्वतंत्रतेस | २४० |
| *गुरुवर अनुसर रे | २४१ |
| जीवन त्यांना कळलें हो | २४१ |
| डोळे तुझे बदामी | २४२ |
| माझ्यापरी | २४३ |
| अमृत खेंचुन आणूं भूवर | २४४ |
| तव नयनांचें दल हललें ग | २४५ |
| *कवि आम्हा हवा महान् | २४६ |
| तुझ्याजवळीं | २४७ |
| ये संध्ये जा कथुनी | २४८ |
| हासत लावा वज्रटिळा | २४८ |
| रुमडाला सुम आलें ग | २४९ |
| आणखीन् काय ? | २५० |
| खाईतला स्वर्ग | २५१ |
| *या उत्तररात्रीं | २५२ |
| *पुढें काय ? | २५३ |
| करीं मला वज्रदेही | २५३ |

| | | | |
|---|---|---|---|
| समजावणी | २५४ | मानिनीस | २८९ |
| शिव ते, द्या त्यांस पिंडावळ | २५६ | वरिष्ठांचीं दुरुत्तरें | २८९ |
| साबरमतीच्या कांठीं | २५६ | ताज | २९० |
| यमदर्शन | २५८ | आज तुझ्या घरिं आल्यें | २९१ |
| उःशाप | २६१ | हिरवळ आणिक पाणी | २९२ |
| हिमालयाची हांक | २६२ | अद्‌भुत वारा | २९३ |
| माझ्या मनाची 'माउ'ली ! | २६३ | मी नंदाघरची बावडि ग ! | २९४ |
| मला आपुलें म्हणावें | २६४ | मुक्या माझ्या व्यथा-कथा | २९५ |
| छेड अशीच शरीरसतार | २६५ | पावलें धारेच्याही पुढें | २९६ |
| * उषावतरण | २६७ | मी अश्रांत प्रवासी | २९७ |
| * क्षितिजाकडे | २६७ | मज लोभस हा इहलोक हवा | २९८ |
| तिरंगी झेंड्यास गोव्याचें निमंत्रण | २६८ | माझें घर | २९९ |
| स्वातंत्र्यलक्ष्मीस | २६९ | बारा मास एका क्षणीं | ३०१ |
| माझी पूजा | २७० | मलयसमीर | ३०१ |
| असलें हें फळ केंवि तपाला | २७२ | श्यामा | ३०२ |
| दे अंतीं तव गोडी | २७३ | सुटलेलें वेड | ३०३ |
| आमार जीबनइ आमार बानी | २७४ | भिजले घुंगुर | ३०४ |
| घेऊं लक्षुमीला घरीं | २७५ | डाळिंबीची डहाळींशी | ३०४ |
| आळंदीची वाट | २७६ | यौवनाचें झाड | ३०५ |
| वास्तवता मज न दिसे | २७७ | अजब आगळी | ३०६ |
| चिरंतनाचा ध्यास | २७८ | काळी माया | ३०७ |
| खवीस | २८० | माझा हाला | ३०८ |
| धन नाहीं हें पाणी | २८० | मामाचा वाडा | ३१० |
| कानफाट्याचा फटका | २८१ | मीलनक्षेत्र | ३११ |
| अजून थोडें सोस मना | २८२ | मृदुमदगति ती येते जेव्हां | ३१२ |
| खिडक्यांवर वाजे वारा | २८३ | शारदेचा भुत्या | ३१४ |
| माझ्या गोव्याच्या भूमींत | २८४ | झाडें झालीं निळीं निळीं ! | ३१५ |
| काळ बोले | २८७ | हिमाद्रिहुनी भव्य नक्षत्रमौली ! | ३१५ |
| जळीं पहांटे शुक्र बिंबला | २८८ | सुवर्णकेशी | ३१६ |
| तुझी माया | २८९ | तूं तुझाच दीप | ३१७ |
| | | ज्ञानदेव गेले तेव्हां | ३१८ |

अनुक्रम 2220 ... १५/२६४

| | | | |
|---|---|---|---|
| तिमिरांतुन ज्योतिकडे | ३१९ | चित्रवीणा | ३३७ |
| कामद्रुमाची डहाळी। | ३२० | मागणें | ३३८ |
| हृदयच जेव्हां होतें कोकिळ | ३२१ | पेटलों मी फार आतां | ३३९ |
| तोच पूर्वीचाच सुर्मा | ३२२ | भगवी रतन-अबोली वेणी | ३३९ |
| हीच हीच ती सागरवेला | ३२२ | मंद असावें जरा चांदणें | ३४० |
| आतां नाहीं जवळ नि दूर | ३२५ | भिजून आल्या ग | ३४० |
| आकाशाचा छंद | ३२७ | मोकळें किति वाटे | ३४१ |
| झालें हवेचेंच दहीं। | ३२७ | पाउस रात्रीं होउनि गेला | ३४२ |
| अपरिचिते | ३२८ | घनसगर्भ नजर एक | ३४३ |
| विरले सगळे सूर | २२९ | मंदावतां सगळीं उन्हें | ३४३ |
| तोंवरी गाऊन घे | ३२९ | कौलारावर लाल खेळतो | ३४४ |
| कळकाचें पातें | ३३० | सरिंवर सरी आल्या ग | ३४४ |
| वळून बघतां मागें | ३३१ | तुला पहावें | ३४५ |
| तत्त्वज्ञानी | ३३१ | आज पहाटे | ३४६ |
| प्रार्थना | ३३२ | नजर तुझी | ३४८ |
| वाढल्या सांजवेळे | ३३३ | वाटच होती बघायची तर | ३४८ |
| सुखा नाहीं चव | ३३४ | घाव राहो वाहता हा | ३४९ |
| फांद्यामधुनी चंद्र दिसावा | ३३५ | तें स्वप्न एक होतें | ३४९ |
| दीस कसा तरि जातो | ३३६ | जळण्यांतहि सुख आहे | ३५० |
| क्षितिजीं आलें भरतें ग। | ३३६ | | |

**बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद १४**
**परिशिष्टें व सूचि ३५१**

कविवर्य बा. भ. बोरकर यांना ता. ३० नोव्हेंबर १९६० रोजीं पन्नास वर्षे पूर्ण होऊन एकावन्नावें वर्ष लागतें. त्या निमित्ताने त्यांच्या समग्र कवितांचा हा संग्रह केला आहे. या संग्रहांत १९२६ ते १४ ऑक्टोबर १९६० या काळांत त्यांनी लिहिलेल्या कवितांपैकी बहुतेक सर्व उपलब्ध कविता एकत्र केल्या आहेत. 'प्रतिभा', 'जीवनसंगीत', 'दुधसागर' व 'आनंद-भैरवी' हे काव्यसंग्रह ह्यांत आहेत, तसेंच 'जीवनसंगीत' आणि 'दूधसागर' यांच्याच काळांत लिहिलेल्या पण त्या संग्रहांत समाविष्ट न केलेल्या बहुतेक कविता या पुस्तकांत घेतल्या आहेत (आणि त्या कविता अनुक्रमणिकेंत * अशा खुणेने दाखविल्या आहेत.) : ज्या कवितांत फिकट पुनरुक्ति वाटली, किंवा ज्या फार कच्च्या वाटल्या, अशा सातआठ कविता बोरकरांच्या संमतीने वगळल्या आहेत. त्याचप्रमाणे प्रकाशित संग्रहांतील किंवा असंग्रहित कवितांतील भाषांतरेंहि गाळलीं आहेत. 'आनंदभैरवी'नंतर गेल्या नऊदहा वर्षांत केलेल्या कवितांपैकी निवडक कवितांचा संग्रह 'चित्रवीणा' या नावाने याच सुमारास प्रसिद्ध होत आहे; त्या समग्र संग्रहाचा या पुस्तकांत समावेश केला आहे.

कवितासंग्रहांना बोरकरांनीं लिहिलेलीं प्रास्ताविकें तेवढींच परिशिष्टांत दिलीं आहेत. समग्र कवितांचा संग्रह करतांना केवळ पुस्तकें एकत्र करण्या-ऐवजी कविता रचनेच्या कालानुक्रमाने देणें इष्ट वाटलें. फक्त 'ताज' ही कविता चुकून पुढे गेली आहे; तिचा लेखनकाल १०-९-४० असल्यामुळे ती 'सानुल्या फुला' व 'विश्वामित्रास' यांच्या मध्ये हवी. त्याचप्रमाणे ९८ क्रमांकाच्या कवितेंत 'दवरणें' हा शब्द 'दरवणें' असा चुकीचा छापला गेला आहे. तो शुद्ध करून घ्यावा.

या संग्रहाच्या निमित्ताने बोरकरांच्या काव्यावर रसग्रहणात्मक निबंध मीं लिहावा, अशी प्रथम कल्पना होती. तथापि माझ्या विवेचनाबरोबरच खुद्द बोरकरांच्याहि प्रतिक्रियांची नोंद झाली, तर रसिक वाचकांस त्यांच्या काव्याचें दर्शन अधिक जिव्हाळ्याने घेतां येईल, या हेतूने आम्हीं दोघांनी चर्चात्मक संवादाच्या रूपांत ही प्रस्तावना लिहिली आहे.

—मंगेश पाडगांवकर

# बोरकरांची कविता : एक चर्चात्मक संवाद

**पाडगांवकर :** आपण कविता लिहावी असं तुम्हाला कां वाटलं?

**बोरकर :** कविता ही लिहायची असते हेंच आधी मला माहीत नव्हतं! जशा नद्या असतात, डोंगर असतात, नक्षत्रं असतात, तशाच कविताहि—पदं आणि गाणीं—असतात, असा माझा आपला भोळा समज. कविता हा शब्ददेखील त्या वेळीं माझ्या कानावर पडला नव्हता. सकाळीं भूपाळ्या आणि स्तोत्रं, दुपारीं घरच्या स्त्रियांच्या तोंडचं 'शिवलीलामृत', उन्हं ओसरायच्या सुमाराला घरांतल्या मावस आजीचा कुठला ना कुठला पाठ, आणि रात्रीं भजनांत संत कवींची निवडक रचना माझ्या कानावर पडत होती; प्रयासाशिवाय मला पाठ होत होती.

गावांतलीं नाटकं आणि भजनी सप्ताह यांच्यामुळं नाट्यसंगीत आणि भक्ति-संगीत पुष्कळच ऐकायला मिळे. माझा गळा चांगला होता; आणि ऐकलेलं मला चटकन मुखोद्गत होई. त्यामुळं घरांत कोणी पाहुणा आला की मला माझ्या पाठांतराची संथा द्यावी लागे. वाट्याला येणाऱ्या अमाप कोडकौतुकामुळं मीं हें सारं उत्साहानं करूं लागलों. चातुर्मासांत 'पांडवप्रताप', 'हरिविजय', 'आर्याभारत' वगैरे ग्रंथ आमच्या चौसोपीवर वाचले जात, तेहि कानावर पडत. हें सारं, मला वाटतं, माझ्या मनांत कुठे तरी साचत चाललं होतं.

पात्रीस नावाचा एक म्हातारा भंडारी माडी काढायला जातांना एखादे वेळीं थोडा वेळ आमच्याकडे राही, आणि एखादं कोकणी गाणं मला शिकवी. आमच्या घराशेजारच्या किरिस्तांव भंडाऱ्यांच्या वाडींत एक लग्न होतं. तिथं वडील मला घेऊन गेले. पंक्ति बसल्या होत्या. आणि जमलेली मंडळी पात्रीसला 'शिळोक' म्हणण्याचा आग्रह करीत होती. लोकाग्रहास्तव पात्रीसनं लग्नांतल्या घटनांवर आधारलेलं आपलं शीघ्रकाव्य म्हणायला सुरुवात केली. तो एक कटाव होता.

कविता ही कुणी तरी 'रचीत' असतो हें इथं मला पहिल्यांदा कळलं. मला हा मोठाच चमत्कार वाटला आणि अशीच रचना आपल्याला करतां यावी असं मला वाटूं लागलं.

**पाडगांवकर :** बोरकर, ही हकीकत घडली तेव्हा तुमचं वय किती होतं? त्या वेळीं शाळेंत जात होतां का तुम्ही? पुस्तकांतल्या कविता, त्यांचे कवि ही माहिती मास्तरांनी सांगितली नव्हती तुम्हांला? आणि ऐकलेल्या अभंगांतसुद्धा 'नामा म्हणे', 'तुका म्हणे' हे शब्द तर कानावरुन गेलेच असतील तुमच्या! म्हणजे जो साक्षात्कार पात्रीसमुळं झाला, तो खरं म्हणजे सर्वसामान्य माहिती अशाच स्वरूपांत परिचित व्हायला हवा होता.

**बोरकर :** त्या वेळीं माझं वय आठनऊ वर्षांचं असेल. गावांत शाळा अशी नव्हतीच. कोकणांतून मास्तर येत आणि ते घरच्या घरींच आम्हाला शिकवीत. त्यांतला एकहि मास्तर चारसहा महिन्यांच्यावर टिकत नसे. त्यामुळं माझं मराठी शिक्षण दोन इयत्तांपलीकडे जाऊं शकलं नाही. पुस्तकांतली कविता मास्तर पाठ करून घेत; पण त्या समजावून सांगणं किंवा कवीची माहिती देणं त्यांच्या गावींहि नव्हतं. या साऱ्या प्रकाराला कंटाळून मी नवव्या वर्षींच पोर्तुगीज शाळेंत दाखल झालों. 'नामा म्हणे', 'तुका म्हणे', 'सोयरा म्हणे' हें रोज कानावरून जात होतं; पण कसं कोणाला माहीत, माझं त्याकडे ध्यान गेलं नाही. मला वाटतं, तें वयच असं असतं की एकादी सूक्ष्म गोष्ट सहज लक्ष्यांत येते, आणि सर्वसामान्य गोष्टींकडे दुर्लक्ष होतं. 'नामा म्हणे', 'तुका म्हणे', या गोष्टीकडे माझं ध्यान पात्रीसच्या या 'काव्यगायना'नंतरच प्रथम गेलं.

**पाडगांवकर :** तुम्हीं पहिली कविता केव्हा लिहिलीत?

**बोरकर :** घरांतल्या रोजच्या भजनांत ठराविक अभंग आणि पदं विशिष्ट अनुक्रमानं गायलीं जात; आणि तें आटोपल्यावर, विशेषतः आम्हा मुलांना, नवीन पद किंवा अभंग म्हणायचा असे. एक दिवस मी हें विसरून गेलों. आणि काळोख पडायच्या सुमाराला मला या गोष्टीची आठवण झाली. माडीवर जाऊन मीं स्वतःच अभंग रचला आणि तोच त्या दिवशींच्या भजनांत म्हटला. घरच्या मंडळींनी साथ दिली. पण शेवटीं 'बाकी म्हणे' ही ओळ येतांच सारेच चमकले. भजन संपल्यावर चुलत्यांनी मला बोलावून घेतलं आणि संतांच्या अभंगांत आपलं नाव घुसडणं पाप आहे अशी मला समज दिली. संत झाल्याशिवाय अभंग करायचा नसतो अशी आजीनं ताकीद दिली आणि "तूं थोरला मुलगा आहेस, तुला संसार चालवायचा आहे" असं सांगून अभंग न करण्याबद्दल माझ्याकडून

वचन घेतलं. कविता करण्याची उबळ अधूनमधून मला येत होती : पण शब्द देऊन चुकल्यामुळं मी ती आंतल्या आंत दावून टाकीत होतों. पण सहासात वर्षांनी एक अकल्पित घटना घडली, आणि कवितेनं मला कायमचं झपाटलं.

**पाडगांवकर** : कुठली अकल्पित घटना ?

**बोरकर** : सांगितलं तर हसाल तुम्ही ! मी त्या वेळीं इंग्रजी तिसरींत होतों. सकाळची वेळ होती. जनरल इंग्लिशचा क्लास होता. शाळेच्या प्रिन्सिपॉलनी माडीवर जाऊन मला खडूच्या कांड्या आणायला सांगितलं ! तिकडे गेल्यावर एका रंगीत चित्रांच्या पुस्तकावर माझं लक्ष गेलं; आणि तें चाळतां चाळतां मी भान विसरून गेलों. इतक्यांत कुणीं तरी मागून माझे डोळे झाकले ! तो माझा वर्गमित्र पाइस् असावा असं वाटून मीं हात धरले, तो ते मऊ लुसलुशीत लागले ! चमकून मीं मागं वळून पाहिलं. तोंच मार्गारीदनं पटकन् माझा मुका घेतला ! —आणि हसतहसत ती खाली पळाली. माझ्या भोवतालचं सारं जग एका क्षणांत पालटलं आणि सर्वत्र काठोकाठ सौंदर्य भरून गेलं आहे असा अननुभूत साक्षात्कार मला झाला. जिना उतरतांना तोदेखील झुलतो आहे असं मला वाटलं. मी वर्गांत येऊन बसलों. पण माझं कांही त्या मुलीकडे लक्ष गेलं नाही. मी कुठल्या तरी दिव्य जगांत जाऊन पोचलों होतों. त्या रात्रीचं तें धुंद चांदणं मला अजून दिसतं. तसं चांदणं मीं पुन्हा कधी पाहिलं नाही. उत्तररात्रीपर्यंत मी त्या चांदण्यांत हिंडत होतों आणि एकसारखा गुणगुणत होतों—

Robin, Robin, red-breast
Oh ! Robin dear
Robin sings so sweetly
In the falling of the year.

**पाडगांवकर** : बोरकर, हें स्वप्न सांगितलंत की वस्तुस्थिति ? मला तर सारखा हेवा वाटत होता हें सारं ऐकतांना ! एकूण हें तुमचं दुखणं बरंच जुनं आहे तर ! ! तुमचं पहिलं 'नंदनवन' याच वेळीं तुम्हाला आढळलं असं म्हणायला हरकत नाही ! !

**बोरकर** : मला वाटतं, कधी कधी आपलं स्वप्नच आपल्याला वस्तुस्थितींतून आढळत असावं ! निदान माझ्या बाबतींत तरी तें तसं घडलं !

**पाडगांवकर** : या घटनेचा तुमच्या लेखन-प्रवृत्तीवर कांही खोल परिणाम झाला आहे असं तुम्हाला वाटतं का ?

**बोरकर** : हो, वाटतं ! मानसशास्त्राच्या परिभाषेंत ज्याला psychological

fixation म्हणतात, तसा कांहीसा प्रकार माझ्या मनोधर्माच्या बाबतींत झाला असावा. प्रीतीच्या जिवंत उत्कट प्रत्ययाशिवाय माझ्या 'नंदनवना'चीं दारं मला उघडीं होत नाहीत! असंच कांही तरी अकल्पित घडावं लागतं. निसर्गाचं वेड आणि ईश्वराची ओढ या प्रसंगीं हाताला लागणाऱ्या या 'नंदनवना'च्या आणखी दोन किल्ल्या.

**पाडगांवकर** : तुम्ही आपल्या पहिल्यावहिल्या कविता कोणाला दाखवीत होतां? कुणाकडून तुम्हाला मार्गदर्शन मिळालं?

**बोरकर** : आमच्या घरांत कविता करणं हा छांदिष्टपणाचा प्रकार समजला जात असे; आणि मला तर छांदिष्ट म्हणूनच काढलं होतं. त्यामुळं मी कविता करीत असें त्या चोरून!! बरींच वर्षं मीं त्या कुणाला दाखवल्याहि नाहीत. कवि काऱ्यांचे वडील आपला संशोधनाचा उद्योग आमच्याकडे राहून करीत असत. ते एकदा फार आजारी झाले. आणि त्या निमित्तानं कवि काऱ्यांचा आणि माझा स्नेह जमला. आम्ही एकमेकांना आपल्या कविता दाखवूं लागलों. त्यांच्याच मुळं बालकवि, गोविंदाग्रज, टिळक, केशवसुत, यशवंत, वगैरेंची कविता मला वाचायला मिळाली. मला कांही मार्गदर्शन मिळालं असलं तर तें या कवींच्या अत्यंत आवडलेल्या कवितांतूनच.

**पाडगांवकर** : यांपैकी कोणत्या कवींची मोहिनी तुमच्या मनावर विशेष पडली?

**बोरकर** : माझ्यावर खरीखुरी मोहिनी पडली ती बालकवींची; आणि त्यांच्या खालोखाल गोविंदाग्रजांची. इतर कवींच्या बाबतींत त्यांच्या कांही कवितांनी मला असाधारण भुरळ पाडली, एकाद्या कवीचा एकादा गुण मला विलोभनीय वाटला, पण या कवींपैकीं कुणालाहि गुरुपद द्यावं असं मला वाटलं नाही.

**पाडगांवकर** : त्या वेळीं तुम्हाला कविता कशी सुचत असे?

**बोरकर** : पाडगांवकर, या प्रश्नाचं उत्तर देण्यापूर्वी माझ्या धडपडीची थोडीशी कल्पना मला द्यावी लागेल. घरांत आम्ही बोलत होतों कोंकणी. लोकव्यवहारहि कोंकणींतच चालत होता. मराठी दोन इयत्तांपलीकडे माझं शिक्षण झालेलं नव्हतं. एकाद्या कवितेच्या वाचनानं मनाला चटका लागला म्हणजे मी कवितेच्या जगांत विहार करीत होतों. कधी एकाद्या चालीच्या मोहिनीमुळं, कधी कवितेंतल्या वातावरणामुळं, तर कधी आशयाच्या नवलाईमुळं मी कविता गुणगुणूं लागायचों. भाषा आणि छंद आपल्या पकडींत यावे यासाठीच माझी अर्धीअधिक शक्ति त्या वेळीं खर्ची पडत असावी; त्यामुळं माझ्या आशयाची पृथगात्मता बाजूला पडून पूर्वसूरींचेच सूर प्राधान्यानं त्यांत प्रकट झाले.

**पाडगांवकर** : हें झालं मराठी कवींच्याविषयी. परभाषेंतले कोणते कवि तुमच्या वाचनांत आले होते ?

**बोरकर** : १९३०पर्यंत तरी पोर्तुगीज कवि मीं फारसे वाचले नव्हते. क्वचित् एकाददुसरी कविता वाचली असेल. पण बालकवि-गोविंदाग्रजांप्रमाणं कोणाहि पोर्तुगीज कवीनं त्या वयांत माझं चित्त आकृष्ट केलं नाही. १९२६ ते ३० सालच्या दरम्यान मीं बरीचशी इंग्रजी कविता वाचली. त्या काळांत 'Golden Treasury' तर मीं वाचली होतीच; शिवाय शेले, कीट्स्, बायरन् आणि टेनिसन मीं विशेष आवडीनं वाचले.

**पाडगांवकर** : तुमच्या कवितेच्या शब्दकळेवरून अनेकांचा असा ग्रह होतो की, संस्कृत काव्याचं तुम्हीं मोठं मार्मिक अध्ययन केलेलं असावं. हें कितपत खरं आहे ? संस्कृत काव्य तुम्हीं केव्हा वाचलंत ?

**बोरकर** : माझ्या मराठी शिक्षणाची वाताहत मीं तुम्हाला सांगितलीच. जिथं मराठीची ही गत, तिथं आमच्या नशिवीं संस्कृत कुठलं ? जो कांही संस्कृत वारसा माझ्या कवितेंत तुम्हाला दिसतो तो मला मिळाला संत-पंतांच्या कवितेंतून —विशेषतः 'ज्ञानेश्वरीं'तून. 'ज्ञानेश्वरी' अकराव्या वर्षी माझ्या हातीं आली... आणि अजून मी ती वाचतों आहें. तेव्हा हें सारं वैभव त्या मायमाउलीचं ! संस्कृत काव्याच्या अभ्यासांत मीं लक्ष घातलं तें अगदी अलीकडे, पुण्याला आल्यावर —म्हणजे १९४८ सालापासून. शब्दाच्या सौंदर्याचं आणि संगीताचं मला लहानपणापासून वेडच आहे. मुलं लोलक जमवतात तसे मी ते जमवीत गेलों. अशा शब्दांची संस्कृतांत नुसती रेलचेल आहे.

**पाडगांवकर** : गोव्याच्या जीवनाचं वैशिष्ट्य आपण व्यक्त करावं असं तुम्हाला या कालखंडांत वाटत होतं का ? 'प्रादेशिक वाङ्मय' हा शब्द तुमच्या कानावरून त्या वेळीं गेला होता का ?

**बोरकर** : १९३० सालापर्यंत तरी गोव्याच्या जीवनाचं खास असं कांही वैशिष्ट्य आहे आणि आपल्याला तें व्यक्त करायचं आहे, याची डोळस जाणीव मला नव्हती. गोव्यांत असेपर्यंत सारं जग गोव्यासारखंच आहे असंच मीं धरून चालत होतों. १९२६ सालीं मी धारवाडला शिक्षणासाठीं गेलों, तेव्हा कुठं मला गोव्याचा निराळेपणा गोव्याच्या वियोगामुळं अधिकाधिक जाणवत गेला. पण तो आपण प्रकट केला पाहिजे हा विचार मात्र मला शिवला नाही. 'प्रादेशिक वाङ्मय' हा शब्दप्रयोगदेखील पहिल्या प्रथम माझ्या कानावर पडला तो

१९३०च्या मडगावच्या मराठी साहित्य संमेलनांत—सुखटणकरांच्या 'सह्याद्रीच्या पायथ्याशीं' या कथासंग्रहाच्या संदर्भांत.

**पाडगांवकर** : 'प्रतिभा' हा तुमचा काव्यसंग्रह मीं फार पूर्वी वाचला होता. तुमचा तो पहिलाच संग्रह एवढ्याचपुरतं माझं कुतूहल तेव्हा मर्यादित होतं. या चर्चात्मक संवादाच्या निमित्तानं पुन्हा बऱ्याच वर्षांनी मीं हें पुस्तक वाचलं. अनेक गमतीच्या गोष्टी मला या कविता वाचीत असतांना जाणवल्या. पहिली गोष्ट मला जाणवली ती अशी : संतांचं वाङ्मय कानांवरून गेल्यामुळं काव्याचे संस्कार तुमच्यावर झाले असं तुम्ही म्हणतां. पण 'कातरवेळेनंतर' या एका कवितेचा अपवाद सोडला, तर या काव्याचे संस्कार 'प्रतिभे'तल्या कवितेवर कुठंच जाणवत नाहीत हें कसं ?

**बोरकर** : त्याला कारण मीं आजीला दिलेल्या वचनांत असावं. अभंग लिहायचा नाही म्हणजे संतांच्यासारखी रचना करायची नाही, असं मीं माझ्या मनाला पटवलं असावं. ज्या एका कवितेचा तुम्हीं उल्लेख केला आहे ती भावातिरेकाच्या असावध क्षणांत निर्माण झाली असेल एवढंच मला म्हणतां येईल.

**पाडगांवकर** : तुम्ही सांगतां तें कारण असू शकेल—तसं ते महत्त्वाचं आहेहि—पण त्यानं पुरतं समाधान होत नाही. कारण असं की काव्याची निर्मिति पुष्कळशी अंतर्मनाच्या गूढ प्रक्रियेनुसार होत असते. आणि तुम्ही म्हणतां त्या 'असावध क्षणा'चा फार मोठा भाग काव्यनिर्मितींत असतो. संतांच्या काव्याची शब्दकळा, त्यांनी वापरलेलीं वृत्तं, त्यांच्या अनेक गाण्यांच्या चाली या सावध अनुकरणाच्या स्वरूपांत नव्हे, तर मुरलेल्या संस्कारांच्या स्वरूपांत तुमच्या शैलींतून अडखळत, धडपडत कां होईना, पण दिसायला हव्या होत्या. तशा त्या दिसत नाहीत याचं कारण, मला वाटतं, त्या कालखंडांतच असावं. गडकरी, बालकवि, केशवसुत, टिळक, बी, गोविंद यांच्या संस्कारांतून तेव्हा कविता आकार घेत होती—त्यांतली बरीचशी स्थूल अनुकरणात्मकच होती. सूक्ष्मतरल इंद्रियसंवेदना टिपून त्यांतून सौंदर्याकृति निर्माण करण्याची बालकवींची ताकद या कवींत नव्हती—आणि त्यामुळं 'ललित-लुलित' शब्दांत बांधलेल्या उपमा-उत्प्रेक्षांच्या उतरंडीच काव्य म्हणून खपत होत्या. त्यांच्याजवळ शब्दांची क्रीडा करणारी गोविंदाग्रजांची भव्योत्कट कल्पनाशक्ति नव्हती—होता तो नुसता अनुप्रासयुक्त शब्दांचा पोकळ, पोरका खेळ. आणि अशा तऱ्हेच्या रचनेंतच काव्य आहे अशी बऱ्याच तरुण कवींची समजूत असावी. या समजुतीमागं काव्याविषयीची अमाप हौस होती, कांही विषयांची निवड हे कवि कळकळीनंहि करीत असत—

पण या कळकळीची अभिव्यक्ति मात्र वाङ्मयीन संकेतांच्या शेवाळाखेरीज कांही निर्माण करूं शकत नव्हती.

तुमची 'प्रतिभा' या संग्रहांतली कविता माझं लक्ष वेधून घेते : कारण त्या कालखंडांतल्या वाङ्मयीन प्रवाहाचं, संकेतांचं, *cliches* चं दर्शन मला ती वाचीत असतांना होतं. हें दर्शन मला वाटतं फार महत्त्वाचं आहे. कारण कोणत्या नव्या दिशेनं कवींना आपलं व्यक्तिमत्त्व प्रकट करणं भाग होतं त्याची सूचना यांतून मिळते.

**बोरकर :** तुम्ही म्हणतां तें बव्हंशीं खरं आहे. मराठी भाषा आणि मराठी छंद घटवण्यांतच माझी अर्धीअधिक शक्ति त्या काळांत खर्चीं पडल्यामुळं माझ्या पृथगात्मतेचा अंकुर जोमानं वर येऊं शकला नाही, अशा अर्थाचं विधान मीं या-पूर्वी केलेलं आहे. पण तशा स्थितींतल्या 'प्रतिभे'तल्या कवितेंतील पूर्वसूरींच्या सुरांबरोबरच माझे स्वतःचे सूरदेखील कुठं कुठं, क्षीणपणं कां होईना, तुम्हाला डोकावतांना दिसतील.

**पाडगांवकर :** मला वाटतं, बोरकर, 'प्रतिभा' या संग्रहांतली कविता तुमच्या बरोबर वाचावी : त्या कालखडांतलं मराठी काव्यांतल्या संकेतांचं स्वरूप समजून घेण्यासाठी. प्रथम आपण त्यांतल्या प्रेमकवितांकडे वळूं. या कविता लिहितेवेळीं १८-१९ वर्षांचं तुमचं वय होतं. पौगंडावस्थेचा हा काळ. स्वप्नाळू हुरहुरींचं तेव्हाचं जग असतं. अनुभवाच्या दृष्टीनं कदाचित् या काळांत सखोल-संमिश्र अशी कविता लिहून होणार नाही. पण स्वप्नाळू प्रणयाच्या या धुक्यांत कोरलेल्या चित्रांतहि एक गंमत असते, त्या नव्हाळींतल्या उमाळ्या-उसाशांचं एक काव्यात्म जग असतं. पण तुमच्या या कवितांत प्रणयाचं हें उत्कट, स्वप्नाळू विश्व एकाद्या कवितेचा अपवाद ('माझी आगबोट चालली') सोडल्यास फारसं आढळत नाही. या कविता प्रेमाच्या अनुभवांतून स्फुरलेल्या नाहीत : प्रेमाविषयी कवीच्या कांही कल्पना आहेत—उसन्या कल्पना आहेत—आणि त्यांतून या कवितांचा जन्म झालेला आहे. 'प्रीतीचा तिळगुळ' ही क्लृप्तिवजा कविता याचं प्रातिनिधिक उदाहरण म्हणून घेतां येईल. या सगळ्या कवितांतून जाणवणारी प्रेयसी ही हाडामांसाची, जिवंत भावनांची वाटत नाही. हातीं पडतात त्या तिच्याविषयीच्या सांकेतिक कचकड्याच्या कल्पना.

**बोरकर :** त्या पौगंडावस्थेच्या वयांत जी प्रेमकविता माझ्या वाचनांत आली होती तीच मुळी काल्पनिक प्रेयसीवरची आणि कल्पनांनी नटवलेली असे. प्रेयसी एक वेळ खरी असली, तरी तिच्याविषयी जें खरंखुरं वाटतं तें आपण सांगू

लागलों तर त्यांतून आपल्या खऱ्या प्रेयसीचा छडा लागायचा, या भीतीनं कवि तिला लोकसंमत आणि शिष्टमान्य संकेतांच्या आवरणांत लपवीत असत!! काव्यांतील या तत्कालीन दंडकाला मीहि बळी पडलों, असं त्या वेळच्या माझ्या कवितेचं परिशीलन करतांना आता मला दिसतं. वस्तुतः ज्या कवितेचा उल्लेख तुम्हीं नुकताच केला ती हाडामांसाच्या प्रेयसीलाच उद्देशून होती. पण माझ्या मनावरचं तत्कालीन संकेतांचं कवच तेव्हा गेलेलं नव्हतं. तें 'माझी आगबोट' या कवितेंत गळून पडलं आहे. तसं पाहिलं तर ही कविता त्या कवितेच्या आधी लिहिली गेली आहे. मग असं कां व्हावं ? याला उत्तर एवढंच की आंतला जोर जेव्हा तीव्र असतो तेव्हा आपलं खरं व्यक्तित्व बोलूं लागतं आणि जेव्हा भावना क्षीण असते तेव्हा ती संकेतांनी तिला सजवीत-नटवीत असते.

**पाडगांवकर :** कचकड्यांच्या या 'प्रीतिदेवतां'चं रहस्य तुमच्या कारणमीमांसेनं बरंचसं उलगडतं. रविकिरणमंडळांतल्या कवींच्या बऱ्याचशा प्रेमकविता वाचीत असतांना पुष्कळ वेळां मला अशाच तऱ्हेचं तीव्र असमाधान वाटत असतं. लावणीवाङ्मयांतलं प्रणयाचं चित्रण बरंचसं उत्तान आहे. (उत्तान आहे म्हणून कांहीच बिघडत नाही!) त्यांतली जोरकस धुंदी जिव्या सुपारीसारखी काळजाला भिडते. 'भाळिं कुंकवाची चिरी जशी काय लाल लाल मिरची पिकली' यांतला अस्सल ठसका या खोट्या पण गुळगुळीत सफाईनं लिहिल्या गेलेल्या प्रेमकवितांच्या काळांत आपण पार हरवून बसलों. तुम्ही मात्र ही वाट फार काळ चुकलां नाही. नाही तर 'स्पर्श', 'स्मृति', 'रमलाची रात' यांसारख्या उत्कृष्ट कवितांची निर्मिति अशक्यच होऊन बसली असती.

**बोरकर :** त्या काळीं स्वतःच्या पत्नीशीं आणि स्वतःच्या घरांत देखील पांढरपेशा माणसाला मनमोकळेपणानं शृंगार करतां येत नसे. एवढंच काय, आपल्या मुलाचा मुकाहि वडील माणसांसमोर घेतां येत नसे. त्यामुळं या समाजाचा सारा शृंगार चोरूनच व्हायचा. शृंगार, मग तो घरांतला असो की घराबाहेरचा असो, उघडपणं बोलणं हें अशिष्ट समजलं जात होतं. जो खालचा समाज म्हणून गणला गेलेला होता त्याचं जगणंवागणं आमच्यासारखं दांभिक नीतीनं ग्रासलेलं नव्हतं. आमच्या मानानं तो समाज किती तरी मोकळा आणि म्हणूनच धीटहि होता. त्यामुळं त्यांच्या लावणीवाङ्मयांतला जातिवंत जिवंतपणा आपणाला जिव्या सुपारीसारखा झोंबतो. आमची सुपारी वाळलेली आणि पुटं चढवून मऊ केलेली. त्यामुळं त्या वेळचा आमचा प्रेमकवि राधाकृष्णाचा आडोसा तरी घ्यायचा किंवा प्रेमाच्या शिष्टमान्य कल्पनांचा आपल्या खऱ्या भावनेवर साज चढवून तिचा

तोंडवळा कवितेंत लपवून टाकायचा. माझ्या विधानाची सत्यता तुम्हांला पडताळून पाहावयाची असेल तर आपल्यांतील चांगल्या कवींनी आपल्या पत्नीवर जीं मनापासून कवनें लिहिलीं तीं त्या मानानं किती खरीं वाटतात पाहा.

मी फार काळ वाट चुकलों नाही याला माझ्या मतें दोन कारणं घडलीं. विसाव्या वर्षीं माझं लग्न झालं. त्यामुळं प्रणयाचा प्रत्यक्ष अनुभव मिळून माझा संकोच बराचसा चेपला गेला. दुसरं, त्या कालावधींत ख्रिस्ती समाजांतलं माझं दळणवळण वाढलं. गोव्यांतला ख्रिस्ती समाज बऱ्हंशीं लॅटिन संस्कृतींत वाढलेला असल्यामुळं शृंगाराच्या बाबतींत तो अधिक प्रांजल, सौंदर्यासक्त आणि प्रीतींतल्या धिटाईचं कौतुक करणारा आहे. स्त्रीच्या सहवासांत योग्य वेळीं चातुर्यानं तिला उद्देशून समुचित gallantry फेकणं हें त्यांच्यांत सुसंस्कृतपणाचं लक्षण समजलं जातं. त्या समाजांत वावरल्यामुळं माझी भीड चेपली आणि प्रेमभावना खरी असेल तर तिचा विमुक्त आविष्कार करण्यांत कसलाच कमीपणा नसून उलट पुरुषार्थच आहे असं मला वाटूं लागलं. 'प्रतिभा' आणि 'जीवनसंगीत' यांच्या मधल्या काळांतले माझे दोन छोटे हस्तलिखित कवितासंग्रह मी माझ्या गलथान व्यवहारांत हरवून बसलों. ते आज हाताशीं असते तर त्या काळांत माझ्यांत घडलेल्या या पालटाचीं कांहीं प्रभावी प्रात्यक्षिकें तुम्हांला पाहायला सापडलीं असतीं.

**पाडगांवकर** : तुमच्या प्रेमकवितांप्रमाणंच निसर्गकवितांचा अभ्यासदेखील, मला वाटतं, असाच उद्बोधक ठरेल : 'प्रतिभे'नंतरच्या तुमच्या निसर्गकवितांचं मराठी काव्यांतलं स्थान वैशिष्ट्यपूर्ण असल्यामुळं तर हा अभ्यास विशेषच उद्बोधक वाटेल.

या कालखंडांत गोव्याच्या निसर्गसुंदर जगांत तुम्ही राहत होतां. स्वाभाविकच रसरंगरूपाचं हें जग तुमच्या काव्यांतून उमलावं असं रसिकाला वाटणारच. पण प्रत्यक्ष तुमच्या कविता वाचतांना काय आढळतं? या जगाचा प्रत्ययच कुठं येत नाही. तुमच्या या कवितेंतून व्यक्त होणारी निसर्गाची मूर्ति तुमच्या डोळां जडलेली नाही; तुमच्या अनुभूतीचा ती अपरिहार्य भाग बनत नाही. क्वचित् कांही ओळींचे अपवाद आहेत—पण ते अपवादच ! या अपवादभूत ओळी असाधारण आहेत अशांतला भाग नाही. पण एका वेगळ्या कारणासाठी त्या मला महत्त्वाच्या वाटतात. 'चिमणें जगत्' या कवितेंतल्या दोन ओळी पाहा .

*आनंदानें गुरें हांकिलीं फणसाच्या पानांचीं*
*त्यांहि बिचाऱ्यां गोडी होती गवताविण कुरणांची*

यांतलीं 'फणसाच्या पानांचीं गुरें' ही प्रतिमा कोंकणांतला निसर्ग भोगलेल्या

मनांतून स्वाभाविकपणं येणारी आहे—आणि ही प्रतिमा बालपणांतल्या निर्व्याज विश्वाशीं एकरूप होऊन व्यक्त होते. त्यामुळं एक प्रकारचा सच्चेपणा ही ओळ वाचीत असतांना जाणवतो. 'माझी आगबोट' या कवितेंतल्या निसर्गप्रतिमा-देखील प्रेमभावनेच्या आशयाशीं एकरूप झाल्यामुळं जिवंत, खऱ्या वाटतात.

पण दोनचार ओळींचे हे अपवाद सोडून दिले, तर 'प्रतिभा' या काव्य-संग्रहांत दिसणारा निसर्ग हा त्या प्रेमकवितांप्रमाणंच कचकड्याचा वाटतो. या निसर्गप्रतिमा अनुभवांतून आलेल्या नाहीत; त्या वाचनांतून—विशेषतः बालकवींच्या काव्याच्या वाचनांतून—आलेल्या आहेत. खरं म्हणजे त्या प्रतिमा नव्हेतच, नुसते शब्द आहेत. निर्झरिणी, राघूमैना, पवनाचा हिंदोल, गगनश्रीच्या मानसांतलें कमळ, विपिनें, वनमाला, फुलराणी, हरिणाचीं बाळें, अष्टदिशांचा गोफ, ही सर्व मंडळी न चुकतां आपली हजेरी लावून जातांना दिसतात. हे सारे बालकवींच्या कवितेंतून (मोठ्या प्रेमानं) उचललेले केवळ शब्द आहेत हें ध्यानांत यायला वेळ लागत नाही. बालकवींच्या काव्यांतली शक्ति नेमकी कुठं आहे हें इथं जराहि कळलेलं नाही. कळली आहे ती त्यांनी वापरलेल्या प्रतिमांची रेडिमेड यादी. बोरकर, केवळ तुमच्याच नव्हे, तर मला वाटतं, 'मनोरंजनां'तून प्रसिद्ध होणाऱ्या या काळांतल्या बहुतेक कविता अशाच बेगडी होत्या. एक तर या निसर्ग-प्रतिमा यांत्रिक यादीवजा असत किंवा त्यांचा उपयोग प्रवेशाशीं सुतराम् संबंध नसलेल्या नाटकांतल्या पडद्यांप्रमाणं नकली, सजावटवजा केला जाई; निसर्गप्रतिमा ही भाववृत्तीचा अपरिहार्य भाग बनलेली नसे.

गोव्याचा रंगधुंद निसर्ग डोळे भरून पाहिला असूनसुद्धा तुमच्या बाबतींत हें असं कां घडलं? हें असं घडतं आहे असं तुम्हाला कधी आणि कसं जाणवलं?

*झळझळतीं गवताच्या गंजी*
*हवेंत भ्रमती चतुर किरमिजी*
*अहा पिसोळीं पुष्पदळांसम वहात भिडति तृणास*

अशांसारख्या ओळी लिहिण्यापर्यंत तुम्हीं कसा प्रवास केला?

**बोरकर** : पाडगांवकर, त्या काळांतल्या माझ्या निसर्गकवितेबद्दल तुम्हीं जीं विधानं केलीं आहेत तीं तिला चपखलपणं लावून दाखवतां येतात आणि तत्कालीन अन्य कवींच्या तत्सम कवितेवरून त्यांना पुष्टीहि मिळते हें खरं असलं, तरी माझ्या बाबतींत प्रकार थोडा निराळा घडला आहे. निदान त्यामागचीं कारणें निराळीं आहेत. मला ही गोष्ट थोडी विस्तारानं सांगावी लागेल.

शरिरानं दुबळं, मनानं कोवळं आणि बुद्धीनं तल्लख असं मी एक उपेक्षित मूल होतों. आमच्या मोठ्या कुटुंबांत आई अष्टौप्रहर घरकामांत गुंतलेली असे आणि वडील आपल्या कामधामांत. त्यामुळं माझ्या भावनांची नेहमीच उपासमार झाली. घरांत वारंवार अन्याय, उपेक्षा, उपहास, विपर्यास, देहदंड आदि शल्यं माझ्या वाट्याला येत आणि तीं बोलून दाखवण्याचं विश्वासाचं कोणतंच स्थान मला नव्हतं. मुलांना आपण नेहमी फुलांची उपमा देतों. पण माझा लहानपणचा अनुभव अगदी याच्या उलटा आहे. वर्गांतल्या अभ्यासांत ज्या मुलांना मी वरचढ होतों तीं दणकट मुलं खेळांत आणि अन्य वेळीं माझ्या दुबळेपणाचा आणि कोमल-पणाचा फायदा घेऊन नाना परींनी मला छळीत असत आणि रडतांरडतां माझी पुरेवाट होई. घरांत किंवा संवगड्यांत अशीं दुःखं सोसावीं लागलीं म्हणजे घरामागची बकुळ, टेकडीवरची जांभ्या खडकांची कमान, गावच्या नदीचा काठ, बांबूच्या जाळींतला चंद्र यांच्याशीं हितगुजं करीत मी जिवावरच्या दुःखांचा भार हलका करीत असें. माणसाइतकंच हें स्थिरचर मला सजीव वाटे आणि माणसांपेक्षाहि अधिक स्नेहल वाटे. त्याचमुळं बालकवींच्या निसर्गकवितेनं माझ्या मनाची पूर्णपणं पकड घेतली. निसर्गांतले बालकवींचे स्नेहीसोबती मी आपलेसे करून घेऊं लागलों. माझा प्रयत्न कविता लिहिण्याचा नव्हता; या मंडळीशीं स्नेह जोडण्याचा होता. निसर्गांतल्या आपल्या स्नेह्यांना स्वतःचं सुखदुःख प्रत्यक्षांत सांगावं आणि बालकवींच्या असल्या स्नेह्यांशीं कवितेंतून नवं नातं जोडावं, असं माझं त्या काळांत चाललं होतं. १९२६ सालीं मी धारवाडला गेलों तेव्हा कुठं गोव्यांतल्या निसर्गासाठी मी झुरूं लागलों होतों. पुढं जेव्हा खऱ्या अर्थानं माझ्यांतला कवि जन्माला आला, तेव्हा कलावंताच्या तटस्थ आस्थेनं गोव्यांतील निसर्गाकडे पाहण्याची दृष्टि मला लाभली. ही दृष्टि, मला वाटतं, मला १९३० नंतर आली. त्यासाठी गोव्याच्या दीर्घकालाच्या वियोगांतून मला जावं लागलं. इतके दिवस मी कवितेंतून जीवनाचं पोषण मिळवीत होतों. आता आपल्या आंतरिक जीवनाचा आविष्कार करण्याची ऊर्मि माझ्यांत जागी झाली. हें सारं नेमकं केव्हा आणि कसं घडलं हें मला सांगतां येत नाही. पण भाऊ बहिणीला फार वर्षांनी भेटावा आणि ती उफाड्यानं वाढलेली पाहून त्याला तिच्या सौंदर्याची आजवर न झालेली जाणीव अकस्मात् प्रत्ययाला यावी, तसं कांही तरी या वेळीं घडलं असावं.

**पाडगांवकर :** 'प्रतिभा' हा काव्यसंग्रह वाचीत असतांना 'वाङ्मयांतली प्रादेशिकता' याविषयीचा एक प्रश्न माझ्या मनांत होता. तुम्हीं या पुस्तकाला

लिहिलेल्या छोट्याशा प्रस्तावनेंत 'सार्थ कोकणी शब्द ठिकठिकाणीं वापरले आहेत' असं विधान केलं आहे. मी स्वतः या दृष्टीनं काळजीपूर्वक हें पुस्तक वाचलं. दोनचार शब्दांखेरीज ज्यांना 'खास कोकणी' म्हणतां येईल असे शब्द मला कुठंच आढळले नाहीत. मग प्रस्तावनेंत हें वाक्य कां आलं? 'ग्रामीण' वा 'प्रादेशिक' वाङ्मयाची टूम या वेळेपासून सुरू होत होती की काय? पुढं ही बरीच फोफावली. 'लई', 'बिगीबिगी', 'वकुत' एवढे शब्ददेखील ग्रामीण वाङ्मयाच्या चवदार 'न्याहारी'ला पोटभर होऊं लागले. अनुभवाची जागा वेगळेपणाची चूष म्हणून वापरले जाणारे शब्द घेऊं लागले. 'प्रतिभा' या काव्य-संग्रहांत आकार घेणारं अनुभवाचं विश्व, त्यांतून डोकावणारा निसर्ग अस्सल प्रादेशिकतेपासून खूपच दूर आहे—कारण हें विश्वच मुळी गडकरी आणि बालकवि यांच्या पुस्तकांतलं आहे. आता उरले शब्द: तेहि माझ्या मतं दोनचारच आहेत. मग 'कोकणी शब्द ठिकठिकाणीं वापरले आहेत' या विधानाचा अर्थ काय? मला वाटतं, प्रादेशिकतेची ही आकर्षक टूम तेव्हा आकार घेत असावी. तुम्हाला कितपत पटतं हें?

**बोरकर :** प्रादेशिकता हा शब्द पहिल्याप्रथम माझ्या कानीं पडला तो मडगावच्या मराठी साहित्य संमेलनांत हें मीं आधी तुम्हांला सांगितल्याचं आठवत असेलच. 'प्रतिभा' हा संग्रह प्रसिद्ध झाला तो या संमेलनांत; तेव्हा प्रादेशिकतेच्या सुस्पष्ट जाणिवेंतून माझ्या त्या वेळच्या कवितेंत कोकणी शब्द येणं असंभव होतं. तुम्ही म्हणतां, खास कोकणी शब्द 'प्रतिभें'त दोनचारांहून अधिक नाहीत. मग ठिकठिकाणीं कोकणी सार्थ शब्द इथं वापरले आहेत अशा अर्थाचं विधान मला कां करावंसं वाटावं? तुम्ही माझ्या या वाक्याचा रोख नीट लक्षांत घेतला तर मी हें विधान भीतभीत केलं आहे आणि मराठी वाचकांना असा प्रयत्न कितपत रुचेल याविषयी संशय व्यक्त केला आहे असं तुम्हाला दिसेल. 'प्रतिभे'त तुम्ही समजतां त्यापेक्षा किती तरी अधिक शब्द कोकणी आहेत. पण गेल्या पस्तीस वर्षांत कोकणांतल्या लेखकांनी ते इतक्या सर्रासपणं आणि सातत्यानं वापरले की आता ते मराठीहून वेगळे आहेत असं वाटेनासं झालं आहे. मराठीच्या माझ्या अपुऱ्या ज्ञानामुळं मला सुलभ असलेल्या कोकणीचा आश्रय मीं केला असावा. त्यांत कांही गैर नाही असाहि विचार त्या वेळच्या हवेंत होता. मराठी शब्दकोश तयार होत असतांना त्यांत अंतर्भूत करण्यासाठी गोव्यांतले कोकणी शब्द गोळा केले जात होते. गांधीजींच्या विचारामुळं प्रादेशिक अस्मितेची राजकीय जाणीव गोव्यासारख्या प्रदेशांना होऊं लागली होती. अभावितपणं ती त्या वेळीं

साहित्यक्षेत्रांतहि मूळ धरूं लागली असणं शक्य आहे. या वातावरणाचादेखील माझ्यावर परिणाम झाला असेल. पण तो अजाणतां.

**पाडगांवकर :** कोकणी शब्दांच्या संख्येचा मीं प्रश्न उपस्थित केला तो भाषिक वादासाठी नव्हे. एका वाङ्मयीन प्रश्नाच्या संदर्भात मी त्याच्याकडे पाहत होतों.

'प्रतिभा' या काव्यसंग्रहानंतर तुमचं 'जीवनसंगीत' हें पुस्तक प्रसिद्ध झालं. १९२९ ते १९३६ या कालखंडांत लिहिलेल्या कविता या संग्रहांत आहेत. मराठी काव्याच्या क्षेत्रांत तुमचं स्थान निश्चित झालं तें या पुस्तकामुळंच. या काव्यसंग्रहांतून प्रकट झालेल्या व्यक्तिमत्त्वाची चाहूल 'प्रतिभा' काव्यसंग्रहांत कुठं दिसते किंवा काय असा एक विचार माझ्या मनांत होता. या दृष्टीनं तें पुस्तक वाचीत असतांना या नव्या व्यक्तिमत्त्वाची चाहूल दाखवणाऱ्या दोन कविता मला आढळल्या : 'माझी आगबोट' आणि 'कातरवेळेनंतर'.

'माझी आगबोट' या कवितेचं ध्रुवपद पूर्वी रूढ नसलेल्या अशा कांही वेगळ्याच छंदांत प्रकट झालं आहे! लाटांच्या आंदोलनांवर झुलणाऱ्या आगबोटीचा 'छंद' या शब्दांनी पकडला आहे. 'हळूहळू पाण्यामधीं बुडणारं जुनं जग' आपली सारी खिन्नता घेऊन या प्रतिमेंतून जाणवतं. 'ज्याच्यावर दैव स्वैर उडतं' त्या दर्याचा 'निळाकाळा' रंग नुसताच वर्णनात्मक नाही : त्या निळ्याकाळ्या रंगांत भाववृत्तीचा उदास खोलपणा भिनलेला आहे. या कवितेंतल्या निसर्गप्रतिमा गोविंदाग्रज किंवा बालकवि यांच्या पुस्तकांतून उचललेल्या नाहीत. त्या खास तुमच्या आजूबाजूच्या आहेत : आणि त्या नुसताच आजूबाजूचा प्रदेश—गोव्याचा—उभा करण्याचं सांकेतिक 'प्रादेशिक' कार्य करीत नाहीत; त्या प्रतिमा तुमच्या भाववृत्तींनी भारल्यामुळं त्यांना अस्सल कलात्मक आशय प्राप्त झालेला आहे.

*नारळीचे वृक्ष स्तब्ध प्रेमस्तंभ उभे*
*पर्णांआड पक्षी जणूं भाव हृदीं दबे*
*धरितात अश्रु हृदीं केळियेचे गबे*
*हेमंताचे दीस तरी हृदीं उष्ण वात ग*
*माझी आगबोट चालली दरियांत ग...*

'माझी आगबोट' या कवितेप्रमाणंच 'कातरवेळेनंतर' ही कविता मला महत्त्वाची वाटते. या कवितेची शब्दकळा संतांच्या ओवीला खूप जवळची आहे. आश्चर्याची गोष्ट अशी की, निसर्गाच्या साहाय्यानं जीवनविषयक तत्त्वज्ञान सांगणं या नावाची जी लोकप्रिय टूम निर्माण होत होती तिचा या कवितेला ओझरताहि स्पर्श नाही. या संग्रहांतल्या इतर सगळ्या कवितांत बालकवींचं अनुकरण आहे—पण तुमच्या-

तल्या कलावंताला बालकवि खराखुरा कळल्याची कुठंहि खूण नाही. या कवितेवर बालकवींची जराहि छाप नाही : पण इथं बालकवि तुमच्यांतल्या कलावंताला कळल्याची खूण आहे. या कवितेला 'अर्थ' नाही; तत्त्वज्ञानात्मक 'आशय' नाही; तिला एक मूड आहे—आणि या भाववृत्तीनंच निसर्गाच्या आर्त प्रतिमांचं रूप घेतलं आहे. अलंकरण हें या प्रतिमांचं कार्य नाही, त्यांचं अस्तित्व साधनरूप नाही; आणि म्हणूनच कलात्मक अर्थानं त्या जिवंत आहेत.

ज्या काळांत या कविता तुम्हीं लिहिल्या त्या वेळीं किंवा कालांतरानं मी म्हणतों त्या तऱ्हेचा वेगळेपणा तुम्हाला जाणवला होता काय? 'माझी आगबोट' या कवितेंतलं ध्रुवपद तुम्हाला कसं सुचलं? तशी एकादी कोंकणी लोकगीताची चाल तुमच्या स्मरणांत होती काय? आज या कविता वाचतांना तुम्हाला काय वाटतं? या कविता त्या वेळीं ज्या टीकाकारांनी वा तुमच्या ओळखीच्या रसिक वाचकांनी वाचल्या त्यांपैकी कुणाला त्यांचा वेगळेपणा, त्यांतून व्यक्त होणारी तुमच्या भविष्य-कालीन निर्मितीची नवी दिशा जाणवली होती काय?

**बोरकर :** पाडगांवकर, या दोन कवितांचा आगळेपणा आणि वेगळेपणा ज्या डोळसपणानं तुम्ही आता पाहतां आहांत तसं पाहणारा जाणकार रसिक किंवा सृजनशील टीकाकार मला त्या वेळीं भेटला असता तर माझ्या उमलत्या कलात्मक व्यक्तित्वाची वेळीच मला जाण येऊन माझी कलाशक्ति अधिक जोमानं आणि अधिक वेगानं चढलीवाढली असती. पण तें भाग्य मला मिळालं नाही. तुम्हा नवीन मंडळीची सूक्ष्म कलात्मक दृष्टि त्या काळच्या रसिकांतच काय पण अग्रगण्य मानल्या गेलेल्या टीकाकारांतदेखील नव्हती. 'प्रतिभा' ह्या काव्यसंग्रहां-तील कविता माझ्या पहिल्या काव्यगायनांतून लोकांच्या कानावर पडल्या तेव्हा-पासून माझ्या कवितेच्या चहात्यांचा वर्ग सारखा वाढत चालला. साहित्यांतल्या मान्यवर मंडळीकडून तिचं कौतुकहि फार झालं, पण माझ्या कलात्मक व्यक्तित्वाचा आगळेवेगळेपणा कुणींच माझ्या ध्यानीं आणून दिला नाही आणि माझ्याहि ध्यानांत तो ठळकपणानं तेव्हा आला नाही. 'प्रतिभा' हा संग्रह प्रकाशित झाला तो यश-वंतराव सरदेसाई यांच्या आग्रहामुळं आणि त्यांच्याच प्रयत्नामुळं. पण तो प्रसिद्ध होऊन गेल्यानंतर एकदोन वर्षांतच त्याच्या मर्यादा आणि उणीवा मला समजल्या आणि तो संग्रह छापायला मी संमति द्यायला नको होती असं मला वाटूं लागलं. ह्या संग्रहाच्या पाचशेच प्रती काढलेल्या होत्या आणि ज्यांनी आगाऊ वर्गणी दिली होती त्यांची आणि इतरांची मागणी भागवण्यांत सहा महिन्यांतच त्या खपल्या. पण मीं त्या संग्रहाची दुसरी आवृत्ति काढली नाही. 'जीवनसंगीत'मध्ये 'माझी आगबोट'

या त्यांतल्या एकाच कवितेचा अंतर्भाव मीं केला आहे. कवितेविषयींचा माझा आदर्श विकसत होता, पण मला माझ्या कलात्मक व्यक्तित्वाची डोळस जाण आलेली नव्हती. जें आवडेल तें रुचीनं खावं आणि खूप कावाडकष्ट करावे आणि त्यामुळं शरिराला पुष्टि, घाट आणि कांति यावी तसा हा प्रकार होता; डोळस व्यायाम, निवडक नियोजित अन्न, शरिराला कोणता आकार आणावा याची पूर्वनियोजित योजना यांचा इथं मागमूसदेखील नव्हता. 'कातरवेळे'नंतर या कवितेच्या निर्मितीचा क्षण मला आता आठवत नाही आणि self-hypnosis करून मला तो उभा करायचा नाही. तशानं सत्य शोधण्याऐवजी आपण नसते भ्रम मात्र उभे करतों. पण 'माझी आगबोट' या कवितेच्या निर्मितीचा क्षण मला स्पष्ट आठवतो. बोटीनं माझा हा पहिलाच प्रवास होता. प्रेयसीपासून मी दूर जात होतों. मन भरून आलं होतं, व्याकुळ झालं होतं. अर्थात् त्या कवितेंत लाटांचा ताल आला तोहि नकळत आणि प्रतिमा आल्या त्याहि भोवतालच्या परिसरांतून आणि त्या भावनेशीं संबद्ध असलेल्या स्मृतींतून. या कवितेचा छंद मला परिचित असलेल्या कोणत्याहि कोकणी गाण्यांत नाही, एक नवा छंद माझ्या करवीं निर्माण होऊन गेला आहे, याचं वरींच वर्षं मला भानहि झालं नाही. एके दिवशीं पोस्टांतून अचानक एक ग्रंथ मला भेट म्हणून आला. उघडून पाहतों तो माधवरावांची 'छंदोरचना'. त्यावर 'अमुक पृष्ठ पाहा' अशी खूण होती. त्या पृष्ठावर या कवितेच्या छंदाचं विवरण होतं. त्याला त्यांनी 'जलारोहण छंद' असं नाव दिलेलं होतं. तें वाचून मी चमकलों आणि स्वतःशींच म्हणालों, 'अरे वा! मी एक नवा छंद निर्माण केला तर!' माझ्या कवितेचं आगळेपण तुम्ही मला सांगूं लागलांत की आजदेखील मला असंच कांहीसं वाटूं लागतं.

**पाडगांवकर :** तुम्ही म्हणतां तें पटतं मला! त्या कालखंडांत काव्याकडे पाहण्याचा दृष्टिकोन आपण बारकाईनं अभ्यासला पाहिजे. त्याची चर्चा ओघानं आपल्याला करावीच लागेल.

'प्रतिभा' या काव्यसंग्रहांतां गोविंदाग्रज आणि बालकवि यांच्या कवितेची गडद् छाया तुमच्या कवितेवर होती. 'जीवनसंगीत'त गोविंदाग्रज आणि बालकवि जाऊन त्यांच्याऐवजी भा. रा. तांबे आले. तांब्यांचं गुरुत्व तुम्हीं मोठ्या भाविकतेनं या वेळीं स्वीकारलंत! 'तांब्यांची गायकी पुढे चालविणें'...'तांब्यांच्या अभिजात गायकीचा लौकिक व प्रचार वाढवणें' हें आपलं ध्येय तुम्हीं 'जीवनसंगीता'ला लिहिलेल्या छोट्याशा प्रस्तावनेंत नम्र भावानं नमूद करून ठेवलं आहे.

यांतली भाविकता, नम्रता या गोष्टी तुमच्या वैयक्तिक जीवनांतलं एक मूल्य

म्हणून महत्त्वाच्या असतील—नव्हे, आहेतच. पण मला असं वाटतं की, कलेच्या साधनेंत किंवा तुमच्या कलाकृतीच्या मूल्यमापनांत या गोष्टींना महत्त्व देऊन त्यांचा गहिवरून गौरव करणं भोंगळपणाचं ठरेल. कलेच्या साधनेंत जीवनानुभवाच्या संदर्भामध्ये आपल्या व्यक्तित्वाचा, जाणिवेचा ठाव घेण्यासाठी केलेली धडपड हीच अत्यंत महत्त्वाची असते.

पहिल्या अपरिपक्व अशा अवस्थेंत नकळत आवडत्या कवीची छाप काव्यावर उमटणं हें मी समजूं शकतों. पण थोड्याच वेळानं हे पांगुळगाडे फेकून देण्यासाठी आपण कवि उत्सुक होतों—विलक्षण अस्वस्थ होतों. तुमच्या बाबतींत असं होत नाही. 'जीवनसंगीतां'त तर सोडाच पण अगदी अलीकडे लिहिलेल्या तुमच्या कांही कवितांवरसुद्धा तांब्यांची सहीसही छाप आढळते. याचा एक असा तरी अर्थ होतो की तांब्यांचं किंवा त्यांच्यापासून पृथगात्म असं तुमचं वैशिष्ट्य यांची तुम्हाला डोळस जाणच आलेली नाही किंवा तशी जाण येऊनहि केवळ भावड्या भाविकतेमुळं अथवा रुळलेली व सरावाची वाट सहज झेपते, सायासाविना जमून जाते म्हणून तुम्ही ती अंगीकारीत असतां.

काव्यनिर्मितीच्या क्षेत्रांत गायकी, घराणीं, गुरुबाजी या गोष्टींना स्थान नाही. कवीच्या अपरिपक्व अशा पहिल्या पुस्तकाच्या लेखनावस्थेंत अनुकरण क्षम्य आहे, त्याकडे थोड्या सहानुभूतीनं पाहिलं पाहिजे हें खरं : पण या 'गायकी' प्रकरणाला काव्याच्या क्षेत्रांत तत्त्वज्ञान म्हणून स्थान नाही. तो दृष्टिकोन मला अक्षम्य वाटतो.

माझा वैयक्तिक अनुभव येथे नमूद करावासा वाटतो. 'धारानृत्य' या माझ्या पहिल्या काव्यसंग्रहावर तुमची आणि थोडीशी कुसुमाग्रजांची छाप आहे. पण 'जिप्सी'मध्ये किंवा नंतरच्या काव्यांत ती तुम्हाला आढळणार नाही. ती कटाक्षानं टाळण्याचा प्रयत्न केला पाहिजे—आणि तो जीवनमरणाचा प्रश्न आहे—ही अत्यंत तीव्र जाणीव मला तेव्हापासून छळीत होती.

**बोरकर :** तुमच्याहून आमचा काळ वेगळा होता. बापाचं नाव लावण्यांत आम्हांला कमीपणा वाटत नसे; उलट अभिमान वाटत असे. आपल्या चेहऱ्यांत, बोलण्यांत, स्वभावांत आणि वागण्यांत लोकांना आमच्या वडीलजनांचीं कांही साम्यं आढळलीं आणि तसं त्यांनी बोलून दाखवलं तर त्यांत आम्हांला वैषम्य कधीच वाटलं नाही. किंबहुना तसे उल्लेख आम्हांला—मला तरी—सुखावीत असत. कलेच्या क्षेत्रांतली तुमची आजची जी व्यक्तित्वकल्पना आहे ती आम्हांला अपरिचित होती. माझा मनःपिंड जात्याच सख्यभक्तीला अनुकूल होता म्हणून म्हणा, योग्य वेळीं व्यक्तित्वाची तुमची नवी ज्ञानदृष्टि देणारं कुणी मला भेटलं नाही म्हणून

म्हणा, संसाराच्या आणि समाजाच्या किती तरी जबाबदाऱ्या अकालीं अंगावर येऊन पडल्यामुळं म्हणा, ज्या पारंपरिक संस्कारांत मी वाढलों त्यांच्या प्रभावामुळं म्हणा, किंवा या सर्वच कारणांच्या थोड्याफार परिणामांमुळं म्हणा, तुम्ही आज ज्या प्राणपणानं स्वतःच्या कलात्मक व्यक्तित्वाला जपतां तसं जपण्याची मला आवश्यकताच वाटली नाही. पूर्वसूरींकडून जें संस्कारधन मला मिळत गेलं तो मला वडिलार्जित वारसा वाटला, कर्ज वाटलं नाही, आणि म्हणून त्याचा मला भारहि झाला नाही.

'प्रतिभा' या काव्यसंग्रहांत ज्या अर्थानं गोविंदाग्रज आणि बालकवि यांच्या कवितेची गडद छाया आहे त्या अर्थानं 'जीवनसंगीतां'त तांब्यांची छाया खचित नाही. तांब्यांच्या आधी मीं अनेक कवि वाचले होते आणि तांब्यांच्या नंतरहि अनेक वाचले. पण माझ्या संपूर्ण व्यक्तित्वाचा तावा मात्र तांब्यांप्रमाणं दुसरं कुणीच घेऊं शकलं नाही. असं कां व्हावं? तांब्यांची कविता माझ्या हातीं आली तेव्हा आजच्यासारखा त्यांचा लौकिकहि झालेला नव्हता. मग त्यांच्या कवितेनं मला अशी भुरळ कां टाकली? मी तिच्यांत यथेच्छ कां डुंबलों? त्यांचाच कां गंडा बांधला? त्यांचीच गायकी चालवण्यावाढवण्याचा हव्यास कां धरला? त्याला कारण एवढंच की त्यांच्यांत मला माझा समानधर्मा भेटला होता. माझा उद्यांचा 'मी' त्यांच्यांत मला आढळला होता. त्यांच्यामुळं माझ्या मूळच्या रायवळ, रासवट, आम्ररोपावर अव्वल दर्जाच्या 'माणकूर' आंब्याचं कलम झालं. रोप आणि कलम यांच्यांत एक नैसर्गिक सख्य असावं लागतं. तें असलं म्हणजे कलमाचे सगळे गुणधर्म मूळ रोप शोषून घेतं, स्वतःच्या जीवनरसानं त्यांना नवी कळा आणि गोडी आणतं आणि आपल्या फळांतून स्वतःची आणि आपल्या भूमीची खरी चवहि विशेष जोमानं प्रगट करतं. 'जीवनसंगीतां'त तांबे दिसतात ते हे असे. माझ्यावर कलम होऊन प्रगट झालेले. 'जीवनसंगीतां'त तांब्यांचं म्हणून जें दिसतं तें त्यांचं तेज—छाया नव्हे. त्यांचा मीं गंडा बांधला आणि त्यांच्या 'गायकी'चा अभिमान घेतला तो भोंगळ भावड्या भक्तिभावानं नव्हे, तर त्यांचा काव्यविषयक आदर्श आणि तो धरण्याची त्यांची हातोटी माझ्या मनःपिंडाला अधिक अनुकूल वाटली म्हणून. द्रोणाचार्यांची मूर्ति समोर ठेवून एकलव्यानं धनुर्विद्येची साधना केली. तसंच तांब्यांच्या बाबतींत मींहि केलं. त्यांनी माझी पाठ थोपटली. 'माझे हात आता थकले आहेत आणि कान तुमच्याकडे लागले आहेत' हें त्यांचं शेवटच्या दिवसांतलं वाक्य मी जन्मांत विसरणार नाही. त्यांनी ऊर भरून माझं असं कौतुक केल्यामुळं टीकाकारांनी माझा आंगठा कापून घेतला याचं दुःख मला फारसं जाणवलं नाही.

अगदी अलीकडच्या माझ्या कांही कवितांवरसुद्धा तांब्यांची सहीसही छाप आढळते हें तुमचं विधान मला मान्य नाही. वडिलांचे कपडे अंगाला चपखल बसतात म्हणून वयांत आलेल्या मुलानं ते घाईमुळं अंगांत घातले म्हणून त्याचं व्यक्तित्वहि उसनं ठरतं असं मला वाटत नाही. हल्लीच्या माझ्या कांही कवितांचा बाह्य परिवेष तांब्यांच्या कवितेसारखा वाटला तरी त्यांतला जीव माझा स्वतःचा आहे असं तुम्हांला दिसेल. माझ्या व्यक्तित्वाची आज मला जाण आलेली आहे किंवा नाही हें तुमचं तुम्ही ठरवा. पण तिचं अष्टौप्रहर भान ठेवून पूर्वसूरींचे संस्कार कटाक्षानं टाळायचे, आपल्या वेगळेपणाचा अट्टाहास धरायचा, हें माझ्या स्वभावांत नाही. तसा माझा आदर्शहि नाही. कविता म्हणजे कवीच्या व्यक्तित्वाचा आविष्कार असं मानणारा पाश्चात्यांत एक पक्ष आहे, तर कविता म्हणजे कवीच्या व्यक्तित्वविलोपनशक्तीचा आविष्कार असं मानणारा दुसराहि एक पक्ष त्यांच्यांत आहे. हे दोन्ही सिद्धांत परस्परविरोधी नसून परस्परपूरक आहेत असं मी मानतों. कवि हा जिवा-शिवाचं सख्य अनुभवतो तेव्हा त्याचा अनुभव कलाकृतींतून आविष्कृत होतो. अनुभव शिवाचा, पण तो बोलतो जिवाच्या परिभाषेत. जीव अनेक जिवांशीं तन्मयता भोगीत शिवत्वाची ओळख घेत असतो. माझ्या बाबतींत तरी हें असं घडत आलं आहे. अर्थात् या साधनेंत तुम्ही म्हणतां तसं थोडं शैथिल्यहि असेल. पण माझं यावर उत्तर एवढंच की 'आम्ही नव्हतों अमुचे बाप। उगाच कां मग पश्चात्ताप ?'

**पाडगांवकर :** पण 'व्यक्तित्वविलोपनशक्तीचा आविष्कार' म्हणजे दुसऱ्याचा मुखवटा आपल्या चेहऱ्यावर घालून मिरवणं नव्हे ! तांबे यांच्याबद्दल तुम्हाला वाटणारा अभिमान मी समजू शकतों. परंतु केवळ तेवढ्यानं माझं समाधान होऊं शकत नाही. तांबे यांनी आपल्या अनुभवाचं स्वरूप त्यांत रंगून जाऊन न्याहाळतां न्याहाळतां रचना आणि बांधणी यांचा खास स्वतःचा असा घाट निर्माण केला. नववधू, प्रणयप्रभा, शुभवदना या त्यांनी वापरलेल्या खास 'जाती' मनांत रेंगाळत राहावं, सुभाषितासारखं मार्मिकपणं वापरतां यावं, असं आकर्षक ध्रुपपद ते प्रथम बांधीत आणि नंतर कडव्याकडव्यांतून त्यांतल्या कल्पनेचा विस्तार करीत. शेवटच्या कडव्याची रचना ध्रुवपदाप्रमाणंच आकर्षक आणि ज्याला त्या बांधणीचा 'परमोच्च बिंदु' म्हणतां येईल अशी असे.

तुमच्या 'जीवनसंगीतां'तल्या बहुतेक कवितांवर तांब्यांची छाप आहे : याचाच अर्थ असा की तांब्यांनी निर्माण केलेली ही 'बांधणी' तुम्हीं मोठ्या आत्मीयतेनं आपलीशी करून घेतली होती—आणि आपले अनुभव या बांधणींत तुम्ही अगदी

चपखल बसवीत होतां. किंवा आपण असं म्हणूं की तुम्ही अनुभवच अशा लकबीनं घेत होतां की तांबे-घाटाची कविता आपोआपच तयार व्हावी. अगदी आजतागायत तुम्हीं लिहिलेल्या कांही कवितांवरहि तांबे यांची छाप आहे, असं मी म्हणतों तें याच अर्थानं. "या कवितांचा बाह्य परिवेष तांब्यांसारखा असला तरी त्यांतला जीव माझा आहे" असं जें तुम्ही म्हणतां तें मला पटत नाही. 'आज तुझ्या घरिं आल्यें' यासारखी अगदी अलीकडची कविता उदाहरण म्हणून मी देईन. या कवितेंतला जीव तुमचा आहे म्हणजे काय? कवितेंतला जीव खराखुरा जिवंत असेल, तर तो स्वतंत्र असा घाट आपोआप प्राप्त करून घेतो : ती एक organic अशी जीव-प्रक्रिया असते असं आपण म्हणूं. पण तुमच्या या 'जीव असलेल्या' कवितेंत असं होत नाही. त्यांत अनुभवाच्या घटकांची किंवा त्यांना प्राप्त होणाऱ्या आकाराच्या (formच्या) घटकांची वेगळ्या—म्हणजेच जिवत—पद्धतीनं मांडणी करण्याचा जराहि प्रयत्न नाही. तांब्यांनी निर्माण केलेला घाट तुमच्या अंगवळणीं—किंवा 'शब्दवळणीं'—पडल्यामुळं तुम्ही ही रचना सफाईनं करून जातां—It comes handy! या रचनेंत यामुळंच एक सहजतेचा, सफाईचा आभास निर्माण होतो; 'बोरकरांची रचना ललितमधुर आहे' असं भाबडेपणानं लिहिणाऱ्या टीकाकारांची त्यामुळं प्रामाणिक सोयहि साधते! पण अशा कविता वाचीत असतांना नेमकी हीच सहजता, हीच सफाई मला खटकते. त्यांत नव्या निर्मितीचा प्राण नाही असं वाटतं.

**बोरकर :** पाडगांवकर, माफ करा. तुमचं हें म्हणणं मला अजिबात पटत नाही. पूर्वसूरींनी निर्माण केलेल्या वृत्तांत, जातींत वा छंदांत नंतरच्या कवींकडून झालेली सारी रचना हमखास नकली व निर्जीव आहे असा तुमच्या म्हणण्याचा अर्थ होतो. असला प्रत्येक रचनाप्रबंध ज्यानं पहिल्याप्रथम निर्माण केला त्याच्यापेक्षाहि त्याच्या-नंतरच्या कवीनं काव्यदृष्ट्या तो अधिक समर्थ आणि संपन्न केल्याचीं अनेक उदाहरणं दाखवून देतां येतील. कवितेचा वृत्तिविशेष, तिच्या आशयाचा रंगढंग, खुद्द कवीचा स्वभाव आणि त्या वेळचा त्याचा 'मूड' यांच्या सहज संगनमतानं अनुरूप रचना-प्रबंधाची निवड कविमन करून जातं. केवळ handy म्हणून तो रचनाप्रबंध उचलला जातो हें विधान अतिव्याप्त आहे. कवीला असे पाचपन्नास रचनाप्रबंध handy असूनहि तो अमकाच प्रबंधप्रकार कां स्वीकारतो, याला याहून खोल कारणं खचित आहेत. Handinessचा कांहीसा भाग त्यांत आहे. पण त्यांत गैर काय आहे? वेगवेगळे कवि भाषेचं एकच माध्यम वापरतात आणि तिचीं सर्व बंधनं पाळूनहि आपल्या व्यक्तित्वाचा पृथगात्म आविष्कार करूं शकतात. तसंच

हें. आकाराला किंवा घाटाला महत्त्व आहे जरूर. पण तो आकार किंवा घाट आशयाच्या घटकद्रव्यांची प्राणतत्त्वाच्या आविष्करणाच्या संदर्भात जी मांडणी होते तिच्यांत पाहायचा असतो. ‘तुम्ही अनुभवच तांब्यांच्या पद्धतीनं घेत होतां’ असं जें तुम्ही म्हणतां तें जर खरं असेल, तर त्याचं मुख्य कारण आम्हां दोघांतलं समानधर्मत्व. ‘आज तुझ्या घरिं आल्यें’ ही कविता उदाहरण म्हणून तुम्हीं दिलीत. ती कविता जिवंत आहे किंवा नाही हा निवाडा रसिकांनी द्यायचा आहे. पण मध्यरात्रीं जेव्हा ती लिहून झाली तेव्हा तांबे आज जिवंत नाहीत या विचारानं मी अत्यंत व्यथित झालों. ती सारी रात्र भक्तीच्या उत्कटतेनं कृतार्थ झालेली गोपी होऊन मी जगलों-जागलों होतों एवढं मला पक्कं आठवतं. जी सहजता, जी सफाई तुम्हाला खटकते ती तर मी कवितेच्या जिवंतपणाचं एक महत्त्वाचं लक्षण मानतों. जें खरंखुरं असतं, जिवाभावांतून उमाळून आलेलं असतं तें सहजोद्गारांतूनच प्रगट होतं. तिथं खटपटीच्या खटाटोपाला जागा नसते.

**पाडगांवकर** : ही सहजता मला खटकते असं मीं म्हणालों याचं कारण मला तो सहजतेचा आभास वाटतो. ‘आज तुझ्या घरिं आल्यें’ ही कविता लिहून झाल्या-नंतर तुमच्या अनुभवाला आलेली भक्तीच्या उत्कटतेची कृतार्थता मला वंद्य वाटते. पण म्हणून तुमचं म्हणणं मला मान्य होतं असं मात्र नव्हे! आपल्या कल्पनेप्रमाणं घर बांधलं आहे तांब्यांनी, त्यांतल्या सगळ्या वस्तूंची मांडणी केली आहे त्यांनी —तुम्ही त्या घरांत आत्मीयतेनं आणि सहजतेनं वावरतां हें खरं : पण म्हणून तें घर कांही तुमचं होऊं शकत नाही. ज्या रचनातत्त्वांवर त्याची मांडणी होते तीं तत्त्वं तुमच्या व्यक्तित्वांतून स्फुरून आलीं आहेत, तुमच्या काव्यानुभवांना अशा प्रसंगीं ‘व्यक्तिमत्त्व’ प्राप्त झालं आहे, असं वाटत नाही. काव्यनिर्मिति करीत असतांना कवि त्याला आलेल्या जीवनानुभवांतलं आकारसत्य शोधीत असतो. एकाच वेळीं जीवनाचा, आकारांचा, आणि स्वतःच्या व्यक्तित्वाचा घेतलेला हा शोध असतो. या शोधाचा प्रत्यय येत नाही तेव्हा स्वतंत्र निर्मितीची प्राणकळा रचनेला येऊं शकत नाही. ‘पृथगात्मता’ याचा अर्थ हाच. कवीनं घेतलेल्या आपल्या व्यक्तित्वाच्या प्रामाणिक शोधांत ती अपरिहार्य असते. सुप्रसिद्ध कवि हॉपकिन्स याला “Beautiful to individuation” असं म्हणत असे. तो एके ठिकाणीं म्हणतो, “Every poet, I thought, must be original and originality a condition of poetic genius; so that each poet is like a species in nature . . . and can never recur.”

तुम्हाला मला असं विचारायचं आहे की लेखकाच्या पृथगात्मतेविषयी तुमची कल्पना तरी कोणती आहे?



मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम ... दि. ...
क्रमांक ... नों: दि: ...

**बोरकर** : पाडगांवकर, तुम्ही या कवितेंतल्या सहजतेला सहजतेचा आभास म्हणा किंवा सारी कविताच परभृत म्हणा, पण मला तसं मुळीच वाटत नाही. ही कविता निर्माण झाल्यानंतर मला निर्मितीचं एक अपूर्व आगळं समाधान लाभलेलं आहे आणि आज इतक्या वर्षांनंतरदेखील अशी कविता माझ्या हातून लिहून झाली याची मला धन्यता वाटते. या कवितेच्या घाटाच्या बाबतींत मी तांब्यांचं 'घर' आपलंसं केलेलं असलंच तर तें मीं इतकं पार बदलून टाकलेलं आहे की तें आपल्या आगळेपणानं तांब्यांनाहि विस्मयांत पाडील. माझ्या या उत्तरांत तुम्हाला थोडी दर्पोक्ति दिसली तर ती या कवितेच्या बाबतींतली माझ्या भावनेची द्योतक समजा आणि मला क्षमा करा.

आता थोडं पृथगात्मतेबद्दल बोलूं. पृथगात्मतेची नेमकी व्याख्या करणं कठीण आहे. कोणत्याहि मानसशास्त्रवेत्त्याला अजून ती काटेकोरपणं करतां आलेली नाही. अर्थात् मी ती करण्याच्या भानगडींत पडणार नाही. पण तिच्याबद्दल मला काय वाटतं तें थोडक्यांत सांगण्याचा प्रयत्न करतों.

कवीचा मनःपिंड, त्यानं कळत-नकळत पुजलेले आणि अनुसरलेले आदर्श, जीवन जगतां जगतां त्याच्यावर घडत गेलेले संस्कार, त्याच्या मनाला जडलेल्या सवयी, त्याच्या ज्ञानेंद्रियांना उपजत लाभलेल्या आणि साधनेनं प्राप्त झालेल्या शक्ति, त्याच्या अबोध मनांत साचून राहिलेल्या वांशिक स्मृति, त्याच्या अंतींद्रिय संवेदनांना जाणवणारे भास आणि दृश्यमान होणारीं स्वप्नं, सुखदुःखाच्या उत्कट क्षणीं त्याला घडलेलं जीवनदर्शन, भौतिक आणि वैचारिक विश्वांतील वस्तूंची त्याची आवडनिवड ठरवणारी त्याची सौंदर्यदृष्टि, त्याला प्राप्त झालेले प्रतीतीचे सोपान, प्रतीति घेण्याची त्याची विशिष्ट पद्धति, त्या प्रतीतिपद्धतीच्या समांतर चालणारी त्याची आविष्करणपद्धति आणि आपल्या जाणिवेचीं परिमाणें वाढवण्याची उपजत ऊर्मि—किंबहुना तिची उत्कटता—या सर्वांचा परिपाक म्हणजेच त्याची पृथगात्मता असं मी म्हणेन. हा परिपाक किंवा हें रसायन घडतांना त्याची प्रतिभा catalytic agent सारखी काम करीत असते. अशा किती द्रव्यांचा एकरस ती घडवूं शकते आणि त्यांतून कोणत्या शक्ति प्रगट होतात यावरून त्याची पृथगात्मता ठरत असते.

**पाडगांवकर** : मीं तुम्हाला कवीच्या पृथगात्मतेविषयी तुमची कल्पना कोणती आहे असं विचारलं होतं! तुमच्या उत्तरावरून त्याची कल्पना नीटशी येत नाही. कवीचं मन कसं असतं याविषयीचा ऐसपैस झगा तुम्ही शिवून दिला: त्यांत जगांतल्या कुठल्याहि कवीला ढकलून देतां येईल!

तुमची निसर्गकविता वैशिष्ट्यपूर्ण आहे. तिचं नातं असलंच तर तें तांब्यांशीं नाही—बालकवींशीं आहे. इंद्रियसंवेदनांचीं अत्यंत तरल अशीं रूपं तुमच्या कवितेंत आढळतात तशीं तांब्यांच्या कवितेंत आढळत नाहीत. तांब्यांच्या कवितेंत निसर्ग येतो—पण निसर्गाचीं वर्णनं बहुधा विधानवजा वाटतात. कधी तीं रूपकात्मक असतात, कांही वेळां अलंकरणासारखा त्यांचा उपयोग येतो, कांही वेळां कवितेंतून व्यक्त होणाऱ्या भावनेला हीं निसर्गवर्णनं उठाव देतात. परंतु बालकवींच्या 'औदुंबर'सारख्या कवितेंत संवेदनांच्या प्रतीतीचं असं जें विश्व उमलतं, भाववृत्तीनं भारलेलं विश्व उमलतं, तसं तांब्यांच्या कवितेंत फारसं आढळत नाही. हें सामर्थ्य तुमच्या ठिकाणीं आहे; किंबहुना तुमच्या काव्याचं तें एक असाधारण भूषण आहे- 'जीवनसंगीतां'तल्या 'सांजवेळ', 'मुशाफिरा' या व 'दूधसागरां'तल्या कित्येक कविता याचं उदाहरण म्हणून देतां येतील. फासल्याशा वाटणाऱ्या तरुगिरींच्या ओळी, वायूच्या स्कंधीं मान टाकणारा श्रांत कोलाहल, काळोख पाहून व्याकुळणारं संध्याजल, गाजणाऱ्या माडांतून भडकणारा लाल जाळ व भोवतालच्या गूढ सावल्या, सावळ्या रुखावळींतला कापरा धूर, न सळसंळणारी चिंच...या साऱ्या प्रतिमा आम्ही कधीहि विसरूं शकणार नाही. ही प्रत्येक भारलेली प्रतिमा म्हणजे एकएक मंतरलेलं जग आहे. हें जग हळुवारपणं टिपून घेणारं आणि तितक्याच जिवंत हळुवारपणं व्यक्त करणारं मन विलक्षण संवेदनाशील असलं पाहिजे. 'पण ते फुलांचे अथवा निर्झरणींचे कवि नाहीत, मानवतेचे कवि आहेत' असं जेव्हा टीकाकार म्हणतो, तेव्हा तुमच्या कवितेचं सौंदर्य त्याच्या नजरेंतून हुकलं तर नाही ना—असा (रास्त) संशय वाटूं लागतो. तुमच्या कवितेंतला निसर्ग साधन म्हणून 'वापरलेला' नाही; 'रंगभूमीवर उभ्या असलेल्या नटावर कुशलतेनं प्रकाश टाकून त्याचा अभिनय खुलवतां येतो' तसा कवितेंतला अनुभव 'खुलवण्यासाठी' निसर्ग तुमच्या कवितेंत येत नाही. या निसर्गप्रतिमा अनुभवाचा अपरिहार्य असा भाग आहेत. कवितेंतल्या निसर्गाकडे तुम्ही कोणत्या दृष्टीनं पाहतां? तांबे यांच्या काव्यांतून येणाऱ्या निसर्गाविषयी तुमचं मत काय? मीं मांडलेला तुमचा वेगळेपणा तुम्हांला पटतो का? मानवता, संस्कृति, ध्येयवाद वगैरे बडी मंडळी न येतांसुद्धा केवळ संवेदनांच्या अत्यंत तरल अनुभवांतून उत्कृष्ट कविता निर्माण होऊं शकते असं तुम्ही मानतां का?

**बोरकर :** माझ्या कवितेंत निसर्ग येतो तो अनुभवाचा कांही तरी भाग होऊन हें तुमचं म्हणणं खरं आहे. माझ्या भावविश्वाच्या जलाशयांत भोवतालच्या निसर्गाचं प्रतिबिंब आपोआपच पडतं आणि त्याला एक आगळीच तरलता प्राप्त होते. जेव्हा-

जेव्हा भाववृत्तीच्या तीव्रतेनं मी झपाटला जातों, मंतरल्यागत होतों, तव्हातेव्हा माझ्या तदनुकूल निसर्गसंवेदना आपोआपच जाग्या होतात आणि त्या आपलं प्रतिमाविश्व उभं करतात. एकाएकी निसर्गाच्या आत्मीय भागाशीं माझी तार जमते आणि त्याच्या-माझ्यांत अत्यंत निकटचं असं हृदयंगम communion निर्माण होतं. आमच्यांत हा जो जिव्हाळ्याचा सख्यभाव आहे तो उपजत तर आहेच. शिवाय बालपणांतले कटु अनुभव त्याला गहिरेपणा आणायला कारण झाले आहेत. अत्यंत 'मूडी' मूल म्हणून घरांत आणि माझ्या संवगड्यांत माझी चेष्टा चाले. त्यासंबंधी बोलतांना आई म्हणत असते, 'हा तान्हं मूल असल्यापासूनच असा. आपल्या म्हाळशेसारख्या याच्याहि दिवसाला सतरा कळा असत. कधीकधी तर याची नुरा पाहून मी घाबरून जायची.' भोवतालच्या निसर्गाच्या वृत्तिपालटाचा ठसा माझ्यावर फार लवकर उमटे, आणि त्यामुळं प्रसन्नता आणि विषण्णता आळीपाळीनं माझ्यावर स्वार होऊन माझ्या शरीरप्रकृतींत पालट घडवीत. माझ्या अतितरल संवेदनाशीलतेमुळं लहानपणीं सुखापेक्षा दुःखच माझ्या वाट्याला अधिक आलं. तिच्यापायीं घरांत आणि शाळेंत माझा अक्षरशः छळ व्हायचा. आपलं मन समजून घेईल, आपल्या भावनेला डोळसपणं साथ देईल, असं कुणी मला लाभलंच नाही. त्यामुळं माणसांचा भुकेला असूनहि मी अधिकाधिक एकांतप्रिय बनत चाललों आणि उराशीं जपलेलं माझं सुखदुःख मी निसर्गातील स्थिरचराला आत्मीय मानून सांगूं लागलों. या स्थिरचराला माणसांप्रमाणं व्यक्तित्व आहे, आणि माणसांपेक्षा त्यांची संवेदनांची जाणीव अधिक निरागस आणि सुजाण आहे, असं मला वाटूं लागलं. त्यांच्या सहवासांत मी जास्त जास्त रमूं लागलों आणि माझ्या मनावरचा भार हलका होऊं लागला. त्यांच्याशीं तन्मय होतांना अनेकदा माझ्या गालांवरून कृतार्थतेचीं आसवं ओघळलीं आहेत. गोव्यांतल्या समृद्ध निसर्गानं मी अष्टौप्रहर वेढला गेलों होतों आणि त्याच्याशीं जमलेल्या अशा आत्मीय सान्निध्यांत आमच्यां-तला सख्यभाव गाढावला होता. त्यामुळं कधी माझ्या भाववृत्तीचं प्रतिबिंब मला माझ्या भोवतालच्या निसर्गांत दिसायचं, तर कधी निसर्गाच्या भाववृत्तीनं मी मंतरला जायचा. कधी मी त्याचा आरसा तर कधी तो माझा आरसा. भाववृत्ति जेव्हा उत्कट होते, तेव्हा मला वाटतं आपल्यांतली कोणती तरी अतींद्रिय शक्ति जागी होते आणि त्या वेळीं आपल्या प्रतिभादृष्टीला एक नवीच प्रतिमासंगति भासमान होते. मला हें नीटसं सांगतां येत नाही. पण तुम्ही स्वतः या बाबतींत बालकवींच्या आणि माझ्या जातींतले असल्यामुळं मला काय म्हणायचं आहे हें तुमच्या लक्षांत आलंच असेल. तांबे निसर्गाचं चित्रण करतात, स्वतःच निसर्गचित्र बनत नाहीत, हें तुमचं

म्हणणं मला पटतं. कवि स्वतःच जेव्हा निसर्गचित्र बनतो तेव्हा निर्माण होणारी कविता निसर्गाइतकीच जिवंत आणि रसरशीत होत असते. मानवता, संस्कृति, ध्येयवाद, तत्त्वज्ञान वगैरे गोष्टींना रसिकाच्या पिंडाप्रमाणं ती वेगवेगळीं आवाहनं देऊं शकेल, पण त्यांचं आलंबन घेण्याचं तिला कारण नसतं.

**पाडगांवकर :** तुमची कविता—विशेषतः निसर्गकविता—'प्रादेशिक' आहे असं म्हटलं जातं. हें तुम्हाला कितपत पटतं? ही तुमची कविता प्रादेशिक म्हणायची तर बालकवींची कविता प्रादेशिक आहे असं कां म्हणूं नये? प्रादेशिक निसर्ग कविता असूं शकते का?

**बोरकर :** प्रत्येक भूभागांतील निसर्गाला स्वतःचा असा खास persona असतोच. तो खऱ्या निसर्गकवीला स्वभावतःच जाणवतो आणि त्याच्या कवितेंतून आपाततः प्रगट होतो. त्या दृष्टीनं कोणतीहि अस्सल निसर्गकविता प्रादेशिकच असते. बालकवींच्या निसर्गकवितेला प्रादेशिक असं म्हटलं गेलं नाही आणि माझ्या कवितेला मात्र तें विशेषण लावलं गेलं याचं कारण चटकन डोळ्यांत भरणारा गोव्याच्या निसर्गांतला वेगळेपणा आणि नवाई हें असावं असं मला वाटतं.

**पाडगांवकर :** तुमची शब्दकळा 'नादमधुर' आहे अशी प्रशस्ती नेहमी तुम्हाला बहाल केली जाते; बोरकरांची रचना गेय आहे असंहि कुणी म्हणतात. मला वाटतं, तुमच्या कवितेंतील या तथाकथित गेयतेंतहि तांब्यांच्या अनुकरणाचा बराचसा भाग आहे. पण तो भाग वेगळा. खरं म्हणजे पुष्कळ वेळां 'नादमधुर रचना' हा शब्दप्रयोग आपण भोंगळपणानं वापरतों. अनुप्रास साधले, अंतर्यमकांची माळ ओवली, मृदु व्यंजनांचा अधिक वापर केला की, 'रचना' ऐकायला बरी लागते—की झाली ती नादमधुर, गेय रचना! केशवसुतांची रचना नादमधुर नाही असं जेव्हा कुणी म्हणतो तेव्हा हसूं येतं. कवितेची शब्दकळा हा अनुभवाचा अपरिहार्य भाग असतो.

*ललितलवंगलतापरिशीलनकोमलमलयसमीरे*

ही जयदेवाची ओळ मला जेवढी नादमधुर वाटते, तेवढीच केशवसुतांची 'कठिण शब्द या धोंड्यांनीं—करितों हाणाहाण' ही ओळ मला 'नादमधुर' वाटते. रचनेचं सौष्ठव म्हणजे 'ललितलुलित' शब्दांची गुळगुळीत देखणी माळ नव्हे! त्यांत शब्दांनी अनुभवाशीं राखलेलं इमान अभिप्रेत असतं. तुमच्या उत्कृष्ट कवितांत तें आढळतं. पण पुष्कळ वेळां नुसत्याच 'बाह्य' गेयतेसाठी तुम्ही

शब्दांशीं खेळतां असंहि वाटतं—अशा वेळीं पोकळ शब्द अनुभवावर स्वार होतात ! काव्यांतल्या गेयतेविषयी तुमच्या कोणत्या कल्पना आहेत ?

**बोरकर :** कवितेची शब्दकळा हा जसा अनुभवाचा अपरिहार्य भाग असतो तसाच तो अनुभव व्यक्त करणाऱ्या कवीच्या स्वभावाचाहि भाग असतो. माणसाच्या आवाजाची जात ही जशी त्याच्या स्वभावाची जातिवंत निशाणी असते त्याचप्रमाणं कवीची शब्दकळादेखील त्याच्या मनःपिंडाची द्योतक असते. मात्र बाह्य श्रुतींना रिझवणारी कवितेची गेयता उपेक्षणीय नाही. पण अंतःश्रुतींना जाणवणारा तिच्या आंतरिक गेयतेचा प्रवाह तिच्या शब्दकळेंतून भावाच्या जातीगतीशीं इमान राखून वाहता राहिल्याशिवाय ती व्यर्थ आहे. म्हणूनच समर्थांची ' धिर्धरा धिर्धरा तकवा हडबडूं गडबडूं नका ' ही ओळ ' नादमधुर ' आहे, हें मी जाहीरपणं सांगून टाकलं आहे. या शब्दकळेंत समर्थांचा भाव आणि स्वभाव समर्थपणानं दिसून येतात.

संगीतानं भारावलेल्या गोव्याच्या वातावरणांत मी जन्मलों, वाढलों आणि त्याच्यावरच पोसलों. त्यामुळं बाह्य आणि आंतरिक या दोन्ही संगीतांचं अद्वैत साधल्याशिवाय माझं समाधानच होत नाही. कवितेच्या ओळी माझ्या मनांत येतात त्या आपल्या अंतःसंगीताप्रमाणंच रागतालहि घेऊन येतात. माझ्या कवितांचे छंद, जाति किंवा वृत्त यांचीं नावं तुम्ही मला विचारलींत तर मला तीं बिनचूक सांगतां येतीलच असं नाही; पण सहसा तीं चुकायचीं नाहीत. तसंच त्यांच्या रागतालांबाबतहि आहे. मला त्यांचीं नावं सांगतां येणार नाहीत. पण त्यांचं आणि कवितेच्या भावार्थाचं नातं मला जाणवलेलं असतं. 'जीवनसंगीतां'त जे राग-ताल आहेत ते मी जाणकाराकडून, मी म्हणतों तशा त्या त्याला गाऊन दाखवून, लिहून घेतले. हेतु एवढाच की मी म्हणतों तशा त्या म्हटल्या जाव्या. भाषेंतला कोणताहि शब्द घेतला तर तो संगीतमयच असतो. किंबहुना, तो संगीताच्या रसायनापासून तयार झालेला ' क्रिस्टल ' असतो. साकार आणि संगीतमय असूनहि एकापरीनं तो ' नेब्यूला 'प्रमाणं अनाकार आणि पुसट असतो. शब्दाचं शक्तिकेंद्र नीट हेरून त्यांत आपल्या भाववृत्तीची प्राणप्रतिष्ठा कवीला करतां आली की त्याला विलक्षण गति प्राप्त होते आणि त्यांतून संगीताचं, प्राणाचं आणि प्रकाशाचं नित्यनूतन उत्सर्जन अखंड होत राहतं. कधी हें साधतं. कधी साधत नाही. शब्दांशीं खेळतांखेळतांच मला शब्दाचं हें रहस्य उलगडत गेलं. जेव्हा तें हातीं लागत नाही तेव्हा माझी ही लहानपणची खोड तेवढी शिल्लक राहते. त्याला काय करणार ?

**पाडगांवकर :** बोरकर, या कालखंडांत रविकिरणमंडळाची कविताहि तांब्यांच्या

कवितेप्रमाणंच लोकप्रिय झाली होती. काव्यगायनाच्या कार्यक्रमामुळं तिचा प्रसारहि अधिक वेगानं झाला होता. या कवितेचा तुमच्या मनावर कोणता परिणाम झाला? या कवितेचीं वैशिष्ट्यं कोणतीं, तिच्या मर्यादा कोणत्या, असं तुम्हाला वाटतं? काणेकर, अनिल, कुसुमाग्रज, तुम्ही यांची कविता या कवींहून वेगळी—अधिक सामर्थ्यवान् आहे, असं रसिकांना वाटलं हें खरं का?—आणि तसं कां वाटलं? रविकिरणमंडळांतल्या कवींपैकी कुणाची कविता तुम्हाला विशेष आवडते? या कालखंडांतले कवि आणि रसिक यांच्या मनावर रविकिरणमंडळाच्या कवितेचा कोणत्या तऱ्हेचा प्रभाव पडत होता याच्या विचाराला आधुनिक मराठी कवितेच्या इतिहासांत महत्त्व आहे. या कालखंडाचं दर्शन आम्हाला तुमच्या शब्दांतून, अनुभवांतून हवं आहे. आणि हें सांगत असतांना अनिल, काणेकर, कुसुमाग्रज ह्यांच्या कविता वाचतांना त्या वेळीं तुम्हाला काय वाटत होतं हेंहि सांगाल तर चांगलं होईल.

**बोरकर :** रविकिरणमंडळाची आणि त्यांतल्या त्यांत यशवंत, गिरीश, माधव ज्यूलियन यांची कविता माझ्या आधी वाचनांत आली होती आणि नंतर तांब्यांची. महाराष्ट्रांत कोणाला किती लोकप्रियता लाभलेली आहे याची वर्दी गोव्यापर्यंत पोचली नव्हती. जीं पुस्तकं किंवा मासिकं योगायोगानं माझ्या हातीं पडत तीं मी वाचीत होतों आणि जी कविता या ना त्या कारणानं मला वेध लावी ती मी गुण-गुणत होतों. रविकिरणमंडळाच्या कवितेचा माझ्यावर फारसा प्रभाव पडला नाही. पण त्यांतल्या कांही कवींच्या कांही कविता त्या वेळीं मला चांगल्याच आवडल्या आणि त्या कवींचीं कांही वैशिष्ट्यं मला विलोभनीय वाटलीं. 'अभागी कमल'-मधली गिरीशांची कथनशैली आणि रचनेची सुभगता मला आवडली; पण त्यांच्या स्फुट कवितेनं मला म्हणण्यासारखा वेध लावला नाही. यशवंतरावांची भाषा रांगडी, भावना रंगेल, आदर्श सोज्ज्वळ, रचना सहजस्फूर्त, कल्पकताहि चांगल्या-पैकी. कवितांचा आशय कांहीसा स्थूल आणि सौंदर्यदृष्टि माफक. या त्यांच्या विशेषांतले कांही मला रुचणारे पण माझ्या अपेक्षांचं किंवा आदर्शांचं माप भरू न शकणारे तर कांही स्वभावतः मला आकृष्ट न करणारे. तरीदेखील आपल्या सच्चेपणामुळं त्यांच्या 'यशोधना'नं मला चांगलंच भारलं. 'प्रतिभे'तली एक कविता उघडउघड 'यशवंतां'चं अनुकरण आहे. 'जयमंगला' या काव्यांतलीं कांही गीतं तर मला तोंडपाठ झालीं होतीं. माधवरावांची बरीचशी कविता मला हठाक्रुष्ट वाटलेली आहे. पण 'तेथें चल राणी', 'कंचनी' आदि कांही कविता आणि त्यांच्या कांही गजला यांनी मला त्या वेळीं वेड लावलं होतं. रविकिरणमंडळाच्या सर्व कवींत

अधिक चोखंदळ सौंदर्यसृष्टि माधवरावांची. नव्याचा त्यांचा हव्यासहि इतरांहून मोठा आणि कवितेचा आदर्शहि अधिक विकसित आणि डोळस. त्यांची जी कविता मला मनापासून आवडली तिनं अल्प असले तरी कांही खोल संस्कार माझ्यावर ठेवले. रविकिरणमंडळाच्या एकंदर कवितेची मुख्य मर्यादा म्हणजे तिची स्थूलता. पण तिच्या जोडीला तिच्याकडे एक तिची अशी खास शक्ति होती. ती म्हणजे तिची आधुनिकता, सच्चेपणा आणि निर्भयता—अर्थात् त्या काळाच्या संदर्भात—सामान्य माणसाच्या सामान्य अनुभवांना सहजतेनं कलात्मक आकार देण्याची हौस. ज्या लौकिक दैनंदिन अनुभवांना पूर्वी काव्यांत मज्जाव होता त्यांना त्यांनी प्रतिष्ठेचा पाट मिळवून दिला. जें सर्वसामान्यांना जाणवत होतं, हृद्य वाटत होतं, पण रम्य करून सांगतां येत नव्हतं, त्याला या कवींनी सहजसुभग वाचा मिळवून दिली. लोकांना तें हवं होतं. समर्थ कवींची पहिली पिढी दिवंगत झाली होती आणि नंतरच्या पिढींत कित्येक बऱ्यापैकी पद्यकार केवळ विश्वविद्यालयीन पदव्यांच्या भरगच्च पाठिंब्यावर किंवा पूर्वसूरींच्या नीरस अनुकरणावर कवींचीं आसनं बळकावून बसले होते. लोक या प्रकाराला उबगले होते. त्यांना समर्थ नसलं तरी सच्चं असं कांही तरी हवं होतं. तें त्यांना या रविकिरणमंडळाच्या कवितेंतून मिळालं. चवीचे चोचले माणसाला भूक भागल्यानंतर सुचतात. एकादाच चोखंदळ रसिक आपल्या चवीचा पदार्थ सापडेपर्यंत राजीखुषीनं भुका राहतो. अशा रसिकाचं समाधान रविकिरणमंडळाच्या कवींना नेहमीच किंवा पूर्णांशानं करतां आलेलं नसलं तरी सर्वसामान्य रसिकाची भूक त्यांनी चांगली भागवली आणि तीदेखील कित्येक वर्षं अगदी सातत्यानं. यामुळं अर्थातच ती लोकप्रिय झाली. रविकिरणमंडळानं मराठी रसिकतेची उंची वाढवली नसेल; पण विस्तार खचित वाढवला, कवितेला अधिक आधुनिक बनवलं आणि त्यानंतर येणाऱ्या कवितेच्या स्वागताला अनुकूल मनोभूमि तयार केली. या साऱ्याच मंडळींशीं माझे संबंध जिव्हाळ्याचे आहेत आणि मीं केलेलीं विधानं एक वेळ त्यांना मान्य झालीं नाहीत तरी माझ्या सद्भावनेबद्दल ते शंका घेणार नाहीत अशी खात्री असल्यामुळंच मी हें एवढं स्पष्ट आणि विस्तारानं बोललों.

रविकिरणमंडळाची कविता माझ्या वाचनांत आली ती १९२८-३०च्या दरम्यान, तर तांब्यांची १९३१ मध्ये. ही कविता वाचल्यावर माझ्या कवितेविषयीच्या आदर्शांत एवढी मौलिक क्रांति झाली की रविकिरणमंडळाची कविता मला पूर्वीसारखा मोह पाडूं शकेना. 'अनिल' फार थोडं लिहीत आणि तें क्वचितच माझ्या हातीं पडे. पण काव्यगुणांत मला त्यांची कविता नेहमीच

रविकिरणमंडळाच्या कवितेहून अधिक संपन्न आणि अधिक टिकाऊ वाटली. काणेकरांच्या 'चांदरात'वर मी निहायत खूष होतों. ती मला रविकिरणमंडळाच्या कवितेहून अधिक आधुनिक आणि अधिक समर्थ वाटली. त्यानंतर ज्या दोन कवींच्या कवितेनं मला वेडं केलं ते म्हणजे ना. घ. देशपांडे आणि कुसुमाग्रज. ना. घ. हे पिंडानं अस्सल lyricist आहेत, तर कुसुमाग्रज हे पेटलेले bard आहेत. त्यांच्या 'विशाखे'तली ring तर epic आणि prophetic आहे. रविकिरणमंडळाचे समकालीन 'अनिल' आणि त्यानंतरचे काणेकरादि कवि रसिकांना—विशेषतः चोखंदळ रसिकांना—अधिक संपन्न आणि समर्थ वाटले. त्यांच्या कवितेनं माझ्या रसिकतेचं आणि कलाशक्तीचं चांगलं पोषण केलं. पण यशवंतांच्या इतकी लोकप्रियता त्यांतल्या कुणालाच लाभली नाही, असं मला वाटतं. त्याचीं कारणं मग कोणतींहि असोत.

**पाडगांवकर :** 'तेथें कर माझे जुळती' ही 'जीवनसंगीतां'तली तुमची कविता फार गाजली. तिच्यांत मानवतावाद आहे हें तिच्या लोकप्रियतेचं कारण. मला ही कविता श्रेष्ठ दर्जाची वाटत नाही. 'जीवनसंगीतां'तली 'सांजवेळ' किंवा 'मुशाफिरा' या श्रेष्ठ दर्जाच्या कविता आहेत. पण त्या कविता अशा कां गाजल्या नाहीत? ध्रुवपदांत चमकदार उदात्त भावनेचा आश्रय घेणारं विधान करायचं आणि पुढील कडव्यांतून यांत्रिक सफाईनं त्याचा विस्तार करायचा, असं 'तेथें कर माझे जुळती' या कवितेचं स्वरूप आहे. 'सांजवेळ' या कवितेप्रमाणं एकसंध, सलग निर्मितीचा प्रत्यय तिच्यांतून येत नाही. तुम्ही स्वतः आज या दोन्ही कवितांकडे कोणत्या दृष्टीनं पाहतां?

**बोरकर :** 'सांजवेळ' किंवा 'मुशाफिरा' या कविता 'तेथें कर माझे जुळती' या कवितेहून अधिक organic आणि आविष्करणांत अधिक यशस्वी आहेत, हें तुमचं म्हणणं खरं आहे. उत्तम ख्याल गाणं, संपल्यानंतरदेखील बराच काळ मनांत निनादत राहतं, तशीच वाचून झाल्यानंतरदेखील बराच काळ मनाला भारून ठेवते तीच उत्कृष्ट कविता. 'सांजवेळ' किंवा 'मुशाफिरा' या कवितांच्या मानानं 'तेथें कर माझे जुळती' या कवितेंत ही शक्ति कमी आहे. पण ती कविता गाजली ती केवळ त्यांतल्या मानवतावादामुळं हें तुमचं म्हणणं मला थोडं अतिशयोक्त वाटतं. तें कारण तर आहेच; पण तेवढंच कारण नाही. त्याचप्रमाणं उदात्त भावनेचा आश्रय करणारं चमकदार विधान आणि पुढं त्याचाच सफाईनं केलेला यांत्रिक विस्तार असं या कवितेचं स्वरूप आहे हें तुमचं म्हणणं तितकंसं खरं नाही. या कवितेमागची जी भावना आहे ती सच्ची आहे आणि तीच thought

evel वर घनीभूत झाली आहे. तुम्ही म्हणतां तसा कांहीसा प्रकार पहिल्या चार कडव्यांत झालेला आहे. पण पुढं ही कविता वेगळं वळण घेते आणि तिच्या मागच्या भाववृत्तीला गहिरेपणा येतो. पण 'सांजवेळ' किंवा 'मुशाफिरा' या कवितांइतकी ती यशस्वी किंवा organic नाही एवढं मात्र खरं. असं असून ही कविता तेवढी इतकी कां गाजली आणि 'सांजवेळ' आणि 'मुशाफिरा' तशा कां गाजल्या नाहीत? याला माझ्या मतं तीन कारणं आहेत. एकंदरींत मराठी मनाला ध्येयवादी वैचारिकतेचं आवाहन जितक्या लवकर भावतं तितक्या लवकर शुद्ध सौंदर्य-संवेदनेचं आवाहन भावत नाही हें एक, ज्या कालखंडांत ही कविता लिहिली गेली त्या काळीं लोकमानसावर अधिराज्य गाजवणारा तात्कालिक भाव हें दुसरं, आणि तिच्यांतल्या मानवतावादामागला सच्चेपणा हें तिसरं. हें तिसरं कारण नसतं तर तिची लोकप्रियता आजवर टिकली नसती.

**पाडगांवकर :** यावरून सहज एक गोष्ट जाणवली : आपल्याकडे काव्याचे बरेचसे टीकाकार मानवता, मांगल्य या गोष्टी कवितेतून अगदीच स्थूलपणं शोधीत असतात असं तुम्हाला नाही वाटत? कवितेंतल्या या सर्व उदात्त, सात्त्विक मसाल्याकडे बघण्याची त्यांची दृष्टि कलाबाह्य असते. एखाद्या कवितेचं रसग्रहण करीत असतांना विचाराचं असलं सूत्र घेऊन तें घोपटीत वा पिंजीत बसायचं आणि कलानिर्मिति म्हणून कवितेचं सौंदर्य कशांत आहे तें मुळीं शोधायचंच नाही, असा हा घोपटमार्गी प्रकार होता. अशा तऱ्हेच्या टीकेमुळं चांगल्या कवितेकडे पाहण्याची जी सुजाण सौंदर्यदृष्टि निर्माण व्हायला हवी तशी होत नाही : आणि मांगल्य, मानवता, उदात्त ध्येयवाद, प्रकाशपूजन, दलितांविषयीची सहानुभूति इत्यादि सांकेतिक शब्दांच्या शेवाळावरून रसिकतेचा पाय सारखा घसरत जातो. 'तेथें कर माझे जुळती'-सारख्या कवितांच्या बाबत असंच झालं नसेल ना? आज आपण 'सांजवेळ' किंवा 'मुशाफिरा' या कवितांकडे ज्या एका दृष्टीनं पाहतों तशी दृष्टि त्या काळीं तुमच्या आढळांत होती काय? यासारख्या तुमच्या कवितांची शक्ति आणि 'तेथें कर माझे जुळती'सारख्या कवितांची मर्यादा नेमकी कशांत आहे हें तुमच्या निदर्शनाला कोणीं आणून दिलं होतं काय?

**बोरकर :** आपल्याकडच्या टीकेबाबत तुम्हीं जी वस्तुस्थिति सांगितलीत ती जितकी निष्ठुर आहे तितकीच खरीहि पण आहे. आणि हेंच ज्ञानेश्वरांपासून तुमच्या-माझ्यापर्यंतच्या सर्वच मराठी कवींचं मोठं दुर्दैव आहे. जवळजवळ सातशें वर्षं आम्ही ज्ञानेश्वरीचीं पारायणं करीत आहोंत पण तिच्या संशुद्ध आणि समृद्ध सौंदर्या-नुभवानं हेलकावणारे आणि तें उलगडून दाखवणारे किती निघाले? इतकीं शतकं

गेलीं तरी जिथं ज्ञानेश्वरांची ही स्थिति, तिथं तुम्हीआम्ही 'किस पेडकी पत्ती' ! तुम्ही म्हणतां त्या सुजाण सौंदर्यवेधी रसिकदृष्टीच्या अभावीं आपल्या फुलत्यावाढत्या काळांत आपल्या शक्ति आणि मर्यादा तपासण्याची, आपली साधना परिपुष्ट करण्याची संधीच आपल्याला मिळूं शकत नाही. त्यामुळं लोकप्रियता मिळूनदेखील आपल्या कलात्मक व्यक्तित्वाला जोम असतो तेव्हा डोळसपणा लाभत नाही आणि स्वतःच्या एकाकी धडपडींतून जेव्हा तो लाभतो तेव्हा जोम ओसरलेला असतो. मग उरतो तो कुरतडणारा विषाद. माझ्या बाबतींत हें असं सतत घडत राहिलं. माझ्या कवितेला चहाते खूप मिळाले; त्यांतले कांही तर साहित्यांतले दिग्गज होते. पण आज तुम्ही ज्या नजरेनं माझ्या कवितेकडे पाहतां त्या नजरेनं पाहणारं कुणी मला वेळींच भेटलं असतं तर माझी कविता किती तरी पुढं गेली असती, असा विचार मनांत येतो आणि चित्त विषण्ण होतं.

**पाडगांवकर :** कवीच्या काव्यसाधनेंत वाङ्मयीन टीकेची त्याला मदत व्हायला हवी. तुम्हाला ही मदत व्हावी तेवढी झाली नाही असं दिसतं. मग मार्गदर्शनाची प्रेरणा तुम्हीं कशांतून मिळवलीत ?

**बोरकर :** आरंभापासून जी चांगली कविता माझ्या कानावर पडली किंवा माझ्या वाचनांत आली तिनं माझ्या मनांत वेळोवेळीं घर केलं. ती मी धुंद होऊन गुणगुणत राहायचा. तिच्याशीं तन्मय होत तिच्यांतल्या शक्ति मी आत्मसात् करीत गेलों. ज्या ज्या गोष्टींवर मीं प्रेम केलं त्यांच्या त्याच्याशीं मी तन्मय झालों. या शक्तीमुळंच ती आपल्या परीनं माझ्यावर संस्कार करीत गेली, माझ्यांतल्या शक्ति जागवीत राहिली. पुढं या recreationनंच माझ्या बाबतींत re-creation होत मला creation चं सुवर्णद्वार उघडं करून दिलं. १९२८ पर्यंत मी पूर्वसूरींचे सूर आळवले. २९-३० मध्ये माझा स्वतःचा गळा थोडाबहुत मोकळा झाला आणि मीं जे इतके दिवस इतरांचे कित्ते गिरविले होते त्यांतून मला स्वतःची वाणी प्राप्त झाली. ३१-३२ मध्ये तांबे आणि टागोर मी आकंठ प्यालों आणि त्यांनी माझ्या फुलत्या व्यक्तित्वाला विशाल अशीं नवीं क्षितिजें दाखवलीं. माझ्या intuition च्या बळावर मी त्यांना भिडण्यासाठी धडपडूं लागलों. ३३-३६च्या दरम्यान दॉन प्रॉपेर्सिय कुन्हैय आफाँसु ई फिगैरेदु या विख्यात विदुषीच्या निकट संपर्कात मी आलों. आरंभीं बाईचा विद्यार्थी असलेला मी अल्पावधींतच तिचा आत्मज झालों. तिनं माझ्यावर अपार प्रेम केलं आणि मला वाङ्मयीन पुनर्जन्म मिळवून दिला. माझ्या प्रेमामुळं ती म्हातारपणांत मराठी भाषा शिकली. आदर्श कवितेची प्रक्रिया कशी असते हें जरी तिला अनुभवानं माहीत नव्हतं तरी त्याची चर्चा करणारं अद्ययावत् फ्रेंच

वाङ्मय तिनं डोळसपणं अभ्यासलं होतं. त्या वेळीं 'आलां' या नावाचा एक रसकोविद तिच्या विशेष आवडीचा होता. काव्यनिर्मितीच्या शास्त्रावरचे त्याचे प्रबंध ती मला समजावून सांगायची आणि माझ्याशीं त्यासंबंधी चर्चा करायची. लॅटिन देशांतील थोर कवींच्या साधनेचा इतिहास तिनं मला सतत पढविला, त्यांची निवडक कविता मला समजावून सांगितली. व्यवहार सांभाळून आपल्या कलात्म व्यक्तिमत्त्वाची ओळख कशी करून घ्यावी आणि त्याला कसं जपावं आणि तें कसं समृद्ध करावं याचे पाठ ती मला वारंवार देऊं लागली. त्यासाठी वाटेल तें मोल द्यायला कां तयार असलं पाहिजे याची ती तात्त्विक मीमांसा करी. विशेष म्हणजे मी एक थोर प्रतिभावंत आहें हें ती मला वारंवार बजावी आणि प्रसंगीं धारेवर धरी. सामाजिक नीतीचं काटेकोर पालन करीत असतांनादेखील मनानं तिच्यापासून मुक्त राहण्याचं महत्त्व तिनं मला पटवलं आणि जीवनांत सर्व सोसतांभोगतांना कलावंताला आपली तटस्थता कशी बाळगावी लागते हें माझ्या मनावर तिनंच बिंबवलं. भारतीयांचं आत्मदर्शन आणि ग्रीकांची सौंदर्यदृष्टि यांचं अद्वैत मला साधतां आलं पाहिजे असा तिचा आग्रह होता आणि तें मला केव्हा तरी शक्य होईल अशी तिची श्रद्धा होती.

तिनं माझ्यावर हे जे संस्कार केले आणि नव्या जगाचं जें दर्शन दिलं त्यामुळं जीवनांतून आणि कवितेंतून मला आता अधिक डोळसपणानं सौंदर्य टिपून घेतां येऊं लागलं. हा प्रकार १९४६ पर्यंत चालला. याच वर्षीं मी गोवं सोडून या बाजूला आलों. माझ्या आत्मीय जगापासून, माणसांपासून, निसर्गापासून माझी ताटातूट झाली. खरं म्हणजे उपटलेल्या झाडासारखा मी वाळूनच जायचा. पण माझ्यांत कुठं तरी जबरदस्त जीवनशक्ति होती. गोव्याच्या राजकारणाच्या ऐन धुमश्चक्रींत, दारिद्र्यांत, दैन्यांत मी तुमच्याबरोबर कवितेची चर्चा करण्यांत आणि नवनव्या कविता रचण्यांत कशा रात्रीच्या रात्री घालवल्या आहेत हें तुम्हांला माहीत आहे. त्या काळांत मी माझ्या कविमित्रांशीं ज्या चर्चा केल्या, त्यांची जी कविता वाचली —अगदी तुमच्या पिढींतल्या कवींचीदेखील—तिनं माझ्या काव्यविषयक जाणिवा अधिक समृद्ध केल्या. मला जें थोडंफार मार्गदर्शन मिळूं शकलं तें हें असं. वयाच्या तेराव्या वर्षापासून कुटुंबकारण, समाजकारण, राजकारण आणि 'पोट'कारण यांच्या वेगवेगळ्या आघाड्यांवर खर्ची पडत असतांना मला सवड आणि स्वास्थ्य जवळजवळ नव्हतंच. जें थोडं पदरांत पडलं आहे तें माझा ध्यास जबरदस्त आणि ईश्वराची कृपा थोर म्हणूनच.

**पाडगांवकर** : तुमच्या कवितेंतले संस्कृतीचे आणि परंपरेचे उल्लेखहि हृद्य आणि

तेजस्वी असतात असं तुमचं एक वैशिष्ट्य सांगितलं जातं. यात्रा, हरिमंत्र, ब्रह्याचें प्रज्ञास्थल, रुद्रनयन, ओंकार, प्रणव, सामवेद—असे अनेक शब्द तुमच्या कवितेंत येतात. पण या शब्दांमागं एकादा समृद्ध अनुभव आहे असं मला तरी वाटत नाही. या शब्दांचा वापर मला सांकेतिक वाटतो.

*श्रीहरिचें नाभिकमल*
*ब्रह्याचें प्रज्ञास्थल*
*तृतिय रुद्रनयन तूंच फुलविलें प्रभावें*

यांतले हे सगळे शब्द ठोकळ्यासारखे वसवलेले वाटतात. संस्कृति, परंपरा यांची काव फासली म्हणून हे शब्द काव्यानुभव पेलायला थोडेच समर्थ होणार ? या शब्दांचा उल्लेख काव्यांतून होऊं नये असं मला मुळीच म्हणायचं नाही. माझं म्हणणं इतकंच की एकादा विचार मांडण्यासाठी आयते तयार शब्द म्हणून त्यांचा उपयोग करूं नये.

**बोरकर :** तुमच्या प्रतिपादनांतलं तत्त्व मला संपूर्णतया मान्य आहे. ज्या कडव्याचा तुम्हीं नुकताच उल्लेख केलात त्यांत उत्पत्ति-स्थिति-लयाऐवजी मी दृश्य अशा पौराणिक प्रतिमा वापरल्या एवढंच. त्यांत तसं असाधारण कांहीच नाही. जें सांगायचं तें दृश्यमान करून सांगण्याच्या माझ्या प्रवृत्तींतून त्या आलेल्या आहेत. मीं त्या वापरल्या त्या संस्कृतीची काव फासण्याच्या इराद्यानं खास नव्हे. देवळांच्या, कथापुराणांच्या संपर्कात लहानपणापासून वाढलेल्या मला त्या प्रतिमा सहज हाताला आल्या. कुठं असल्या प्रतिमा पुरेशा अर्थघन झालेल्या नसतील. त्या माझ्या कवितेंत कुठं तशा झाल्या आहेत आणि कुठं झालेल्या नाहीत याचं परीक्षण मीं केलेलं नाही. पण असले शब्द, संकेत आणि प्रतिमा माझ्या कवितेंत अनेकदां येतात हें खरं आहे. त्याला कारण लहानपणीं माझ्यावर झालेले धर्मसंस्कार, पौगंडावस्थेंत झालेलं आध्यात्मिक साहित्याचं वाचनमनन, स्वप्नं, भास आणि दृष्टांत यांच्या अनुभवामुळं असल्या गोष्टींच्या ठिकाणीं बळावलेली श्रद्धा आणि ध्यानादिकाची थोडीफार साधना करतांना आलेले अपूर्व प्रत्यय. पण तुम्ही म्हणतां तशा त्या काव्यार्थघन झालेल्या नसतील तेथे त्या केवळ संस्कृतीच्या नावावर गौरवल्या जाणं गैर आहे.

**पाडगांवकर :** एकादा अनुभव व्यक्त करीत असतांना कितीहि सजीव प्रतिमेंतून तो व्यक्त झाला तरी तुमचं समाधान होत नाही. त्या कवितेंतल्या आशयाचं तत्त्व-ज्ञानात्मक विधान तुम्हाला करावंसं वाटतं; आणि त्यामुळं तुमच्या कित्येक कविता कलादृष्ट्या बिघडतात. मला वाटतं, ही लकब तुम्हीं तांब्यांच्या कवितेंतून उचलली

आहे. 'अमृतघट' या तुमच्या कवितेंत दैनंदिन जीवनांतल्या हृदयस्पर्शी प्रतिमा तुम्ही घेतां, पण तरीहि मूळ आशयाचं विधान केल्याशिवाय तुमचं समाधान होत नाही आणि आणि म्हणून

*तूं हंससी उपहासें तरुणा*
*यात्रेकरुंना, कस्तुरिहरिणा*
*आणि बांधिसी काय शहाण्या*
*घर मोडुनि मांडव तयावरी ?*

असं तुम्हाला विचारावंसं वाटतं—त्यामुळं कवितेचा कलात्मक तोल बिघडतो.

'घरांतलें चांदणें' ही सुंदर कवितादेखील घ्या ना. 'दो हृदयांतिल पराग जोडूं जडवुनि अधरावर अधरा' ही ओळ पागल करणाऱ्या चांदण्याची सारी शक्ति व्यक्त करायला समर्थ आहे.

*हिरवें झुंबर हळुच हालवूं*
*सुमगंधीं स्वर गोड कालवूं*
*निळे रुपेरी मीन चाळवूं करुं फेनाचा सुबक तुरा*

असं सुंदर कडवंहि तुम्ही लिहून जातां. जें सांगायचं आहे तें या प्रतिमांतून समर्थपणं सांगून संपलं नाही का ? मग

*सुज्ञपणाच्या बेड्या तोडूं*
*संवत्सरांचीं वसनें सोडूं...*
*...पुन्हां एकदां होउनि तान्हीं*
*रमूं सृष्टिच्या स्तन्यसेवनीं...*

या ओळींची जरूर काय ? अगदी अजूनपर्यंत तुमची ही लकब कायम आहे. तुमची सौंदर्यदृष्टि तर अत्यंत चोखदळ आहे; मग मी म्हणतों ही गोष्ट तुमच्या कलादृष्टीला खुपत कशी नाही ?

**बोरकर :** ज्या परंपरेवर आपण पोसतों-वाढतों तिचा वारसा सहजच आपल्या अंगवळणीं पडतो. तो प्रतिस्वभावच होतो म्हणा ना. ज्ञानेश्वर, टागोर, तांबे यांनी माझ्यावर फार संस्कार ठेवले. त्यांत मराठी संतकवितेचा हातहि थोडथोडका नाही. मला वाटतं, आपल्या तत्त्वपिपासू संस्कृतीवर पोसलेल्या भारतीय मनाला हा तत्त्वजिज्ञासेचा शाप म्हणा, वर म्हणा, आहेच. या तत्त्वजिज्ञासेनं कलात्मक पातळी गाठली तर प्रतिमांनी निर्माण केलेल्या कलेच्या पुतळीला ती उठाव देणारी pedestal ठरते आणि जेव्हा तिला तें साधत नाही तेव्हा ती तुम्ही म्हणतां

तशी कवितेचा तोल बिघडवते. तुम्हीं जीं दोन उदाहरणं दिलीं आहेत त्यांतल्या 'अमृतघट' या कवितेंत तें साधलं आहे आणि 'घरांतलें चांदणें' या कवितेंत तें फसलं आहे. चोखंदळ सौंदर्यवेत्त्याला हें साधलं नाही तरी उमजलं पाहिजे हें मला मान्य आहे. मात्र तत्त्वजिज्ञासा ही वर्ज्य मानली पाहिजे किंवा ती कलादृष्ट्या कवितेची अर्थवत्ता वाढवूं शकतच नाही असं मला वाटत नाही.

**पाडगांवकर :** 'सामाजिक जाणिवेच्या कविता' असं ज्यांना म्हणतां येईल अशा बऱ्याच कविता तुम्हीं लिहिल्या आहेत. (अर्थात् जाणिवेचे असे पाणीबंद कप्पे पाडतां येत नाहीत. विचाराच्या सोयीसाठीच मी असं म्हणतों आहें.) परंतु केशवसुत किंवा कुसुमाग्रज यांचा आवेश, तळमळीचा सच्चेपणा यांचा प्रत्यय तुमच्या या कवितांतून फारसा येत नाही. प्रेमकवितेंतल्या किंवा निसर्गकवितें-तल्या रचनेच्या लकबी (केवळ सवयीच्या म्हणून?) इथेंहि उमटूं लागतात आणि कवितेचा सच्चेपणा जाणवत नाही. एखादा नवा अनुभव व्यक्त करायचा म्हणजे पुष्कळ वेळां आपणच निर्माण केलेले जुने आकार आपल्याला मोडूनतोडून टाकावे लागतात—निदान तसा प्रयत्न करावा लागतो—तुमची सामाजिक कविता वाचीत असतांना या धडपडीच्या खुणा फारशा जाणवत नाहीत. कोणतंहि सामाजिक किंवा राजकीय तत्त्वज्ञान आपण लोकहितासाठी हिरिरीनं मांडावं असं तुम्हाला कधी वाटतं का? तुमच्या राजकीय वा सामाजिक प्रेरणांचे आदर्श कोणते? सामाजिक जाणिवेच्या अनुभवांतून थोर कविता निर्माण होऊं शकेल असं तुम्ही मानतां का? गोव्याच्या राजकारणांत तुम्हीं उडी घेतलीत त्याचा कलावंत म्हणून प्रगतीच्या दृष्टीनं तुम्हांला कांही फायदा झाला का?

**बोरकर :** पिंडानं मी जीवनाचा भोक्ता आहें तसाच त्याचा भक्तहि आहें. आत्माविष्काराची ऊर्मि माझ्यांत उपजतच आहे. लहानपणीं मला चित्रकलेची आणि संगीतकलेची फार आवड होती. चित्रांत माझा हात जितका सफाईनं चाले तितकाच गाण्यांत गळाहि लीलेनं फिरे. पण परिस्थितीच्या प्रतिकूलतेमुळं कविते-सारखं बिनभांडवली माध्यम मला पत्करावं लागलं. जें तीव्रतेनं भावलं आणि अनावर झालं तें या माध्यमांतून स्वाभाविकपणं प्रगट होऊं लागलं. हा आत्माविष्कार हेंच माझं स्फुरण आणि समाधान बनलं, तीच माझी आत्म-विस्ताराची आणि आत्मसाक्षात्काराची साधना होऊन बसली. समाजिक किंवा राजकीय तत्त्वज्ञानाची कवितेला वटीक करावं इतका त्यानं मी अंध कधीच बनलों नाही. समाजकारण किंवा राजकारण यांनीं माझ्या जीवनालाच आव्हान दिलं तेव्हा माझ्या मनानं घेतलेल्या उसळ्याच कवितेच्या रूपानं बाहेर पडल्या.

सामाजिक बंडखोरीपायी मी ज्ञातिबहिष्काराचा ‘ रायस ’ स्वतःवर ओढवून घेतला आणि गोव्याच्या राजकारणापायी सर्वस्वावर तिलांजलि देऊन देशोधडी पत्करली हें तुम्हांला माहीत आहे. या भावना त्या त्या वेळीं माझ्या जीवनांत किती सच्चा होत्या हें त्यांच्यासाठी मीं जें मोल दिलं त्यावरुन तुम्हाला दिसून येईल. पण वैयक्तिक जीवनांत एकादी भावना कितीहि सची आणि उत्कट असली तरी ती कलेंत यथायोग्य रीतीनं संक्रांत होतेच असं नाही. तसं व्हायला त्यांतलं कलात्मक सत्य कवीला पुरतं गवसलेलं आणि पचनीं पडलेलं असावं लागतं. ही किमया माझ्या तसल्या कवितेला कितपत साधलेली आहे हें रसिकांनी ठरवायचं आहे.

सामाजिक, राजकीय, निसर्गविषयक, प्रीतिविषयक असे वर्ग पाडून मीहि कवितेकडे पाहत नाही. कवितेच्या आशयाचं स्वरूप कोणतंहि असो, ती जिवंत आहे की नाही, प्राणानं थरथरणारी आहे की नाही, हा आहे खरा सवाल. ती तशी असते तेव्हा भाषा मोडाफोडावी लागत नाही. तापलेल्या भावनेमुळं ती वितळून प्रवाही होते आणि हवी तशी वाकत असते. तिथं धडपडीचा प्रत्यय येण्याचं कारण नाही.. अशा जिवंत कवितेचा उद्गार सहज असतो, तितकाच समर्थहि असतो आणि अशा समर्थ सहजतेंतूनच तिच्या जिवंतपणाचा प्रत्यय येत असतो. राजकीय व सामाजिक जाणिवेच्या माझ्या सर्वच कविता कलात्मकतेला मुकल्या असतील असं मला वाटत नाही. संख्येनं त्या अल्प असतील एवढंच. सामाजिक वा राजकीय जाणिवेंतून थोर कविता निर्माण होऊं शकेल काय?—अशा अर्थाचा एक प्रश्न तुम्हीं केला आहे. कवीचा तोल मोठा असेल आणि त्यानं हातीं घेतलेल्या विषयाचा तळ गाठला असेल, म्हणजेच त्याच्या प्राणानं तो स्वतःच अनुप्राणित झालेला असेल, तर त्याची प्रतिभा कोणत्याहि प्रकारच्या जाणिवांना समर्थ आणि चिरंतन काव्यरूप देऊं शकेल असं मला वाटतं. वाण आहे ती असल्या द्रष्ट्या स्रष्ट्यांची.

गोव्याच्या राजकारणांत पडल्यामुळं कलावंत म्हणून माझा कितपत फायदा झाला, अशा अर्थाचा एक प्रश्न तुम्हीं विचारला आहे. त्याबाबत आता सांगतों. जोवर गोव्याचं राजकारण हें महान ध्येयांनी भारावलेलं स्वातंत्र्यकारण होतं, तोवर माझ्यांतल्या कलावंताला तें पोषक ठरलं. पण पुढं जेव्हा ध्येयांना ओहोटी लागून आमच्यांतला गाळ वर आला, तेव्हा उडण्याचं काम संपून दिवसेंदिवस त्यांत जास्तजास्त चिखलांत बुडण्याचंच आता शिल्लक उरलं आहे हें माझ्या लक्षांत आलं. कर्तव्याच्या भ्रामक कल्पनांमुळं मी कांही काल त्यांत गुंतून राहिलों. त्यांत माझ्यांतल्या कलावंताची प्रगति खुंटत चालली आहे आणि आता पुढं त्याचा

अपमृत्यूच वाढून ठेवला आहे, असं दिसतांच मी त्यांतून हात धुवून मोकळ झालों. त्यामुळं मीं अनेक सहकाऱ्यांचा रोष ओढवून घेतला. त्यांना सोडावं लागलं याचं दुःख मला आहे. पण माझ्यांतील कलावंताशीं मीं इमान राखलं याचं मला समाधानहि आहे.

**पाडगांवकर :** कलावंतावर सामाजिक किंवा राजकीय नियंत्रण असावं असं तुम्हाला वाटतं का ? वीस वर्षांपूर्वीच्या काळाशीं तुलना करून पाहिली तर आजचा कलावंत अधिक स्वतंत्र आहे का ?

**बोरकर :** समाजरचना किंवा राज्यरचना कोणत्याहि प्रकारची असो, आदर्श मुक्तीकडे धावणाऱ्या कलावंताला तिचीं नियंत्रणं आणि ताण सदैव जाणवतच राहणार आणि तीं तोडण्यासाठी तो धडपडतच राहणार. त्या उभयतांतला मूल्यकलह अटळ आहे आणि त्यांतच त्याचा आणि समाजाचा विकास आहे. कालचीं बंधनं अधिक स्थूल होतीं, आजचीं सूक्ष्म आहेत आणि त्यांच्याविरुद्ध लढणं अधिक कठीण आहे.

**पाडगांवकर :** केवळ काव्यलेखनावर कवि आज आपल्याकडे जगूं शकेल का ? तसं त्यानं जगणं काव्याच्या विकासाला आजच्या परिस्थितींत पोषक ठरेल का ?

**बोरकर :** केवळ काव्यलेखनावर आपल्याकडे आज कवि जगूं शकत नाही, हें अगदी स्पष्ट आहे आणि मला अशी परिस्थिति इष्ट वाटते. उपार्जनासाठी कराव्या लागणाऱ्या अपरिहार्य धडपडीमुळं जीवनाशीं आपलं जें निकटचं नातं राहतं त्यांतून काव्यनिर्मितीसाठी लागणारं अनुभवाचं धन आपल्याला सतत मिळत असतं. जीवनाशीं अशा तऱ्हेनं येणारा हा जिवंत संबंध तुटला तर आपली कविता भोवतालच्या अर्थरचनेच्या ओंजळीनं पाणी तरी पिऊं लागेल किंवा निःसत्त्व तरी बनेल.

**पाडगांवकर :** मानसिक आणि आर्थिक स्वास्थ्य यांचा कलाविकासाशीं घनिष्ट संबंध आहे असं तुम्ही मानतां का ? ज्या कालखंडांत तुमच्या हातून उत्कृष्ट काव्यनिर्मिति झाली असं तुम्हाला वाटतं, त्या कालांत तुम्ही तीव्र संघर्ष अनुभवीत होतां की तुम्हाला स्वास्थ्य होतं ?

**बोरकर :** झाडाला वाढण्यासाठी जसं ऊनहि लागतं आणि पाणीहि लागतं तसं प्रत्येक माणसाला विकासासाठी आर्थिक आणि मानसिक सुखदुःख अवश्य असतं. अतिपाण्यानं झाड कुजून जातं, तर अतितापानं कोळपून जातं; तशी आज साऱ्या मनुष्यजातीची स्थिति झाली आहे. कवीच्या वाट्याला येणारीं सुखदुःखं त्याच्या निर्मितीला पोषक ठरण्याइतकीं वरच्या जातींचीं असावीं. पण जेव्हा तीं तशीं

नसतील तेव्हा आपल्या प्रतिभेच्या परिसानं त्याला त्यांचं सोनं करतां आलं पाहिजे. माझा या बाबतींतला वैयक्तिक अनुभव विचाराल तर मानसिक वा आर्थिक स्वास्थ्याचा आणि उच्च कलानिर्मितीचा तसा अर्थाअर्थी कांही संबंध नाही. तिचं नातं आहे तें आपण किती 'वोल्टेज'नं आणि कोणत्या पातळीवरून जगतों याच्याशीं.

**पाडगांवकर :** गेल्या पस्तीस वर्षांत तुम्ही लिहिलेल्या उत्कृष्ट कविता निवडून काढायच्या म्हटलं, तर मला वाटतं, त्यांतल्या बहुतेक प्रेमकविताच निघतील. प्रेमभावनेच्या अनेक छटा तुम्हीं व्यक्त केल्या आहेत. तुमच्या प्रेमकवितेंत शरीर नाकारलेलं नाही. तें धुंद, रगेल, विलक्षण सुंदर होऊन तुमच्या प्रेमकवितेंतून प्रकट होतं. शारीर अनुभव खोटेपणानं नाकारायचे आणि तथाकथित उच्च अशा प्रेमविषयक कल्पनांभोवती नाटकी गहिवर काढीत निःसत्त्व शब्दांची रुंजी घालीत बसायचं, हा प्रकार तुमच्या काव्यांत कुठंहि आढळत नाही. 'स्मृति', 'स्पर्श', 'जपानी रमलाची रात्र' यांसारख्या तुमच्या कविता मराठीचीं चिरंतन भूषणं आहेत.

*रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड*
*चोंच खुपसुनी फुलवित होता पंखांचें झाड...*
*...करांतुनी तव खिदळत आले स्तनाकार पेले*
*जळता गंधक पाच उकळती यांहिं रंगलेले*
*अभीष्ट त्यांचें चिंतुनि आम्हीं भिडावियले कांठ*
*सुरेहुनी तूं गडे भाजिले ओठांनीं ओठ*

यांतली प्रत्येक प्रतिमा 'कानशिलांच्या तारा झणाणून टाकणाऱ्या' धुंद वासनेच्या मुशींतून निर्माण झालेली आहे. धाबळींतल्या सोवळ्या अध्यात्माला या ओळींनी धक्का बसेल कदाचित्; पण मला यांत माणसाच्या शरिराचा श्रेष्ठ गौरव आढळतो. हीच रगेल धुंद भाषा जेव्हा अबोलांत बोलणाऱ्या प्रीतीचा अनुभव व्यक्त करूं पाहते तेव्हा एका वेगळ्या पातळीवर तेवढीच तरल बनते :

*तुला मला उमगला जिव्हाळा जन्मांचा पट फिटला ग*
*अन् शब्दांचा प्रपंच सगळा कमळासम हा मिटला ग*
*तुला पहातां पहाट वाटे ओती कुरणीं मोतीं ग*
*प्रभेस मिळती कृतार्थ होती अभिलाषांच्या ज्योती ग*
*...मन तव चंद्रापरि करि सोबत जेथें संचित नेतें ग*
*चराचरांतुन प्रेमळपण तव हासत जवळी येतें ग*

पण तुमची प्रेमकविता खरी खुलते तिच्यांत उदासाचा सूर असतांना :

*काळवंडलीं जळें*
*चिंचही न सळसळे*
*वाटतें भयाण सर्व सलत आंत कातर*

अशा कातरा सलवणाऱ्या क्षणाच्या वेळीं. हाच आर्त क्षण 'स्मृति', या कवितेंत किती हळुवार प्रतिमा धारण करतो. शब्दांनी जें सांगायचं तें सारं सांगून होतं— आणि तरीहि सांगूनहि न संपणारं खूप कांही सारखं जाणवत राहतं :

*सूर ओथंबून कंठीं कर्दळी भारावल्या*
*मुग्ध झाडांच्या तळीं भांबावल्या या सावल्या*
*स्वैर एकाकी भ्रमे दिङ्मूढ वेडा काजवा*
*खिन्न झाला दोडकीच्या स्वप्नपुष्पांचा थवा*
*सांचलें पाणी इथें अन् त्यांत गोठे चांदणें*
*आसवांच्या या जिण्याला मौज ना स्वप्नाविणें*
*रात्र होतां शांत सारें गाल गालां लाविले*
*भोगिलें ऐश्वर्य सारें स्पर्शसंगीतांतलें*

अशा वेळीं 'स्वरशृंगाराचा' सोस तुमच्या शब्दांना नसतो. तत्त्वज्ञानाच्या वेड्या कवितेच्या पायांत अडकलेल्या नसतात.

*खूपखूप बोलायचें येतों मनांत योजून*
*तुला पाहतां पाहतां जातों सारें विसरून*

अशी शब्दांची मर्यादा अचानक कळते—आणि म्हणूनच आशयानं भारलेला निःशब्द बोलका होतो : सूचक प्रतिमांतून उतू जातो. बोरकर, हें जें तुम्हाला साधलं त्याचं नेमकं रहस्य कशांत आहे ?

**बोरकर :** माझ्या भाग्यानं विपुल आणि समृद्ध प्रेमजीवन माझ्या वाट्याला आलं. तें मी निःसंकोचपणानं जगलों—प्रांजळपणानं, निरागसपणानं जगलों. अगदी धुंद होऊन आणि सर्व प्रकारचे धोके पत्करून जगलों. त्यावर मीं पापाचे शिक्के कधीच मारले नाहीत. उलट मीं ती पुण्यसाधनाच मानली. आपल्या आणि प्रेयसीच्या प्राणाचा ठाव घेण्याच्या या आर्त भक्तीनं प्रेमभावनेच्या शारीर पातळीपासून आत्मिक पातळीपर्यंतच्या तिच्या चढत्या 'सिंफनीज' मला उमगत गेल्या. आपल्यावर जिवाभावानं प्रेम करणारी स्त्री ही आपली संरक्षक आणि संजीवक देवता आहे, अशी माझी जन्मजात श्रद्धा आहे. आयुष्याच्या अंतापर्यंत तिचीं नित्यनूतन स्तोत्रं माझ्या मनःकोषांतून सतत उमलत-विकसत राहावीं अशी

माझी आकांक्षा आहे. ज्या उदासाच्या सुरामुळं ती विशेष हृद्य होते त्यालाहि कारण आहे. प्रीतीच्या साधनेंत प्रेयसीच्या जीवनांत दुःख येऊं देऊं नये म्हणून पुष्कळसं दुःख आपल्याला धीरानं गिळावं लागतं, तर कधी दिव्य प्रीतीला लौकिकाच्या जगांत क्षयाचा शाप आहे याचा वरचेवर प्रत्यय येऊनहि तिच्या ठिकाणची श्रद्धा ढळूं नये म्हणून जाळणारी आग आंतल्या आंत पचवावी लागते. मी या दिव्यांतून गेलों आहें. माझ्या प्रेमकवितेच्या यशाचं कांही रहस्य असलंच तर तें माझ्या या मनोधारणेंत आणि जीवनसरणींत आहे.

**पाडगांवकर :** मढकरांच्या कवितेनं मराठी कवितेंत एक वेगळी वाट निर्माण केली. तसं पाहिलं तर प्रत्येक सच्चया कवीचं व्यक्तिमत्त्व ही एक वेगळी, नवी वाटच असते. तुम्ही आणि तुमचे समकालीन यांच्या कवितेपेक्षा मर्ढेकरांची कविता वेगळी आहे. या कालखंडांत मराठी कवितेवर सांकेतिकतेची झापड येऊं लागली होती. कवितेचे ठराविक विषय, अनुभव घेण्याच्या निःसत्त्व लकबी, ध्येयवाद आणि मांगल्य यांचे व्यक्तित्वशून्य, गुळगुळीत आदर्श, मठ्ठ सांकेतिकतेला कवटाळून धरणारा तकलुपी सौंदर्यवाद यांनी कवितेचा प्रवाह रुद्ध होत होता. मर्ढेकरांच्या कवितेनं सर्व तऱ्हेचे धोके पत्करून हा बांध फोडला. ' इरेस पडलों जर वचमूजी ' ही मर्ढेकरांची कविता बारकाईन वाचली की या काळांतल्या सांकेतिक काव्यविश्वाची बरीचशी कल्पना येते. मर्ढेकरांनंतर नव्या कवींची एक पिढी जोमानं लिहूं लागली, लिहीत आहे. सौंदर्यवाद हा परवलीचा गुळगुळीत शब्द वापरून नवकाव्याविरुद्ध प्रचार करणं हें आपलं वाङ्मयीन कर्तव्य आहे असं सोयीस्करपणं समजणाऱ्या कांही व्यक्ति सोडल्या, तर ' नवकाव्या 'ची कामगिरी आज मराठी रसिकांनी मान्य केली आहे, असं मला वाटतं. याचं श्रेय मर्ढेकरांकडे आहे. मर्ढेकरांच्या कवितेमुळं नंतरच्या नव्या कवींत sense of freedom निर्माण झाला; काव्याकडे पाहण्याची डोळस, सुजाण नजर त्यांना आली; कलाबाह्य मूल्यांचे साहित्यक्षेत्रांत माजून राहिलेले संकेत झुगारून आपल्या अनुभूतींशीं इमान राखण्याचं त्राण त्यांच्यांत आलं. ही नवी जाणीव म्हणजे मर्ढेकरांनी आधुनिक कवितेला दिलेली एक श्रेष्ठ देणगी आहे. या नव्या जाणिवेच्या प्रकाशांत नवे कवी आपापल्या व्यक्तित्वाचा मोकळेपणानं आविष्कार करूं लागले.

या नवकवितेकडे तुम्ही कोणत्या दृष्टीनं पाहतां? या नव्या प्रयोगांचा, धडपडीचा तुमच्यावर कांही परिणाम झाला का?

**बोरकर :** मर्ढेकरांची ' कांही कविता ' प्रसिद्ध होण्यापूर्वी तिचं हस्तलिखित वा. ल. कुळकर्णी यांनी वाचून तत्संबंधीचे आपले विचार लगेच आपल्या दैनंदिनींत

टिपलेले होते. त्यांत त्यांनी ' बोरकर-कुसुमाग्रजांनी ही कविता डोळसपणं वाचली पाहिजे ' अशा अर्थाचं विधान केलेलं होतं. त्यांचीं तीं टिपणं वाचल्यापासून मर्ढेकरांची नवी कविता वाचायला मी उत्सुक होतों. मीं ती आस्थेनं आणि अगत्यानं वाचली आणि समजून घेण्याचा मनापासून प्रयत्न केला. जी कविता मला नीट समजली आणि आवडली तिच्यावरुन हा आपल्यांतला एक समर्थ कवि आहे आणि आपल्या काव्यविषयक जाणिवांचीं आणि आदर्शांचीं क्षितिजं वाढवीत आहे हें कळायला मला विलंब लागला नाही. पण त्यांच्या पुष्कळशा कवितांची दुर्बोधता आणि जें आपण ओंगळ मानीत आलों त्याला काव्यांत प्रतिष्ठा मिळवून देण्याचा अट्टाहास मला रुचला नाही. भाषेची सूक्ष्मता आणि चोखंदळ सौंदर्यदृष्टि या गुणांत आमच्याहून रतिभरदेखील कमी नसलेला हा समर्थ कवि असं कां लिहितो याचा मला नीटसा बोध झाला नाही. कधीकधी तर त्याबद्दल मला त्यांचा राग यायचा. पण त्यांनी दिलेल्या धक्क्यानं काव्याच्या साचत जाणाऱ्या पाण्याची कोंडी फुटली आणि तुम्ही म्हणतां तसा sense of freedom कवीला मिळाला हें खरं आहे. आणि त्यांचं हें ऋण मराठी कवितेनं मान्य करायला पाहिजे. पण हें श्रेय जसं मर्ढेकरांना दिलं पाहिजे, त्याचप्रमाणं दुर्बोध, निरर्थक आणि ओंगळ अशा गोष्टींचं आजकाल जें शब्दाशब्दांत पेंव फुटलेलं दिसतं आणि त्यांचीं व्युत्पन्न समर्थनं केलेलीं दिसतात, त्यांचीहि जबाबदारी मर्ढेकरांवरच येते. त्यांनी एका सांकेतिकते-विरुद्ध बंड केलं; पण त्यांचं नाव घेऊन आता दुसरी सांकेतिकता प्रतिष्ठा पावूं पाहत आहे. मर्ढेकर आज हयात असते तर त्यांनी या सांकेतिकतेविरुद्ध आसूड उचलला असता याविषयी मला तरी शंका नाही. मर्ढेकरांच्या कवितेनं माझ्यावर प्रत्यक्ष असा कांही परिणाम केला नाही. पण त्यांनी दिलेल्या धक्क्यामुळं मला माझीं काव्यमूल्यं तपासून पाहणं आणि तीं समृद्ध करणं निकडीचं वाटूं लागलं. माझ्यांत शैथिल्य न यायला ते बऱ्याच अंशीं कारण आहेत.

**पाडगांवकर :** तुम्हाला कविता कशी सुचते? शब्द, प्रतिमा, छंद यांची निवड तुम्ही कशी करतां? पूर्वीची तुमची काव्यनिर्मितीची प्रक्रिया आणि आजची लेखनाची पद्धति यांत कांही फरक पडला आहे काय? विशिष्ट तऱ्हेच्या बाह्य वातावरणाची काव्यलेखनासाठी तुम्हाला आवश्यकता भासते का? की कोणत्याहि परिस्थितींत तुम्ही लेखन करूं शकतां?

**बोरकर :** मला गुणगुणतां गुणगुणतांच कविता सुचते. पहिल्या दोन ओळी आपोआप ओठावर येतात आणि मग कविता तयार होत असल्याची जाण येते. तयार होऊन आलेल्या ओळीच पुढच्या ओळींना ओढून म्हणा, भुरळ घालून

म्हणा, आपल्या सोबतीला आणतात आणि कविता पुरी होतांच ही प्रक्रिया थांबते, एवढंच पूर्वी मला कळायचं. पण पुढंपुढं नेमकं काय होतं तें संपूर्णतया कळलं नाही तरी त्या क्रियेचा बराचसा उमज मला पडूं लागला. भाववृत्तीनं मनाचं आभाळ भरून आलं की मला एक प्रकारची विकलता वाटते; जीव हुरहुरूं लागून पिसासारखा हलका होतो आणि निराळ्याच लोकांत तरळूं लागतो. अशा वेळीं मला माझ्यांत एक आगळा अपूर्व नाद जाणवूं लागतो. त्याला वेग येत चालला की माझ्या व्यक्तित्वावर विलक्षण धुंदी चढते. पण आश्चर्य हें की त्या धुंदीच्या अवस्थेंतच मला तितकीच सावधानता आणि तटस्थताहि जाणवत असते. या वेळीं प्रज्ञा वस्तऱ्याच्या पात्यासारखी धारदार होते. सर्व ज्ञानेंद्रियांच्या शक्ति आणि स्मृति तरल आणि ताज्यातवान्या होतात. मनश्चक्षूंना आशय प्रतिमांच्या रूपानं सुस्पष्ट दिसूं लागतो. त्यांना टिपणारे शब्द स्पंद पावत आपापली जागा घेऊं लागतात आणि ते येतात ते अनुरूप छंदाच्या सरांत ओवले जात. या साऱ्या प्रक्रियेंत माझ्या प्राणाच्या, मनाच्या, बुद्धीच्या, ज्ञानेंद्रियांच्या सर्व शक्ति लय लागून वावरत असतात खऱ्या; पण हें सारं कसं अगदी सहज लीलया घडत असतं. कवितेच्या ओळी वारंवार गुणगुणतां-गुणगुणतांच कधी शब्दांचा अनुक्रम बदलतो, तर कधी एखाद्या शब्दाची जागा दुसरा नवा शब्द घेतो. आणि त्या वेळीं जाणवलेल्या या अधिक समृद्ध सौंदर्यसंगतीनं मला आनंदाचे उमाळे येतात. पूर्वी हें सहज व्हायचं. वारंवार व्हायचं. आजहि प्रक्रिया अशीच आहे; पण भट्टी पूर्वीच्या इतक्या आचीनं आणि पूर्वीसारखी वारंवार तापत नाही. व्यवहाराचं सतत भान ठेवावं लागलं तर गरुडाचादेखील कोंबडा होतो. तसा कांहीसा प्रकार मला हल्ली जाणवतो. दिव्य लोक दिसतो, उडण्याची ऊर्मि येते; पण पंख जड झाल्यासारखे वाटतात. ही जाणीव मग यातना होऊन छळूं लागते. आताशा पुन्हा मला पंख हलके वाटूं लागत आहेत, आणि नवं कांही तरी हाताला लागेल अशी आशा मी बाळगून आहें. मला असं केव्हा भरून येईल याचा नेम नसतो. त्याला काळवेळ लागत नाही. तशी स्थिति लाभली तर बाह्य परिस्थिति कशीहि असो, ती माझ्या बाबतींत विरोधकारक होऊं शकत नाही. मात्र एक गोष्ट आहे. भरल्या पोटीं मला कविता सुचत नाही. त्यामुळं अत्यंत अल्प खाऊन मी जणू कांही उपवासाचं व्रत पाळीत असतों व काव्यदेवीच्या कृपाप्रसादाची वाट पाहत असतों.

**पाडगांवकर :** गेल्या पसतीस वर्षांतल्या तुमच्या कवितांचा हा संग्रह एकत्र केलेला आहे. या कवितांकडे मागं वळून पाहिल्यावर तुम्हाला काय वाटतं? या क्षणीं कुणाकुणाच्या ऋणांचं तुम्हाला स्मरण होतं?

**बोरकर :** या पसतीस वर्षांतल्या कवितेकडे मागं वळून पाहिल्यावर आजवर जी धडपड केली ती अगदीच कांही वाया गेली नाही असं जसं वाटतं, त्याचप्रमाणं काळाच्या टिचकीला टिकून उरेल असं खरोखरच आपल्या पदरीं कांही पडलं आहे का ?—असा प्रश्न माझ्यापुढं उभा राहतो आणि चित्त द्विधा होतं. खरं सांगायचं तर आजवर झाली ती उमेदवारी झाली—बऱ्यापैकी उमेदवारी झाली; पण… गाठायचं शिखर अजून दूरच आहे, असंच मला वाटतं. झाला तो प्रवास साधकावस्थेचा झाला. ‘सिद्धप्रज्ञेचेनि लाभें। मनचि सारस्वतें दुभे।’ अशी अवस्था येईल तोच खरा सोनियाचा दिवस. तो शेवटचा दीस गाठण्यासाठी अजून धडपडावंसं वाटतं.

तात्यासाहेब केळकर, वामन मल्हार जोशी, वामन मंगेश दुभाषी, माधवराव पटवर्धन, विठ्ठलराव घाटे, काकासाहेब कालेलकर अशा अनेक ज्येष्ठ आणि श्रेष्ठ साहित्यिकांनी माझ्या कवितेबद्दल आशेचे आणि कौतुकाचे उद्गार काढून माझ्या एकाकी साधनेंत मला धीर दिला. कवि कारे आणि डॉ. गायतोंडे या दोन मित्रांशीं वारंवार माझ्या ज्या चर्चा होत, त्या माझ्या काव्यसाधनेला डोळसपणा आणायला कारण झाल्या. या सर्वांचं आज मला कृतज्ञतेनं स्मरण होतं. पण ज्यांनी माझ्या काव्यसामर्थ्याबद्दल विश्वास बाळगला आणि आपल्या कुवतीप्रमाणं प्रत्यक्षअप्रत्यक्षपणं नाना परींनी तें जागवलं-वाढवलं, त्या अविस्मरणीय अशा व्यक्ति पाच : यशवंतराव सरदेसाई, गोव्याच्या ट्रेनिंग कॉलेजचे माझे अध्यापक रामचंद्र शंकर नायक, माझ्या मानसमाता बाई दॉन प्रॉपेर्सिय, भाऊसाहेब खांडेकर आणि कविवर्य भास्करराव तांबे. तांब्यांची माझी गाठभेट एकदाच झाली. पण त्यांनी केलेल्या तोंडभर कौतुकानं आणि पाठींत दिलेल्या थापेनं एका रात्रींत माझ्यांतील टाकळ्याएवढ्या कलावंताला माडाची उंची आली. या पंचायतनाचं ऋण जन्मोजन्मीं फिटणारं नाही.

आधी असं वडिलजनांचं ऋण वागवलं. आता तुमचं आणि भागवतांचं. तुम्हीं दोघांनी किती आस्थेनं आणि परिश्रमानं या संग्रहाची केळवणी केली !

मराठी ग्रंथ सं[illegible]. ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ...................... दि: ....................
क्रमांक ................................ नों: दि: ....................

## पुनवेची रात

पुनवेची रात मजेची देवांचा उत्सव चाले
सृष्टीचें नंदन फुललें देवदूत नाचत आले

नर्तती कंचनी धुंद, गंधर्व पंचमीं रमले
चित्कलाच कीं दरवळली कविवरही वदतां भ्रमले

स्वर्भूंचा संगम झाला दिव्यत्व येइ उदयाला
अस्तित्व विसरवी जीवा गोड गूढ भ्रमवि मनाला

आंगणांत देवाघरच्या तारका घालिती फुगड्या
रंगनाथ ये खेळांत मग वसनसहित कीं उघड्या—

हा विचार न शिवे चित्ता नसनसीं झपूर्झा भिनलें
मेघबाल धावत आले तद्हृदयीं तेज मिळालें

शशिराज हासला गालीं बाळांची पाहुनि आळ
किटकिटुनि तारका करिती मोत्यांचा और सुकाळ

आनंद बागडे स्वैर उधळितो सौख्य बिनमोल
सोन्याच्या दोल्यावरतीं घेतसे पवन हिंदोल

कुंजांत डोलतचि आला लतिकां आलिंगुनि गेला
स्मित करुनी लाजुनि त्यांनीं पुष्पांचा दरवळ दिधला

पीतांबर लेवुनि अवनी रजनींत विहारत होती
पाहुनी खेळ बाळांचा अपुल्याशीं हासत होती

निर्व्याज कवीहृदयाला खेळाची लागे आस
संगीत गुंगलें कानीं हुरहूर मुग्ध जीवास

परि मजला आईबाबा "खेळुं नये रात्रीं" म्हणती
हा खेद मदीय जिवाला खेळाविण शून्यच जगती

देवाजी, नच कां केलें मज तारा किंवा वारा
मासळीं किंवा नवफूल करण्यास सदा सुविहारा !

पुनवेच्या मागें आतां हा वेडा झाला जीव
पुढल्या जन्मीं तरि देवा करिं गगनीं मज राजीव

बोरी, १९२६

## तोड ही माळ

तोड ही माळ, पळ असाच रानोमाळ !

विसर जिवाचीं प्रेमळ गीतें
तोड जिवाचें जडतें नातें
वेड सोड जें विश्वीं विरतें
तोड ही माळ, जाळ तो प्रेम-जिव्हाळ !

प्रेमवचाचा धरिं न पवाड
हृदयाचें रे बंद कवाड
हृदयाची हृदया नच चाड
तोड ही माळ, प्रेमाचा होई काळ !

ही प्रेमाची फसवाफसवी
कुणास हसवी, कुणास रुसवी
आशीं नैराश्याला वसवी
वृथा जंजाळ, क्षणक्षणा भावनागाळ !

वसंतांतुनी ग्रीष्म उकडतो
चंदनांतही पावक दडतो
वीज नाचते, पाउस पडतो
नसे रे ताळ, आशांच्या राशी जाळ !

भीषण शांतीचा चौफेर
साधुनि घाली घू घुत्कार
नैराश्यानें करिं संचार—
रानोमाळ; तोड ती सुखानें माळ !

आनंदाची आशा सोडीं
विचारतंद्री अक्षय जोडीं
तोडीं अवजड फसवी बेडी
तोड ती माळ, पळ असाच रानोमाळ !

नशिबाची कर पुरती होळी
वैराग्याची घेईं गोळीं
सूळावरची उचलीं पोळीं
तोडुनी माळ, जा पळ ना रानोमाळ !

नांवगांवचा सांडव पत्ता
प्रेमापासुन हो बेपत्ता
जीवावरची झुगार सत्ता
तोड ही माळ, जा पळ जा रानोमाळ !

धारवाड, २९-५-२७

## एक मागणें

*[ कवि 'काव्यविहारी' यांच्या 'मनोरंजनां'तील 'एक मागणें' या कवितेला उत्तरादाखल ]*

जिथें ऐश्वर्यवंतांचा फुकटचा मिरवतो तोरा
जगाच्या द्वेषबुद्धीला जिथें आहे सदा थारा
पडो वा ना पडो तेथें निसर्गाचा खुला मेवा
तिथें नव स्वर्ग उभवाया मला सामर्थ्य दे देवा

अंगिंच्या रक्तबिंदूंचें बनविती जे सदा पाणी
तयांचे क्लेश वाराया मत्करीं ठेव गा पाणी
तुझ्या घरच्या इमानाला मला दिसरात जागूं दे
इमानी पुण्य-जीवांना जिवाचें अर्घ्य अर्पूं दे

जिथें तेजाळ ज्योती ती झळाळे पातिव्रत्याची
जिथें पावित्र्यसिंधूला लहर वात्सल्यप्रेमाची
अशांच्या नवयशोगानीं स्फूर्तिनें घ्यावया ताना
हृदींची वाजुनी वीणा खुलूं दे भावना नाना

स्वदेशप्रेमबिंदूंशीं 'फुकाचे शब्द' राहूं दे
परंतू दिव्य चैतन्यें मला नव तेज उभरूं दे
करीं तलवार तेजस्वी मुखीं रसवंति ओजस्वी
तयें स्वातंत्र्य जिंकाया मला सामर्थ्य दे प्रभुजी

जळीं मळिं खालिं आभाळीं वसति जे काव्यप्रिय बाळ
तयांना नित्य रिझवाया करीं मज भ्रमर लडिवाळ
तयां गाईन मी प्रभुजी तुझीं गीतेंच भक्तीचीं
सुधा नव त्यांस पाजीन तुझ्या स्वर्गीय प्रीतीची

अशी सिंचून संजिवनी चिरत्वीं विश्व नटवीन
पुरा मी विरुनि त्यामाजीं तयाला तुजशिं विरवीन
कसें राहील मी-तूं हें पुरें पावित्र्य पूर्णैक्य
तरी श्रेष्ठा मला देई असें सामर्थ्य हें एक

बोरी, १९२७

## फुलाची कहाणी

काळाच्या बागेंत किती  वेली फुलती नी मरती
मुळीं तयांच्या झरा जरी  समूम वारा वीष भरी
वर्तुळ हें सुखदुःखाचें  त्यांतच जग नाचायाचें
रडणें हसणें
उडणें बुडणें
जगणें मरणें
श्रावणांतल्या विविध परी :  द्वैत येथलें राज्य करी

तेथ कळी कुणि एक दिसे  बालकवीचें हृदय जसें
मग्न निजानंदांत सदा  तिला आपदा नसे कदा
स्तनपानीं रंगुनि जावें  मात्रंकीं आंदोलावें
प्रेमाद्वैतीं
न कळुनि नातीं
दंगच चित्तीं—
विसरुनि जगताला व्हावें,  तत्त्व एक तिजला ठावें

विश्व सर्व तिज गोड गमे  प्रेमांतच तच्चित्त भ्रमे
मोदें लागे विकसाया  कलिकेची कोमल काया
गंधोर्मी मग हळूहळू  वाहत जाती झुळूझुळू
सुमनें, पानें
उपहासानें
हसतां, तान्हें—
फूल बावरुनि तें गेलें  भ्रमिष्ट संकोचें झालें

शंकित दृष्टी त्या आली  दुनिया मग खोटी दिसली
पानांच्या शेजेवरतीं  कंटक त्याला किसकिसती
चोहिंकडे उडुनी धुरळा  जीव तयाचा गुदमरला
श्वास न चाले
अश्रू आले
पराग वितळे
हळवें मानस कळवळलें  अशा जगास्तव हळहळलें

पुष्प विरागी मग बनलें   पर्ण-पल्लवीं निवासलें
आशांचा करुनी न्यास   प्रेमाचा तोडी पाश
नकली जगता सोडोनी   आत्मगुंजना जोडोनी
सुगंध भरुनी
जगा विसरुनी
विंधिला स्मरुनी
यज्ञीं भोगाहुति देत   मंत्र आपुला गुणगुणत :

"मान नको अभिमान मला   प्रभुशिरिं स्थान नको तनुला
मम गुण गाया भृंग नको   फूलपांखरें तशीं नको
मद्गंधें जग सुखवीन   यांत सौख्य मी मानीन
कुणि अवगणुनी
वा कुस्करुनी
अथवा झडुनी
ही तनु मम मातींत पडो   चित्त परी तुयेंत जडो."

या सुमनाच्या सौगंधें   विश्व गुंगलें आनंदें
परि तें न दिसे दृष्टीला   मात्र पाकळ्या झडलेल्या
भृंग पाहुनी हळहळती   अनुदिनिं तत्स्तोत्रें गाती :
"अश्रूंवरतीं
जगलें जगतीं
अंतीं मुक्ती—
मिळवुनि दुःख करी अपुलें   विश्वकाव्य चिरसुखद भलें."

बोरी, १९२७

## शाहिरी पोपटास

ऐसेंच गीत गावें विश्वास रंजवावें
नैसर्ग-काव्यकुंजीं त्वां सर्वदा क्रिडावें

गंधर्वराय कीरा घे उंचशा लकेरा
ज्या उठवितील नेत्रीं इशप्रेम-अश्रुधारा

त्वां पूज्य भक्तिभावें कवितेस आळवावें
स्वमनास रंजवावें विश्रांत लीन व्हावें

एकांतिं स्फूर्ति होई एकांतिं काव्य होई
हें भाग्य पंजरींचें एकांतसौख्य देई

गीतारहस्य सारें या बंदिवासिं कळलें
हें गहन गौप्य सुटलें एकांतवासिं पटलें

एकांतप्रीय जीवा ना बंदिवास कोठें
स्वातंत्र्य-संपदेचे तन्मानसांत सांठे

ब्रह्मांडचेतना ही कविमानसीं खळाळे
ते कुंभ वाक्सुधेचे तुज शाहिरा मिळाले

तें गोड गार पाणी दे क्लांत भूतलाला
संचारतां उमेदी या दाखवीं पथाला

कमनीय सृष्टिशोभा नयनां जरी दिसेना
मित्रांतही मजेनें खेळावया मिळेना

सृष्टी तुझ्या मनाची कोणी लुटूं शकेना
तैसी न रोधितां ये त्वत्प्रीतिची तनाना

ते बांसरी-रवाचे हृदयस्थ सूर छेडीं
गोडींत चित्सुखाच्या होईल स्फूर्ति वेडी

तैसेंच त्वां करावें विश्वास रंजवावें
त्वां नित्य भक्तिभावें कवितेस आळवावें

बोरी, १९२७

## नवलाई

कवी कुणीसा सालाधाला   संध्यासमयीं वनांत आला
अवलोकुनि नव निसर्गलीला   रसज्ञ वेडा विस्मित झाला

सारीं रानें तीं मोहरलीं   दगडांनाही हिरवळ आली
भूमीमधुनी निर्झर निपजे   रसरंगाचें जणुं कारंजें

कुंद-मोगरी-कळ्या विकसल्या   जाइजुईही खुदकन हसल्या
रदनावलि ही जणुं सृष्टीची   प्रीत ओपिते ही हास्याची

'कुहू कुहू'चे मंजुळ ध्वनी   क्षणीं गुंगले वातावरणीं
यानें तर कवि वेडा झाला   बाह्य जगाला पुरा विसरला

कुणी बोललें मनांत गाणें   अर्धस्फुट गुढ मंजुळवाणें
गुणी कोकिले कवनीं बाले   तूंच वसंता काय नटविलें ?

हरित नभाची तूं ध्रुवतारा   का तूं स्वर्गंगेची धारा
ऐन धाटिचें कीं तूं अडलें   विश्वाला भुलवाया आलें

वीणावतिची झंकारसुधा   करी सुखाची मोहनबाधा
स्वानंदनदाची तूं लहरी   अद्भुत चपला चंचल भारी

पवित्रता ग तव कवनाची   कस्तुरिच्या जणुं सौगंधाची
पढवणूक त्याची मज दे ना   तुझ्यासवें घेईन तनाना

एकतार जरि अपुली साधी   घेऊं तरि त्यावरी समाधी
भाव तरारे मनांत सारा   बाह्य जगाचा नकोच वारा

काळे जरि अम्हि कशास शरमूं   वनांत लपुनी मनांत विरमूं
शिकव मला तुजसवें उडाया   तव सूराची साथ धराया

तुझ्या संगतीं नयनीं ओल   छे ! ती भाषा अवघी फोल
आनंदाची अवघी माया   त्यांतच लागूं अम्ही रमाया

कुहूकुहूच्या नादब्रह्मीं   मिसळुन जाऊं दोघे आम्ही
न्हाहूं, पाहूं, जाऊं, राहूं   अक्षयतेनें करूं कुहूहू

नादब्रह्मीं अवघें विरलें   विश्व सुधेनें शांतचि झालें
वसंत झाला अवघा शांत   लेखनि शांतीं झालि निवांत

धारवाड, १६-१-२८

## वाप्पसमर्पण

अनंता तुला कोण पाहूं शके ?
तुला गातसां वेद झाले मुके
मतीमंद अंधां कसा तूं दिसे
तुझी रूपतृष्णा मनाला असे

तुझा ठाव कोठें कळेना जरी
गमे मानसा चातुरी माधुरी
तरूवल्लरींना मुकी मी पुसें,
"तुम्हां निर्मिता देव कोठें वसे ?"

फुलें सृष्टिचीं मानसा रंजिती
घरीं सोयरीं गुंगवीती मती
सुखें भिन्न हीं, येथ प्राणी चुके
कुठें चिन्मया ऐक्य लाभूं शके ?

तुझें विश्वब्रह्मांड, ही निस्तुला—
कृती गावया रे कळेना मला
मुकी बालका माय देवा चुके
तया पाजुनी कोण तोषूं शके ?

तुझ्या दृष्टिसौख्या कसें आदरूं ?
तुझ्या दर्शनावीण कैसा उरूं ?
तुझ्या सावलीवीण कैसा फिरूं ?
तुझ्या आश्रयावीण कैसा तरूं ?

मला दास तूझा म्हणूं तोंड ना
कसा भक्ति गोवूं पिशा जीवना ?
असा हीन पंगू तुला धुंडितो
तुझें ब्रीद राखावया तार तो

नवीं भावपुष्पें तुला वाहिलीं
तशी अर्पिली भक्तिबाष्पांजली
तुझ्या पद्मपत्रावरी ती स्थिरो !
प्रभो ! कल्पना जल्पना त्या हरो !

धारवाड, १७-१-२८

## भृंगास

गाणें भृंगा गुणगुण तें   ईशमनीं जें गुणगुणतें
नव माधुर्यी मुरलेलें   भक्तिरसाशीं विरलेलें
चिरंतनाशीं
निगूढतेशीं
पूर्णत्वाशीं
विश्वेशाशीं जें विरतें   गाणें भृंगा गुणगुण तें

तूं सृष्टीचा शाहीर   विश्वाला गुंगविणार
तव सोज्ज्वल ती रसवंती   जगीं फुलविते फुलवंती
ज्या स्फूर्तीनें
ज्या दिव्यानें
ज्या प्रतिभेनें
विश्वाचें हृद्रन फुलतें   गाणें भृंगा गुणगुण तें

तव गाण्याचे सूर नवे   वातावरणीं गुंगावे
स्वीकारावें त्यां भावें   पूर्णैक्यीं जिव भिडवावे
सप्तपदीचें
सारंगीचें
नव रागाचें
गीत जगाला झुलवीतें   गाणें भृंगा गुणगुण तें

वनमालीची ती वेणू   भारुनि टाकी अणुरेणू
वाग्देवीची सारंगी   नाचवि विश्वा नवरंगीं
संगीताचें
आत्मत्वाचें
दिव्यत्वाचें
काव्य आठवे अजि मातें   गाणें भृंगा गुणगुण तें

काव्यसुधेविण विश्व दिसे   शुष्क जाहलें शोकरसें
पूज्य भावना विरल्या ना   सुखी तनाना हरल्या ना
ऐशा समयीं
विश्वाहृदयीं
गाणें गाई
दिव्य चेतना जें देतें   गाणें भृंगा गुणगुण तें

बहरावीं या नादानें   विश्ववनांतिल तीं सुमनें
कंगोऱ्यांचींही हृदयें   भरुनी यावीं पाण्यानें
जडता नुरवी
जड़ता स्फुरवी
कविता भरवी
भक्तीचीं गा संगीतें   गाणें भृंगा गुणगुण तें

धारवाड, २४-२-२८

... स्थळप्रत.
अनुक्रमांक   दि: ...
... दि: ...

# कुंकूं लावूं काय?

प्रीतीची प्रतिभा कुठें हरपली कांहीं कळेना मना
प्रेमाच्या नव भावना विरुनियां त्या कुठल्या कल्पना
औदासीन्य-निराश-गीत बहके तो वायु वेड्यापरी
प्रेमाचें नव गीत मंजु बुजलें, ये शून्यता अंतरीं

अंधारें भरलें, घनें उतटलें, ती नीलिमा गंजली
अस्ताद्रीवरली कशी पुसटली सौभाग्यपुण्यावली ?
सोनेरी किरणें कुठें दडपलीं ? सौभाग्यही आटलें
संध्येच्या नयनीं जहाल जलही दुःखें पहा दाटलें

सृष्टीचें नव तेज सर्व लपलें, सर्वत्र निर्जीवता
दीर्घ श्वास घुमे, फुलें, तरुलताही पावल्या म्लानता
भावी नी गत कालचित्र दिसलें—ती घोर कालकृती
'सोन्याची घटिका कशी परतणें ?' ऐसी जहाली स्मृती

काळें दृश्य असें कुणी बघतसे डोकावुनी वत्सला
त्यानें चित्त तिचें बुजे स्मृतिमुळें, गाळीत अश्रूजला
येई घेउनियां करंडक करीं सानी पुसे आंगणीं :
"लावूं का तुज कुंकु हें मम गुणी ताई अतां रेखुनी ?"

संध्येच्या पवनीं कधीं शिवतसे हा प्रश्न वेड्या मना
नैसर्गीसम काव्यदेवि चितरी स्फूर्तीविना कल्पना

धारवाड, १-४-२८

हं, हास राजसा चिमण्या गुणगंभीरा
चमकवीं साजऱ्या या इवलाल्या तारा

तव गालावरतीं गुलाब और हसूं दे
त्यावरी चांदण्या खळ्या तशा विलसूं दे
तव अधरांतुनि डाळिंबरसाला झरवीं
तव निर्मल हास्यीं विमल चारुता भरवीं
ही अशी चातुरी करीं गुणाच्या राया
कालिदासकविची स्फुरेल कविता गाया
तव हास्यीं प्रतिमादेवी। हासतें
तव हास्यि कल्पना भावी। नाचते
तव हास्यीं कविता गावी। वाटतें
तव हास्यसंजिवनि फत्तरही फुलवील
काव्यानंदाचे हिंदोले झुलवील

तव नजरेसरशीं वेडे होतिल भृंग
उधळितील अपुले गाण्याचे नवरंग
तव दंतपंक्तिशीं चिउकाऊच्या गोष्टी
सांगतील तारा तुज प्रीतीच्या ओष्ठीं
तव नखांकडे पाहून फुलें भुलतील
अत्यानंदानें मंद गंध देतील
तव भ्रूकुटी हल्तां इंद्रचाप नवरंगी
शोभेल अंबरीं नवसंध्येच्या संगीं
तव इंदुतेजमुखकांती। कोवळी
तव नुरेवरी मधु शांती। सोवळीं
नयनिंची किलकिली भ्रांती। काजळी
जमवुनी तयांच्या सौंदर्याचें हासें
गुंगवी जगाला वाऱ्यावीण सुवासें

तुज बघतां आई दुग्धामृत स्रवतील
तुज पांखर द्याया अंचलही लवतील
नवयौवनबालां लावशील चुटपूट
धावतील त्या तुज कटीं धराया नीट
धाकट्या बालिका म्हणतिल तुजला 'भाऊ'
कुणि म्हणतिल, "भाऊ, ओव्या आम्ही गाऊं."
हनुवटी हलवुनी पुसतिल भलतेंसलतें
जडवितील अपुलें ताइपणाचें नातें
        तव हास्यावरतीं जीव । किति तरी
        करिं आतां अमुची कींव । अंतरीं
        मानसीं प्रीत गाजीव । साजरी
तव मुक्या प्रीतिनें झुलवीं नाजुक वारा
हं, हास राजसा चिमण्या गुणगंभीरा

वात्सल्यें प्रभुजी तूं हसतां कुतुकेल
देवबाप तुजला नव गाणें शिकवील
विसरेल हिंदभू दारिद्र्याचे त्रास
लागुनी तिला तव हास्याचा हव्यास
अंगुली चोखितां अम्ही हास्यरस सेवूं
तव कुंतल उडतां अम्ही त्यासवें जाऊं
निद्रेंत जागतीं तुलाच आम्ही बाहूं
तुजसवें खेळुनी सुखांत आम्ही राहूं
        तव हास्यावरतीं प्राण । पोसवूं
        गाउनी हास्यमहिमान । तोषवूं
        तव हास्याचें हें गान । भूषवूं
हं, हट्ट सोड कीं बाल गुणी शाहीरा
हं, हास राजसा चिमण्या गुणगंभीरा

बोरी, १४-४-२८

## हास्याचा पाळणा

*[आई मुलाला मांडीवर घेऊन हसण्याचा आळा घालते तो देवाचा नवस फेडण्यासाठींच असेल. बाळाचें पहिलें हास्य माउलीला अमोलच असल्या हास्यावर तरंगणारा पाळणा मी स्वतःचा कसा म्हणूं ?]*

हासें हस बाळा । लडिवाळा । जीवाच्या गोपाळा
बाळा हास्यरसा । हास कसा । राजस मानसहंसा
हसण्याच्या छंदीं । आनंदीं । गुंगव वृत्ती साधी
खुलवीं रे बोली । हृत्सलिलीं । नऊ मास पढवीली
अंगाई गाया । हलवाया । मनिंची माझी माया
नयनीं साठवली । आठवली । प्रेमें जी पाठविली
तिजला जीवकळा । दे सगुणा । हासुनियां मनमोहना
चित्सौख्या मिळवूं । जग झुलवूं । परमेशाला भुलवूं
गुंफुनि भावफुलें । भक्तिबलें । गीत कोवळें पहिलें
गाया राजीवा । सदाशिवा । शांतव माझ्या जीवा
प्रेमाश्रू-झरणी । सिंचोनी । तुजला आलिंगोनी
केल्या नवसाचा । हसण्याचा । फेड करूं दे साचा
हस रे हस बाळा । लडिवाळा । जीवाच्या गोपाळा

धारवाड, २४-६-२८

## चिमणें जगत्

बालपणींच्या चिमण्या जगतीं भातुकलीचे खेळ
खेळुनियां संसार थाटला हृदयीं बसवुनि मेळ

निर्व्याज मनें तुटक गाइलीं प्रेमभावना-गाणीं
कुठल्या कोठें विरुनी गेलीं फिरतों चुकल्यावाणी

दिवसापुरतीं घरें बांधिलीं घटकेचा संसार
ठावें नसतां प्रपंचांतलें जिवें साधिलें सार

स्वयें खापऱ्या जमवुनि केलीं क्षणभर त्यांचीं नाणीं
जगताचा व्यवहार मांडिला सावकार कुणि वाणी

सोयरिका केल्याही किति तरि लग्नेंकार्यें झालीं
संसाराचीं चित्रें सारीं आज परी विसकटलीं

आनंदानें गुरें हाकिलीं फणसाच्या पानांचीं
त्यांहि बिचाऱ्यां गोडी होती गवताविण कुरणांची

भोपळ-वेलीच्या पाव्यावर झुकलीं पहिलीं गाणीं
आनंदानें नयनीं रुळलें हृत्सरसींचें पाणी

गोवत्सांचीं धरुनी पुच्छें पळलों, पडलों फार
हे स्वर्गींचे खेळ खेळलों किति तरि बेदरकार

आनंदानें विसरुनि भानें पतंग जे खेळविले
आज हातचे तुटुनि, अंबरीं ते विरुनी गेले

ती पूर्वीची प्रीत पळाली विजोड तो संसार
बालपणींचें सौख्य निमालें आनंदाचें सार

क्षणभरि तरि मज देईं देवा बालपणींची दुनिया
रुक्ष जगीं या कशास जीवित देवा दिधलें वायां ?

धारवाड, २९-७-२८

## लीला

लीला कुणी प्रेमांगणीं कुंजीं मुदें रमली गमे
भोवतालीं ललितसंगमः कल्पना प्रेमीं भ्रमे
विश्वेश गायक गातसे नवप्रेमसंध्यारागिणी
उल्हसे नवरंग उधळी पश्चिमा गगनांगणीं

वृक्षांवरी लीला करी नवबालिका लतिकावली
गुंगली भृंगावली सुमनांप्रती सुखसावली
मंजुस्वरें नभिं पांखरें सत्प्रेमगाना संचिती
प्रेमभावें हृदय धावे भारुनी जाते मती

लीलेंत सृष्टी रंगली अन् धुंद दृष्टी जाहली
खेळावया रोमावली वायूसवें भारावली
लीला कुणी मन्मंगला कुंजीं गमे वनबालिका
पुष्पपरडी घेउनी गुंफी स्वहस्तें मालिका

प्रेमगानीं एकतंद्री काव्यजीवा लागली
पदर परि तो मोडतो क्रीडाच ही लीलेंतली
दिलखूष मी होऊनियां तैं मांडिली जादूगिरी
नजरबंदी घालती त्या हस्तकौशल्यें खरी

निमिषांतरीं कांट्यांतुनी आलीं गुलाबें काश्मिरी
जादुनें मी माळलों झालों क्षणीं भृंगापरी
सेवण्या रस गुंतलों तों कोंडिलें त्यांनीं मला
शक्ती असे भेदावया परि जीव त्यां भारावला

पारधी मीं घातलें जाळें जरी धारीवरी
कोंडुनी मातें उडे ती स्वैर नवख्या अंबरीं
बाण जे मीं सोडिले मर्मीं मला ते लागले
हंस हे नच तुष्टले पोहूनियां जरि भागले

ज्या विजेशीं खेळले हे मेघ माझे कौतुकें
भेदुनी ती जाय त्यांना, साद त्यांचाही चुके
भेदितांना सौख्य त्यांना चित्सुखें ते हासती
दे प्रभा ती संगतीं, ती जातसां तमिं कोंडती

नवखा शिपाई या जगीं, मी गारुडी आहें जरी
सौख्य मरणीं वाटतें साऱ्या इथें उल्का परी

कुडचडें, २२-९-२८

## विरहोत्सुक

झाली सांज नभीं सुहास्य रजनी गोंजारिते तारकां
भूदेवी कवळोनि निर्झर हृदीं प्रेमें करी कौतुका
चारा चारुनियां पिलांस चिमण्या त्यां ऊब देती सुखीं
पान्हा पाजित धेनु चाटिति मुदें वत्सांस, प्रीती मुकी

शाळेंतून गृहीं पहा परतलीं तीं आइचीं लेकुरें
गोपां भाकरि प्रेमपूर्ण हृदयें देतात माता त्वरें
हा ! छे ! मी किति भाग्यहीन दुबळा ! मी दूर आईहुनी
लागे जाचणि एक बालहृदया या राहुनी राहुनी

धारवाड, १५-१०-२८

## जादूची फुलबाग

जादूची माझी बाग   त्यांत दरवळे अनुराग
तळ्याविणें दोनच कमळें   मी येतां मकरंद हले
माझे भृंग तिथें वळती   तयां हंस नच आवडती
चंचल मोहक रंग रमे   भ्रमरनाद त्यामुळें भ्रमे
तीं भ्रमराशीं
भृंगहि त्यांशीं
जीव जिवाशीं—
जडतां उमले नव भाषा   त्यांत रंगते नव आशा

चांफेकळि ही रम्य सुनी   पाकळि उलवी कीं वदनीं
निःश्वासासरसें उडती   गंधांच्या लपल्या प्रीती
माझ्या हृदयींच्या वातीं   त्या सगळ्या रमती विरती
कळीहि हासे
वातहि हासे
जीवन हासे
हसें जाहलें हास्याचें   लहरी त्यावरतीं नाचे

फुलांत पुष्पें कां फुलती ?   नवलाची दिसते जगती
दोन पाकळ्या दलियाच्या   डाळिंबरसें वळल्याच्या
त्यांत उमलल्या कुंदकळ्या   निसर्गप्रीती थैं हसल्या
नव दिलरंगीं
चित्ततरंगीं
आली गुंगी
नित्य फुलांशीं खेळावें   त्यांशीं वाटे मेळावें

परि छे ! मी किति मूढ बरें   गुलाब विस्मरलोंच पुरे
त्यांची किति ग्रा नवलाई   मुळींच कांटे त्यां नाहीं
केशवसुत पुरते चकले   उगीच कांहिं तरी भकले !
गुलाब फुलतां उल्हासें   कांटे उठती प्रेमरसें

माझ्या शरिरीं
तडागतीरीं
जादुच सारी
सारी अद्भुत जादुगिरी   फुलबागेच्या माझारीं

खेळे निर्मल रंगांनीं   तो बटमोग्रा बाळ गुणी
हस्तें त्या कुरवाळावें   त्याशीं वाटे खेळावें
मधेंच त्याच्या सान खळी   फुटे तिथें मोदा उकळी
आनंदानें
उन्मादानें
स्वैर मनानें
वाटे त्याला चुंबावें   प्रीतीनें त्या भारावें.

तिथेंच खेळे कारंजें   त्यानें मन्मन बहु रंजे
तुषार उडतां चौफेर   मम जीवा आले घेर
नवी चारुता यांनींच   करुनि आणिला हा नाच
नसतें नर्तन
भलतें वर्तन
नव संकीर्तन
भलते भाव भरी हृदयीं   दुनिया मिळवुनियां दरयीं

प्रेमाचा जादूगार   करि जादूचा संसार
जादूनें जिव बेबंद   तेणें बनलों स्वच्छंद
आशांच्या जमल्या   मूर्ती झाली का त्यांची पूर्ती
संध्या सजली
पुरी रक्तली
आशा पुरली
माझी बाग मशीं विरली   मम वृत्ती तिजशीं जिरली

धारवाड, ऑक्टोबर १९२८

## ताई

*[हिंदु समाजांतील असहाय बालविधवा माझ्या ताईच नाहीं तर काय ?]*

बालहृदया भावीक गुणी ताई
तुझी दुर्दिनता दर्शनेंच दाही
हृदय उघडाया तुला सखा नाहीं
तुला झाल्या ना शून्य दिशा दाही !

तुझी काकुळती जगा मुळीं ये ना
गरीबांची चालते नित्य दैना
विगतपतिकांना नसे कुणी वाली
सुदीनाला थाराच नसे भालीं

समाजानें तुज गांजणूक द्यावी
घरीं घरच्यांनीं सर्वदा छळावी
हृदय पोळावें तुवां त्यांस वाटे
तुझ्या जीवनकाननीं सर्व कांटे

जीव जाळोनी जगीं त्वां जगावें
शिव्याशापांना सिद्ध सदा व्हावें
असें पातक तरि काय तुवां केलें
तुला बघतां जनिं नाक मुर्डियेलें

तुझी दृष्टी व्याकूळ तरळतांना
उष्ण निःश्वासें वात घूमतांना
भग्नहृदयीं भावना दाबतांना
निराशेनें तव कळी मलुलतांना—

मन्मनींचा आनंद पूर्ण आटे
शोकसलिलानें कंठिं प्राण दाटे
ढाळिसी तूं जरि उष्ण अश्रुबिंदू
तरी नाहीं तुज जगीं दयासिंधू

काव्य-जीवा तर फार पुष्प-आस
तेंहि न मिळे तुज केशिं खोविण्यास
सुमन भावें त्वां प्रभूला वहावें
एक सुख हें राखिलें तुला दैवें

धारवाड, ऑक्टोबर १९२८

## चल वेड सोड आतां

*[या कवितेंत कांहीं अर्थ नाहीं, तुम्ही हें वेड आतां सोडून द्या, असें सांगणाऱ्या प्रामाणिक उपदेशकांस—]*

कुणि बोललें कुणातें 'चल वेड सोड आतां!'

सुभगे सुशील सरिते या क्षारसागरातें
नच अर्पि प्रेमगीता 'चल वेड सोड आतां!'

कां कोकिळे पिलांना सोडून घेसि ताना
कां भाळली वसंता? 'चल वेड सोड आतां!'

हें धावणें फुकाचें मृगबाळका पुरे रे
कां तूं पिसा सुवासा 'चल वेड सोड आतां!'

कां चातका स्वतःशीं हे मेघ मोजितोसी?
स्वातीविणें न त्राता! 'चल वेड सोड आतां!'

हि उषा चटोर पोर; कां घालितोस घेर
रंगेल शुक्रदेवा? 'चल वेड सोड आतां!'

त्या सोड दीपसंगा बा गोजिऱ्या पतंगा
भिरभीर फेर फिरतां 'चल वेड सोड आतां!'

हे शाहिरा फकीरा कां पढवितोस कीरा ?
ती सोड वेडि कविता; 'चल वेड सोड आतां !'

हे बोल जाचिताती या कोवळ्या मनासी
मग कां असेंच वदतां—'चल वेड सोड आतां !'

अम्हि जन्मतांच वेडे वेडांत सौख्य वाढे
मग खेदितां कशाला ? 'चल वेड सोड आतां !'

बोरी, १-११-२८

## निसर्गदेवतेस

हे माउली दे साउली दिनरात या दीनाप्रती
तव पूजनीं तव गायनीं मम रंगु दे भोळी मती
मुखचंद्रमा तव दाउनी या कविचकोरा पोसुनी
वात्सल्यप्रेमें सेव ही त्वत्पादसेवा गायनीं

संध्या-उषा कुंकू तुझ्या भालप्रदेशीं शोभतें
सौभाग्य अक्षय त्वद्गुणें आम्हां अभाग्यां लाभतें
तव चीर पोपटि त्यावरी वनवेलबुट्टी साजरी
अस्मान-कंचुकि जोडिली त्या तारकांची झालरी

सौभाग्यमणि तो शोभतो तारा ध्रुवाचा साजरा
कौस्तूभ कंठीं लोंबतो गुणि शुक्रदीपक गोजिरा
अंधारकुंतलिं शोभली ती तारका-फुल-मालिका
ही खेळुनी निःश्वासली वाऱ्यांतली नव वीचिका

गंध तीचा सेवुनी मज गुंगुं दे वेड्यापरी
आकाशपंथीं संचरूं दे स्फूर्तिनें प्रतिभा-परी
जलवंति-पैंजण रुमझुमे नादें जगाला भारतां
पडसाद त्याचा काढुनी हृदयांत जागविं भारता

खुलतां तुझा भुपराग जें संगीत खग आलापिती
जें गीत झुळझुळती झरे संध्या-उषा जैं रंगती
रिझवी तयाची देउनीयां शीक माते! बालका
झालों जरी वेडापिसा न करीं तरी बहिरा-मुका

शैलस्तनांतुनि लोटतां गंगारुपी दुग्धामृत
तन्माधुरी चाखूनियां मज पाझरूं दे संगित
सानंद अश्रू गाळिले जे जाहली द्रवमालिका
नवचेतनामृतकंद हा सकलांस आहे ठाउका

लव बिंदु त्याचा सिंच गे मम काव्यप्रीतिंत राजसे
शेखी तुझी मिरवावयाचें लाव गे मजला पिसें
तव कल्पतरु या नारळी त्यांची समाधी दे मला
ते तोषिती तृषितां तसें मज ओपुं दे कविताजला

हे माउली! हे देवते! भावें तुला मी वंदितो
जागेपणीं निद्रेंत स्वप्नीं वंदितों मी वंदितों

बोरी, ५-११-२८

## एक कहाणी

सये साजणी भरल्या नयनीं कां ग विपिनीं फिरसि अशी
वनबालांशीं निर्झरणीशीं किती बोलशी पिशी कशी ?

वेडी हुरहुर लागुनि कसली वेड्यावाणी तूं बनली
भिंगुळवाणा जीव जाहला चटक लागली तुज कसली ?

लतिकांवरचीं फुलें वाळलीं निर्झरणीही मुक्या कशा
साळू, मैना गीत विसरल्या सगळ्या झालां पिशा कशा ?

" आईबापावीण पोर मी मायेस्तव जाहलें भुकी
बारगीर कुणि राजगांवचा ममतेनें मज करी सुखी

भाऊराया ताईस्तव या जीवाचेंही रान करी
सुकलेल्या या कांटेराना प्रीत तयाची स्वर्ग करी

मजस्तव त्यानं गोजिरवाणे बिंदिबिजवरे गोवियले
भाऊस्तव मीं किती जमविलीं सुधामधुरशीं मुळें, फळें

खुल्या दिलानें, अमुचीं जिवनें कथितां प्रेमें, फळें, फुलें—
विसरुनि गेलों, अश्व भाउचा विसरुनि चारा मनीं फुले

एके दिशिं मज देउनि त्यानें सुबक सुमांचा साज नवा
' येतों ताई—जाणें आहे स्वारीवरतीं आज पहा

दुस्मानांनीं देशावर छे ! घाव घातला—कथूं कसें ? '
जड हृदयानें बोलुन इतुकें वारूवरतीं भाउ बसे

जीवेंभावें किती विनविलें, ' भाऊराया, थांब बरें ! '
प्रेमाचीं मम फळें न घेतां भाऊ दौडत जाय त्वरें

असेल परतुनि आला म्हणुनी फिरतें विपिनीं पिशी कशी
वनबालांशीं निर्झरणीशीं हेंच बोलतें दिनीं-निशीं

लतिकांवरचीं फुलें वाळलीं निर्झरणीही मुक्या अशा
साळू-मैना गीत विसरल्या सगळ्या झालों पिशा अशा. "

धारवाड, २५-११-२८

## गरिबाची पुष्पांजलि

घेईं पुष्पांजली प्रभूजी अवनत ऐशा कालीं

चुकलीमुकली माझी सेवा पावुनि घेईं देवा
मजसम साध्या रानफुलांचा साज गरीबी लेवा

गरित्र आइचा पोर पोरका सारें तुजला ठावें
शिळ्या शिदोरीवांचुनि तुजला काय धन्या म्यां द्यावें !

बापुडवाणें चुकलें पाडस आलें गा तव दारीं
पुष्पांजलि ही सेवुनि देवा पुरवा माझी वारी

वेडेबगडे सूर वेळुचे मानुनि घे हें गाणें
मुलांफुलांशीं बोल बोललों जे उघड्या हृदयानें

सोडुनि रुसवा बोला देवा ! रागावुनही बोला
रागें भरली माय जरी ती कुरवाळिल बाळाला

जुनें फाटकें सान कांबळें यावरतीं पहुडावें
आनंदें रडतां बाळानें पाय तुझेच चुरावे

यावाचुनि मज स्वर्ग कोणता, पुष्पांजलिचें सूख
मम पुष्पांजलि तुशीं विरावी पहातां तव श्रीमूख

धारवाड, २-१२-२८

## आळवणी

हे कन्हया, वेणुगानीं ती छेड गोड तान

कुंजिं गुंजमाली
रागरंग-चाली
गाउनी, फुलाचें हरी भान

जळीं हंसलीला
करी गायनाला
भारुनी जिवाचे सारे कान

शकुंतांस छंद
गानाचा आनंद
समीरही गाई भावगान

रश्मि प्रेमरंगीं
नाचती तरंगीं
गुंगावतें कानीं सरिद्गान

मनीं, जनीं, रानीं
गान येइ कानीं
परी जिवा न समाधान

गवळणी, कुरंग
धेनु नी भुजंग
दाटुनी फुललें दिसे रान

विश्व उत्कंठलें
त्वद्गाना भुकेलें
व्याकळोनी कानीं आले प्राण

बांसरी बजाई
भावगीत गाई
राधिकेस लावी तुझें ध्यान

भक्त भगवंता
मेळवी वसंता
इतुकें दीनास देई दान

१९२८

## कवि कोण?

देवलसी जीव सदाचा उदासी
फुकाचा सुखासी पार नसे

भावनेचा फूल भक्तीचा गोसावी
दिसे तसें गोवी काव्याभासें

लोण्याहून मऊ मायेचें अंतर
दुर्बळा अंतर देत नसे

देवाचे संदेश उकलुनी दावी
विश्वासी सुखवी आत्मज्ञानीं

मनानें बालक बुद्धीनें जो वृद्ध
तोडितो संबंध जगें जरी

सौंदर्याचा भोगी जीवनीं विरागी
निद्रेंतही जागी जगासाठीं

कर्तव्याची चाड कुडीच्यापरीस
दगडा परीस करूं शके

मतीनें कृतीनें उक्तीनें निर्मळ
तेजानें उजळ करी जनां

ह्याच खरा कवि प्रीत पाझरवी
तेजें दिपे रवि ईश्वर हा

धारवाड, १९२८

## खादी गीत

सृष्टिदेवते, एकच का तुज खादीचा संग
ध्यानमग्न श्यामले, प्रभूचे फेडिसि का पांग ?
तुझी गुणाची गगनदेवता नवराशिचा चरका
फिरवुनि स्वर्गी सूत कांतिते द्याया सुरलोकां

नील तनुलतेवरी चढवुनी खादीचा साज
साजुन दिसली सुगुणशालिनी औरच कीं आज
बालतारका हासत खेळत कापुस पिंजरिती
वांछितरंगी शालू करण्या रंग ढगां देती

रम्य मनोहर रंगदार नव साड्या नेसुनियां
चौफेरच कीं घेर घालिती नव आनंदें या
वात्सल्यानें पिता प्रभूजी कुतुकें त्यां पाहे
राहुन राहुन मानससरसीं प्रेम वाढताहे

हा तर झाला देवाघरचा खादीचा खेळ
दुनियेवरतीं हृदय बसवितें तयालाच मेळ
प्रशांत प्रीती जिकडेतिकडे चंद्रेच्या रातीं
पातळ खादीचें लेवुनियां फिरते वेत्रवती

निर्झरबाळक धावति मागें, खादीचा हेका
धरुनि मागती आईपाशीं टोपी-अंगरखा
प्रभातसमयीं गिरिवर बांधुनि खादीचे फेटे
स्वर्गीं डोकावती प्रभूच्या नयनरम्य भेटे

सफेत खादी भाव उभविते गत पुण्याईचे
पावित्र्याची रसगंगा या मानसांत नाचे
प्रेमप्रमोदें प्रणयी सागर सरित्साजणीला
फेनरुपी पातळघडि अर्पी खादीची लीला

पावित्र्याची प्रीत पाजळे चेतनसंजिवनी
या खादीनें विश्वीं भरली, हसली ही रजनी
उज्ज्वळ चारित्र्याची दीप्ती खादिरुपें उजळे
स्वार्थभावना दुष्ट जगांतिल खादीनें वितळे

भारतभूला मंगल मंत्रें नवजीवन द्याया
परमेशानें धरिली आतां गांधींची काया
श्रीकृष्णाचें चक्र सुदर्शन अवतरलें आज
देशदैन्य हरण्यास ओपितें खादीचें तेज

अंध मानवा परवशतेचे तोड घोर बंध
खादि पेहरुन हो संन्यासी जगताला वंद्य.

धारवाड, १९२८

## महाराष्ट्रगीत

झंझावाताच्या शौर्याला मेघराज तोही थरके
महाराष्ट्राचें निशाण उज्ज्वल बेदरकार परी फडके
भेसुर तिमिरीं छत्रपतीची चंचल चपला चकमकते
स्वातंत्र्याचें तेज इमानी नभोमंडलीं लकलकतें

स्वयंस्फूर्तिची समर्थवाणी दिक्पर्वतही हालविते
साधींभोळीं मनें मराठी चैतन्यानें कोंदविते
राकट कणखर देश मराठा जित्या हिंदवी रक्ताचा
सरळ मनाचा सिधा शिपाई भीम जसा कीं कुंतीचा

दणदणीत मर्दानी कवनें शाहिर गातां लल्कारी
अंगिं शिरशिरी भरली, हरहर धडधडली ती रणभेरी
स्वातंत्र्याची राष्ट्रविजयिनी स्वयंस्फूर्तिनें फुरफुरुनी
दुखावली नागीण उफळली मराठियांच्या रक्तांनीं

पर्वतकुहरीं, दरीं, पठारीं सूर मराठी निनादले
राष्ट्रदेविच्या निःश्वासांनीं भरलीं सारीं रानफुलें
शाहीरांनीं संगरोन्मदें डफावरी देतां थाप
भरिति मिशांना पीळ मराठे हो शत्रूंचा थरकांप

अबलख वाजी दौडी गाजी भाला फिरके भवतालीं
दख्खन तकदीराचे आंखीं आली रक्ताची लाली
विळा मराठी फिरतां अव्वल महावृक्षही उन्मळले
महाराष्ट्राच्या रणनादानें कडे मेरुचे कोसळले

संगरतांडव चौफेर करी रक्ततृषित तो शौर्याग्नी
यवन कर्दुनी भूमि शमविली सह्याद्रीच्या मर्दानीं
संगरबाला हिय्येवाल्या किती तरी गेल्या समरीं
विवाहकालीं करीं घेतल्या उज्ज्वल त्यांनीं समशेरी

धन्य सती त्या, धन्य मराठे राष्ट्रमुक्तिस्तव मरणारे
आज तयांचे वंशज सारे आजीमागें दडणारे
कुवत करारी घेत भरारी रणशूरांच्या पट्ट्यांची
वळवळणीं ही व्यर्थ आमुच्या लांब जिभांच्या पट्ट्यांचीं

बोरी, १९२८

## शोध

*[एका मराठमोळ्या शाहीर चालेचा भ्रातृशोक. प्रेमाचा चुकून राहिलेला एकुलता एक धागादोरा तुटल्यावर स्त्रीहृदयाची काय बरें स्थिति होईल ?]*

गवसेल कुठें हरली नाजुक माया । प्रीतीच्या भाऊराया

मम प्रीतीचें कोंदण उघडें पडलें । जीवाचें लेणें झडलें
जीवाविण हें जगणें नशिबीं आलें । प्रेमाला मरणचि आलें
ही बावरली नैराश्यानें दृष्टी । भासली उदासिन सृष्टी
गांजणूक आली जीवा
सांडणूक देवा भावा
जगण्याचा कसला केवा ?
प्रेमाविण हें जगणें झालें वाया । प्रीतीच्या भाऊराया

ऋणानुबंधाचे तुटले लागेबांधे । दुःखानें सुटले सांधे
मम आशेची हिंमत आतां हटली । उपहासीं दुनिया नटली
भेसुरतेनें काळवंडल्या राई । आनंद पळाला बाई
या अस्मानीं कीं रानीं
हुडकावें चुकल्यावाणी
तोंडचें पळालें पाणी
दिलदार जिवा दाखव तरि तव छाया । प्रीतीच्या भाऊराया

तो आशेचा भाव जिवाचा झडला । मर्माला घावच भिडला
तो प्रीतीचा सवाल ओठीं अडला । नशिबाचा घाला नडला
तो अलबेला आज पारखा झाला । प्रीतीचा छानछबेला
फसविलेंस हातोहात
कळविलीस नाहीं मात
कर प्रेमाची रुजवात
विरंगुळाच तूं, मालिक राजस राया । प्रीतीच्या भाऊराया

तुजवरुनी हा करिन जीव कुरवंडी । शिणवीन कराया जोडी
तुज हुडकाया जाइन रानोमाळ । गुंफीन अश्रुंची माळ
बहिणभावांचे गाइन प्रीतपवाडे । प्रीतीचे बांधिन वाडे
जमवुनियां राघूमैना
पढवीन प्रीतिच्या गाना
तव पुसेन ठावठिकाणा
ही घिरट्यांची घालिन भवतीं माया । प्रीतीच्या भाऊराया

बोरी, १९२८

मराठी ग्रंथ सं...लय, ठाणे. स्थळप्रत
दि:
दि:

## विहगास

विहगा जाच उडून

तूं सृष्टीचा राजस राणा
नाजुक गोंडस गोजिरवाणा
शाहिरशाही बा तव बाणा
तान सांवरुनि, गान आवरुनि, लवकर जाच उडून

श्रवणमनोहर त्वदिय लकेरी
रसिकांची परि उणीव भारी
दृष्टि जगाची पुरी विषारी
गोफण मारुन, तुजला मारुन, पाडितील कोंडून

स्वतंत्रतेची बोलि वदावी
स्वत्वाची शेखी मिरवावी
दुजियांची मुक्तीच हरावी
मानवि कावा तुज नच ठावा, जाऊं नको फसून

रत्न जोंवरी आहे हातीं
तोंवरि पारख त्याचि न करिती
हरल्यावर त्यासाठीं रडती
ऐसी रीती आहे जगतीं, चित्तीं नित्य दडून

ऐहिक बंधन फसवील तुला
दडपील तुझ्या नव प्रतिभेला
भावशून्य वनिंच्या दगडाला
चैतन्याचें, गीत फुलाचें, दे सत्वर पढवून

निवांत एकांतांत वसावें
सृष्टीच्या सलगींत वसावें
परमेशाशीं जीवेंभावें
गीत गाउनी, प्रीत वाहुनी, जा प्रभुजीशिं जडून

आम्ही सख्खे भाऊ भाऊ
वनांत आनंदानें राहूं
चिरंतनाला सदैव गाऊं
स्वानंदाचें नंदनवन तें त्याशीं जाउं विरून

आत्मा परमात्मीं विरतांना
वाऱ्यावरतीं अमुच्या ताना
भुलवितील भ्रमुनी रसिकांना
नव संजीवन विश्वा देउन, विरतिल त्या सुखवून

धारवाड, १०-१-२९

## स्मशानांत

भेसुर शांती पेहरलेल्या भयाण एकांता !
गभीर संयम, भावसमाधी दे मजला आतां
काव्यउदासी जगताला हा जीव पुरा विटला
आनंदाचा धागादोरा पुरा पुरा तुटला !

विकारविरहित क्षणभरि तरि मज देवा राहूं दे
मयत जगाचें एकांताचें सुख तें पाहूं दे
सुकल्या वृक्षाच्या छाये मज भावें राहूं दे
विषयी जगता जागवावया मजला बाहूं दे

वृक्षावरचीं सुकलीं पानें फडफडुनी पडतां
जड पंखानें नभीं पांखरें झेपें झडपडतां
उष्ण वायुच्या श्वासावरतीं ज्या उर्मी उडती
त्यांच्यांतिल मज रहस्यगीतें उडवूं दे जगतीं

चितांचितांचा दाह सोसुनी अश्रूंचा लोट
दगडांची जी स्थिती जाहली पाहूं दे नीट
पंचत्वाची मिसळण करि जी जिवनाची ज्वाला
जीवाच्या सलगीनें करुं दे तिजशीं जिव्हाळा

पावित्र्याच्या धुळाक्षरांचा घेऊं दे बोध
विचित्र चित्रें बघुन घेउं दे पैलतीर-शोध
गरगर फिरुनी वरवर जातां जीवाची धार
मनिंच्या ताना कवनीं घुमती होउनि अनिवार

पावित्र्याची, स्थीरत्वाची चित्सुखदवमाला
अश्रुमोहिनी घालुनि डोळां हृदयीं करि लीला
धुंद नजर ती धुवुनि टाकितां अंतर सुखभुक्ती
जीवात्म्याला कारागारीं देइ खरी मुक्ती

दुःखाच्या कडुनिंबामधुनी काव्यानंद झरे
प्रेमाश्रूंच्या सरसीं अक्षय सौख्यब्रह्म वितरे
अश्रुसिंचनीं हृदयभूमिला जीवनिं शितळावें
मरणाच्या चिन्मय शांतीला मरणीं कवळावें

अक्षय शांतारामा मृत्यो ! जहरामृतदानी
निस्सिम भावें गानिं पूजनीं तुलाच मी मानीं
'बागुलबोवा' म्हणतिल कोणी कांटेरी फणस
अंतर्यामीं गमे नांदतो सौख्यामृतसुरस

तव जहरावर सतिंनिं राखिलें पातिव्रत्य अपुलें
माय-बालकें पुन्हां साधिलें हरलें प्रेम भलें
कुणीं आपुले दूर सारिले जगताचे बंध
निराशेंतुनी कुणीं मिळविला आशेचा छंद

जगताच्या सुखदुःखा त्यजुनी तव सेवे आलों
तारीं नच मज मार ईश्वरा भावें हें वदलों
या भक्तीला तोषुनि देवा दे जहरी प्याला
त्याची लागे अंतिम आशा या मम जीवाला

आइबालका प्रणयप्रणयिने तुमच्या विरहांनीं
आशांची जी राख जहाली ती अंगा वरुनीं
आत्मसंयमी भावशून्य जो योगिराज बसला
त्याला माझा खिन्न जिवाचा प्रणाम शेवटला

धारवाड, २२-३-२९

## नेत्रमीलन

प्रेमपूर्ण स्वानंदाची ज्योत पाजळून
खूण ठेव ही ऐक्याची अंतरीं जपून

मोहरलीं मीलनयोगें मूक जीवरानें
मंदवात सौगंधाचा वावरे प्रितीनें
वसंतांत कूजन करिते कोकिळा लपून

तुझ्या दृष्टिपानें हृदयीं उमलला फुलोरा
आसबाष्पबिंदू करिती त्यावरी विहारा
मूक गुंजनें मकरंदा टाक भारवून

अंतरिंच्या धाग्यावरतीं भावपुष्पमाला
तुझ्या नाममंत्रासाठीं गुंफिली विलोला
सूत्रगांठ घाल तुझ्याशीं हर्षनें झटून

स्वैर धावती हर्षद त्या चंचला तनाना
मोहनीज स्वानंदाची येतसे जिवांना
स्वप्नचित्र सुखदाशेचें हृदीं चितारून

नेत्रपल्लवी जीवाची काव्यरम्य भाषा
सुखें नेइ बाह्यांगाचीं बंधनें विनाशा
दोन जीव नजरेसरशीं जातसां मिळून

नयनद्वार उघडें तुजला हृदयमंदिराचें
पुण्यस्थान प्रणयाशेच्या रम्य विहाराचें
येथ बिंबती प्रतिबिंबें चुंबनें दुरून

निरांजनें पूर्णत्वाचीं तेवती तिथून
दिव्य दीप्ति नेत्रीं चमके पूर्ण प्रकाशून
तेज-दीप्ति ती स्वयमेवीं जाउं दे विरून

धारवाड, ५-४-२९

## जळता संदेश

देख, भाई मर्द तूझे चालले रे चालले,
जॉनबूलें पाजिलीं त्यांना कडू हालाहलें!
कोण फाशीं, कोण पाशीं, चाललें कोणी उपाशी
रंगसी अजुनी सुखाशीं, झोंपसी गादी-उशांशीं!

लाज ना तुज जासि कां बेमान पैशा भाळुनी?
कैसें तुझें रे, जात नाहीं हृदय अजुनी पोळुनी?
जगसी कसें अवमानिलें लाजीरवाणें हें जिणें?
फिरसी असा दारीं उन्हीं कां भाकरीमागें सुणें?

भावना नाहीं तुला, संवेदना नाहींत का?
रुधिरीं तुझ्या त्या पूर्वजांचें ओज बा नाहींच का?
सिंह तूं असुनी अशी बकऱ्यापरी कां भीरुता?
रणगर्जनें घन हालवीं अन् हादरीं त्या मारुता!

नूतनाशें हिंदभू पाहील तुजला लाडक्या
स्वातंत्र्यशूरा लाभती दैवी सुखाच्या पालख्या
कुंडीं उडी घाली मुर्दे राष्ट्रोत्सवीं सांडी कुडी
काळाकडे दोस्ती करी रणमर्द हो हिंदी गडी

मननिग्रहें तनु दंडुनी नवजीवना जयिं निर्मिलें
चित्तक्रांती करुनि, भ्रांती हरुनि, हृदया उर्मिलें
सूर्यमंडळ भेदुनी तीं गगनपटलें छेदुनी
ब्रह्मांडकंदें कोंदुनी जयघोषनें आक्रंदुनी—

हिंदराष्ट्रोद्धारणीं वीराग्रणी लढले रणीं
ते हुतात्मे दिव्य झाले प्राणपिंड समर्पुनी!
राष्ट्रयज्ञीं आत्मज्योती ज्या स्वतेजें चेतल्या
वन्ही नसांनीं चेवुनी राष्ट्रांतरीं त्या पेटल्या!

दिव्य दीप्ती फाकुनी दिपल्या दिशा तेजें अशा
जळुनी निशा—दुहिची मती—तेजस्विनी हासे उषा!
वंदुं त्यांची संस्मृती नित पाळुनी त्यांचीं व्रतें,
स्वातंत्र्यनिर्झर शोधुनी सिंचूं तयांतिल अमृतें!

राष्ट्रदेविस वाहुनी हीं प्राणपुष्पें आदरें
स्वातंत्र्यनांदी गाउनी उजळूं उषा सारी त्वरें!

कुडचडें, २२-४-२९

## राजसा पुरुषप्रीति क्षणभरी

गडे हो सुरम्य रजनी खरी
खेळूं विशाळ नीलांबरीं

मंगला विमल चंद्रिका
चंद्राची अभिसारिका
करि प्रणयी सारवरचुका
लज्जिता होउनि सति अंतरीं

धुंडिते नाथ सुंदरी
वसुधेच्या कुंजांतरीं
तो दुरी जरी अंबरीं
उत्सुका भलतेंसलतें करी

ही जलवंती श्यामला
करि अभिनव ललिता लिला
हृदिं लपवुनि शशि, कोमला—
सुखाच्या विनोदशय्येवरी

परि ध्यास तिला फसवितो
उपहासें शशि हासतो
तो तारांशीं उधळितो
दिलाचा रंग कुरंगापरी

ही दुनिया फसवी दिसे
जगिं दिव्य प्रेम कीं नसे
वचनीं काव्य का वसे ?
राजसा पुरुषप्रीति क्षणभरी

धारवाड, २३-४-२९

## संगम

शरच्चंद्र तारागणिं वितरी अभिनव शोभा सुखप्रभा
तव शीलाची विमल यशोभा सारिल मागें दिव्य नभा
शशिप्रकाशीं मोहुनि गेले नारळतरु ते सिद्ध मुनी
पतिव्रते, सत्प्रेमसमाधी अविचल तव ही तयांहुनी

संथपदीं नादब्रह्म निर्मी नील श्यामला जलवंती
तव नुपुरांचा झणत्कार परि कलाकामिनी भ्रमवि मती
आंबेराईमधुनी निर्झर वायुसवें गाती गीतें
सुखवी चित्ता तुझी गिरा परि भक्तिरसभरा संगीतें

जलवंतीच्या लहरीसंगें चंद्रबिंब अस्पष्ट हले
मम जीवाची प्रतिमा तरि तव हृन्मंदिरिं अक्षयचि खुले
विश्वाचीं जीं मूक गुंजनें रजनीउद्यानीं खुलती
तव हृदयाची विमल मोहिनी त्याहुनि भारिल विश्वमती

विमल चंद्रिका, मंजुळ गुंजन, दिव्य भावना या त्रयिचा
संगम सुंदर जीवितप्रांतीं वाहत जावो गे अमुच्या

बोरी, २८-४-२९

## श्रीकृष्णवंदन

देई हरित्सावली कल्पवृक्ष स्वशाखा तुझ्या स्वैर आंदोलना
आली तुझ्या दर्शना सृष्टिदेवी धरोनी नव्या दिव्यशा भावना

ती नीलिमा रम्य तूझ्या रुपाची धरी उच्चता सागरीं, अंबरीं
तें तेज, प्रीती दिठीं वेष्टिलेलीं धरीती रवीचंद्र हृन्मंदिरीं

भासे मला श्वासपंक्ती तुझ्या त्या फुलांच्या हृदीं कोंदुनी राहती
गंभीर अंधार अज्ञात सारा तुझ्या कुंतलांची करीतो स्तुती

पीतांबराची तुझी प्रीति ओपी प्रकाशांत पावित्र्य पूर्णैक्य तें
ओठांतली माधुरी टाउकी ते शकुंतांस, भृंगांस, जल्वंतितें

तीं मोरपत्रें मला दाविती रम्य नैसर्ग, लावण्य, संजीवन
माथीं गमे शोभती तूझिया तीं कुठेंही तयां अन्य अस्तित्व न

भासे तुझें रूप नैसर्गि मातें : तुला नित्यशा येथ मी वंदितों
देई तुझ्या बांसरी-गुंजनाची मला काव्यप्रीती असें मागतों

आंदोलती गूढ संदेश तूझे समीरीं तुझ्या स्वैर वेणूरवें
कानीं भरोनी मला गाववीं ते समाधीं, तुझ्या त्या कलालाघवें

बोरी, ४-५-२९

## कोळी

कोळी मी विणितों हृदांतुनि सुध्या सद्भावजाला स्वतः
प्रासादीं, बहु जीर्ण पर्णकुटिकीं भंगे न ती उच्चता
राहोनी जगतीं दुरी सतत मी तोडोनि तद्बंधनें
माझे आत्मिक बंध वेढिति मला गुंफोनियां गायनें

मी मोदें धरितों रसीक-हृदयें : त्या मक्षिका गोजिऱ्या !
माझें जीवन त्यांवरी सतत मी एकांतिंच्या हावऱ्या
माझें राज्य हवेंत, मी हुडकितों संदेश-जंतू किती
त्यांच्यापासुनि जाहली मनरमा सारी मदीया कृती

विश्वा मी बघतों, मनीं विहरतों दीसीं-तमीं सारखा
हृत्तंतूंवर उंच उंच चढतां मातेंच मी पारखा
देखें मी सकलां; मला कुठवरी वा कोण पाहूं शके ?
माझें जाल परी करी मुक जनां सज्ञान नी बोलकें

मी गेलों तरि भावजाल मम तें भारील प्रेमी मनें
राखील स्मृति मध्यबिंदु नित तो सद्भाव-आंदोलनें.

बोरी, ५-७-२९

## पहिलें चुंबन

*[ गुरुवर्य गोविंदाग्रजांच्या कवितेचें विशदीकरण ]*

प्रेमा, चुंबनधुंदि जी विलसते अस्वस्थ त्वल्लोचनीं
चित्ता भ्रांत करूनियां उपजवी तंद्री पिशी मन्मनीं
मोहाच्या नव स्वप्नस्वर्गभवनीं प्रासाद मीं बांधिले
त्यांचें सुंदर ओज बाष्पसलिलीं ताजापरी भासलें

घर्में कीं दवबिंदुंनीं डंवरली ती मोंगली मोहिनी
त्वद्भालावर ऊर्मि कैक उडतां हेलावती रागिणी
कंपोनी हृदया झणीं अनलसा रोमांत ती चेतवी
कांटेरी शिणगार सर्व शरिरीं सुखदुःखिता खेळवी

उन्मादें तव पाकळी अधरिंची प्रस्फूरिता दाबितां
दाबी स्फूरित भाव कोण न गमे मन्मानसा मोहिता
प्रीती अंतर मीलना हृद्द्वयें आतूरलीं चुंबना
भीती ही परि भावना हलवितें जाचोनि वेड्या मना

भीतीनेंच प्रितीस मोल चढतें तें रम्य स्वर्मीलन
लेवी यास्तव माधुरी प्रथम तें भीतीभरा चुंबन

बोरी, ७-७-२९

## आशा

तुझ्या गोड सहवासानें भूल मना आली
हृदयभिन्नता जीवाची सर्वही निमाली

प्रेमदृश्यमाला सारी दिसे मोहनिद्रीं
मुग्ध, मंजु, कोमल येई इंद्रजालतंद्री

नयनओल हलवी हृदयां भावना तरारे
लेखमालिका रोमांचीं मुग्धशी थरारे

तुझ्या वदनकमलावरतीं झूल जी दवाची
गंध भारुनी खेळविते प्राणवायुवीची

वामगालिं अरुणकलेचें अर्धमुग्ध हासें
विनयलाजमिश्रित रम्या लावि जिवा पीसें

शोधिसी कशाला अजुनी हृदयभाव माझे
एक भावना ओठाशीं धावतांच लाजे

लोचनिंच्या दवबिंदूनीं वाहिली जिवाशा
जीवभृंग लागे तुझिया हृदयपुष्पवासा

वास्को, २६-८-२९

## तोडुं नको माळ

तोडुं नको माळ गडे काव्यसुंदरी,
निःश्वासावरि विश्वें खेळवूं परी
उद्वेगें नैराश्यें उबग कां सखे ?
अनुरागें जगताला होउं पारखे

वाऱ्यावर विरुनि सये गाउं गुंजनें
तृषाक्रांत दीन जिवां सुखवुं रंजनें
सौख्यदुःखलहरि विसर जगद्बंधनें
आत्मकाव्यमोद लुटूं सत्यशोधनें

पूर्वजन्मसख्य दिव्य आत्मयां कथी
प्रेमपथीं होत जाय भ्रमित ही मती
काव्यरम्य होय अशी हृदयमीलना
भीसि कां ग उगिच अशी फोल बंधना ?

स्वार्थाची कांटेरी वेल काढुनी
प्रेमवृक्ष वाढवुं ग अश्रु सिंचुनी
नटवुं कुंज संसृतिचा आत्मसाधनीं
प्रेमसमाधींत घेउं गोड मोहिनी

हृदयाचें नंदन तव दिव्य कोवळें
भावपारिजात तेथ नित्य दर्वळे
खेळे निःश्वास तदिय रम्य शालिनी
तद्गंधें आत्मयास येइ मोहिनी

विनयानें वाकुनियां वेचितां फुलें
तव हृदयीं मदिय हृदय नकळतच मिळे
पारिजातकुसुमगंध प्रेम हें असे
विश्वात्म्या लावितसे भक्तिचें पिसें

मिळणीच्या धाग्यावर गुंफिलीं फुलें
दुर्वांकुर तुलसिदलें तनहि मंथिलें
माळ अशी आजवरी लपविली जना
तिजवरि नित सिंचलेंस नयनजीवना

भरुनि हृदय दिव्यताहि खेळते नसीं
माळ तुझी ठेव मला सतत दिसतशी
स्वार्थ विसर अर्थ पहा सतत अंतरीं
तोडुं नको माळ गडे काव्यसुंदरी

वास्को, १८-९-२९

## कातरवेळेनंतर

झाली आतां कातरवेळ । दाट घोर अंधारांत
वायु तीव्र धरी साथ । अस्वस्थ कां ?

काळ्या राई निःश्वासती । आंत घुबडें घूत्कारती
व्योमगर्भी भरी भीती । स्वैर कोण ?

कड्याहुनी निर्झरतती । निर्भय उड्या घालिताती
डोळियां न लागे पाती । मेघ जागे

बाह्य सर्व तरी लपे । अंतःसृष्टी भिन्न रूपें
जाणावया खडतर तपें । चालिलों वाट

कंठीं घंटा घणघणती । धेनुवत्सें हंबरती
मुकुंदवेणूसाठीं अती । झुरे जीव

शिरुनी मातेच्या अंतरांत । लाव म्हटलें सांजवात
जळूं लागे आतां रात । दीप्तियोगें

समीर जळून दिव्य झाला । नेत्रीं नवा प्रकाश आला
'शुभं करोति' आत्मा वदला । स्वानंदांत

दिसे आतां तारावली । मधुनमधुन चमके बिजली
आतां दिशा उजळली । उन्मनांत

दिक्कालाच्या पलीकडे । देवद्वारीं चौघडा झडे
सूर त्याचा कानीं पडे । लाधे यश

नसनसीं चांदणें फुलून । आत्मा तुर्यैंत गेला भुलून
मी-तूं आतां विसरून । नाद भरे

एक मुरली गाजूं लागे । विश्व पूर्ण प्रेमीं भंगे
भाव-गुंजारवीं रंगे । ब्रह्मभृंग

कुडचडें, २४-१०-२९

## पराधीन जीवास

पराधीन जीवा समाधान नाहीं स्वानंदनिद्रा कधीं ना मिळे
हे इंगळे लागले स्वार्थबुद्धीज, आत्माच होमांत भासे जळे

घे पांखरा व्योमगर्भीं भरारी नि जा फाडुनी सप्त स्वर्मंडळें
हो बंधनातीत, हो उन्मनाधीन तोडूनियां जीविताचे ळळे

कां भाळसी पाहुनी इंद्रचापास ? हे रंग फसवे निळे जांभळे
हो तेजमार्तंड त्वद्दीप्तियोगें निर्मीं स्वयें हीं अशीं वर्तुळें

वारूनि सारीं लव्हाळें जळांतील नाचीव रश्मीस मंदानिळें
तोडी फुलें मानसराजहंसा न, मोहास ह्या जाळ गंधानळें

मडगांव, २९-१०-२९

## दोन आंगणांत

चल सये चल ग — निळ्या आंगणिं झिमझिम खेळ ग
हास बाई हास ग — लुट मजेंत मोतियांची रास ग
उड गडे उड ग — चवथिचांदाचि होडि गडे सोड ग
फिर मुली फिर ग — ये न विजेस तुझि कधिं सर ग
बोल बये बोल ग — रूप-गुण तुझे बिनमोल ग

नाच गड्या नाच रे — माझ्या आंगणिं मोति अन् पाच रे
हास मुला हास रे — जाईजुईंत भर नवा वास रे
उड सख्या उड रे — झऱ्याझऱ्यास लाव पुरें वेड रे
फिर मुला फिर रे — भुंग्याभुंग्यास कर पुरें जेर रे
बोल हंसा बोल रे — ऐट तुझी भारिच बिनमोल रे

कुडचडें, ३०-१०-२९

## पांखरास

नाच ऊड पांखरा भरारा नवयुग ये तव घरा
तोड—करीं रे त्वरा—पिंजरा, जोड दिगंतर-धरा

फुलवेलींतुनि झुळका झुलती दोले आंदोलती
तुला ते झुलवाया वांछिती
सुगंधगत चिरगायन गुणरत भृंग गात संगिती
हृदा तव साद तीव्र घालिती
अरुण शुक्र नव संदेशांनीं उजळविती अंबरा
विहरिती चित्स्फूर्तीची गिरा

बालरवीचे सुवर्णरश्मी घरटें तुज वीणिती
ऊब ती तेजाची उगविती
स्वानंदाची स्वर्गनीलिमा छाया त्यावर धरी
प्राचिची शाखा दे साजरी
लुप्त तारका स्वतेजाच्या दव-मोत्यांचा झरा
न चारा देती तुज पांखरा

कुडचडें, ३०-११-२९

## माझी आगबोट

माझी आगबोट चालली दर्यांत ग, दर्यांत ग
मन धावत तरि तव हृदयांत ग

तुकतुक पाण्यामधीं जुनें जग बुडे
निळ्याकाळ्या दर्यावर दैव स्वैर उडे
तुझ्या चिंतनानें दिल तरी धडधडे
वरखालीं लाटेवरी हेलकावे खात ग

पाचूवाणी जळावरी मोत्यावाणी फेस
खेळतांना मोदें मातें म्हणे, "बाळा हास."
पिशावाणी उदास मी, एक तुझा ध्यास
पाचूवाणी नेत्रीं तुझ्या मोतीं ठाव घेत ग

नारळीचे वृक्ष स्तब्ध प्रेमस्तंभ उभे
पर्णाआड पक्षी जणूं भाव हृदीं दबे
धरितात अश्रू हृदीं केळियेचे गबे
हेमंताचे दीस तरी हृदीं उष्ण वात ग

आशेनें मीं आकाशांत पाहियलें जधीं
तुझीं प्रेमपुष्पें शुभ्र आलीं वाटे तधीं
परी हाय ! पक्षी ते ग स्वैर वाऱ्यामधीं
सान बाळासम मज कुणी फसवीत ग

मुंबई, १-१२-२९

•

## स्थानभ्रष्ट फुलास

आहे विश्वच नंदनोपवन हें, मीही फुलांचा पिसा
स्थानभ्रष्ट 'गुलाब' नित्य भ्रमवी माझ्या पिशा मानसा
तीचे गाल उषा, गुलाब सुखदा संध्या गुलाबी असे
तन्नामास्तव सर्व भान जिविंचें प्रीतींत वेधीतसे

या तंद्रींत नदीतिरीं गुणगुणें मी नित्य आहिंडत
तों माझी—नच कोणि यौवनसती धुंदींत कीं चालत
सांजेच्या चढत्या तमासम तिच्या उन्माद नेत्रीं भरे
मातें देखुनियां थरारुनि तनू किंचीत मागें सरे

वेणींतून गुलाब तों निखळला तारा नभांतूनसा
घ्याया किंचित वाकलों तरि तधीं धक्का बसे मानसा
मी मागें फिरलों, फिरून बघतां अश्रू तिच्या लोचनीं
ओले गाल तिचे बघून शतधा सुस्कारलों तापुनी

स्थानभ्रष्ट फुलास देखुनि वदें, "का देवराया फुलां—
स्थानभ्रष्ट करावया दुखविण्या हा बाग त्वां निर्मिला?"

मुंबई, ४-१२-२९

## शेषशायी

माझें अंतर फाळितां मज दिसे ब्रह्मांड हृन्मंगल
आत्मबुद्धिप्रसाद-शांतिसुख जें तेथें वसे उज्ज्वल
दुग्धाहूनि विशुद्ध अमृत भरे प्रीती मनःसागरीं
आत्मा तेथ अनंत शेषशयनीं निद्रिस्त प्रज्ञेवरी

शेषाच्या शिरिं जो स्वयंप्रभ मणी ती दिव्य आत्मप्रभा
शीरोधार्य वसुंधरा दिपवुनी त्रीसप्त व्यापी नभां
नाभीं कस्तुरिका-रुपी विमलता ठेवी जगज्जीवन
त्यांतोनी नवभावपद्म उमले ब्रह्मा करी गुंजन

लक्ष्मी ती प्रतिभा चुरी पदसुमां स्ववैभवें जी नटे
वायूपुत्ररुपी मना विहरण्या ब्रह्मांडही धाकुटें
व्योमीं ती गरुडापरी भिरभिरे बालीशसी कल्पना
देवर्षी रस, नाद तुंबर ऋषी, स्वेच्छें करी गायना

स्वानंदीं नवसृष्टि घेइ मजला तुर्येंत वेडावुनी
माझें काव्य नसे परी दिसतसे तें जाय मी गाउनी

बोरी, १९-१२-२०

## अव्यक्त भाव

काळा जीव तुला कुरबान

मम आशेचा वसंत प्यारा
खुलवित होता हृद्वन सारा
कोकिलाहि नवजीवनधारा
संगीताच्या, चिरंतनाच्या, वितरित होती छान

ग्रीष्माची परि दुर्दीनकळा
हृदयप्रांत नित जाळित सगळा
रोमराईंनीं धडकति ज्वाळा
नैराश्याच्या, उद्वेगाच्या स्वैर दीर्घ बेभान

गगन उदासी स्मशान भासे
मेघ मृत्युचे जणूं तमासे
कीं ते फिरती विरह-आर्तसे
कालकुटातें पिती जणूं ते घालुनियां थैमान

विरहदग्ध दीर्घ श्वासांनीं
अंधारीं स्फुंदे कीं अवनी
सागर, हृदय तिचें झंबळुनी
अस्थिरता भेसूर जिवाची पिटि जणुं वक्षस्थान

व्याकुळ निर्झर, व्याकुळ सरिता
व्याकुळ पर्वत, फुलें, तरुलता
सहिष्णुता ही प्रेमाकरितां
मम जीवास्तव रडति न कुणि लव नाहिं दयेला स्थान

मेघ तारका रडति फुलांस्तव
वायू सुस्कारतो नभास्तव
मानव परि अपुल्या विभवास्तव
पोकळ करि स्तव, अंतरिं विस्तव, हसें मुखावर छान

हृदयांची जुळणी न कुठेंही
सहानुभूती मनीं न राही
स्वार्थातें जो तो जनिं बाही
सर्वच दाही सुखद न कांहीं जग कांट्यांचें रान

अव्यक्त जिरले मनांत भाव
स्मृतितापांचा हो समुदाव
आतां सखया निकाल लाव
सर्वत्रांचा, तूं कलिजाचा मित्र खरा, घे प्राण !

बोरी, १९२९

## प्रीतीचा तिळगुळ

मदिय आली प्रियतमा सखी दारीं
भासवियलें तिज मग्न मी विचारीं
शयनखुर्चीवर ग्रंथ करीं एक
सोंग उठवियलें घेउनी सुरेख

तिळगुळाचें हातांत सान ताट
मदिय दृष्टीची पाहतसे वाट
वदन सस्मित ताठली भ्रूधनू कीं
मोहिनी ऐसी दृष्टिशरां फेकी

बाण ऐसे परि मोहिती मनाला
ललित दृश्या या जीव लुब्ध झाला
"तीळगूळा घ्या गोड मधुर बोला !"
मधुर वचनें बोलली हें सुशीला

"या तिळाहुनि तव गालिं तीळ छान
शर्करेनें तव अधर ये भरून
वदनरंध्रीं फुलतात रम्य कांटे
असा तिळगुळ तव गोड मना वाटे."

चांदर, १४-१-३०

## मुक्तीचें गाणें

शारदिंच्या चंद्रकलेनें शिंपडिलीं किरणें कवळीं
मानुलीं चकोराचीं तीं चंचूनें करिती जवळी

अनिलांत भरी निशिगंध निर्व्याज धुंद आनंद
वरि मिलिंद एकच छंद सेवितो शुद्ध मकरंद

पाचूच्या रानामधुनी पाऱ्याचा निर्झर खेळे
आम्रावर राघूमैना जोडपें प्रीतिनें बोले

कुरणांत चाखिती पान्हे हरणाचीं तान्हीं बाळें
वाऱ्यावर हसती रमती गोजिरीं फुलें लडिवाळें

विमल नील जलवंती ही मृदु अधरें करित जपास
भक्तीचा भरुनी भाव सोडिती लता निःश्वास

वाऱ्याच्या अंगाईनें निजलीं हिरवेलीं शेतें
चित्ताला येउनि तंद्री गुंगलीं मनीं संगीतें

गुंगले समाधीमाजीं गंभीर नील शैलमुनी
प्रीतीच्या गंगा वहाती अंतरें तयांचीं फुटुनी

उद्भ्रांत गोड तंद्रींत मोहलें विश्व रसरंगी
त्या मुकुंदवेणुरवांनीं नसनसांत भरली गुंगी

आनंद सर्व विश्वांत कोलाहल परि जगतांत
स्वार्थाची नित लयलूट लागतां मानवी हात

जगताच्या मानससरसीं आटलें प्रीतिचें पाणी
स्वार्थाचा कर्दम दाटे राजहंस रुपला कोणी

कमलांत मोहुनी रमला पोहला भागला विटला
फसुनियां बापडा झाला वाळला फुलांचा झेला

कानांत घुमे संगीत अंतर भक्तीनें भरलें
लागली मना उत्कंठा बंधनें बांधुनी धरिलें

देखिलें नभीं तों कोणी अभ्राच्या कुंजरपृष्ठीं
अष्टमिच्या चंद्रकलेची घालुनी तुतारी ओष्ठीं

कोवळी निळी नवमूर्ती मुक्तीचीं गीतें फुंकी
जीवज्योत रमली अंतीं राजहंस जरि का पंकीं.

बोरी, २४-१-३०

## कविता म्हणजे काय ?

मनाची मोहिनी कोणी म्हणे दोल्यावरी गाणीं
फुलांची कोमला राणी नटे निःश्वासमालांनीं

प्रीति सौंदर्य वत्सलता निरामय शांति गंभिरता
फुलें कुंजीं अशीं रमतां मुदें ये बहर संगीता

तिथें खडकांतुनी मोदें सुखी निस्यंदिनी खेळे
तिथें दगडांचिया हृदया फुटे हिरवें नवें कवळें

तिथें कलिकेंत ब्रह्मांडीं करी क्रीडा सुखें वारा
अशा साथींत वीणेच्या रसें झंकारती तारा

तियेच्या संगितासरसीं दिलारा क्रीडतो मोर—
नव्या स्वानंद-उल्हासें; वनश्रीहास्य सामोर

हृदाच्या सारसीं नितळे शुद्ध जें बिंब विश्वाचें
तिथें चिद्रूप जें विनटे प्रभूच्या आत्मचंद्राचें

असे तें स्वप्न तंद्रीचें मोहिनीचे मृदू बोल
अम्ही गातों पिशावाणी तयाचे साद बिनमोल

कवी वदुनी वृथा देती अम्हांला मद्य मानाचें
वृथा लोकीं अम्हां पुसती तियेच्या अर्थ गीतांचे

जधीं स्वप्नांत सानुकलीं प्रभूशीं हासती रमती
स्फुरे सृष्टींत स्वानंद तयांना अर्थ का कळती ?

अम्ही बाळें प्रभूघरचीं, मनाचें हास्य ती कविता
अशा अर्थाविना हास्यीं—सुखानें हास बा रसिका !

बोरी, १७-२-३०

## पूर्णचंद्र

गगनश्रीच्या मानसांतलें
विमल कोवळें कमल उमललें
सच्चित्सुखस्वानंदें भरलें
बाळ सानुलें, स्वप्नीं हसलें विश्वाच्या सदनांत

दिव्य बाळ मोहिनी संचरी
उन्मेषानें स्वर्गसुंदरी
वात्सल्याच्या फुटुनी लहरी
गाणें म्हणती बाळ न्हाणिती चुंबन-अभिषेकांत

गंधर्वांच्या रंगमहालीं
माय तयाला घेउनि आली
मेघपल्लवीं छबी घेतली—
झाकुनि त्याची, कवळी त्यासी हृदयाच्या हृदयांत



मराठी

नक्षत्रांच्या मीठमोऱ्या
उंवाळिल्या त्यावरुनि साजऱ्या
अंजन घालुनि नेत्रीं हसऱ्या
गालबोट लाविलें चुंबिलें मग त्यातें प्रेमांत

तेजाचें त्या दुग्ध पाजिलें
शांतीच्या करजालिं झुलविलें
प्रीतीचें त्या गीत गाइलें
विश्रांतीच्या वक्षस्थानीं थोपटिलें सौख्यांत

दीप्तीचा नव स्वर्णपाळणा
कुणीं जोडिला अष्ट दिशांना
रम्य गोफ हे, गोड नीलिमा
ग्रहगोलांच्या राघूचिमण्या लांबविल्या इतुक्यांत

विरल मेघशय्येंत घातलें
स्वप्नांकित नव बाळ सानुलें
हास्यीं त्याच्या विश्व रंगलें
सृष्टी गाई त्या अंगाई कोमल गीतसुरांत

बोरी, १८-२-३०

## काळास

सोन्याच्या फुलपांखरापरि वनीं स्वच्छंद जे क्रीडिलें
कांट्यांतें विसरूनि पुष्प-सुरसीं भृंगापरी गुंगलें
जेणें कृष्णघनीं सुधा शशिपरी संचारिली निस्तुला
जेणें हास्यमिषें रसीक-जनताहृत्सिंधु हेलावला

प्रीतीच्या लहरीवरी विहरलें जें राजहंसापरी
जेणें चंदन नागता विसरुनी आलिंगिलें अंतरीं
जेणें भागिरथीजला मृदुमुखें सूर्यापरी चुंबिलें
जें शुक्रापरि स्वर्उर्षी सुखभरें तेजीं तमीं मीनलें

जें वातीं, सलिलीं सदा वसतसे कोळी तसें कूर्मसें
राहे अच्युत शांत निर्मळ शुची कैलासशृंगा असें
झालें तें मम भ्रांत मानस अतां काळा तुझ्याकारणें
विश्वाचीं तव गूढ घोर सगळीं तोडावया बंधनें

विश्वीं कांबळ वेष्टुनी बघसि तूं कोट्यावधी लोचनें
वेडें मानस जाहलें करितसे संदेशपारायणें

बोरी, १९-२-३०

## शर्वरी

काळें अंबर नेसली कलिसुता, हो भाल भस्मांकित
पृष्ठीं कुंतल कृष्ण सैल, बघतां हो काय रोमांचित
वायूचें भयवाद्य वाजवितसे, नक्षत्रमाला करीं
पायीं घुंगुर क्षुब्ध सिंधुलहरी, नैराशनृत्या करी

औदासीन्य-भरा भयाण बहके घूत्कार-गीतावली,
भिल्ली कोण तुं गे! अशी द्रुतगती येथें कशा पातली ?
तूं जादूगरिणी, कृतांतभगिनी, सौंदर्यविध्वंसिनी
श्वासें कालकुटा क्षणीं भरि जगीं संक्षुब्ध कीं सर्पिणी !

जाळीं का विणिसी किरातदुहिता भीती-निराशा-मय ?
वा वेषें लपल्या सदा हुडकिसी दुःशील पापानय ?
झालें मानस भीतिविस्मयभरा होतां तुझें दर्शन
देखोनी कृति ये तिरस्कृति मनीं वैकल्य हो दारुण

तूझीं निःश्वसनें परी भिनुनियां अश्रू जधीं सांडले
तूझें अंतर जाणुनी मन तधीं प्रेमेंच भारावलें
तूंतें ओळखिलें, मनास पटलें, "पावेल सारें लय
चित्सौख्यें भरलें चिरंतन जगीं वैराग्य हें अक्षय.

निद्रा, मृत्यु, समाधि चालक जगीं तीन्ही तुझीं बालकें
दारू, वीष, पियूषसीं त्रिजगतीं जीं क्रीडती कौतुकें
अझें मद्य पिती, विषा बहु भिती, धुंदीं सुधा सांडिती
जे उत्कंठित पीयुषा न निजतां त्वत्प्रीत सांभाळिती

बोरी, २२-२-३०

## निर्वाणीचा संदेश

स्वर्गसुंदरी, परी, लिले! वायूवरच्या शकुंतले
"प्रीति असे का?" जधीं पुसें सानुकले कर चुरीतसे
ऊरभरी हसुनी नयनीं प्रेमाचें भरिसी पाणी
क्रूर अशी थट्टा करिते चुटपुट हृदया लावितसे
भासे जणुं चपला गगनीं मेघीं लपवी प्रेमखनी

संमोहें अंतर भरुनी बघतों जधिं तुझिया नयनीं
विकार कोमल ये खुपुनी अधीरतेनें निःश्वसुनी
निरीक्षुनी आत्म्यामधुनी नच वदुनी परि स्मित करुनी
हरिसी मनिंचें भान पुरें साच करिसि भलतेंसलतें
कपटी चंचल सरल असें चित्त तुझें तरि काढुं कसें?
बिंदि-बिजवरे तुझ्या शिरीं : रती जणूं बगिचाच करी
फूलपांखरें नयनाचीं काळिंनिळीं स्वर्तेजाचीं
हसती रुसती चकाकती चपलेसम हास्यें करिती
बालगुलाबें सकाळचीं उषादेविच्या प्रभेंतलीं
तिथें खेळती सान खळ्या खळ्या न परि नभिंच्याच कळ्या
गाल तुझे ऐशाच परी छटा तयांना किती तरी

प्रीति ! अश्रुंची माळ करी   मोद खरा तुज हवा तरी
ओठ तुझे पवळ्यासरिसे   लाविति चित्ता एक पिसें
चुंबनमय गाई गाणीं   हो हृदयींची फुलराणी
प्राणांच्या तारा करुनी   अंतरवीणा वाजवुनी
आनंदोद्रेकीं भुलुनी   जा कुठल्या कोठें उठुनी
परी अश्रुंची माळ करी   हृदयमंदिरीं परोपरी

मम हृदया तूं नच भुललें   न तयें तुज जरि शांतविलें
कवनाची जरि आळवणी   घेईन तुला आकळुनी
अरसिक मग तूं सुम म्हणुनी   टाकिन मी तुज कुस्करुनी

बोरी, २४-२-३०

## सागरास

या जगा कंटाळुनी स्वार्थी तयाच्या गोंधळा
प्रीतिभंगें प्राशुनी नैराश्यिच्या हालाहला
दर्शना आलों तुझ्या सोत्कंठ चित्तें सागरा
गंभिरा औदार्यसिंधो शांतिच्या गंगाधरा

त्वन्मुखींच्या त्या छटा सामावल्या माझ्या मुखीं
दाह प्रेमाच्या स्मृतीचा अंतरीं घे पेट कीं
तूझिया शीर्षी किती या प्रीतिगंगा धावती
मी अभागी लाभती त्या सांग कैशा आटती !

इंदुला देखोनियां त्वद्वृत्ति या हेलावती
देउनी बिंबा तुला तो राखितो प्रेमस्मृती
चंद्रमौळी तूं, ललाटीं माझिया इंदू नसे
साजरी छाया तिची तीही न नेत्रांतें दिसे

मी अभागी, मी विरागी, तूं सुखी रत्नाकरा
रत्न माझें सांडलें खायास दे मातें हिरा
तूं गिरीजेचा पती, का सासऱ्याचीयामुळें
वीष घेतां पीयुषाचीं लाभती वल्ली-मुळें ?

माझिया या केतनीं साऱ्या परी उलट्या परी
प्रेमभंगें वीष ओती दुष्ट तो माझ्या उरीं
सैकतीं या हिंडतों मी होउनी काळानिळा
नीलकंठा सोडितो निःश्वास हा माझा गळा

त्रासलों या प्रीतिशून्यीं दीसरातीं हिंडतां
भक्तिला तोषून देवा दे हृदीं ठावा अतां

मडगांव, ४-३-३०

## मातृभूमीची भूपाळी

गोमंतकदेवते, प्रभातीं मानसपूजा वरीं
आमुची मानसपूजा वरीं
चित्स्फूर्तीचा वसंत तुजस्तव सत्सुमगजरा करी

सिद्धगिरीचें शांतिसुखासन हें तव सिंहासन
शारदे ! हें तव सिंहासन
पुण्यमंदिरीं तुझ्या शोभतें अंत्रुज नंदनवन

कैवल्याचा कळस तळपतो सोज्ज्वल मुकुटच शिरीं
मंगले ! सोज्ज्वल मुकुटच शिरीं
आम्रबालिका ढाळिति तुजवर चवरी, नच मंजरी

निसर्गसुंदर हिरवा शालू सुमनांची कूसरी
त्यावरी सुमनांची कूसरी
सृष्टीही तव कंठिं घालिते अलंकार किति तरी

मांडवि जुवारि जलवंतींचे पदीं तुझ्या पैंजण
साजरे पदीं तुझ्या पैंजण
त्वदिय रूप-रवि-उत्कंठेनें प्रसन्न हृदयारुण

तव हृदयासम उदार निर्मल नागेशींची तळी
नंदनीं नागेशींची तळी
सदाशीवही घेई तेथें कधीं कधीं बुचकळी

तुझ्या यशाचा दीपस्तंभ बघ मांगिरीश-सन्निध
मोहला मांगिरीश-सन्निध
चौकावर तव श्रीमहालक्ष्मी सेवेला तिष्ठत

देवि शारदा छेडित वीणा करि तव संकीर्तन
उत्सवीं करि तव संकीर्तन
तेहतिस कोटी देव जमति तव घ्याया पददर्शन

ललित कलांच्या पंच कंचनी भावमधुर नर्तनीं
सुखविती भावमधुर नर्तनीं
मोहुनि जातो भक्तसमुह तव प्रेमळ सद्वर्तनीं

जोड आपुली घेउनि आला उपमन्यू बालक
माउली उपमन्यू बालक
दुग्धाचा अभिषेक करितसे, मूर्तिमंत कौतुक

दिव्य प्रीतिचा चिरनंदादिप जळे तुझ्या मंदिरीं
सुंदरी, जळे तुझ्या मंदिरीं
विश्वात्म्याचें शांतिनिकेतन गमतें तुझिया घरीं

आम्र, फणस, कलिंगडें, सुकेळीं फळें विविध सेवना
नंदनीं फळें विविध सेवना
कल्पतरूंचे सुधाकुंभ तव सज्ज तृषा शमविण्या

जिव-लखबाजी द्वारपाळ तव शूर वीर रणधिर
तिष्ठती शूर वीर रणधिर
पश्चिमसागर झडवी देवी यशनौबत गंभिर

अरुणराग रंगला भुपाळी आई तुज गाइली
भुपाळी आई तुज गाइली
पाइक मी तव गोड करुनि घे सेवा जी वाहिली

बोरी, १०-३-३०

## नंदन

भाकरीचा तूं भिकारी कैदियाचा पाहुणा
बैल घाण्याचा निजाचा नी मुक्याचा मेहुणा

तापतो मार्तंड डोई रेव ही पायांतळीं
चाबकें मानेवरी नी प्यावया गंगाजळी

हंबरे तैं प्राण तूझा, जीव माझा विर्घळे
आटुनी हृत्सिंधुही नेत्रांबुदीं पाणी मिळे

लावुनी या अमृताची दीसरातीं शिंपणी
मीं तुला केली असे ही नंदनाची ओपणी

वाळवंटींच्या सराई स्फूर्तिस्थानें नंदनें
दूत देवाचे अम्ही अर्पावयाला वंदनें

हे नरा नारायणांशा कां तुझी दीन स्थिती
क्लांत जीवा घे विसावा नी करीं पूर्वस्मृती

प्रीतही पावित्र्यही सौंदर्ययुक्ता ही हवा
स्पर्शतां अंगा तुला वाटेल मृत्यूही हवा

सौख्य हें स्वानंदप्राप्ती ही समाधी निस्तुला
लाभतां मत्प्राण-इंदू चंद्रिका देतो तुला

"ऊसनी त्याची प्रभा नी तो कलंकाचा, क्षयी!"
चालु दे चोहींकडोनी ही अशी कोल्हेकुई

काय त्याचें त्रा चकोरा चंद्रकांता साजणा
चंद्रिकेच्या चित्सुखाचा ध्यास त्यांच्या जीवना

कृत्रिमाला सोडुनी या नंदनीं गा संगितें
त्वत्सुखानें सौख्य माझें सारखें रे वाढतें

बोरी, २१-३-३०

## माझें जग

नको मजला ऐश्वर्य मान कांहीं
महत्त्वाकांक्षा लालसाहि नाहीं
कां बळाची मज चाड अशी आहे?
मृत्यु माझ्या अंगणीं खेळताहे

नको शौर्य मला क्रौर्य जिथें नाचे
कोंबड्यांच्या परि नाहिं झुंझण्याचें
रक्तमांसाचा चिखल जिथें सारा
अशा जगताचा नको मुळीं वारा

भूत इतिहासीं स्वार्थ घोर खेळे
शून्य खिन्नपणा भयद करी डोळे
भविष्याच्या मृदु गोड चिंतनांत
स्वप्नसौख्यीं मत्प्राण पेंगतात

आस, भीती, सुखभ्यास मला नाहीं
सदा शांती मम खोपटांत राही
मशीं गोष्ट्यांचा खेळ करी मोद
लपे, शोधी मज सारखा विनोद

मदिय पांवा ऐकुनी स्तब्ध राई
कान टवकारुनि धावतात गायी
मोहजालीं या गुंगि येइ जीवा
हृदीं त्यांच्या मज लाभतो विसावा

ओंजळीनें हरिणांस तोय द्यावें
हृदीं-खांदीं नित ससे खेळवावे
झऱ्यांकडुनी नव सृष्टिज्ञान घ्यावें
किरां मयुरां तें गीत शीकवावें

विश्व माझें मजसवें करी खेळ
उन्हीं थंडीं पावसीं ना अवेळ
वानरासम स्वच्छंद चित्तवृत्ती
आज-उद्यांची नसे मुळीं भ्रांती

वस्त्र लंगोटी, अन्न गोड कोंडा
गोड निद्रेला उशासाठिं धोंडा
तरल थंडी मग फुलुन रोमरोमीं
सुखें साखरगुंगींत झेमतों मी

चुंबण्याला मन प्रीति सदा येई
दुःख तेंही नव दिव्य रूप घेई
मदिय विश्वीं नच उच्च-नीच कांहीं
प्रीति मोदाविण येथ अन्य नाहीं

गड्या रसिका आनंद करूं सारा
येथ ये रे बा राजसा दिलारा
नको चिंता मानसीं मुळीं वाहूं
पांखरें आम्ही वायुवरी राहूं

तुझें सानुकलें वीतभरी पोट
कशा त्याच्यास्तव पिसी रक्तघोट ?
सुधा प्याया या विश्वि माझिया या
प्रीतिगीतें ग्रा शीक तूं म्हणाया

बोरी, २१-३-३०

## हृदय-निवेदन

मम जिविताची नाव चालली परिस्थितीच्या दरियांत
बालपणींचे झोत मजेचे सरले अवघे निमिषांत

संशयमेघीं लुप्त जाहली मम ध्येयाची ध्रुवतारा
तत्त्वाचें तें शीड उडालें बेछुट चोहिंकडे वारा

मनोविकारांच्या भेसुरशा ताडमाड उडती लाटा
संकटवादळ भयाण भवतीं सुटकेच्या दिसति न वाटा

रात्र पसरली जगतावरतीं अंधाराला ये पूर
मनःस्मशानीं भुतें नाचती कलरव त्यांचा भेसूर

तव नेत्रांच्या होकायंत्रावरतीं अजुनी ती तगली
तूं नावाडी दूर कशाला ? वळणी कां हातुनि सुटली ?

तव आळवणी करुनी माझा गळा पुरा सुकुनी गेला
कोलाहलिं या मूढ भ्रमानें आत्मा माझा गुरफटला

प्रेमाचा मीं सौदा केला सरळपणाचें भांडवल
अपेश हातीं आलें माझ्या सावलिची नाहीं झूल

विश्वाचें कोडें उकलेना इंद्रजालसम देखावे
सशापरी हें प्रेम पळतसे, वाक्शर लागति सोसावे

भ्रांत होउनी अश्रुजलानें हृदयाचे लिहिले लेख
काळ्या चष्म्यांतुनी वाचिती आंखुड डोळ्यांचे लोक

मुखवाया घरच्या जनतेला तिळतिळ अंतर मम तुटलें
सर्व गिलावा, नकली सारें पाहुनियां मम मन किटलें

कर्तव्यास्तव जगणें वाटे तेंहि दिसेना नजरेला
नैराश्याच्या धगींत माझा जीव कोवळा होळमला

तुझ्या चिंतनीं देवा फुलुनी रोम, लोचनीं ये पाणी
गात्रें गळुनी, प्राण व्याकळुनि कल्कल उठतो स्वैर मनीं

पराधीन या भ्रमिष्ट जीवा एक जाचणी लागतसे
पिसेपणीं या सौख्य वाटतें परी मनाला मुक्ति नसे

देवा! परि हें सौख्य मनाला न सोसवे वाटे ओझें
तुझ्या पदींच्या स्वानंदसुखीं नेई सत्वर मन माझें

बोरी, २५-३-३०

## विपत्तीस

प्रीय देवते नमन तुला   अभंग संग तुझा मज दे
तुझ्या कृपेला नसे तुला   सदा तेथ मज राहूं दे

तूं स्वार्थांची जरि कुमरी   निःस्वार्थी तव प्रेम असे
जन शापिति तुज परोपरी   तरि त्वत्प्रेमा तूट नसे

रक्षक शिक्षक जगताची   प्रभुची दूती तूं असती
सदा चाड तुज सत्याची   उरावरी कलिच्या बससी

सुविवेकाची तूं जननी   भूतदया तुजमुळें कळे
सद्भावांची तूं स्मरणी   भूल तुजमुळें झणीं पळे

गर्व-भोग-दानव वधिसी;   नीति, उदासिनता, प्रीती
तुझ्या घरीं गमती दासी   हृदयें दिव्यत्वें भरिती

कृत्रिमतेच्या वेड्याला   निसर्गीत करिसी शहाणा
दूर सारुनी द्वैताला   मेळविं मानीं अपमाना

अंधां डोळस तूं करिसी   तसें मुक्यांना वाचाळहि
पांगळ्यांसही चालविसी   गरिबांचा करिसी सांभाळ

सत्काव्याची तूं प्रतिभा   त्वत्संगतिं मज सुख म्हणुनी
होय मजपुढें देव उभा   मुक्ति न मज, तुज अवगणुनी

तव उलट्या अंबारींत   मिरवणूक माझी चाले
तुझे दोहरे आळवित   'भिक्षां देही' मी बोलें

मुंबई, १६-४-३०

## प्रतिभेस

स्वैर करीं संचार ! प्रतिभे !
    स्वैर करीं संचार

तव नांवावर, तव सेवेवर
    हा माझा संसार

तव प्रेमास्तव वेडा झालों
    सोडुनियां घरदार

तुझियास्तव हृद्यांत दडपिले
दुःखाचे उद्गार

तूं उडतां मी पतंगापरी
डुलत उडें हळुवार

परी येथला बंध ओढितो
दुःसह मजला फार

ही पहिली घे शीघ्र भरारी
जीवावरति उदार

१९३०

## प्रणयमुग्धेस

नादांत गुंगसी जें शब्दांत सांग बाले
आषाढच्या घनें कां त्वन्नेत्र भारलेले ?

होसी रसार्द्र केवीं झुकतेस द्राक्षवेली ?
ओठांत वेदनेची मदिराहि साठलेली !

पायांस अंतराच्चा कां भार साहवेना ?
कां बोल घोळलेला ओठांतुनी सुटेना ?

कां सावलींत तूझ्या बघतेस बावरून ?
भलतीच लाज मेली वद गे सखे त्यजून

घे शेत हेलकावे तव कां विळी न चाले ?
नादांत गुंगसी जें शब्दांत सांग बाले

मुंबई, १३-१२-३०

## शेज

कढे सिंधु ढाकी वाफा नारलिका वाली वारा
माझ्या जिवा तुझा थारा

धीर देती तारे जगा रातीच्या काळवेळे
मला सये तुझे डोळे

कोळपल्या कातळांना लहरीचें बिंदुजळ
माझ्या चित्ता तुझे बोल

कृष्णमेघां सोमरस अफाटल्या आकाशांत
डोळां माझ्या तुझें स्मित

वायु कळकांच्या पुंजा सांगे नवलकहाणी
तूं-मी त्याची राजाराणी

वायुचिया तरंगाला मत्त प्राजक्तीचा वास
मला तुझा सहवास !

जलराणीच्या वक्षीं चंद्रबिंबा चढे तेज
कुठें सांग माझी शेज !

बोरी, ३०-१-३१

## परिचयें प्रेम तव जाइल का?

येतां जवळी मी पळशिल का ?
फिरतां मागें मग वळशिल का ?

विखरुनि जादू तुझ्या फुलांची
भूक वाढविसि मूक जिवाची
गुंगत येतां हुंगायासी
गुलाब गे तव चुरतिल का ?
कांटे माझ्या मनिं खुपतिल का ?

भ्रमणचतुर भ्रमरांची जोडी
लावी हृदया गायनगोडी
गात पाकळी फुलवुनि सोडी
कवळुनि धरितां कोरिल का ?
भांडार आंतलें चोरिल का ?

तव हृदयीं शुक्राचा तारा
मम आत्मा जणुं प्रभात-वारा
येतां वाहाया दवहारा
ढगांत त्याला गिळशिल का ?
मग काळिज माझें पिळशिल का ?

तव हृदयाच्या पाणभुईवर
मृदुल पदें मी फिरतां झरझर
आलें जर कधिं वादळ दुस्तर
लहरींवर झेलशील का ?
खडकांवर वा आदळशिल का ?

स्नेह आमुचा मूकपणाचा
कल्पनेंत आनंद मनाचा
वास्तवांत तो जरि जायाचा
घालूं पुढतीं पाउल का ?
परिचयें प्रेम तव जाइल का ?

वास्को, ४-३-३१

## वेड

वेड लाविलें असें कशास ना कळे उरीं
ये यशाविना प्रकाश हासरा मदंतरीं

मृगजळास मोहुनी
मीं मलूल धावुनी
ये न तें करीं तरीहि गोड ओढ संगरीं

जें फुलांत शोधिलें
जें मनीं चितारिलें ·
तें न चुंबिलें तरीहि रंग-गंध हे घरीं

येइ चांदणें धरूं
अंबरांत ये फिरूं
स्वर्ग येइ भोगितां जरीहि प्राण पंजरीं

वाट पाहुनी तुझी
शीण लोचनांबुजीं
दर्शना मुकें तरीहि हुर्हुरींत माधुरी

लोचनीं जरी सडे
ऊन हें उरीं पडे
खेळ श्रावणा! असा अनंतकाल अंतरीं

बोरी, १७-५-३१

## मन मार

मन मार उगिच जें चुकचुकतें
सत्कर्म सदा उजळुनि निघतें

अपेश हें सोपान यशाचें
शांती बालक या क्रांतीचें
चिरंजीवनहि कटु मरणाचें
यशांत तेज विलसुनि फुलतें

एकांतुनि ये अनंत उदया
अणुंनीं जीवित ब्रह्मांडा या
भंगुर पार्थिव म्हणोत काया
त्यांतही दिव्य परि धगधगतें

नच पामर तूं, श्रीपरमेश्वर
विश्व अखिल तव विलासमंदिर
तुजमुळेंच तें प्रिय, शिव, सुंदर
तुजविण तें मडकेंच रितें

तव श्वासें जग अवघें जगतें
हास्यें तव तें हसत विकसतें
अखिल व्यापुनी तेज विलसतें
सौंदर्यप्रेम तव रसरसतें

म्हापसें, ३१-१०-३१

## तीन सांजा

तीन सांजा जाहल्या मी बावरें आंतून कां ?
जीवघेणी वाजवीसी वेणुची कां गीतिका ?

नाटकी रे प्रेमगाणीं छंद जीवा लाविती
बद्ध पाशीं रेशमाच्या जाहलें मी मालका

छेडिसी कां बांसरी रे बैसुनी वातायनीं ?
देति ठेका मानसींही त्वत्पदींच्या पादुका

मल्करींची, मन्मनींची वात कंपे साजणा
बांसरीच्या, त्वन्मुखाच्या सोसवेना रे सुखा

चोरचालीं रात येई मंदिरीं, हृन्मंदिरीं
जीव हा सारा फुले, सांडे उरीं रे चंद्रिका

लावितां कुंकूं सख्या रे अंगणीं वृंदावना
नेत्र हे, हा जीवही पाहूं बघे तूंतेंच कां ?

सूर जे तूं काढिसी आंदोलतें मन त्यांवरी
वाहतें श्वासीं तुझ्या तें देतसे टाळ्यान्च कां ?

सोसवेना यापुढें रे ! सुस्वरांच्या टांचण्या—
लागुनी मीं विव्हळावें ही तुझी इच्छाच का ?

"रातवेळीं वेणुनादें नाग येई मोहुनी—"
—माय बोले, हासती तूं—हें तुला समजे न का ?

"रातवेळीं वेणुनादें नाग येई मोहुनी"
मी म्हणें, म्हणसी परी तूं, "वृद्ध ती, तूं बालिका !"

बोरी, १९३१

## सायुज्यमुक्ति

तूं प्रेमिक मी तव प्रियकरणी
तुज आळवितां गेलें फुलुनी !

प्रभातरवि तूं मी नव कमलिनि
शीतल शय्या किति तुजवांचुनि
वायु तशांतहि भलतें वदुनी
करि असह गुदगुल्या फिरफिरुनी !

तव ऊबेस्तव तनु शिणशिणते
येतां जवळीं परि बावरतें
लाज गुलाबी किति शिरशिरते !
हो असह्य ! ये पाकळि उलुनी

सोन्याच्या तव हृदयीं पोहुनि
मन रे माझें गेलें हुरळुनि
तुझ्यांत गेलें विश्व लोपुनी
मज तुजविण कांहिं न ये दिसुनी

स्पर्शें तव, मम हृदय थरथरे
बिंब तुझें आंतुनी झुरसुरे
गोड विश्व हें, मधु जीवन रे !
धर अशीच मज नित आवळुनी

दृढालिंगनीं तुझ्या मरावें
प्रतिकिरणीं तव मिसळुनि जावें
प्रणयाच्या ज्योतींत जळावें
क्षण एक योग परि अनुभवुनी

म्हापसें, २६-२-३२

## मालवणारी वात

विश्व हें दिसे मला क्षणोक्षणीं नवें नवें
साथ तूं दिल्याविना न मुक्तकंठ गाववे

इष्टमित्रमीलनीं
भाषणीं, विनोदनीं
रंगतांक्षणीं तुझी मनोज्ञ मूर्ति आठवे

गोड जें जनीं वनीं
खेदजन्य जें मनीं
वाटतें अपूर्ण तें न भोगितां तुझ्यासवें

आमुच्यांत सुंदरी
घातली जनें दरी
आणि त्यांजला हवें प्रकाशगीत गे नवें!

नीरवीं, भवाटवीं
वैभवीं नि गौरवीं
विश्रमीं, श्रमीं, भ्रमीं तुझी उणीव जाणवे

काव्यदेविच्या वनीं
गंधमद्य प्राशुनी
जीव धुंद हो जरी तुझ्याविना न पालवे

चेचती मनोगतें
आणि तोंच वाटतें
तूं न सारिल्यामुळेंच आंत वात मालवे

बोरी, ८-५-३२

## आणि मज माउलीच जाहली

कोमल बिल्वदलांवर हिरव्या, धवल जाइचा सर
तशी ही निद्रावश सुंदर
बालकवीची विमुग्ध प्रतिभा, निश्चल मंदाकिनी
तशी ही शांत विमल मोहिनी

अरुण हिच्या गालांवर, हृदयीं सूर्यबिंब रंगलें
तनूवर वस्त्रअभ्र पसरलें
ही वासंतिक उषासुंदरी हिमनगदेशांतली
आपुल्या स्वप्नांतच रंगली
जीवनगंधीं हिच्या वाहतें कल्पांचें गायन
जयावर स्मृतिचें संमोहन

ही उषा जगाची भुवनीं मम उगवली
कीं सदेह शारद वैणिक श्वसनावली !
कीं भावातीता पराच सुखसाउली !

पार्थिवतेच्या क्षितिजापुढतीं जाउनि ही राहिली
आणि मज माउलीच जाहली

पणजी, ३०-६-३२

## आकांक्षा

जरी पुन्हा यावयाचें सत्य सुंदर या जगीं
प्राजक्तीच्या जाती जावें निसर्गाच्या नवयुगीं

माझ्या कोवळ्या पानांचें तुज बांधीन मंदिर
तुझ्या स्वर्णकिरणांची मज लाभतां झालर

आशारूप ही सावली पोटीं सदा साठवीन
कीं तूं माझ्या रसीं जावें हळूहळू मिसळून

आणि यावी हुडहुडी पानीं भरावी सळसळ
ध्वनीमुळें पांथनेत्रीं ओघळावें गंगाजळ

पोटीं एक लाट यावी मज हसें नावरावें
तुझ्या स्वप्नवृत्तींनाही त्यांत पूर्णत्व मिळावें

तुझे रूप, गंध त्यांत मनोमन उमटावे
जेणें काळाचेंहि तीर क्षण भिजोनिया जावें

ऐसा पडावा कीं सडा कीं तो करितांना गोळा
ओठीं अरुण फुलावा मनीं तारकांचा मळा

उरीं ऐशा आनंदाची मूस साठतां पेटती
शिरीं ढग वादळले तरी नाहीं मुळीं खंती

तुझी लागुनी लहर गेला जरी हा बहर
सावधानचित्त करीं विनवणी ही लाचार

पणजी, २८-७-३२

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम २८२२५ वि: ...
क्रमांक ... १५९१३ ... नों: दि: १०/१/६५

## विरोधी भक्ति

निष्ठुर किति हृषिकेशी ! रे तूं

जपतां वरिवरि
येशि लपुनि घरिं
गुपितें चोरुनि नेशी रे तूं

दोष अमित तव
गणितां मम जिव
हलके चित्त हरीसी रे तूं

तुजशिं अबोला
धरितां मजला
भलती जवळिक करिशी रे तूं

ढकलितां तुशी
अधिक बिलगशी
शिथिल तनू ही करिसी रे तूं

दुरावितां तुज
सुस्वर हितगुज
घालुनि ओढुनि घेशी रे तूं

तुझ्यावरुनि मन
विसरवितां क्षण
अधिकचि घरचा होशी रे तूं

तुला चुकवुनी
रमतां स्नानीं
लुगडें चोरुनि नेशी रे तूं

दार लावितां
तुला अनंता
तवपणिं मंदिर भरसी रे तूं

दीप शमवितां
नयनहि मिटितां
मनीं प्रकाशुनि हसशी रे तूं

पणजी, २७-९-३२

## कशि तुज समजावुं सांग?

कशि तुज समजावुं सांग?
कां भामिनि उगिच राग?

हास्याहुनि मधु रुसवा
हेमंतीं उष्ण हवा
संध्येचा साज नवा
हा का प्रणयानुराग ?

चांफेकळि केविं फुले ?
ओष्ठकमल केविं उले ?
भोवतिं मधु गंध पळे
कां प्रसन्न वदन-राग ?

वृत्तींचा होम अमुप
त्यांत जाळुं गे विकल्प
होउनिया निर्विकल्प
अक्षय करुं यज्ञयाग

ओठांचे फेड बंध
गाइं गडे मुक्त छंद
श्वासांचे करुं प्रबंध
हृदयांचें मधु प्रयाग

पणजी, २६-१०-३२

## येइं सखी

येइं सखी हसतमुखी हळुहळु वर जाऊं
अणुअणुंनीं पार्थिवता गाळित जग पाहूं

नील गहन शांत गगन
विरल त्यांत चंद्रकिरण
जणुं अथांग आर्द्र नयन
ही शराब प्राशुनि बेफाम धुंद होऊं

पर्णांचें मृदु कंपन
लहरींचें आंदोलन
कलिकांचें तरल श्वसन
नसनसांत खेळवीत विकलगात्र होऊं

शीतलतेचें अंजन
वायूचें रूप धरुन
स्फूर्तीचे पंख करुन
यां अनंत विस्तारीं रंगुनी तरंगूं

शीतल करुं चंद्रासन
या अथांग यमुनेंतुन
संगम-उत्सव करून
कणकणांत हिम भरीत शांतकाय होऊं

बोरी, १४-११-३२

## इतुक्या लौकर येइं न मरणा

इतुक्या लौकर येइं न मरणा
मज अनुभवुं दे या सुखक्षणां !

फिरुन पहाटे डोंगरमाथा
व्यावे काजू येतिल हाता
किंवा पोफळि शिंपुनि दमतां
मज आलिंगू दे रविकिरणां

वझऱ्यावरतीं न्हाउनि पाणी
गावीं मीं कुणबाऊ गाणीं
पोवलींतुनी पेज पिऊनी
झोपुनी जरा सुखवुं दे मना

निसर्ग-गो-वत्सांशिं रमावें
दिवसभरी श्रम करित रहावें
तिखट कढीनें जेवुनी घ्यावें
मासळिचा सेवित स्वाद दुणा

पडत्या किंवा सायंकाळीं
गुंतावें भावांच्या जाळीं
वेणुस्वरांचीं काढित आळीं
मज उकलूं दे आंतील खुणा

रेंदेराचें ऐकत गान
भानहीन मज मोडुनि मान
चुडतांच्या शेजेवर पडुन
भोगुं दे मूक निस्तब्धपणा

रात्रीं समईशीं वाचावी
ज्ञानोबाची अमृत-ओवी
कविता-स्नेहें वात जळावी
उजळीत मनाचा द्वैतपणा

कुळागराची गर्द साउली
त्यांतच माझी खोप सानुली
निद्रेविण स्वप्नांच्या ओळीं
रेखीत भोगुं दे सरळपणा

फूलपांखरें अनंत माझीं
बनुनी, मीं सेवावीं ताजीं
हृत्सुमनें आनंदामाजीं
नाचवीत पांथांच्या नयनां

बोरी, १९३२

## जादुगार

कोण वेळ साधियली श्रीरंग जादुगारा ?
बांसरी-स्वराचा गळ रे लागला जिव्हारा

पोटीं उठे कळवळा
भूक कानीं होय गोळा
जीव होय चोळामोळा
दुकाळलीं वर्षें कथिती व्यर्थ हा पसारा !

ओढुनी मनींची दोरी
केली रहस्याची चोरी
कुठें जीवनाची थोरी !
वैजयंति संसाराची उधळली भरारा

फांद्यांवरी माझें घर
वातें हाले थरथर
केलें मला तेंही दूर
आणि व्योमगर्भी मज कां फेंकिलें दिलारा ?

आकाशींची डोळां नीळ
करी हृदया निवळ
दिसे तुझें लीलाजळ
फेन त्यावरी हा अमुचा विश्वगोल सारा

स्वरासवें रानींवनीं
हिंडविसी या जीवनीं
तगमग होई मनीं
तोड बंध हे अस्थींचे, नोढवे शरीर

पणजी, १९३२

वास्तव्य कुणाचें तेथ असे
त्या नांव कोणतें देउं कसें ?

कोलाहल दिवसभरी श्रमुनी
थडग्यांवरतीं घेइ विसावुनि
शांत रात, निर्झर-मर्मर-ध्वनि
यांच्यावरतीं कोण वसे ?

मध्यरात्र जातां ओसरुनी
वारा पडतां तनु गारठुनी
कलिकाकोषीं, कुमारिकामनिं
हळुवारपणें कोण बसे ?

अंध तमीं पणती मिणमिणती
कोण वसे तज्ज्योतीभवतीं
महात्म्यांचिया मुद्रेवरतीं
निर्व्याजपणें कोण हसे ?

निजतां गात्रें, निजतां वृत्ती
कोण तरळतें स्वप्नांवरतीं
अमर कवींच्या कवनांवरतीं
नाचुनि लावी कोण पिसें ?

जेव्हां माझ्या स्मृती उजळती
पुढचीं विश्वें नयनां दिसती
संकटकालीं अति एकांतीं
हृदय स्पंदनीं कोण ठसे ?

१९३२

## कारागीर

तव परिस-हृदय लागुनि सजणा
मज सहजचि आला स्वर्णपणा

तव स्पर्शाचें मधुर निर्बंधन
स्वातंत्र्याचें हरी कृपणपण
शीतल तेजें भरि तनु कणकण
सुख झरे भरे उर क्षणक्षणां

अनंत वाद्यांचा स्वरसंचय
झाला अजवर मज कंटकमय
साधियली त्यांतिल अक्षय लय
स्वर मिळे नवा जीवनकवना

नाद, रंग, रज, अभिनय, अक्षर
त्यांत तूंच सत्, सुंदर, शंकर
नटेश तूं स्वानंददिवाकर
तूं फुलविलेंस आंतिल अरुणा

तव अधरांची पिउनी जोडी
कळली मज मम अनुपम गोडी
सीमा विश्वाची हो थोडी
मग कोण पुसे वस्त्राभरणा ?

तूं जीवाचें केलें सोनें
कलाकुसर कर क्षणिं अंगुलिनें
तव कंठींचें करि मज लेणें
तूं कारागिर माझा रमणा

पणजी, ४-१-३३

## सांजवेळ

सूर्य गेला देशांतरा आणि दिशा अंधुकली
पंख-दमल्या पक्ष्यांचीं भिरीं घरा परतलीं

नभाचिया नुरेवर रंग विटुनी उल्हासी
त्याचा गाभा गढूळला स्पष्ट दिसे कासाविशी

तरुगिरींचिया ओळी कुणीं फांसल्याशा वाटे
तम सांवळ्या भूमीचा कोंडलेला श्वास सुटे

श्रांत कोलाहल टाकी वायुचिया स्कंधीं मान
सिंधुतीरीं घ्यावयाला सांजवेळ-समाधान

सांध्यजळ व्याकुळलें तम पाहुनी गहन
चुळबुळे, खळबळे भाव होईना सहन

भव्य नौकांतले दीप स्तब्ध सावधान झाले
त्यांस देखुनी जळाचें खिन्न काळीज हाललें

तेजोरेषा थरारल्या त्याच परी काळजांत
आणि तया पाहुनीयां दीप जहाले स्तिमित

दूर कुठूनसा आला गूढ घंटारव कानीं
मंत्रमुग्ध माझी वृत्ती, मुकें मन, मुकी वाणी

पणजी, १३-१-३३

## तेथें कर माझे जुळती

तेथें कर माझे जुळती
दिव्यत्वाची जेथ प्रतीती

हृन्मंदिरिं संसृतिशरस्वागत
हसतचि करिती कुटुंब-हित-रत
गृहस्थ जे हरि उरांत रिझवित
सदनीं फुलबागा रचिती
तेथें कर माझे जुळती

ज्या प्रबला निज भावबलानें
करिती सदनें हरिहरभुवनें
देव-पतींना वाहुनि सु-मनें
पाजुनि केशव वाढविती
तेथें कर माझे जुळती

गाळुनियां भाळींचे मोती
हरिकृपेचे मळे उगविती
जलदांपरि येउनियां जाती
जग ज्यांची न करी गणती
तेथें कर माझे जुळती

शिरीं कुणाच्या कुवचनवृष्टी
वरिती कुणि अव्याहत लाठी
धरिती कुणि घाणीची पाटी
जे नरवर इतरांसाठीं
तेथें कर माझे जुळती

यज्ञीं ज्यांनीं देउनि निजशिर
घडिलें मानवतेचें मंदिर
परी जयांच्या दहनभूमिवर
नाहिं चिरा नाहीं पणती
तेथें कर माझे जुळती

स्मितें जयांचीं चैतन्यफुलें
शब्द जयांचे नव दीप-कळे
कृतींत ज्यांच्या भविष्य उजळे

प्रेम-विवेकीं जे खुलती
तेथें कर माझे जुळती

जिथें विपत्ती जाळीं, उजळी
निसर्ग-लीला निळीं काजळी
कथुनि कायसें काळिज निखळी
एकाची सगळी वसती
तेथें कर माझे जुळती

मध्यरात्रि नभघुमटाखालीं
शांतिशिरीं तम चवऱ्या ढाळी
त्यक्त, बहिष्कृत मी ज्या काळीं
एकांतीं डोळे भरती
तेथें कर माझे जुळती

पणजी, १६-२-३३

## गोड कळ

परलोकींही दुर्मिळ सजणा अंतरंगिंची कळ

सल नाजुक सलतां मनीं
येतात स्मृती बहरुनी !
क्षण वाटे जीवन सायंकालिन सलील उज्ज्वल जळ

तूं गुदमरविसि चुंबितां
कडकडुनी आलिंगितां
मग करितां कुडिची घडी गोड ये जीवाला भोवळ

ढग कौलारीं कोसळे
घरिं पुरति न समई जळे
परि यात्र अवेळीं मिळे मला तव उबाळ वक्षस्थळ

जग गहन सतीचें मन
सुखदुःखाचें मीलन
करि अनलमंचकीं शयन प्रणयिनी सोनसळी केवळ

मन अपुलें जळता दिवा
भिलभिले हालतां हवा
परि उजळी अवघें त्रिभुवन जरिही माथ्यावर काजळ

बोरीं, २१-५-३३

## ऐक्यगान

ऐक ! ऐक ! ऐक्य तुझें तुजसि साद घाली
बघ त्याचें तंतुजाल तव सभोवतालीं

तनु क्षणभंगुर पणती
ऐक्य त्यांत दिव्य ज्योति
स्पर्शक्षणिं धूलिकणीं दिव्यता उदेली

विश्व हें अनंत गान
जीवन तव एक तान
अनुभवीं तदीय स्थान, रंग-भावजालीं

एक रश्मि विविध रंगिं
एकच जल हृत्तरंगिं
एकच स्वर पालटून या अनंत चालीं

हें सकलानंदधाम
शांति हीच हा विराम
ध्यानविमुख ज्या क्षणिं तूं सिद्ध मेघ भालीं

जे जे क्षणिं प्रेम मोद
भोग वा मनोविनोद
रोमरोमिं ऐक्य तेंच तुजसि साद घाली

पणजी, १९-६-३३

## सुहृदास

वर्षांत तव शिरीं वर्षफुलें
सहर्ष जीं यशकीर्तिपरिमलें

तव वदनीं स्मित-शरच्चंद्रिका
हृदयिं सिंचितां भरति ये सुखा
पटे तूंच जिवलग प्राणसखा
जग गोड वाटतें तुझ्यामुळें

मध्यरात्रिची निळी वारुणी
उदंड भरली तुझिया नयनीं
पितां, सुखें मन विव्हल होउनि
माझेंपण तुझिया रसीं मिळे ?

सरी मृगाच्या तव मृदु वचनीं
पिकतील मळे जेणें विपिनीं
गर्भ मतीचे तव तेजोमणि
जे तव एकांत-विलास-फळें

जिथें उमटती तुझीं पाउलें
तेथ उमलती तेजःकमळें
अंधारीं तेणें पंथ कळे
गति सुगम जलदही त्याचमुळें

अखंड वाजिव जीवनवेणू
सजीव होतिल पथिंचे रेणू
परस्परीं मीनतील अणुअणु
ब्रह्मांड उभवितिल याच बळें

फुलती सहृदय जन तव श्वासें
वठले तरु मोहरती हास्यें
कलावंत बहरति सहवासें
रविबळें जेविं ग्रहगण उजळे

वंद्य तुझी मज अंतर्ज्योती
घरोघरीं जी लावी वाती
स्पर्शें करि दगडांच्या मूर्ती
संजीवक तेजाचे पुतळे

पणजी १३-८-३३

## करिं सुंदरि स्वरशृंगार

करिं सुंदरि स्वरशृंगार

भुवनीं, भवनीं, हृदय-उपवनीं
तरल विरलतर पवनावरणीं
मृदुल मधुरतर स्वरलहरींनीं
अखंड करिं संचार

गान न तें, फुलणें, लखलखणें
ॐकाराचें अभंग लेणें
दिव्य जिवाचें संपूर्ण जिणें
ऐंद्रिय साम्य-विहार

जळीं, स्थलीं, मलिं, अनलीं, अनिलीं,
तृणपर्णीं, चरजनीं, ग्रहगणीं
लपलें स्वरसौंदर्य उकलुनी
गुंफ तयाचा हार

चराचराची जीवनयात्रा
चाले गुंगत ज्या हरिमंत्रा
तत्संगीतें भरिं हृत्पात्रा
करिं तनु हिमसम गार

मम देहीं जीं बीजें निजलीं
युगकल्पांच्या अवजड चिखलीं
स्वप्नें सरुनि न अजुनि उगवलीं
शिंपड चार तुषार

हो जीवन तेणें वलयांकित
हृदयांचीं क्षितिजें ओलांडित
अवकाशाचे लोकहि व्यापित
ढवळो पारावार

कर उन्नत मम, ॐकारचि तन
हृदयंगम संगीतहि जीवन
स्पर्शें करिं मज हरुनि अहंपण
सामवेद साकार

१९३३

## तुझी माझी प्रीत

तुझी माझी ग प्रीत साजणी चांदण्यांतली लावणी ग
किती अशीं हीं फुलं गुंफायचीं मनांत फुलला मळाच ग

किती करांना शीण द्यायचा, हार तयांचा कोवळाच ग
शराबींत ना मजा माधुरी ओठांचा पेला ओठाला ग
गार वाहुं देत वारे सभवतीं काळजाची ऊब्र काळजाला ग
झेल घेउं या निर्धास्तपणें दैवाच्या दोल्यावर ग
जरा कुठं धडधडलं जर उरिं रेल जिवावर सत्वर ग
कल्पकल्पवर विलास करुनी लाटांवर करुं प्रवास ग
फेनापरि दशदिशांस उधळूं हृत्सुमनांचा सुवास ग

१९३३

## नवी भूपाळी

क्षितिजावर आली लाली
नयनांची नीज पळाली
कंठांत नवी भूपाळी
शुभरेषा आज कपाळीं

पळविती घरोघर चुली
इंधनांतली
काजळी काळी
शुभरेषा आज कपाळीं !

देउनी रक्त सोवळें
शिंपिती मळे
तरुण शुभकाळीं
शुभरेषा आज कपाळीं !

पाडुनी तटांचे चिरे
उभविती घरें
जगाच्या भाळीं
शुभरेषा आज कपाळीं !

जाळिती सांचला केर
धूर बाहेर
तेज राऊळीं
शुभरेषा आज कपाळीं!

सांडलीं चिरंतन फुलें
दलित नव दलें
गुंफिती माळी
शुभरेषा आज कपाळीं!

फुलविती निखारे, फुलें
सुखें, घरकुलें
स्त्रिया गुणशाली
शुभरेषा आज कपाळीं!

प्रीतिच्या विराट ग्रास
प्यास हृदयास
प्रीतिची झाली
शुभरेषा आज कपाळीं!

लंघुनी वैरि बंधनें
व्यापिते मनें
कृतीची चाली
शुभरेषा आज कपाळीं!

आंतला सूर्य उगवला
मुखीं सोज्ज्वळा
प्रभेची जाळी
शुभरेषा आज कपाळीं!

म्हापसें, ५-१-३४

## पारिजात

"हट्ट तुझा बेहद्द पाहुनी अभिमानी भामिनी
गोड तुझ्या रुसव्यांत हरवलें मन माझें रंगुनी

स्वर्गीतिल प्राजक्ताहुनिया दुर्लभ चेतोहर
प्रीतीचा पारिजात तुजला दिधला मीं सत्वर

श्रीकृष्णानें दिधला भामे स्वर्गीतुनि आणुनी
हृदय-वनांतिल परी ठेविला तिला सदा चोरुनी."

"नाथ! दिल्वरा! मीच शिंपितें तो हो रात्रंदिनीं
फुलें तयाचीं तरी सांडती कवितेच्या अंगणीं

अशीच होती माझ्यासरशी भामेचीही गती
रुक्मिणिचा परि भलता मत्सर तिनें न केला किती!

श्रीकृष्णाशीं कधीं न वदली भामा रागाविणें
मी दारीं हासतें, स्वारिचें तिजशीं जरि बोलणें."

९-१-३४

## आकाशाचें मनोगत

इंदुकले! नवलाची तव हास्य-जादुगारी
गाढ ढगांच्याही भाळीं ये जरीकिनारी

दिवसभरी तापुनि होतों जाहलों उदासी
रंगदार स्वप्नें विरलीं हासरीं विलासी
हिमांगिनी! बिलगुनि बसतां तूं जरा उराशीं
हळूहळू हरली मनिंची काजळी विषारी

होय देह ज्योतिर्मय हा कांतिनें तुझ्या गे
गतस्मृती त्वत्प्रीतीनें धुंदल्या शुभांगे
प्रीतियोग दिव्य विरागी त्यांत जीव जागे
सांद्र नीलिमा श्रीहरिचा दाटला शरीरीं

संगमस्मृती तव झाल्या तारका मनीं या
तुझ्या वियोगीं लागति त्या अधिकची खुलाया
आणि धीर येई हृदया काळघोट घ्याया
तूं रहस्य, या जीवींची चित्कला, हुषारी

पणजी, ८-२-३४

## कणव

इतुक्यांतचि आणिं न तव कणव मोहरा
साहवेल केविं दान दीन पामरा ?

घालिं न आतांच मला अमित भूषणें
भारें मम होइल हें मंद चालणें
चिद्घन तूं, गोड तुझें जरिहि बोलणें
संततझड न सहे या मातिच्या घरा

तव वीचींवरतीं ही नाव हालुं दे
स्वानंदें तींत जीव सहज डोलुं दे
उडुनी स्वर्गास जों न ती स्वहस्त दे
लाटांनीं कवळुं नको पोटिं सागरा

मागितलें जल जरि मीं तप्त होउनी
वर्षावें टाकिं न मज चिंब भिजवुनी
होइल नभ पांखरेंच पंख दाटुनी
व्याधाचा शर बसेल अचुक अंतरा

स्वप्नीं हा बालकतरु हसत चंवरला
पवनचुंबनांत तुझ्या जरि सुखावला
मूळ धरुनि पाताळीं जों न पोसला
चंडबळें खेळुं नको धरुनिया करां

दृष्टीची साथ फिटुनि ती न निवळली
झिळमिळती सृष्टि बघुनि तींत रंगली
तव उबाळ किरणांची भूक वाढली
दाविं नच विराट रूप तरि प्रभाकरा

तळमळिनें जळत हृदय-कांच तापली
सहजपणें ती नच जों शांत जाहली
वरदजळें क्षाळिं न ती जरि विटाळली
ती ढळेल कायमची होउनी चुरा

सौख्याची परिसीमा जरि तुझी दया
दुर्बल मी तींत न मज ये रमावया
वितळुं नको व्यर्थ प्रीतिच्या हिमालया
माझा नच योग अजुनि जाहला पुरा

नारवें, ५-३-३४

## वारुणी रात

पलीकडे शेतांत तुंबलें काळें काळें पाणी
वैभव अपुलें पसरुनि त्यावर बसली कमलराणी

मानेवरतीं मान टाकुनी शीतल शेजेवरतीं
अंगलगीच्या उबेंत कमळें सगळीं पेंगत होतीं

दूर कडेला बाग केळिची उगीच आनंदून
पानोपानीं यौवनकांती दे हासत उधळून

न कळे वारा केविं कांपरा वेळूच्या पुंजांत:
शीळ घालितो कवण हेतुनें—प्रेमिक जणुं कुंजांत

सांज संपुनी नीळ नभींची प्रेमें दाटत होती
वंशतरूंना भरुनि शिरशिरी थरथरलीं क्षण पातीं

सुखावुनी पाण्यांत बैसलीं डोळे मिचकावीत
काळीं ढोरें, जवळ चिन्यांवर धनगर झुरके घेत

बांधावरच्या माडावरची नुतरे अजुनी 'सूर'
वातावरणीं वाढत होते तों 'मांड्याचे' सूर

पलीकडे देवळांत वाजत होती मधुनी घंटा
भुरभुरला तों कुण्या जिवाचा आठवणींचा साठा

माडामध्यें खोप, तींतही जळे कुणाची भाटी
पिउनी घे कुळवाडी तेथें दारू करटी-वाटी !

अर्धें लुवल्या अर्धें मळल्या अफाट त्या शेतांत
मळणी करिती पाय कुणाचे, लुवणी आणिक हात

दणकट त्याचा उघडा करडा लवलवणारा देह
मूर्तिमंत तो स्त्रीहृदयाचा अतिसुखदायी मोह !

नजर तियेची आगें-मागें विळा परी शेतांत
बघतां त्यातें वाटे कीं तो शिरलासे पोटांत !

भोवतालच्या सृष्टीहुनिया सुंदर अंतःसृष्टी
हावरेपणें पहात होती त्याची मिटली दृष्टी

म्हणे मनीं तो, "घरास जातां कोंडिन मी खोपींत—
गोड गुदगुल्या करणारी ही रम्य वारुणी रात."

नारवें, ६-३-३४

## तुझ्या तेजें

जगाच्या आत्मयज्ञींच्या सदासाक्षी प्रकाशेंद्रा
कधीं माझ्या मनाची तूं जरी का फाडिली निद्रा

जिवाचीं बद्ध या स्वप्नें तुझ्या स्पर्शें खुलीं झालीं
तुझ्या तेजें जरी त्यांना प्रभावी चेतना आली

जिवीं जीं कोंडलीं विश्वें तयांना लाभली मुक्ती
घटीं विस्तारली माझी जरी ऐंद्रीय आसक्ती

तुझ्या तेजापरी माझ्या स्वरांचे भर्जरी धागे
जरी जीवांत गुंतोनी जहाले ते स्वयें जागे

करीं, नेत्रीं, उरीं, ओठीं तुझ्या लावण्य-तेजानें
भविष्याचीं नवीं दैवी जरी सामावलीं पानें

प्रसादाचें तुझ्या फूल निखाऱ्याचेंच मागेन
चुली थंड्या अनेकांच्या कराया दीप्त लागेन

जयांनीं खोदिल्या नाहीं मनींच्या आंतल्या खाणी
निवांतीं प्राशिलें नाहीं जिवींचें जांभळें पाणी

जयांना ना कळे कैसें जगीं सौंदर्य चोखावें
घरीं, दारीं, सुखीं, दुःखीं, विरागीं काव्य भोगावें

जयांच्या आत्मबीजांत प्रभावी झोपले वृक्ष
तयां देईन हुंगाया तुला ठेवूनियां साक्ष

बोरी, १०-३-३४

अनुक्रम 2225 ... क्रमांक 1593 ... नों दि: 10/3/56

अमृतघट भरले तुझ्या घरीं
कां वणवण फिरसी बाजारीं ?

प्रेम तव गड्या मनीं दाटुनी
नेत्र प्रियेचे आले भरुनी
गहन जहाली भवतीं रजनी
घाईंत तमीं कां जाशि तरी ?

मोत्या इवला, मनी सानुली
कुशींत कवळुनि त्यांना बसली
प्रेमें किति तव राजसबाळी
हें बघुनि कधीं रमलास उरीं ?

वडील वाचिति गाथा-पोथी
काल तिथें तूं क्रमिलास किती ?
किंवा आई वळिते वाती
वदलास तिजशिं कधिं ऊरभरी ?

पाडस घरचें कितिदां आलें
गळा करुनि वर तुला बिलगलें !
गोंजारुनि त्या कधिं खाजविलें ?
कधिं दलें दिलिस त्या घांसभरी ?

पडे चांदणें चौपाशीवर
भवतीं घेउनियां सगळें घर
वाटिलेंस त्या केव्हां अडसर
तूं पीत, गात मोकळ्या स्वरीं ?

तूं हससी उपहासें, तरुणा !
यात्रेकरुंना, कस्तुरिहरिणां
आणि बांधिसी काय शहाण्या
घर मोडुनि मांडव तयावरी ?

बोरी, १३-३-३४

## किति दयाघना करितोस ऋणी ?

किति दयाघना करितोस ऋणी
असा सुखाचा पाउस पाडुनि ?

पथीं लाभती स्मितें निशिदिनीं
इंद्रजाल मनिं प्रतिपलिं भ्रमणीं
भंवतीं नंदनवनसम अवनी
आकंठ शर्कराजलहि जनीं

तरंग शीतल असे सखेजन
अरुणकिरणवृंदसा मित्रगण
फुलवि दरवळवि ज्याचें भाषण
रसरसे हृदय वर्णी गहनीं

अनंतपथिं कुणि सावरिती मज
कथिती भावें अंतरिंचें गुज
वाजवुनी प्रीतीचें अलगुज
घालविती जीवाची झुरणी

फुलें घरीं, दारीं, व्यवहारीं
मधु परि मम हृन्मशकागारीं
आंच लागतां जळजळणारी
किति गोडी भरिसी तरि ज्वलनीं !

चढतां गिरि मी, क्षितिज फुलविसी
हसतां, गंधें त्रिभुवन भरिसी
जळतां मी, तूं स्नेह घालिसी
पसरिसि जीवन अगणित किरणीं

बोरी, १२-४-३४

दा. क्र. ११२७६

## वैभव

दीस गिमाचे बरंच सुकलं विहिरीमधलं जळ
धरूं लागलं नुक्तं कोठं रुखावळीला फळ
मृदु भारानं सखू बावली नाजुक परि जाहली
डोईवरतीं घागर घेऊनि उन्हांत त्या चालली

दीड पुरुष त्या नितळ तांबड्या घरच्या भिंती बघून
तिला वाटलं काळोखांतिल गुपीत आलं फुलून
पारे होता अजून चढवित शिदू तिचा घरधनी
मिरगाआधीं झाकुन घ्यायचं होतं त्याच्या मनीं

किर्णावाणी तिला वाटली तवां शिदूची नुरा
घामें न्हाला देह तयाचा मशिंग आला भरा
परसांतिल पनवेलीपर ती हिरव्या वेषें खुलून
अलगद चालीं न्हाळावरच्या येई करव्यावरून

"जपून ये हं!" शिदू म्हणाला, "करवा नाहीं धड!"
"तुमच्या पिर्तीच्या आधारं येणं नाहीं जड!
पुरे आतां हें किती राबणं ये दिस माथ्यावर
पणसाखालीं बसून संगं जेऊं वाटीभर

तोर आणलं खळांतलं मी मागुन धनिणीकडून
तुमच्यासाठीं तसं आणिलं चुलींत खारं पुरून."
"पसा दो पसे तुझ्या हातचं उदक घोटितां सखू
मला वाटतं उमेदिनं ही सर्व धर्तरि जिखूं

सोब्रत असतां तुझी साजणी जिकिर उन्हाची कुणा!
तुझ्या चिंतनीं कष्ट जुमानित नाहीं माझा कणा!"
—जेवण झालं, झाल्या गोष्टी अंथरिली वाकळ
झुरके बसला घेत शिदू तैं सावलींत शीतळ

पहात होती त्यास सखूही कातरीत पोफळ
पिर्तित त्यांना बाधत नव्हती संसाराची झळ!
मशिंगामुळें पानवेल कुणि झाली म्हणती जुन.
वेलीवरवीं बाधेना त्या वैशाखींचें उन.

बोरी, १४-४-३४

## मुशाफिरा!

चालसी किती जगें किती युगें मुशाफिरा?
एकटेपणा तुझा असह्य हो चराचरा!

सांज दाटली शिरीं
परतलीं घरा भिरीं
सांवळ्या रुखावळींत धूर मात्र कांपरा

स्तब्ध मार्ग तांबडा
वळत जाय वाकडा
मोडक्या पुलाकडून तार जाय बंदरा

काळवंडलीं जळें
चिंचही न सळ्सळे
वाटतें भयाण सर्व ! सलत आंत कातरा

आसपास ना कुणी
भय भरे उगी मनीं
एक रात्र होउं या परस्परांस आसरा

या इथें वडातळीं
पाय टाकुनी जळीं
जागुनी वदूं कितीक काल, गुंफुनी करां

शीणभाग घालवूं
अन् विकल्प मालवूं
प्रीतिची निगूढता निशेंत आणुं या भरा

आपुले झरे मुके
करुं जुळून बोलके
गात गात विस्तरून भेट देउं सागरा

बोरी, १८-४-३४

## प्रसादाची वाट

धाड देवा ऐशा संकटांच्या कोटी
होवो ताटातुटी दांभिकांची

कळतील कोण सोयरे सजन
तुझी प्रेमखूण बाणूनियां

संकटांची सुरी लागतां जिव्हारीं
अमृताची झरी पोटीं झरे

कळे मज जीवीं कोठें तुझा वास
वाटती सायास निर्माल्यें गा

वार घेतां वाटे दिव्य हें शरीर
तुझेंच मंदिर अनंता रे

करितों मी तेथें भावें झाडलोट
प्रसादाची वाट पहातसें

बोरी, ८-५-३४

## हिमालयास

तूं आहेस मदीय मातृनिटिलीं रेषा सुरम्योज्ज्वल
हस्तें श्रीविधिनें सहर्ष लिहिली सौवर्ण मुक्तावळ
केलीं कैक सुखाभिषिक्त शतकें एका जिच्या अक्षरें
झाली काय फिकी जिला वहियलें वास्तव्य विश्वेश्वरें ?

उंचावून न पावल्या तुजकडे ज्वाला स्वयज्ञाचिया !
केवीं ये नच रक्तिमा तव मुखीं, हा रोष गा कासया !
आंचीनें कधिं या स्वयें वितळुनी निस्पंद वाहाशिल !
अंतर्बाह्य तनू समग्र अमुच्या केव्हां भरा येतिल ?

केव्हां पाठविशील विस्मृत भल्या गेल्या दिसांचे ध्वनि
शास्त्रें, मंत्र, कथा पुनश्च सगळें भांडार धुंडाळुनी ?
दातृत्वें अजुनीहि थोर बहु हो मन्मातृभूकारणीं
तूझें वैभव, तेज, ओज सगळें आसेतु विस्तारुनी

दे प्रज्ञेस विशालता, विमलता देहा, द्युती कल्पने
दे सामर्थ्य करां, रसत्व रसने, दे भव्यता भावने
दे शांती हृदया, प्रसन्नमयता पूर्णत्व-आरोहणीं
केव्हां सुंदरता तुझी प्रतिपलीं वर्धिष्णु पाहीन मी !

पाहूं ना शकलों तुला हिमरुपीं देवा नगेंद्रा जरी
समृद्धींत सुखें बघेन अमुच्या सप्रेम केव्हां तरी !

मडगांव, १९-५-३४

## गेलें भिऊनि मनांत

सखे मी गेलें भिउनि मनांत !

कळंजलें मन, स्थिरचर-जीवन गहिऱ्या अंधारांत
निष्ठुर वारा उखडि तणारा वात न ठेवि घरांत
दगडफेंकिपरि सणसणल्या सरि, चमके वीज पुढ्यांत !
घरें पाडिती रातकिड्यांचे भेसुर रव हृद्यांत !
नाथांविण मी होतें एकटि भरल्या संसारांत
दूर देखिला पिंपळ नटला अगणित खद्योतांत
नकळे कोठुनि तोंच दाटला दरवळ निमिषार्धांत !
प्रीतीचा मधुवेल मोगरा फुलला गऽ परसांत !
गेलें धावुनि दारीं पडलें प्रभुच्या करपाशांत !

पणजी, १४-७-३४

## माउलीचा खेळ

गेला मानव बाळ विश्वजनिशीं, तीतें पुसे, "माउली !
आलों केविं, कुठून, कां, मज अशी काया कशी लाभली ?"
संकोचें क्षण हो विमुग्ध जननी मंदस्मिता वत्सला
साऱ्या पूर्वसुखस्मृती मग तिच्या नाचूं मनीं लागल्या

कळे मज जीवीं कोठें तुझा वास
वाटती सायास निर्माल्यें गा

वार घेतां वाटे दिव्य हें शरीर
तुझेंच मंदिर अनंता रे

करितों मी तेथें भावें झाडलोट
प्रसादाची वाट पहातसें

बोरी, ८-५-३४

## हिमालयास

तूं आहेस मदीय मातृनिटिलीं रेषा सुरम्योज्ज्वल
हस्तें श्रीविधिनें सहर्ष लिहिली सौवर्ण मुक्तावळ
केलीं कैक सुखाभिषिक्त शतकें एका जिच्या अक्षरें
झाली काय फिकी जिला वहियलें वास्तव्य विश्वेश्वरें ?

उंचावून न पावल्या तुजकडे ज्वाला स्वयज्ञाचिया ?
केवीं ये नच रक्तिमा तव मुखीं, हा रोष गा कासया ?
आंचीनें कधिं या स्वयें वितळुनी निस्पंद वाहाशिल ?
अंतर्बाह्य तनू समग्र अमुच्या केव्हां भरा येतिल ?

केव्हां पाटविशील विस्मृत भल्या गेल्या दिसांचे ध्वनि
शास्त्रें, मंत्र, कथा पुनश्च सगळें भांडार धुंडाळुनी ?
दातृत्वें अजुनीहि थोर बहु हो मन्मातृभूकारणीं
तूझें वैभव, तेज, ओज सगळें आसेतु विस्तारुनी

दे प्रज्ञेस विशालता, विमलता देहा, द्युती कल्पने
दे सामर्थ्य करां, रसत्व रसने, दे भव्यता भावने
दे शांती हृदया, प्रसन्नमयता पूर्णत्व-आरोहणीं
केव्हां सुंदरता तुझी प्रतिपळीं वर्धिष्णु पाहीन मी !

पाहूं ना शकलों तुला हिमरुपीं देवा नगेंद्रा जरी
समृद्धींत सुखें बघेन अमुच्या सप्रेम केव्हां तरी !

मडगांव, १९-५-३४

## गेलें भिऊनि मनांत

सखे मी गेलें भिउनि मनांत !

कळंजलें मन, स्थिरच्चर-जीवन गहिऱ्या अंधारांत
निष्ठुर वारा उखडि तणारा वात न ठेवि घरांत
दगडफेंकिपरि सणसणल्या सरि, चमके वीज पुढ्यांत !
चरें पाडिती रातकिड्यांचे भेसुर रव हृद्यांत !
नाथांविण मी होतें एकटि भरल्या संसारांत
दूर देखिला पिंपळ नटला अगणित खद्योतांत
नकळे कोठुनि तोंच दाटला दरवळ निमिषार्धांत !
प्रीतीचा मधुवेल मोगरा फुलला गऽ परसांत !
गेलें धावुनि दारीं पडलें प्रभुच्या करपाशांत !

पणजी, १४-७-३४

## माउलीचा खेळ

गेला मानव बाळ विश्वजनिशीं, तीतें पुसे, "माउली !
आलों केविं, कुठून, कां, मज अशी काया कशी लाभली ?"
संकोचें क्षण हो विमुग्ध जननी मंदस्मिता वत्सला
साऱ्या पूर्वसुखस्मृती मग तिच्या नाचूं मनीं लागल्या

त्याचें गुंतविण्यास चित्त सहजीं अन्याकडे तेधवां
ती बाळास वदे, "प्रभातसमयीं या खेळ खेळूं नवा."
तेव्हांपासुनि नित्य पाठशिवणी त्यांची असे चालली
क्रीडामग्न सदैव बाळ-जननी झालीं, युगें लोटलीं

लास्यीं, दिव्य पदें तिचीं क्षण जिथें कालांतरें स्पर्शलीं
तेथें मंगल रम्य विश्वकमलें आलीं, फुलें लागलीं
ईर्ष्येनें किति वेंचिलें सुम तयें तद्दर्शनें हर्षुनी
नी त्या संग्रह वाढतां उमजलें, जाती न तीं संपुनी

तो आनंदसरोवरीं विमल या केलिक्रमीं गुंतला
—प्रश्नाची फिरुनी स्मृती कधिं तरी होईल का त्याजला ?

पणजी, १९-९-३४

## दरवणें

कधिं कधीं वाटतें दूर कुठें तरि जावें
विसरुनी जगाला मालक अपुला व्हावें
नी विश्ववहीचीं गळलींमळलीं पानें
वाचुनी दुखावें विषण्ण आनंदानें

होउनी असें मी पायांमागुनि गेलों
बहु उजाड माळावरी पोंचतां दमलों
मीं सभोंवार जों श्रांत फिरविली दृष्टी
मज दिसली तेथें थकली सुकली सृष्टी

फुरशासम मधुनी एकच पाउलवाट
वळकांडीं घेउनि होती दूरच जात !
जिवजिवार तेथें मुळीं फिरकलीं नाहीं
भीतिनें न घेती अंगहि झाडें कांहीं

या अशा अभागी उदासवाण्या जागीं
कुणि एक दरवणें बसलें शांत विरागी
तें कल्प किती तरि थिजुनि भाजलें भिजलें
काळाचे त्यावर कितिक कुंचले फिरले

किति सिणल्या पांथें त्यावर अपुलीं ओझीं
ठेवुनी कळिवरें केलीं क्षणभर ताजीं
परि मला न त्याचें कोणी कथिलें नांव
या जगीं अशांना असेल केवीं भाव !

त्यावरतां नव्हती संख्या सत्कृत्यांची
ती होती भाषा दगडांच्या हृदयाची !
मीं कैक दिसांचें हृदयावरचें ओझें
ठेवुनि मन केलें उघडें, हलकें माझें

आंसवें तसतर ढाळियलीं त्यावरती
वदलों त्या, "हो मज ध्येयपथीं सांगातीं."
मज माणुसकीची दिली तयें जाणीव
नी प्रथमच आली माझी मजला कींव !

पणजी, १३-१२-३४

## यापुढें

यापुढें संपली नीज
ती काळरात अंधारी यापुढें
पूर्वेस अरुण रक्ताचा
द्युतिवृष्टि दिव्य संसारीं यापुढें
स्फूर्तिचे नाचरे वारे
सुटतील दिशांतुनि चारी यापुढें
मोकळे, द्विजांचे गळे, नभोमंडळें
व्यापितिल सारीं
स्वरकंप भरेल शरीरीं यापुढें

जागेल अंतरीं देव
त्यागुनी शिळांच्या राशी यापुढें
वेढितील नच धर्माला
तट, भिंती आणिक वेशी यापुढें
क्रांति मिरवित नेइल झेंडे
सन्मानें देशोदेशीं यापुढें
रोकडे, होउनी खडे, सुधेचे घडे
देउं दुबळ्यांसी
विष खावुनि ग्रासोग्रासीं यापुढें

लाभेल जयाचें त्याला
भरपूर विनातक्रार यापुढें
साहील न अवमानाचा
कोणीही कसला वार यापुढें
शिर उन्नत करुनी जगणें
होईल हाच आचार यापुढें
होईल प्रीति हा योग, त्याग हा भोग
सत्य आधार
स्वातंत्र्य हाच शृंगार यापुढें

हातांत जगाच्या हात
घालुनीच आम्ही चालूं यापुढें
पत-इभ्रत त्याची अमुची
अध्यात्मबळें सांभाळूं यापुढें
जडतेला पंख फुटावे
कळवळुनी म्हणुनी बोलूं यापुढें
अंतरीं, लावितां सुरी, झरे जी सरी
तिचें जल गाळूं
ती आग आजची जाळूं यापुढें

म्हापसें, १९३४

## रे, फुलेंच जड गमती हृद्या

किति नवल तुला सांगूं सखया ?
रे, फुलेंच जड गमती हृदया !

अमर कवींच्या उज्ज्वल वचनीं
भावार्थांचीं माझ्या लेणीं
दिसतां मन हर्षे श्रीमंतुनि
परि सुखीं दुखावे या समया

विक्रमवंत चरित्रें वाचुनि
स्वाभिमान ये मनीं उसळुनी
लावुनि टांचणि तोंच आंत कुणि
मज म्हणे, "गत तुझ्या पहा वया."

फलद्रूप पाहुनी स्वसत्कृति
हृदयाचे जों डोळे निवती
तों काळाची विराट मूर्ती
मुख वासुनि घाली घोर भया

अन्य देशिंचीं विभवविलसितें
पाहुनि परिसुनि मानस रमतें
तोंच उणें सलुनी तें पुसतें,
"अदृष्ट कधीं येइल उदया ?"

आणि कधिं कधीं ध्येयासाठीं
लढतां लढतां जिवलग तुटती
सुखा येइ वैराग्यें दीप्ती
तरि नित्य ज्योत जाळीं हृदया

क्वचितचि असले येति अमर क्षण
सालंकृत करिती हें जीवन
समाधान वाटे आलोकुन
ज्योतीच्या पोटीं घन छाया

पणजी, १९३४

## तेजोदेवतेस

चपल तुझे चरण जरा या घरीं स्थिरावे
आणि दिव्य किरण तुझे अंतरीं शिरावे

कुठुनि कुठें सांग जाशि
उज्ज्वल आनंदराशि
आळवीत गौरवीत दीपराग भावें ?

श्रीहरिचें नाभिकमल
ब्रह्म्याचें प्रज्ञास्थल
तृतिय रुद्रनयन तूंच फुलविलें प्रभावें

शककर्त्या शुभवचनीं
प्रमदांच्या रतिनयनीं
सज्जनमनवृंदावनिं किति तुला भजावें ?

समरधुरंधर-खड्गीं
न्यायकंटक-शृंगीं
गौरी ! ज्वालाविलास दाविसी स्वभावें

तव चंचल मृदु चरणीं
सांकुर कुसुमित धरणी
बघुनि मुदित स्थिरचर का मीं उगी रहावें ?

मम जीवनघुंगुर-सर
बांधिन तव पदिं सत्वर
क्षणभरि तरि तव भ्रमणीं त्या निनादवावें

पणजी, १-१-३५

## संधिकाल

परसांतिल आंबा बघ आला फळभारें रंगा
चपळ चानिया धावत तुरतुर झटती सर्वांगा
वासंतिक धुंदी घोटाळे अजुनी पानांत
कोकिल-कूजित मंजुळ घुमतें अजुनी कानांत

आठवणींच्या चित्रांचा शिरिं हिरवा संभार
मावळता रवि उधळी त्यावर कांचन-भांडार
आणिक खालीं गाढ पसरली छायांची जाळी
येइं श्यामले, बसूं घडीभर बोलत या काळीं

एकांतांतिल गोड करूं या ही रक्तिम घटका
माधुर्याचा भार फळांचा अधरें करुं हलका
याच फळांपरि रसाळ मोहक माझेही शब्द
ओठांनीं तूं कां नच करिसी मग त्यांचा भेद ?

चपळ पिसोळीं चतुर चोरटीं भुरभुरती जवळी
सावध ! सजणी, नेतिल अमुचीं कानगुजें सगळीं
चावट ! उष्टी शीर मुखीं मम घालुनियां अर्धी
दीस गिमाचे असुनि गडे कां करिसी तूं गर्दी ?

मडगांव, २१-४-३५

## हिरकणी

दिली मला हिरकणी  तुवां एकातांच्या पारीं
चोरी मला ठेवायाची  परी जगाच्या बाजारीं

अंधारल्या आसमंतीं  कुढला जो जीव माझा
तिच्या तेजा देखुनीयां  निमिषार्धें झाला ताजा

दोन गुंज नाहीं सोनें  चंद्रमौळीं झोपडींत
विश्वमोलाचें हें रत्न  जडवाया कोंदणांत

तुझी दौलतही थोर  सुरक्षित ठेवायाला
स्थळ उरावीण माझ्या  नाहीं आलें गे वांट्याला

नाहीं तुला, नाहीं मला  जीव कावरेबावरे
नशिबाची, जीविताची  दोरी गडे थरथरे

तुझ्या माझ्या डोळां आतां  येई दाटूनियां रडें
सोसवेना तिची माया  पोटीं तुटतें आंतडें

हिरकणी देउनीयां  तूं या लोकीं नागवली
घेउनीयां माझी वेळा  मींच जवळ आणिली

बोरी, २४-८-३५

## हुषार भाई

हुषार भाई, हुषार भाई!
हांकेवर ये भाग्य आमुचें
लवाजम्यानें वाजतगाजत:
पुरुषार्थाचीं शस्त्रें-वस्त्रें

चढवुनि व्हा रे सज्ज शिपाई
क्रांतीचा जयघोष करा रे
आणि पुकारा संगर-यात्रा !
हे अंड्यांतिल महाकवींनो !
कवचामध्यें खुपसुनि माना
कुशीउशीचा घेत उबारा
शतकें किति पहुडाल किड्यांपरि ?
उत्प्लवनें पहिल्याच गड्यांनो
स्वर-पंखांच्या संचाराला
उणीं करा रे भुवनेंगगनें;
शिंगें कर्णे झांज नगारे
रणवाद्यें या फुंकित, बडवित
भैरव तांडव करा देशभर
हर हर हर सावेश गर्जुनी
रुद्र करा भारतभर जागा !
विशाल तुमचीं सोज्ज्वल हृदयें :
धाडधाड लागोत जळाया.
त्या ज्वालांच्या तालावरतीं
कंठ फुटे तों गा रे गाणीं !
ज्या गाण्यांच्या स्पर्शासरसें
मेल्या रक्ता उकळ्या फुटतिल
तिसरा डोळा होउनि उघडा
अज्ञाता लागेल गिळाया,
बुद्धीच्या तुटतील शृंखला
खुल्या मनाच्या होतिल खाणी
गुप्त सकलही भुजा प्रगटतिल
भास्कर-तेजाशीं झुंजाया !
अस्थिपंजरीं प्राण न मावुन
बघेल त्रिभुवन व्यापायाला !
यास्तव संजीवक प्रतिभेचा
अखंड मंगल सेक करुनियां

करा भीमबळि सगळी सेना !
नव्या युगाचे सैनिक या हो
घरांत मुडदे कुसती त्यांचें
दहन-दफन उरकुनि घ्या आधीं !
पितरांच्या प्रेतांस कवळुनी
निष्क्रिय जे मुळमुळत बैसले
हाणा त्यांच्या कंबरिं लाथा
नी आणा त्यां शुद्धीवरतीं !
जुन्या काळच्या इमारती ज्या
आज जिवाला धोका झाल्या
त्या हाणुनियां पाडा सत्वर
प्रकाश-वारा आंत शिरूं द्या
ज्याला तुमचे पूर्वज भ्याले;
काळाच्या टिचकीला टिकले
जे जे सुदृढ चिरे तयांचे
तुंग उभारूं स्तंभ मनोरे !
आज असा विध्वंस मांडुनी
उद्यां करूं मांडावळ नूतन
चार भिंतिंच्या कुंपणांत जें
सरड्यासरसें प्रेम आपुलें
रंग पालटित नाचत उरलें
मुक्त करा रे सत्वर त्याला
उल्हासें आसेतुहिमाचल
गुढी घेउनी नाचायाला !
सगळी सृष्टी, हिंदसमष्टी
एकच अथवा जिवलग व्यष्टी
जीवेंभावें कुणावरी तरि
प्रीतीची अतिवृष्टि करा रे !
प्रेमाचें साकार सानुलें
रूप जरी रे मनुजदेहधर
तिलांजली द्या सर्वस्वावर

आणि दृष्टिचें तेज वाढवा
विराट तेजें प्रगटुनि दाविल
विश्वरूपदर्शनें तुम्हांला !

वोरी, १०-१०-३५

## कवण तूं

कवण तूं सुरतरसाची गंगा
भुलवुनी मारिसि हृदय-अनंगा
हासुनी उधळिसी अष्टदिशां रसरंगा

कोवळे सघन मनांचे मळे
कवींचे अर्धोन्मीलित गळे
फिरवुनी दृष्ट तूं करिसि खुले मोकळे

कुणा दे पुरुषार्थांची आशा
कुणाला पार्थिव नव अभिलाषा
आणखी कुणाला भव्योदात्त निराशा

पावसी भावापरि भक्ताला
प्रकाशें रेखिसि अदृष्टाला
ही तेजस्विनि ! तव सुंदरतेची लीला

अभिनयीं मूक मनांचीं गाणीं
हिमांकित वासंतिक नटराणी
वाणींत झुळझुळे मधुर झऱ्याचें पाणी

मूस कीं मूर्तचि पंचकलांची
कूस वा सकलहि ग्रहताऱ्यांची
तूं सतनु चिन्मया प्राणवायुची वीची

वीजशी आलिस कोठुनि गेहीं
रोषनी केलिस स्पर्शें देहीं
फुलविली माझिया सुखासुखीं नवलाई

बोरी, २८-१०-३५

## —स

शरदृतूचें ऊन सांडलें होतें मन-रानीं
फूलपांखरापरि तूं आलिस रंगाची राणी
स्तिमितपणांतचि विरलीं माझीं उच्छृंखल गाणीं
नकळत नयनीं आलें व्याकुळ कसलेंसें पाणी

आणि वाटलें जिवा, पांखरा! उडतच्च बिलगावें
सलगीनें तव सार्थक सगळ्या वृत्तींचें व्हावें
तुझ्या दर्शनें प्रथमच्च गमलें मी आहें दुःखी
जिवलग जग हें सदैव पुढतीं होइल आशंकी

असुख असें हें गोड निर्मिलें अंतर्मुख केलें
वज्र मनींचें संस्कारांनीं दुखवुनि उजळविलें
असह्य झालें तेज तयाचें या दुबळ्या जीवा
जरी तयानें वैभव चढलें विस्मृत मम नांवा

अदृढ असल्या सुखद क्षणाला आलिस तूं अद्ये
न मागितां तूं मागितलें जें मींही देउं नये
आज राहिला एकच्च जरि मज गहिरा अंधार
सतेज त्याचीं स्वप्नें मजला होती आधार

पणजी, ६-११-३५

## उरलें घरटें दूर !

पंखांवरतीं रंग झेलुनी गळ्यांत स्वर कोवळे
हिरवें जग भवतींचें केलें उडतां उडतां निळें

इवल्या पंखां अंतराळ तें आलें ना आवळूं
जीव भुकेला देहासंगें हळू लागला गळूं

तों सोन्याच्या उन्हीं देखिले सजीव कण सानुले
झुकली चुकली झेप, गुंतलीं जाळीं या पाउलें

जाल न तें तव हास्य चंचले, कण ते दशनांकुर
हाल मांडिले माझे जरि तूं गमती मज सुंदर

अंतराल हरपलें आणखी इथें गवसलों असा
उरलें घरटें दूर, जाहलों इकडे वेडापिसा

संध अशी साधुनी साजणी पंख नको कातरूं
निळें-पाचवें रहस्यमय जग नको स्वामिनी हरूं

तुझ्या मनगटावरी खेळणें मला नको का गडे ?
विक्रमविरहित विलास तरि तुज काल किती आवडे ?

पणजी, १६-११-३५

## विशाल भारत

विराट तरुवर नटवर शंकर हे अजरामर महाकवे !
युगांयुगांचे नाचव पानीं अनंत सुंदर रंग नवे

कालोदरिंचीं खात आंतडीं पसरीं पाळें पाताळीं
तद्वत विष्र करिं अमृत संतत हात विस्तरीं आभाळीं

व्यासदृष्टिनें ग्रास करीं क्षणिं सगळ्या भुवनां-गगनांचा
सकल पटांचा न्यास करुनि घे ठाव निरंजन रूपाचा

अवतारांची सकल मालिका विविधपणा जेथें विसरे
आणि मुक्तता प्रतिपळिं जेथें सुंदरतर रूपें विचरे

तेज तिथें हो स्निग्ध मधुरतर, लय पावुनियां पीत रहा
रोमांचांचे अंकुर अंकीं सहजचि फुटतिल लाख दहा

पानोपानीं भविष्यकलिका फुलतिल तव मृदु स्मितासवें
गंधें त्यांच्या सहज जवळतिल गंधर्वांचे सकळ थवे

योगबळें तव होतिल सुमनें ज्या काळीं परिपक्व फळें
रूप-रंग-रस-परिमळ-निर्झर खळखळतिल आनंदजळें

अमरां पितरां यक्षकिन्नरां मधुदानें संतुष्ट करीं
तन्मुख-चुंबित बीजें झडतिल, पुनश्च उठतिल तुझ्यापरी

रात्रभरी मज अशी जागवी अखंड ही तव सळसळ गा
स्कंधीं ग्रहगण तुझ्या काजवे दिसति न ते जरि आज जगा

पणजी, ७-१२-३५

## लोकसागरा

लोकसागरा ! स्थिरपद कां तूं ?
स्थितिलोलुपता पाहुनियां तव
उरीं गुदमरे माझें गाणें.
असतां पोटीं खर वडवानल
मुखीं कांति कां निश्चल व्याकुल ?

विपन्नतेंतिल शालिन्याला
लाचारपणा जडतो हेतू
जळे खळबळे जें तव पोटीं
त्याचे कढ किति कोंडुनि धरशिल ?
सजीवतेची तुझिया द्वाही
फिरवी दिक्कालाच्या वरुनी
प्रळयगर्जितें हालव वसुधा
चाळव तिच्चिया व्यापारांना
स्वाधिष्ठित हो ! मारुनि फुंकर
आकाशींच्या मालव टिकल्या
टक लावुनियां त्यांना न कधीं
भाग्य तुझें रे उजळायाचें !
संतापाच्या तुझिया लाटा
फुटूं देत रे दिशादिशांतुनि
देशदेशिंच्या मरुद्गणांना
तव यश लल्कारित जाऊं दे !
भरेल धडकी मेघापोटीं
सौदामिनि होईल हिंपुटी
मदोन्मत्त इंद्राचें तख्तहि
कोलमंडुनी पडेल खालीं !
अथांग अपरंपार मनाचा
क्षोभ कसा किति विराट सुंदर
एक वेळ जगता पाहूं दे
आणि फिरूं दे साफ बाहुली !
तव पृष्ठावर मिरवत फिरती
किती जहाजें, किती विमानें
खुशालचेंडूंच्या या सोयी
फिरवी त्यांवरुनी वरवंटा
दुबळे त्यांतिल जीव, तयांस्तव
फुरसत कोणा रडावयाला ?
युद्ध जगाशीं, युद्ध स्वताशीं

युद्ध पांचही महाभुतांशीं
चालव विश्वासानें अविरत !
प्रळयाच्या तालावर गावें
तुफान लाटांनीं नाचावें
फिके अचानक पडतिल सारे
रंग नभींचे फसवे नटवे !
भूताच्या शिरिं नाचत मीही
अनिर्बंध तुजसवेंच गाइन
दुर्मिळ हा तव ताल लाभतां
अमरकाव्य मुडदेही गातिल !
आज घडीला, तुझ्या तडीला
राज्य पसरलें बघ शंखांचें
फुंकुनि त्यांचीं पोकळ डोकीं
दांभिक, भोळे, दुबळे प्राणी
शंखनाद करुनियां तयाला
म्हणती तव घनघोर गर्जना !
तुझी हेलना करुनी चाले
तुझ्या जिवावर जी ही चंगळ
मुकाट बघशिल किती कोठवर
क्षुब्ध, क्रुद्ध हो महासागरा !
पटव जगाला तुझ्या मनाच्या
न्यायबुद्धिची साक्ष एकदां !
पोटीं जीं तव अगणित रत्नें
वर येऊं दे चमकत त्यांना
उजळवुनी युग विसावतांना
गातिल तीं तव तेजोगीतें !

१९३५

## सागरा

सागरा ! हिरा मम नेला कोणत्या ठिकाणीं ?
निळया ओळिपैलीकडचें भाग्य दाखवोनी

अजुनि दुखी सरली नाहीं प्रीतिच्या मिठीची
मूर्ति प्रेमलाची उमदी ना हले दिठींची
दीसरात अंतर कोरी तीव्रता शिटीची
भिजत वाळुसम का जावें मीं असें झुरोनी ?

पाचव्या-निळ्या तव फुटती कातळांत लाटा
धाव घेइ वाटे कांठा प्रीतिचाच वांटा
आणि क्षणीं दुसऱ्या येई भीतिचा किंवाटा
काय जीवनीं आणिसि या आंसवें भरोनी ?

ओढतात रांपण कोळी गात काळरातीं
उजळ मासळी तडफडते, माड गाजताती
जाळ लाल भडके मधुनी, साउल्या सभोंतीं
निष्ठुरा ! प्रतिक्षणि टाकिसि हृदय कां चिरोनी ?

काजळून अधिकचि जाई क्रूस व्योममार्गी
अकस्मात दचकुनि भुंके श्वान आडमार्गी !
दुष्ट अंतरींचीं स्वप्नें मारितात नांगी !
जितेपणीं जावें का मीं जळुनियां मरोनी ?

१९३५

## क्षणभंगुर जरि जीवन

क्षणभंगुर जरि जीवन सखे सुखसुंदर करुं आपण
सखे गऽ शाश्वत करुं आपण

मृदु मादक मुखचुंबनें
दृढ निर्दय आलिंगनें
जन म्हणो चिखल, शुभमंगल कमलें उमलवुं या त्यांतुन

जन अंजन नयनीं भरो
तम गगनभरी विस्तरो
शुभ बकुलफुलीं तेथल्या सजवुं या सुखशय्या आपण
मृदु स्वप्नांची लोंकर
करि भुरुभुरु वाऱ्यावर
धर, दुशाल जरिची विणूं हिमांतरिं वसंतसुखसाधन

करुं गोड कुशींतच निशा
उतरवूं जगाच्या विषा
चल मुलांफुलांमधिं उषा फुलवुनी विकासवूं जीवन
सखे गऽ प्रकाशवूं जीवन

बोरी, १-१-३६

## निरोप

प्रीति तुझी राहिल स्मरणीं
जन्मजन्म मज जाळित उजळिल दिव्य ज्योति जी तव नयनीं
अश्रुजलें तव जाइल वितळुनि किल्मिष आमिष जें स्वमनीं

दाहक मोहक निःश्वासांचीं दिधलिंस सुमनें सुरतरुणी
तेणें आला देवपणा मज पार्थिवता सगळी गळुनी

तव दुःखांच्या शिणगारांनीं नटलें तनमन दिनरजनीं
प्रकाशभाषा एक उरे त्या रतण्या तव अद्वयभजनीं

साक्षात्कारचि तुझ्या प्रीतिचा होय गमे मज प्रतिकिरणीं
सत्य करुनि सौंदर्यसाज जणुं ज्वलित स्मितें उधळी भुवनीं

त्यागचि माझा भोग देवते ! घाव न कधिं आणिन मरुनी
आजीवन वाहवुनी शोणित मांगल्यें न्हाणिन अवनी

म्हापसें, २३-२-३६

## माझ्या गीतांस

निळावतीच्या दीपकळ्यांनो आलां माझ्या घरीं
नाचुनि गाउनि रंगविली ही मम अंगण ओसरी

मुशाफरीला चला जिवांनो विसरा आतां मला
चिंवचिंव ऐकुनि चिमण्यांची ये दाटुनि माझा गळा

दाणे टिपतां त्यांना बघुनी ओठीं आणिन हसूं
आणि आठवुनि तुमच्या लीला पिउनी घेइन असूं

मुंबई, १०-३-३६

## फसवणूक

प्रेम तिचें जरि होतें मजवर, मी माझा नव्हतों
वाटत होतें तिला परी मी आनंदें जगतों

मलाहि होती जरी हवी ती, घडि होती टळली
प्रीती होती परस्परांना उशिरां बहु कळली !

हासत खेळत बोलत होतों आम्ही दिवसभरी
खडकांवरतीं जणूं फुटाव्या काजळि जळलहरी

सावरुनी मज तारेवरतीं दिवसा वावरतों
रात्र पसरतां न कळे का मी उगीच तळमळतों !

सुखी जगाला भासवुनी किति जीव जगीं जगती
फसवणूक ही पसरुनि भवतीं उरांत तगमगती !

मुंबई, ११-३-३६

## कविवर भास्करास

कविवर भास्कर गावा
आळवोनि नव रागरागिणी रंग दिशांत भरावा

अमृतोपम मन कनकमनोरम
सकल कलांचें तीर्थचि संगम
जेथुनि जीवन स्थावरजंगम
पावे उदय विसावा

स्पर्शें ज्याच्या तृणांत मोतीं
धुळींत ये सोन्याला भरती
पिकांस मनिंच्या न मुळीं गणती
मत्त वसंतहि भावा

घट घरिंचे जन घ्या घ्या भरुनी
उदंड घ्या आकंठचि पिउनी
पोरां थोरां द्या हो वांटुनि
उजळा नांवा गांवा

पिउनि खगांनो नादि बनावें
सलें जगाचीं विसरुनि जावें
जीवेंभावें गात उडावें
जयजयकार करावा

१९-३-३६

## प्रमादाचा पिंगा

अगडबंब बंबं भयाण नाद। भयाण नाद
पिसाट नंगा नाचे प्रमाद

दीर्घ किंकाळीनें घेइ काळजाचा घास
खाऱ्या घामाचा हो त्याच्या त्रिलोकाला वास

तोंडांतून ज्वाला त्याच्या येती नऊ लाख
सर्वांगाला जिवांचिया संसाराची राख

नाचतांना गरगरां फिरवितो डोळे
उकळतें वाटे तेथें काळकूट काळें

तेंच पसरुनी वाटे आकाशपाताळ
कोळपून काजळून गेलें तिन्ही काळ

जटा त्याच्या आपटती मोडती कीं माड
सागराचा घोष किंवा भयनाक गाढ

कर्णीं त्याच्या घोंघावती वाळे आणि माशा
काळा देह वाटे जणूं मृत्यूचा तमाशा

दांत विचकवी, चावी, फेंदारितो नाक
अंगुलीनें फिरवितो लोखंडाचें चाक

अर्भकांच्या आंतड्यांच्या गळां त्याच्या माळा
लाज झांकावया मोहरांचा सोनसळा

चूड हातीं जाळावया आघवें ब्रह्मांड
तेलथाळी दुज्यांत वा मुके हें कुभांड

कांहीं करीं दुर्बळांच्या नशिबांचे टाळ
क्षणीं रडे क्षणीं हासे अक्राळविक्राळ

पोट बडवीत म्हणे, "नरमांस आणा
नाहीं तरी प्रळय मी करीन हें जाणा!"

राजे घेउनियां आले कळसे रक्ताचे
बावा घेउनियां उभे ग्रासही मेंदूचे

वनेंउपवनें आतां लागलीं पेटाया
आसनें नी सिंहासनें लागलीं मोडाया

नैवेद्याची आतां पुढें उरली ना सोय
क्रुद्ध प्रमाद हा नाचे भुका थय्थय्

आपुलेंच खाई आतां तोडोनिया मांस
रक्तबिंदूंतून येती दानवांचे वंश

राजा! त्यांना खावयाला देशील रे काय?
उमराव-अमीरांची व्यर्थ आतां धाय!

तुझ्या त्याच्या संहरणा राजा! स्वयमेव
गण घेउनियां आले शंभु महादेव

कळंगूट, ११-४-३८

## माझ्या हिऱ्यास

'रे हिऱ्या माझिया झळक घरीं !
रे झळक शिरीं ! तूं झळक उरीं !'

हास गड्या चल उधळ प्रकाशा
चलाचलीं हिरवळोत आशा
फुलोत शीघ्र मुक्यांच्या भाषा
रंगुनी गंधुनी भुवनभरी

मानवतेच्या नयनीं, अधरीं
करीं, शिरीं, उरिं, उदरीं, जठरीं
हसत झुळझुळो अष्टौप्रहरीं
रे, तव तेजाची विमल झरी

हलाहलांतुनि निघेल अमृत
जागृत होइल जीवन विस्मृत
श्रेय अगोचर होइल आवृत
पसरुनी चराचरभर लहरी

करूं घरोघर अशी दिवाळी
दिव्य जोंवरी अपुल्या भाळीं
हरूं जगाची सकळ काजळी
स्मित हरिचें जोंवर या शरिरीं

कळंगूट, १७-४-३६

## माझे अश्रू !

नभीं मेघ काळा काळा   कुणासाठीं अश्रू ढाळी
आणि काजळी तयाची   तयांसवें कोण गाळी ?

कोण त्वरें करी त्याला   ज्योतिर्मय निरंजन
अश्रूंतून कोण त्याच्या   ओपी वनांत जीवन ?

कुणासाठीं शिंपल्याचें   कातरतें अंतरंग
कोण तयासवें भरी   मनीं त्याच्या सांध्यरंग ?

कोण वेदनांचीं त्याच्या   करी दिव्य मुक्ताफळें
जगीं कौतुक तयांचें   कोण करवी आगळें ?

कुणासाठीं कोळशाला   भूमिगर्भी जळजळ
केविं लाभतें तयाला   तेज स्वर्गींचें सोज्ज्वळ ?

घणासवें येती केवीं   लोळ द्युतीचे त्यांतून
कोठें दुःख अमोल जें   करी जडा सचेतन ?

कुणासाठीं नेत्र माझे   येती जळून भरून
सुखासुखीं जीव माझा   कुणासाठीं उदासीन ?

माझ्या मात्र आसवांचें   व्हावें काय क्षार पाणी
दाहें त्यांच्या काजळावें   जग काय करपोनी ?

कळंगूट, १७-४-३६

## बाळ जन्मा आलें

बाळ जन्मा आलें, आज आनंदाचा दीस—घरीं
रडूनियां हसविलें लहानथोरांस—बाई

बाळ जन्मा आलें, फळे कुळींची पुण्याई—दोन्ही
गोठियांत दुभतात हर्षभरें गायी—बाई

बाळ जन्मा आलें, गेले माउलिचे शीण—सारे
मुखीं तिच्या मंद शांत लावण्य नवीन—बाई

बाळ जन्मा आलें, आज आले उदरास—हरी
देखुनियां विसरली वेदनासायास—बाई

बाळ जन्मा आलें, गूढ पिताजिला ओढ—उरीं
तुला मला साखरेची मूठ गोड गोड—बाई

बाळ जन्मा आलें, आजी-आजोबांच्या डोळां—पाणी
देखुनियां बाळझरा सुखाचा कोवळा—बाई

बाळ जन्मा आलें, आज दिवाळी दसरा—घरीं
सोनियाच्या निरांजनीं दीपक हासरा—बाई

१७-८-३६

## आपण दोघें लहरी ग

गोड लबाडी झाली उघडी पहा पहा परतीरीं ग
निळ्या महालीं स्वर्णमंचकीं विडा रंगला जहरी ग

लुले जोंवरी झाले भाले
पंखहि नच जों वळले, गळले
दाहि दिशा जों रंगचि सगळे
आकाशभरी जुळी भर्जरी झर्कन् खेळुं भरारी ग

सगंध हिरवी कुजबुज रानीं
सकंप जवळी व्याकुळ पाणी
निळीं-जांभळीं गाई गाणीं
करूं बोलकी याच घडीला तनुंतिल वीज रुपेरी ग

शीतळ झुळुका झाल्या चंचळ
थरथरतो बघ तुझाहि अंचळ
सुकल्या कांठा भिजवी बघ जळ
माझ्या ओठां आणिशील कधिं कोमल ओल तरारी ग

आलें जग जरि मागुनि सजणी
आपण उतरूं सागरभुवनीं
देहवेलि वर देऊं फेकुनि
सागरपोटीं अमुच्यासाठीं नवरत्नांची नगरी ग

कशास तनुचें अपणां बंधन
स्वैर विलासीं उगीच अडचण
मिसळत भटकूं अक्षय आपण
आज इथें तरि, उद्यां कुठें तरि आपण दोघें लहरी ग

१९३७

## तूं

तूं वासंत उषा प्रभातसमयीं माता मला मंगला
सर्वांगावरतीं स्मितांतुनि तुझ्या सांडे प्रभाकांचन
आशेचें हिरवें कुळागर मला माझें गमे जीवन
तृप्तीचा नयनांतुनी तव झरा येतां निळा कोवळा

तूं संध्यासमयीं जिवास भगिनी येतां श्रमांतीं घरा
कौलारावरच्या धुरापरि तुझी दृष्टी मला तोषद
ती घंटारवशी क्षणीं श्रम हरी वाणी तुझी सद्गद
संध्यारंगतरंगसे स्वर तुझे शृंगारिती अंतरा

वेळीं कातर गे तिच्यापरि सखे घालूनियां फुंकर
तूं देतां न कळूं हळू हरविशी माझ्या मनींचीं सलें
तूंतें का निशिगंधमत्त हळव्या स्वच्छंद मंदानिलें
छाया आणि सुधारसें घडविली ऐशी रमा सुंदर ?

येतां गाढ निशा, निशाच गमसी कांता भविष्याकृती
तूं मन्मानसशी अगाध शुचिता अज्ञेय ज्योतिष्मती

बोरी, १९३७

## दूधसागरास

हास खदखदून असा हास दूधसागरा
लासल्या गिरीदरींत फेंक फेंस पांढरा

हास्यीं तव वेदघोष
सृजनाचा दिव्य तोष
जीवनकल्लोळहर्ष वर्षवीं शुभंकरा

हास्यध्वनि तव उठोत
कंठ प्रस्तरां फुटोत
हिरवळो नटो फुलांत माउली वसुंधरा

श्रीहरिवरदानहास्य
चित्कलाविलासलास्य
श्रेय हें मुलां फुलां तुला मला कलाधरा

शिरिं पडोत दैवदंड
आपण हासूं उदंड
ग्रीष्म असो जगत हसो ओसरोहि आसरा

या जगांत हास्य उणें
हास्याविण दीन जिणें
हास्यशून्य जीवनास यौवनीं जडे जरा

विष द्याया हसति कुणी
पचवाया हसति कुणी
हास्य अकारण तारक रे तुझेंच सुंदरा

प्रभुहि अकारण हसला
नी त्रिलोक रसरसला
विश्व तदिय हास्याचा मोकळा निळा झरा

हसती जे द्वंद्वमुक्त
तेच भक्त, ते विरक्त
ते सभाग्य पुण्यशील जिवविती चराचरा

हसतचि जे जगति मरति
दीपराग जागवीति
कविमुनिशास्त्रज्ञ मनीं घुमवुनी नवी गिरा

हास्य इथें जोंवरि तव
मिळवूं नव विजय, विभव
स्वस्तिवचन सफल करूं भूषवूं महेश्वरा

१९३७

## पाण्याला ओढ लागली थोर

नाजुक वर चवथीची कोर
पाण्याला ओढ लागली थोर

अनुक्रम ............ पि. ............
क्रमांक ............ नों: दि: ............

पानापानांत आंबेवनीं
निळ्या जळाचिया अंगणीं
पाउलें सांजसाजणी
पुसट तव लाविति वेध कठोर

पान्यावाणी कायसें जळीं
तुझ्या बोटांतली मासळी
धरुं बघतां पळली तळीं
तुझ्यासम तीही चंचल पोर

कोकिळा गेलिस देउन सूर
फळफुलां रसगंधांचा पूर
मला परि मंद निळी हुरहूर
धुरापरि जरि आशांस फुलोर

हासली पसय कुळागर-कोनीं
केळिवर सोनफुलें पाहोनी
गंधगुजगीत तिचें ऐकोनी
गुणगुणे निर्झर रानकिशोर

दशदिशा चुंबन दिनरजनीचें
वाढवी स्पंदन मिथुन जनांचें
करी मन घरटें लावण्याचें
जलदसें जरि तें काळेंभोर

बोरी, १९३७

## मृगया

रे, घोर तुझी तरुणा मृगया
किति माखशील रुधिरें विजया

खरखरणारें दारुण हें उन
त्यांत करपलें आधिंच हें वन
गेलें सगळें जीवन आटुन
निमुळत्या गिरींच्या मात्र सुया

आत्मसुगंधें मत्त होउनी
मृगनयना या गेल्या हुरळुनि
धावुनि धावुनि गेल्या थकुनी
त्या तृषितांची तुज कशि न दया ?

दैव अदय निर्मितो मृगजळें
हेर होउनी तुझा कौशलें
तीव्र भयंकर तोंच शरबलें
विंधुनि त्यां, लाजविशी प्रणया

केली परि तव पारध त्यांनीं
मात्र ये न हें तुझिया ध्यानीं
पहा जरा रे मागें वळुनी
हें अपेश आलें तुझ्या जया !

मुकलें अंतीं तुझें तुला घर
रानच भवतीं घोर भयंकर
गोड, कुटिल परि हें स्मरसंगर
रे, अनय इथें खाई अनया

१९३७

## ये पुढल्या दारानें

ये पुढल्या दारानें, ये रे हरि, ये पुढल्या दारानें
धीट जाहलें, मूर्ख मतलबी जगताच्या मारानें
राखाया मुखदक्षण त्याचें टाकियलें नवऱ्यानें

देह आणि मन सख्या उजळलें रात्रंदिन अपमानें
जगास कथुं दे मला तुझी मी निर्भय कंठरवानें

दयिता तव जरि जगभर श्रीहरि करिं तव मज अधरानें
ये ये हासत सुरतवसंता ! फुलव तनूचीं रानें

आनंदीआनंद करूं मग चिन्मय रसभारानें
खुशाल जग मग म्हणो मला कीं विटाळिली जारानें

१९३७

## राजा-राणी

मी दुःखाचा राणा आणिक तूं ग सुखाची राणी
ललाटिंचे परि लेख हिंडती अपुले भिन्न ठिकाणीं

दो चरणांपरि आलों गाया एकच जीवनगीती
कविमन चंचल त्यास न रुचली अपुली लौकिक प्रीती

खेद न करिं सखि जाऊं आपण विहरत हसत तळाला
ध्वन्यर्थांचीं तेजोवलयें शोधुनि आणायाला

जुळुनि कधीं तरि नटवूं आपण त्याची अमरा वाणी
मरणासम मी अद्भुत सखि तूं चिन्मय जीवनखाणी

उधळ दिवसभर स्मितें तुझीं जणुं उन्हेंच सांजसकाळीं
त्यांत खुलाया हिरवीं स्वप्नें मी मम पसरिन खालीं

देइन अरुणा हेमांगिनि तव हृदयींचा नजराणा
संध्यासमयीं मन्मनकुंकुम लावीं दिग्ललनांना

निशेसवें मी पसरिन नभभर माझी गहन निराशा
गाळ आंसवें तूंहि तियेवर तोडुनि पार्थिव पाशा

उडुगणमंडित गगन दुजें करुं फुलवूं सुम रात्रीचें
ऐकूं तेजोगुंजन तेथिल मधुकर अंधाराचें

निशिदिनिं क्रीडा करूं अशी सखि रिझवुनि ते स्वर कानीं
मी दुःखाचा राणा आणिक तूं ग सुखाची राणी

१९३७

## सावल्यांचें नृत्य

सावल्यांचें नृत्य माझ्या चांदण्याच्या अंगणांत
घननीळ वेदनांचें लास्य तुझ्या गायनांत !

अबोलीचा गोंड माझा दिसायाला साधाभोळा
पोटीं परी गांठ त्याच्या ठावी माझ्या काळजाला

सुरंगीच्या सुगंधानें डंख विसरला नाग
रात ओथंबली तरी जाईना का तुझा राग ?

जांभ रंगा आला दारीं तळीं गुलालाची रास
माघ मोहरला अंगीं जरा बिलगुनी हास

१९३७

## संध्याकाळीं उमललेली कळी

कां अशी अकारण हसशी सखि अपुल्याशीं ?
कळशींतिल जळ कां खिद्ळे तव हृदयाशीं ?

घट एक भराया लागे कां ग घटका ?
कां उतावळीचा भाव दाविशी लटका ?

इतक्यांतच्च कळशी कशि ग अर्धी झाली ?
नी कुणा सांजची तहान वरूुन आली ?

कटिं असुनी घट हें केविं मुखावर पाणी ?
कां भिजलें कुंकू चमके सूर्यावाणी ?

डोळ्यांत गहनता कोठिल ही घननीळ ?
गात्रांत कुणाची घुमते अजुनी शीळ ?

जातांना होतिस कलिका नाजुक पोर
घटकेंत फुलापरि झालिस केवीं थोर ?

रवि असा कोणता उगवे सायंकाळीं
कर शिवतां ज्याचे ये जीवास नव्हाळी ?

का अर्घ्यंचि अर्धें जीवन त्याला दिधलें ?
अन् हास्यें त्याच्या उरलेंसुरलें भरिलें ?

१७-२-१९३८

## कवि आणि कविता

"येशी सांग कुठून ? दिव्य कविते ! हे चित्कले सुंदरी ?"
—गा तेथून कवे ! अनंत निजला जेथें तुझ्या अंतरीं

"तेथें शांति अगोचरा, मग मुखीं वाणी कशी सुस्वर ?"
—बन्सी देह मदीय, नित्य घुमवी श्वासेंच बन्सीधर

"हीं ज्योतिर्मय भूषणें तनुवरी, कोणीं दिलीं आंदण?"
—देहांतील तुझ्या युगानुयुग जे, ती श्री तिचें हें धन

"केवीं आकळिशी अनंत गगनें पंखांविणें सत्वर?
कोठें पुण्यजलाशयीं विहरुनी येशी क्षणाभीतर?"

—गेले मानसहंस दिव्य उडुनी त्यांनीं दिले जे पर
शीर्षांचे वर ते तुझ्या, जडवुनी मी नेसलें अंबर

तेणें मी उडुनी जिथें अतिरसीं न्हातात व्यासादिक
तेथें शांत मनें विहार करितें मानून पुण्योदक

"केवीं गे मग साश्रु लोचन तुझे जेव्हां मुदें हासशी
डोळ्यांनीं हसतां, मुखावर कशी संध्याद्युति म्लानशी?"

—रात्रीचा घन कृष्णकोष फुलतां तेजास येई भर
छाया भूमिवरी जशा पसरती जेव्हां हसे भास्कर

लीला त्याचपरी करोनि तुजला मी प्रत्यहीं दावितें
कीं जें सत्य चराचरीं विनटलें तूझेंच उद्बीज तें

"केवीं चिन्मय मोहिनी असुनि तूं निर्लेप मांगल्य ही?"
—मी भस्मासुर जाळितें हंसुनियां नाचून गाऊनही

"मी गे अज्ञ असून केविं असशी तूं मात्र विद्यावती?"
—भ्रांती तूं मम, मी तुझी कविवरा ज्योतिष्मती जागृती

हळाजूण, २७-५-३८

## जलद भरुनि आले

गडद निळे गडद निळे जलद भरुनि आले
शीतलतनु चपलचरण अनिलगण निघाले

दिन लंघुनि जाय गिरी
पद उमटे क्षितिजावरि
पद्मरागवृष्टि होय माड भव्य न्हाले

धुंद सजल हसित दिशा
तृणपर्णी सज्ज तृषा
तृप्तीचें धन घनांत बघुनि मन निवालें

उतट बघुनि हरिकरुणा
हरित धरा हो गहना
मंदाकिनिवरुनि धवल विहगवृंद डोले

रजतनील, ताम्रनील
स्थिर पल जल, पल सलील
हिरव्या तटिं नावांचा कृष्ण मेळ खेळे

मीन चमकुनी उसळे
जलवलयीं रव मिसळे
नवथर रसरंग गहन करिति नयन ओले

धूसर हो क्षितिज त्वरित
ढोर पथीं अचल चकित
तृण विसरुनि जवळिल तें खिळवि गगनिं डोळे

टप टप टप पडति थेंब
मनिंवनिंचे विझति डोंब
वत्सल ये वास, भूमि आशीर्वच बोले

२७-५-३८

## माता काली

बंधूभगिनी ! चला, चला   मुलें होउनी चला, पळा
त्यांसम जे जे धीट बळी   हरला ज्यांच्यापुढें कली
नग्न, निरामय
विमुक्त, निर्भय
हासत नाचत तेज चला   प्रकाशशिखरीं चला, पळा

जिथें कलंडे निळा घडा   नक्षत्रांचा नित्य सडा
तिथें अहा माता काली   अम्हां पाजण्या ही आली
तिचीं लेकरें हक्कानें   आणि न केवळ जन्मानें
त्यां घे जवळी
इतर चुरगळी
मृत्युंजय जे तेच चला   दिवस लाभला आज भला

माता काली नग्न तिथें   प्रकाशगिरिचें शिखर जिथें
अंतर्नयनें देखावा   ठाव योगियां जो ठावा
त्याच्यावरतीं
स्नात शोणितीं
माता काली नग्न तिथें   विश्व जाहलें जिथें रितें

ज्वालेसम ती लाल उभी   दिव्य, निरंजन खुल्या नभीं
माता जरि ती, ती कुमरी   अनंत यौवन देहभरी
परार्ध व्याली
परार्ध प्याली
कुमरी परि माता काली   मुळीं कुचाग्रें नच ढळलीं

सत्त्व ज्यांत ग्रहगोलांचें   उतट असे घट रक्ताचे
घोट त्यांतले सर्वांला   देइल ती प्राशायाला
शोणित हिरवें भूमीचें   होइल पय तें बाळांचें
लाल रुधिर जें सूर्याचें   होइल प्रेयचि युवकांचें

धवल रुधिर जें चंद्राचें    होइल श्रेयचि वृद्धांचें
निळें रुधिर जें गगनाचें    तें होइल धन अजरांचें

पिउनिहि हें जर
उरे शिकंदर
चिरंतनाचा तान्हेला    लाविल ती मग पान्हाला

२५-११-३८

## सूर्याचें प्रेमगीत

जळावें अनंतांत माझें जिणें हें मला ध्यास 'मी कोण?' हें जाणणें
सदा बद्धपद्मासना मांडुनी मी दिशांचीं बघें लंघण्या कुंपणें
निराहार मी भस्म भक्षूनि माझें तपस्या किती उग्र केली युगें
किती दंडिला देह विच्छिन्न केला अजूनी पहा साक्ष देती भगें!

तपाच्या गुणें अंश माझे सभोंतीं फिरूं लागले होउनी सेवक
परी विक्रमें शांति ये ना मनाला जरी तेज त्याचें चिरंजीवक
अकस्मात आलें फळा पुण्य माझें तुझ्या दृष्टिला दृष्टि गे भेटली
सखे पृथ्वि! अर्धांगिनी तूंच माझी प्रचीती अशी अंतरीं बाणली

तुझी रक्तकांती, हरिद्रेषभूषा, पदन्यास, रत्नांग, आभूषणें
बघूनी जडे वेध तूझा जिवाला सले जीविंचें तीव्रतेनें उणें
अये भिल्लिणी! लास्य पाहूनि तूझें तपस्या विसर्जून मी हासलों
म्हणो विश्व झाला तपोभंग माझा वृथा नित्यशः भाजलों लासलों

तपस्या दुजी श्रेष्ठ गे प्रीति तूझी असे पेटलें अंतरीं स्थंडिल
तुला त्यांतल्या लाल दावासुमांनीं सदा अर्पितों प्रीति ऊर्जस्वल
जरी अंतरें आपुलालीं मिळालीं रहावें दुरी योजनें आपण
विधीची जरी योजना क्रूर ऐशी मनांचें पुरे गोड हें मीलन

वृथा दग्धहस्तें धरावी कशाला अपेक्षा तुझा हात घ्याया करीं ?
करूं पाप कैसें तुला स्पर्शण्याचें जगाचे कसे शाप घेऊं शिरीं ?
नको चुंबनें आणि आलिंगनें गे पुरे प्रीति ही दृष्टिभेटींतली
फळा आणुनी तीच पितृत्व मोठें दिलें तूं मला कामिनी ! माउली !

जधीं व्यास ॐकार उच्चारुनी गे मला अर्घ्य द्यायास झाला उभा
सखे ! प्रीतिची सांगता दिव्य झाली जगा आणखी जाग आली नभा
दणाणून गेल्या दिशा मंत्रघोषें महाप्राण सांगे जगत्कारण
न तूं धूलि गे तूंच माता जगाची तुझ्या पोटिं घे जन्म नारायण

१२-५-३९

## ते कर मन्मातेचे

ते कर मन्मातेचे
वर जणुं स्वरसुंदर कवितेचे
झाडिति हे सदनींचें अंगण
मनिंचें आणि अमंगल मीपण
क्षुद्र सुखांचे तसे रजःकण
सांचति जे भवतींचे

लावुनि लावण्याच्या वेली
गुंफिति त्यांचीं फुलें रसेलीं
वास्तुदेव पूजिती त्रिकाळीं
निर्माल्य न कधिं ज्यांचें

मलीन देहा घालिति न्हाऊं
म्हणति, " जिवाला उटणें लावूं
पावित्र्याचे दरवळ देऊं
फेडूं पांग जगाचे."

श्वास तारिंचे भरिती ओठीं
स्पर्शें ज्यांच्या अमृत पोटीं
विषय ज्यांपुढें अनंत कोटी
गमती तृणवत् साचे

शिविती चिंध्या, भग्न भावना
विदीर्ण स्वप्नें, जीर्ण कामना
दैन्य झाकिती कळे न कवणा
तंतु भरुनि ममतेचे

बांधिति जखमा या देहाच्या
त्यांहुनि खोलहि या हृदयाच्या
घड्या तयांवर माधुर्याच्या
सिंचन प्रेमजलाचें

आधारचि ते निराश्रितांना
धैर्यद, वत्सल रुग्णजनांना
संजीवक संगरविद्धांना
भाग्यलेख दलितांचे

धन्य करांनो ! या या काळीं
दिव्य लिहा हो अमुच्या भाळीं
तोडूं जाळिं, उडूं आभाळीं
घरटें करुं गगनाचें

मडगांव, २५-११-३९

## अमर सुंदरता

गे अमर तुझी ही सुंदरता
कविकुलगुरुची जैशी कविता

बालवयीं शैशव-लीलांनीं
मृदुल करांनीं, मधु अधरांनीं
चतुर बोबड्या सुखद वचांनीं
कांट्यांत फुलविली कोमलता

गात्रिं तुझ्या जधिं वसंत फुलला
सुमशर तव मम हृदयीं रुतला
तद्रुधिरें क्षितिजाक्षितिजाला
गे अपूर्व आली मंगलता

गिमांत गमतां जीवन नीरस
तहानुनी हें झुरतां मानस
झडला तव नयनांतुनि पाउस
खळखळली अवचित सुखसरिता

सुंदरता तव होती पानीं
आज फुलीं ती हसे बहरुनी
रंगें गंधें तिच्या मोहुनी
हुंगितों, चुंबितों फुलें अतां

विविध ऋतूंतिल जैशी धरणी
अखंड जननी, अखंड तरुणी
तैशी तूं मज गे दिनरजनी
उठतां, बसतां, हसतां, रुसतां

१९३९

## अशि मारिशील न कुणाला ग ?

अशि मारिशील न कुणाला ग ?

अधर जरा वळलेला खालीं
भुंवइ जरा चढलेली भालीं

खळी जरा झुकलेली गालीं
नयनिं विषारी भाला ग

दाट पापणी काळी काळी
पसरी डोळ्याखालीं जाळीं
त्यांत न गवसे अशी मासळी
ठावी का कलिकाला ग ?

बघुनि जरा लीलेनें मुरडुन
चिडविसि मानेवरची नागिण
आणि क्षणीं ती जाई डंखुन
सहजपणें कितिकांला ग !

उन्नत चंचल तव वक्षस्थल
चाल मस्त ही, पद उच्छृंखल
तुडवित जाशी मदनाचें दल
जणुं झाडाचा पाला ग !

८-४-४०

## उर्वशीच तूं जाया

क्षाळीं पद संध्या
गांगजळा ये रंग मोतिया

गडे धुळीचें झालें सोनें
किनारले गिरि रजतरसानें
मोरपिसांसम चमकति पानें
झालें जग मयमाया

शिरिं अपुल्या खग वळिति तोरणें
शिंपडिती मोत्यांचे दाणे
मलयानिल नाचत मोदानें
लागति ते वेंचाया

रत्नकांति ये दाहि दिशांना
अवचित दीप्ती तव नयनांना
ज्योतिर्मयता अपुल्या प्राणां
काया या जणुं छाया

दीप उजळले हृदयीं, ओठीं
द्युतिनिर्झर ओघळले पोटीं
स्पर्शें विश्वें अनंत कोटी
लागति बघ तेवाया

रंभाकृति तव मृदुल हिमानी
दृढ धरिली मीं दोंहि करांनीं
अतीत तरि मज उरशी अजुनी
उर्वशीच तूं जाया

१८-४-४०

## भाताचें रोप

चिमणें इवलालें बीज
रम्य त्यांत होती शेज
दीड वितीचें कुणि रोप
चेत तिथें होतें झोंप

ऊन म्हणालें, "ऊठ गड्या !"
पाउस वदला, "मार उड्या

जगांत ये रे या उघड्या
करीं जळाच्या पायघड्या."

वायु बोलला, "ऊठ किं रे
माझ्याशीं घर फेर बरें
हसलें जर आपणां कुणी
दावुं वाकुल्या नाचोनी!"

भूमि म्हणाली, "चल बाळा
वाजव पाण्याचा वाळा
आंगीं हिरवी सोनसळा
वालुनि ही दावीं सकळां."

झोप झटकुनी तें उठलें
नंदबाळ जणुं अवतरलें
पाउस, वारा, ऊन तसें
जमले भवतीं गोप जसे

अद्भुत याचा खेळ अहा!
जरा येउनी पहा तरी
उगवे, चमके पहा पहा
मोरपिसांचा तुरा शिरीं

केपें, ८-८-४०

## सोन्याची द्वारका

सोन्याची द्वारका पाहुं या सोन्याची द्वारका
चंद्र डोइवर उधाण सागर वेळ गमावूं नका

चला जन जातिवंत जे बुडे
देह ज्यां गंधांचीं लाकडें
हासतिल यमाचियाही पुढें
या हो नाविक असले निधडे पाठ जयांची सुखा

बघुनि जे सहस्र सागर-फणा
झोंबती त्यांच्या मणिभूषणा
सरेना तिळही हसरेपणा
वक्र नक्र देखुनी पराक्रम ज्यांचा न पडे फिका

लावुनी भगवंताच्या बुका
बुजविण्या सकल जगाच्या भुका
पूजिती अंतरिंच्या पावका
मुखांत ज्यांच्या प्रकाशगीतें लाजविती माणका

ओरडुत कुत्रे अन् कावळे
अशुभ ना त्रिभुवन मंगल निळें
हाकरा मार्ग पहा झळझळे
या वाटेनें कालच गेले गात ग्यानबा-तुका

१४-८-४०

## सानुल्या फुला!

सानुल्या फुला! तान्हुल्या फुला!
येथ कसें एकटेंच करमतें तुला?

घेउं का करीं? नेउं का घरीं?
सकल तुला घेतिल रे उचलुनी शिरीं

भाउ सानुला पाहुनी तुला
आनंदुनि कर उचलिल बिलगुनी मला

राग ताइचा सहज जायचा
गालिं तिच्या रंग तुझा झणिं फुलायचा

आइ तुज शिरीं धरिल मज उरीं
पापे मज देइल किति गोड तुजपरी

मधुर मोहिनी तव विलोकुनी
तातहि जातील झणीं शीण विसरुनी

देव जरि मुका बहु तुझा भुका
होइल तुज बघुनि तोहि खचित बोलका

त्वरित चल तरी सांज अंबरीं
तरल रंग, विमल गंध उधळ ये घरीं

केपें, २-९-४०

## विश्वामित्रास

विश्वामित्रा ! व्यर्थ न तप तव
पतनचि तव गा अमुचें वैभव

क्षुधादमन तूं करिसि विलक्षण
मोडिसि करुनी अभक्ष्यभक्षण
म्हणोत सुर हें विचित्र तर्पण
वंद्य तुझा जठरानल-गौरव

कामहोम तूं घोर मांडिला
लोहदेह जाळिला, दंडिला
अंतीं वितळुनि तोच बोलला,
"काम न मर्त्य, न मायासंभव."

स्पर्धा ब्रह्याशींहि लाविली
अहंपणें प्रतिसृष्टि घडविली
व्यर्थ ठरुनि ती सार्थचि वदली,
"मानव अंतीं राहिल मानव."

अमित्रता विश्वाशीं धरुनी
दिलीस सत्यें जगा परजुनी
प्रमाण मानूं सदा जीवनीं
समर्थ वेदांहुनि तव अनुभव

उभवियला ध्वज तुवां अराजक
त्यावर लिहिला मनुजाचा शक
देवहि करीत असतिल कौतुक
धन्य धन्य गा तुझा पराभव !

२४-९-४०

## पांढऱ्या ढगास

हसत हसत वर वर जा पांढऱ्या ढगा रे
मुक्त होसि करुनि तृप्त तृषित या जगा रे

गिरिदरिंतुन खळखळून
जाय पिकांवरुन ऊन
झळझळवी त्वां दिधल्या अमर सौभगा रे

लवति पिकें कृषिकयुवति
त्यांसम त्या अति लवती
तव सुवर्णदानाचे सजविण्या ढिगारे

भिजति उन्हीं अगणित जन
कणसांसम तृप्तवदन
बघुनि यांस येइ बहर आज नवयुगा रे

तुडविति तृण वृषभदळें
कणराशी पडति पळें
विहगकुळें उडति, तुझा वर न वावुगा रे

सफळ तुझें संतर्पण
अन्न जाहलें प्रसन्न
दीप्तीचा श्लोक दिव्य तूं वरून गा रे

ऐक जरा हे कृतार्थ
द्यावया तुलाच साथ
वक्षस्थलिं वाजति तव भक्तिचे नगारे

२१-१०-४०

## भर सखि भर सखि पुनश्च ओंजळ

जीव तृषेनें अजुनी व्याकुळ
भर सखि भर सखि पुनश्च ओंजळ

कनक-कीर्तिचीं तुडवुनि शिखरें
शिणले पद हे शिणलीं गात्रें
रुधिराचीं, अधराचीं पात्रें
प्यालों तरिही न शमे जळजळ

काल चांदणें दिलेंस प्याया
आज येइ काळोख खावया
जन्नड्यांतुनि त्रिकाळ त्याचिया
मृत स्वप्नांची उठे भुतावळ

खालीं मानव्याचा सागर
विराट तांडव करी भयंकर
शंख घुमे त्यांतुनि 'जय शंकर!'
तत्कंठांतिल आण हलाहल

बघुनि उभा मज या शिखरावर
तेज मागती असंख्य कृश कर
प्रकाशगंगा जरि माथ्यावर
उरीं क्रुद्ध काळा कोलाहल

जोड करांचे लाल शिंपले
भास्कररक्तें भरीं मंगले!
लाव मुखा, भार्गवीं, स्नेहले!
युगांतराची माझी तळमळ

कृश करिंची त्या विझे प्रभावळ
हेंच काय त्वत्प्रीतीचें फळ?
सत्वर करिं मज, उदार हो चल,
जळत्या संजीवनिचा ओहळ

१-११-४०

## जन म्हणोत तुज दुसऱ्याची ग

जन म्हणोत तुज दुसऱ्याची ग
तूं राणी मम हृदयाची ग

खुशाल कर घर त्याचें सुंदर
मुलें फुलें गे फुलवीं घरभर
कुशल करें संसारीं भर जर
कर गुंफा प्रणयाची ग

मला न सखये त्याचा हेवा
बघ मम हृदिं रत्नांचा ठेवा
तुवां ठेविला कधीं न ठावा
कला तुझी नवलाची ग

घराहुनी त्या सुंदर मन मम
चितारुनी तूं करिसी निरुपम
मुलीं फुलीं त्यांतिल परमोत्तम
पूजिसि पावन प्राची ग

जनां त्वचेचे डोळे दुबळे
प्रकाशसुख त्यां न दिसे, न कळे
प्रीति न गवसे म्हणुनियां खुळे
म्हणती तुज दुसऱ्याची ग

२-१२-४०

## सुमेवाला

मी सुमां विकणारा
आलों तुमच्या दारा
नमुना याचा पाहिल्याविना लावुं नका माघारा

किंमत याची थोडी
प्रीतिवचांची जोडी
फुलल्या अथवा गालांवरची लालस राजस गोडी

डोळा इकडे आणा
द्या अश्रूचा दाणा
घरभर जगभर आनंदाचा आढळेल नजराणा

संसाराचा भारा
मोरा जेविं पिसारा
होउनियां क्रीडाल सुखानें फुलवुनियां परिवारा

पोलादाचा भाला
भिडला जर हृदयाला
शिवतां तुमची चोखट दृष्टी लाजवील सोन्याला

भाग्य असें थोड्यांना
पंख जसे घोड्यांना
रंग शराबी, गंध गुलाबी नशिबाच्या कोड्यांना

हें सुख उपभोगा रे
भिडवा स्वर्ग जगा रे
डोळ्यांमध्यें साय ठेवुनी न करा नरक उगा रे

चोख करा रे डोळे
त्यांत दयाघन वोळे
रतिमदनाचा जरीकिनारी हिंदोळा आंदोळे

वास इथें मम थोडा
तोंवर हें सुख जोडा
नातरि जीवन होइल अंतीं कळिकाळाचा खोडा

व्हा दैवाचे चेले
अमर सुखाचे पेले
सुर्मा घालुनि नयनीं व्हा रे मदनाचे अलबेले

हा घ्या मोफत फावा
न्या हो अपुल्या गांवा
मात्र सुखामधिं या गरिबाची गोड आठवण ठेवा

२३-१-४१

## बांगड्या

बांगड्या बघा या
श्रावण लावण्यराज लागला फुलाया

जलवलयें, स्वरवलयें
दिनकर-शशिकरवलयें
मिसळुनि घडिल्या प्रणयें
गोड बांगड्या या

नाजुक या सुंदर अति
मंजुळ रविं रुमझुमती
रत्नांसम चमचमती
भाग्य रंगवाया

या प्रदोषकांत निळ्या
या बिजल्या सोनसळ्या
लाजविती रुसुनि खुळ्या
आम्रकिसलया या

नव युवती! कां भिडस्त?
भरुनि घ्या त्वरें स्वहस्त
वाजवुनी तरुण मस्त—
चरणिं लोळवाया

या वासंतिक हिरव्या
आशांसम नित्य नव्या
वधुहृदयापरि हळव्या
प्रेम-ओवया या

निर्मळ हें हिरवेंपण
पतिगृहिं न्या करिं मिरवुन
सतत करा जपुन जतन
ही सुरम्य माया

क्षितिजासम या जांभुळ
जलदांसम या श्यामल
वत्सल या गंगेंतिल
सांध्य-मेघ-छाया

या माउलि, अपुल्यास्तव
वर ज्यांचा सुखसंभव
कर ज्यांचा दे गौरव
वैश्वदेव राया

ये कन्ये, ये दुहिते,
अपरिणिते, ललितलते,
ये कांते, ये माते,
सुभग-साज न्याया

२६-१-४१

## पाठमोरी पौर्णिमा

पाठमोरी मूर्ति तूझी पाहिली मीं कौतुकें
वाटलें त्वत्कुंतलीं गे गुंतलीं सारीं सुखें

भार त्यांचा गाढ काळा मेघ आषाढांतला
का फुलांच्या मार्दवें मानेवरी भारावला ?

प्रीतिचा गे दूत माझा हा सुरंगीचा सर
खोवुनी तूं कुंतलीं गे गोविलें अभ्यंतर

हा न झेला गे फुलांचा—लाजरी सौदामिनी
वांकुनी केशीं तुझ्या मातें खुणावी हासुनी

काय आघातें तिच्या हे केस तूझे कांपती ?
प्रीतिभावें चाळवोनी वा मला बोलाविती ?

कंप त्यांचा अंतरंगीं जाय माझ्या खेळुनी
आणि त्यांचा वास माझा श्वास टाकी कोंडुनी

भाग मानेचा खुला हा गे बिजेचा चंद्रमा
अंबराच्या नीलिम्याला गे उणी स्वर्गोपमा

कांतिपानें धुंद झालें गर्द हें नीलांबर
पोत—छे ! स्वर्जान्हवीचा झोत हा पाठीवर !

पद्मिनी ! झाला करांचा गोड चाळा मोहक
आंगठीचा नीळ हासे रम्य संध्यातारक

होति पूर्वापश्चिमा आरक्त हस्तांचे तल
कंकणीं नक्षत्रपुंजां तेज आलें शीतल

स्वर्धरेची धार झाली त्वत्कटीची रेख ते
देवता आपाद कोणी रम्य ऊर्मी लेखिते

कच्छ वाटे सिंधुपृष्ठीं पंथ ज्योत्स्नामंडित
पाहुनी झाले किती गे प्रीतिभावें पीडित !

स्वैर वांकी या रुपेरी—फेंस खेळे सुंदर
पावलांच्या लालिम्याला भूमिची थोडी सर

पाठमोरी तूं बिजेची रात्र, लावण्यें रमा
हासुनी पाहीं वळोनी, होउं दे ना पौर्णिमा

२-३-४१

## माझी बेगम

माझी बेगम आली—प्यारी—माझी बेगम आली
मस्त मोंगली विलास सगळे उधळित ही भवतालीं

डोळ्यांतुनि वाळ्याचें अत्तर हासत-हासत जाळी
केश रेशमी, गाल मख्मली, अधरिं शराबी लाली

वचनीं बुलबुल, गायनिं कोकिळ, कवनीं पिक कुरवाळी
न्हाली ही शृंगाररसानें प्रतिभालंकृति ल्याली

सुमधुर स्वप्नें, दिव्य भविष्यें फुलवित गालीं, भालीं
श्वासें जाळीं धूप, कटाक्षें उरांत खंजिर घाली

आणि तत्क्षणीं घाव चुंबुनी होई रंगरसेली
हासत, नाचत ये चंदेरी माझी गझल-कवाली
अन् रक्ताची मैफल उडवी हृदयीं—रंगमहालीं

दादर, २४-५-४१

## दीपजागृति

प्रीतीचा कनकदीप पुनरपि उरिं जागे
लागे कर अद्भुत अजिं त्याजला तुझा गे

स्नेहधार ओतिलीस
आणि वात सारिलीस
लाविलास कुंकुम त्या भावनानुरागें

सकळ काजळी झडली
श्यामलता लव नुरली
पाजळली जीवज्योत उजळि काळजा गे

दिव्य हा महाप्रकाश
क्षितिजाचा करि विकास
हृदयभुवन त्रिभुवन हें दाटवी परागें

काल ये बनूनि नाद
घालि कणकणांत साद
शब्दाचा वेध आज पुनरपि मज लागे

आज सखे तृप्त तृषा
येइ ध्रुवावरिल उषा
जीवनवन बहरुनि ये सकल रत्नरागें

या प्रभेंत होउं स्नात
घाल स्नेह सार वात
अविरत सखि गुंफित रव जाउं दिव्य मार्गें

फोंडा, २९-५-४१

## धावा ऐकून

आर्त धावा तुझा ऐकुनी सुंदरी
धांवलों प्रेमले मी तुझ्या मंदिरीं

तेथ तूं दाविली प्राणपंचारती
सेवितां दिव्यता वर्षली अंतरीं

मुग्ध तूझ्या कळ्या हासल्या रंगल्या
गंध त्यांचा त्वरें दाटला या उरीं

प्रेममंत्रावली जी तुवां गायिली
ऐकतां धुंदला जीव ताल-स्वरीं

स्वप्नरंगीं तुवां वाट जी रेखिली
तींत मीं देखिली दिव्य कारागिरी

गे, तुझ्या संगतीं बोलतांचालतां
लंघिली मानसें पार्थिवाची दरी

पूजनें तूझिया तृतिच्या मीं शिरीं
देव-ता पावलों मर्त्य होतों जरी

३०-५-४१

## तुझें आगमन

या वळवाच्या सरीपरी तूं आलिस माझ्या दारीं ग

झाकळलें नभ होय मोकळें
गळे तयांतुन ऊन कोवळें
हें धन असलें कधिं न देखिलें रविच्या विभवागारीं ग

मळल्या राया न्हाउनि नटल्या
निजलेल्या स्वरलहरी उठल्या
रुळवित चरणीं चपल लाजऱ्या सोनकिनारी भारी ग

मृद्गंधाच्या चवऱ्या मिरवित
नाचत नाचत आले मारुत
कणाकणांतुनि घुमवित मादक मदनाची ललकारी ग

थरारलीं बघ कमळें सगळीं
मकरंदाला फुटली उकळी
जलदाची पिचकारी बसली निळ्या निळ्या कासारीं ग

तृणातृणांतुनि उठली तृष्णा
आवरिशी मग कां तव करुणा ?
खुलें कधीं जें जीवन अडलें वरुणाच्या भांडारीं ग

२-६-४१

## घरांतलें चांदणें

घरात पडले आज चांदणें ऊठ साजणा ऊठ जरा
परस्परांवरि या किरणांपरि सोडूं पुनरपि नयनशरां

ओलांडुनि भिंतींचें कुंपण
चंद्रदूत हे आले चोरुन
त्या वाटेनें जाऊं आपण
पाहूं हिरवीगार धरा

निजलेलीं स्मरगुजें जागवूं
तहान त्यांची हसत भागवूं
हृदयांतिल मकरंद नाचवूं
भिउनि राहिला जो तिमिरा

सुज्ञपणाच्या बेड्या तोडूं
संवत्सरांचीं वसनें सोडूं
दो हृदयांतिल पराग जोडूं
जडवुनि अधरावर अधरा

हिरवे झुंबर हळुच हालवूं
सुमगंधीं स्वर गोड कालवूं
निळे रुपेरी मीन चाळवूं
करुं फेनाचा सुबक तुरा

अशा विलासीं रमुनी भ्रमुनी
कणकण अपुले जातां शिणुनी
भूवक्षावर बिलगुनि पडुनि
मिळवूं चंद्रावर नजरा

पुन्हा एकदां होऊं तान्हीं
रमूं सृष्टिच्या स्तन्यसेवनीं
गात्रीं कोंडुनि रात्र चांदणी
आणुं पहाटेआधिं घरा

५-६-४१

## सांत्वन

तूं जरि स्वर्गाची सांगाती
तरि येथिल गे दुबळीं नातीं

दुबळीं जरि तीं पाश सबल ते
तोडुनि वरितां तुला देवते !
उलटुनि होतिल शाप जागते
ढळवितील तप अपुलें अंतीं

जनगंगातटिं घरें बांधिलीं
अंधपांगळीं त्यांत पोशिलीं
पुरें तिच्या वाहतील सगळीं
येईल मात्र हातीं माती

हृदयांतिल या पणत्या, ज्योती
झुरुनि अंधकारिं जरि मिणमिणती
त्यांस लाभतां आज जागृती
स्नेहाविण का उरतिल वाती ?

मीपण नेऊं हसत विनाशा
फुलवूं अपुली प्रकाशभाषा
उजळूं मानवतेच्या आशा
गे, जळुनि करूं जीवन-मुक्ती

मडगांव, १०-६-४१

## नवल

अंधारिं उभा मी बघत नभा
गे, तटस्थ वर नक्षत्र-सभा

रोमांचांतुनि असुर प्रगटले
आक्रंदुनि मज तुडवूं झटले
त्यांस खरबलें पदीं चिरडिलें
जणुं मत्त गजें धरिलें दर्भा

दैवाचा अजि खर शर सुटला
विंधुनि कर तव उरिं मम शिरला
तपोबलें परि शर वर ठरला
सखि, दुर्लभ तूं मज हो सुलभा

क्रुद्ध हिंस्र पशु विनम्र झाले
व्याळ विषारी गरळ विसरले
खड्याखड्यांतुनि हेम निघालें
कोळशांस फुटल्या लाल जिभा

जिवांजिवाचें रक्त मिसळलें
म्हणुनि असें हें नवल वर्तलें
अद्भुत त्यांतुनि दिव्य हासलें
उकलुनि मंगल जीवनगर्भा

कां मग आतां वृथाच कण्हणें ?
बघ वर झालें गगन ठेंगणें
न्याहाळुनि पाहण्याकारणें
चिन्मय अद्वय अपुली प्रतिभा

मडगांव, २१-६-४१

## व्याकुळ कर्णधार

मत्त आज चांदरात धुंदि सागराला
हंसाकृति नाव सखे नेउं बंदराला

पवनाची तुज न भीड
त्वरित उभविलेंस शीड
अंचल तव चंचल अजि धरित त्याच ताला

स्वप्नांची रास धवल
फेनापरि करि सळसळ
दलुदलु हा परिमळ सखि चढतसे कपाळा

त्यांत तुझें आते गान
हरवि सकल देहभान
शिथिल करुनि जीव आणि नीज लोचनांला

थांब सखे, थांब जरा
भरिं न सुराचषक पुरा
भरिला तरि लावि न इतुक्यांत मन्मुखाला

खडक इथें धरुनि दबा
मगर परजतात जिभा
चळतां मम दृष्टि, जाउं उमयतां तळाला

जायचें अजून दूर
देखिलें न परमतीर
व्याकुळ हा कर्णधार, सावरीं तयाला

२२-६-४१

## प्रीति तूझी

प्रीति तूझी अंतरीं या दाटुनी ना साहवे
नावरे आतां उमाळा, लोटती हीं आसवें

सर्व हर्षामर्ष माझे पुण्यसेकीं नाहले
अंतरींची सृष्टि सारी ये नटोनी वैभवें

जे स्मृतींचे वृक्ष होते ग्रीष्मतापें पोळले
जीर्ण त्यांचें अंग आतां स्वर्णपर्णीं पालवे

स्वप्नवेली गोड झाल्या अन् फळांनीं वाकल्या
गे फुलीं आले फुलोनी कल्पनांचे ताटवे

भावनांचे भृंग तेथें दंग झाले गुंजनीं
डोलती गंधीं फुलें आनंदुनी त्यांच्यासवें

चित्तकोषीं जे युगांचे भाट होते झोपले
झोंबती वेगें फळांना आज हे त्यांचे थवे

आणि आशेची पुन्हां ही दाट झाली हिर्वळ
सानुलीं तेथें फुलें हीं वाटती कीं काजवे

काल आकांक्षा सखे ज्या पावल्या पाषाणता
त्यांवरी तूं बैसुनी संगीत गे गासी नवें

तृप्ति तूं गे, शांति तूं गे, तूंच देवी शारदा
आसवें प्राशून माझीं गाइं वीणागौरवें

१६-७-४१

## सखि ये गे

सखि ये गे, सखि ये गे,
वेगें स्वप्नसुमांगे

दर्शनलालस लोचन आतुर
हृदय अनावर
स्वर अधरावर
भरले पुलकपरागें

फुलल्या स्मृति या दिनयामिनिसम
कनकमनोरम
नवरत्नोपम
गहिंवरल्या अनुरागें

मोजित मन हें दिन, घटका, क्षण
अति आनंदुन
अति उल्हासुन
बघ रात्रंदिन जागे

चराचरावर अनंत-यौवन
स्मरसंमोहन
नवसंजीवन
आळविण्या तुज लागे

ये सखि ! हासत, गात, विलासत
हृदय विकासित
भुवन प्रकाशित
गुंफित जीवित-धागे

युगायुगांची वारीं तळमळ
कर सखि ! शीतळ
उरिंची जळजळ
ये आलिंगन दे गे

२१-७-४१

## भृंग

कां ग घेतलास सांग भृंग हा उशाला?

गुंतवुनी स्वप्नगुजीं
मोडिल हा झोप तुझी
अवजड हा करिल तुझ्या मखमली दुशाला

फिरवुनियां गोड गळा
पळविल हा रस सगळा
कंटकमय करिल तुझ्या सकल पुष्पमाला

पोखरील हा पलंग
धुंद करिल अंगअंग
घुमुनि घुमुनि आणिल हा घेरि जीवनाला

चाळवील मृत विलाप
भिंतींतिल त्रिविध ताप
होइल सुखमंदिर तुज क्रूर बंदिशाला

अनुदिन हा गात छळी
प्रतिपळिं किति घेइ बळी
जाणुनि हें कवळिशि त्या अंतरीं कशाला ?

केपें, ५-८-४१

## स्मृ ति

लोचनीं ये आज पाणी त्वत्स्मृतीनें साजणी
भैरवी आलापिते ही रात्र येथें चांदणी

सूर ओथंबून कंठीं कर्दळी भारावल्या
मुग्ध झाडांच्या तळीं भांबावल्या या सावल्या

स्वैर एकाकी भ्रमे दिङ्मूढ वेडा काजवा
खिन्न झाला दोडकीच्या स्वप्नपुष्पांचा थवा

सांचलें पाणी इथें अन् त्यांत गोठे चांदणें
आंसवांच्या या जिण्याला मौज ना स्वप्नाविणें

योजनें लंघून राहे स्वप्न माझें देखणें
सुस्मृतींचीं चालवीतों येथ मी पारायणें

या गवाक्षांतून तूं मीं चंद्र होता देखिला
चुंबनांचा पाठ आम्हीं त्याजला होता दिला

ओतिली त्यानें तदा हर्षें सुधा सृष्टीवर
तीहुनीही गोड आम्हीं वर्षिले सप्तस्वर

रात होतां शांत सारी, गाल गालां लाविले
भोगिलें ऐश्वर्य सारें स्पर्शसंगीतांतलें

मेघ वेगें पांगले अन् वायु झाला शीतळ
विश्वही झालें निळें अन् लोचनीं आलें जळ

आजही ये तेंच पाणी दूर तूं गे साजणी,
दूर तूं, छे! तूं जिवाला राहसी आलिंगुनी

रात्र गाई भैरवी ही गोड वाटे सुस्वर
आणि अश्रूंतूनही हें दृश्य हो चेतोहर

९-९-४१

## गड्या उद्यांच्या दिसा

गड्या उद्यांच्या दिसा, लागले लोचन पूर्वेकडे
मधें परि काळोखाचे कडे!

विचकुनि चावुनि दांत नाचते रात्र कालिका पिशी
चरकती पर्वतही तापसी!
ऊर बडवुनी गळा काढितो सागर वरचेवर
मुखांतुनि फेंस निघे भरभर
दुखावल्या कोल्ह्यापरि धावे केंकाटत मारुत
फुलांचें रक्तमांस ओकित
असतील घरकुलें उडुनी गेलीं किती!
माझेंहि जाउं दे, त्याची न मला क्षिती!
जी मुग्ध गीति कंठांत, तिला दे गती
पहा जरा रे, दिसा उद्यांच्या वळुनी माझ्याकडे
उजळ हे काळोखाचे कडे

युगनाथा तव गातां स्तोत्रें निवेल ही कालिका
ग्रहांची घालिल तुज मालिका
आणि चौघडा वाजवील हा सागर आनंदुन
फुलांनीं फुलुनी येइल वन

पादचर्चनास्तव तव आणिल पवन सुगंधांजली
आरती दाविल गिरिमंडळी
घरट्यांस्तव खग हे शोक न करतिल फुका
धरतील गगनभर विकासलेल्या सुखा
मी मुग्ध होउनी बघेन मग कौतुका
आज परी तव मूठ जरा धर उघडुनि माझ्यापुढें
वारुं दे गाउनि मज सांकडें

मडगांव, १४-९-४१

## रमणी आणि धरणी

प्रमत्त तुजपरि सखि ! ही धरणी
धीट देखणी तरणी ताठी
असल्या मादक सौंदर्याचा
मोह माझिया मना मराठी

हिचें तटतटे यौवन येथें
तुटूं पाहती हिरव्या गांठी
तुझ्यापरी ही अधीर सजणे,
प्रखर माझिया स्पर्शासाठीं !

चमके बघ कुदळीचें पातें
आहे ना मम अशीच दृष्टी ?
जी पडतां तुजवरतीं वरिवरि
केलिस मजवर रतिसुखवृष्टी

नादिं लागतां तुझ्या म्हणाले
लोक कपाळीं चढवुनि आंठी,
"पोर फांकडी फिरवुनि याला
फेंकिल जणुं कळकाची काठी !"

आजहि म्हणतिल, "फोड काढुनी
घेइल अंतीं हातीं माती !"
लाखेसम या लाल मातिनें
भरिन भांग तव माझ्या हातीं

या कुदळीच्या घावासरशीं
चमक उठे बघ कशि सोन्याची
चमकुनि हटली मागें जरि ती
हौस मला हिज लाजविण्याची

लाख सुखें मज दिसती दडलीं
या असल्या मस्तीच्या पोटीं
म्हणुनी खणतों उन्हांत असल्या
पितों चांदणें तुझिया ओठीं

मी प्रीतीचा पाइक न सखे !
केवळ रतिसुखभोगासाठीं
वा भूमीचा मालक केवळ
पोट कसें तरि भरण्यासाठीं !

केपें, १५-९-४१

## मुखवट्यास

कलास मुखवट्या ! तूंच आजवर घात
कोंडिलास माझा प्राणच काळोखांत
प्रणवाचा त्यांतुनि सुटला वादळवारा
जा उडत ओरडत असा सात गगनांत !

तव आक्रोशानें मिळेल पितरां शांती
मम मुक्तीस्तव जे झुरले नित्य निवांतीं
हर्षुनी उघडतिल पंच भुतांचे डोळे
दर्शनें माझिया येइल त्यां नवकांती

तोडिशील कुठवर सांग सनातन नातें
जोडितें मला जें आणि सकल विश्वातें ?
जड करूं शके का चैतन्या अटकाव ?
का झरा दुभंगे काठीच्या आघातें ?

तूं श्वास निरोधुनि वय मम चोरुनि नेलें
मुख दाबुनि मजला मूक आजवर केलें
कानांवर माझ्या हळूच ठेवुनि हात
वदलास मला, "पाळण्यांत गायन मेलें."

नेत्रांचीं माझ्या अडवियलीं तूं पातीं
जग धूसर केलें पसरुनि कपट सभोतीं
मिरवलास माझ्या रूपावरतीं बसुनी
करुनियां तनूला आधाराची काठी

वदलास सदा मज कोंडिल हा तुज वारा
कल्लोळ स्वरांचा घालिल कानीं पारा
फिरवील बाहुल्या प्रकाश हा सुलतानी
बोलतां दिशांतुनि होइल निर्दय मारा

मज ठावा सगळा तुझा घातकी कावा
सिद्धान्तच मुळिं दुबळ्या नच मोक्ष मिळावा
जोंवरी मुखीं मम गंज तुझ्या दास्याचा
तोंवरी शांतिचा राहिल मजशीं दावा

म्हण खुशाल क्रोधें कुरूप मजला, मूर्खा !
तुजमुळेंच झडली मम रूपाची रेखा
मज लोभ नसे तव नकली लावण्याचा
जें बांधुनि ठेवी ललाटिंच्या आलेखा

तव दायादांच्या भुताटकीचा जाच
किति वेळ भोंवतीं चालविशील असाच ?
मी सोऽहं म्हणतां पडतिल दचकुनि खाली
अन् होइल त्यांवर अग्नीचा नटनाच

कुडचडें, १६-९-४१

## इमानी कुत्र्यास

तूं मान स्वताला थोराघरचा श्वान
जा राजपथांहुन ताठ उभारुन मान
मुळिं पाहुं नको तूं वळुनी या वाटेला
होईल कलंकित रे तव थोर इमान !

तुज चपल बोलती निर्भय वीर शिकारी
वाखाणित कंठीं घालिति पट्टा-दोरी
हीं दास्यभूषणें फिरवित जा डौलांत
छू: म्हणतां पळ जा गुडघे मोडित चारी !

जरि तुझ्या धन्याच्या सुटल्या सूं सूं गोळ्या
रक्ताच्या अमुच्या फुटल्या जरि आरोळ्या
रे, मोड आपुले कान, मिटुनि घे डोळे
तूं चघळ हाडकें, चघळ सुखानें पोळ्या !

जा विसर आपुली जात, आपुला प्राण
ललकार मुखानें पारतंत्र्यमहिमान
मी चित्र तुझें हें दावुनि पोरांथोरां
चेतवीन त्यांचा निजलेला अभिमान

उद्धरेल जेव्हां सकल आमुचा वंश
तव जपुनी ठेवूं लाचारीचा वेष
दर्शनें त्याचिया प्रतिदिनिं सायंकाळीं
रे, मिळवूं आम्ही मोक्षाचा संदेश !

कुडचडें, १८-९-४१

## कोठवरी सांग खुळे !

कोठवरी सांग खुळे ! धरिशिल तरि मनिं शंका ?
प्रीतीची अमरसाक्ष पटली अजुनीहि न का ?

बघ गगनीं ढग भरले, हृदयाला पडति तडे
म्लान होति येथ पहा चंद्राचे गोड सडे !

शैवालें झांकळली सजल शांत पुष्करिणी
मुकलें तिज गगनबिंब, पाहुन घे मन-रमणी !

'क्षय विधुला, क्षय तनुला' पंडित जन म्हणति जरी
चांदण्यांत, जीवनांत काय नसे अमृतझरी ?

पवनावरि बसुनि गडे धुडकावूं ढग सगळे
चांदण्यांत उमलवुं या हृदयांतिल कमलकळे

निवळ करूं चतुर करें झांकळलें खिन्न तळें
पाहुं त्यांत चंद्रकांत गगनाचें बिंब निळें

अधरांनीं दूर करूं उरलीसुरली शंका
नाशिवंत जीवनांत अमर करूं परमसुखा

मडगांव, ३-११-४१

## हरिच्या स्मरभुवनीं

सोड सखि ! येतें काकुळती
कुंजवनींचे रव रात्रंदिन व्याकुळ मज करिती

आर्जवें करिशिल सांग किती ?
कळतें मजला, दिसतें सगळें; परि नच अन्य गती

दूर कर केशरची वाटी
चांदण्यांत मी बुडवुनि काढिन अंगाची कांती

ललाटीं माझ्या स्वैरपणा
आवळुनी हे केश बांधितां होइल काय उणा ?

रेशमी शाल नको चोळी
मधुचंद्रोदयिं बसेन लेवुनि छायांची जाळी

रिते मज येथिल मणिमोती
दाटति आटति अश्रु, चार पळ जैसे गणगोतीं

अमोलिक जरि ते तुज गमती
कालिंदीचे तुषार निळसर घे अंगावरतीं

नगांचें काढ झणीं ओझें
या भारानें दुरावेल मज अंतिम घर माझें

जेधवां हृदयीं धरिल हरी
सालंकृत तनुभागा मुकतिल परमामृतलहरी

घालिसी लोभ वृथा इथला
पाय सखे जरि रुतला, येथें प्राण तिथें रतला

वराया तनु येवो नवरा
भरोत अनलानें, लवणानें पितरांच्या नजरा

येथले पाश अतां तुटले
देहसुखा जें भुललें जग त्या मन माझें विटलें

भुले जो केवळ देहसुखा
स्पर्शं का तो शकेल उजळूं हृदयांतील अलका ?

असा तुज काय रुचेल सखा ?
जीव हिरावुनि गेला त्याला म्हणशिल का परका ?

हिणव, म्हण अगणित त्या दयिता
अगणित सुमनें फुलवि म्हणुनि का हीन गडे सविता ?

नको मज ठेवूं गुंतवुनी
लग्नघटीनें ठरेन जारिण क्रूर न हो सजणी

देइं सखि ! देइं कान जरा
प्रवालपाशांपरि रव येती न्याया मजसि घरा

लाजरें जळ कां तव नयनीं ?
चल, पळ जाऊं, सखे ! विसावूं हरिच्या स्मरभुवनीं

केपें, ४-११-४१

## काळोखांतलें वाचन

काळोखाची काळी मखमल
क्षितिजवर्तुळीं ओढुनताणुन
कलाबतूनें भरिते रजनी
निज स्वप्नांचीं फुलें चिरंतन

मराठी ग्रंथ

काळाचा हा चिरजीवनपट
        कितिदां मीं लोकियला टकमक
आज सखे ! परि तव करपाशीं
        रहस्य उकले मला अचानक

काजळला हा जीवनपट मम
        असाच हृद्याजवळी घेउन
प्रीतीच्या विद्युत्तंतूंनीं
        नक्षत्रांसम भर अक्षरगण

जगत उद्यांचें पाहिल टकमक
        अंधपणांतिल डोळस लखलख
वाचुनि सार्थक करिल जिवाचें
        अमुच्यापरि कुणि रसाळ वाचक

८-११-४१

## एक सायंचित्र

लाल केशरी गुल्मोहरचे क्षितिजीं फुलले तुरे
आणि फुटाण्यांपरी उडालीं दिपलेलीं पांखरें

सर्कशींतल्या बालकांपरी धीट चपल कोंकरें
आढ्यावरुनी खुडीत होतीं कोमल पानें त्वरें

बिंब तयांचें होतें पडलें निळसर ओढ्यामधें
गार उन्हांतिल चित्र दुहेरी तरळत होतें मुदें

हिरव्या कांचेचीं पोफळिचीं झळझळलीं झावळें
कुळागराचे खांब रुपेरी थरारुनी थांबले

सुवास चांफ्याचा कुजबुजला न कळे आला कुठून
आणि कुणाचें गुपीत गेला वाऱ्यावर उलगडून

स्मरकवनाचा चरण माझिया स्फुरला ओठांमधून
कंकणरव हासला अचानक, त्वरित पाहिलें वळून

शब्द थबकले वदनामधले, स्तिमित जाहलों तदा
वीज निघाली डोळ्यांपुढुनी तुडवित जलसंपदा

स्वरांवरी ते गुंफित गेली धरित तांबड्या निऱ्या
गौर वांकुल्या दावित गेल्या भिजलेल्या पोटऱ्या

कवन जाहलें पुरें तरीही सळसळती झावळें
खळबळतें मनिं काय कळे ना, ऊन मात्र मावळे

बोर्डी, १४-१२-४१

## आगीचें पांखरूं

आगीचें पांखरूं खुळें हें आगीचें पांखरूं
कशास त्याला कुसुमकरांनीं उगाच बघसी धरूं ?

पंख तयाचे इंद्रधनूचे
लांबुनीच गे पहावयाचे
पळभरहि न तें स्थिरावयाचें वायूचें लेकरूं

सोन्याचा जरि तुझा पिंजरा
माणिकमोत्यांचा जरि चारा
राख तयांची माखुनि जाइल, नको तया आवरूं

पेटवितें तें उडुनी भुवनें
आणि गाउनी उजळी गगनें
चंचलता दाहकता त्याची नको तरी विस्मरूं

रक्त स्वतःचें पिउनी जगणें
त्या धुंदीनें गाणें, उडणें
अशा जिण्याच्या जिवास धरुनी नको सुखा अंतरूं

मुंबई, २५-१२-४१

## दुखणाइत दिवा

दुखणाइत हा जळे दिवा !

खोकत खोकत काजळ ओकत
कुजट करी ही दमट हवा

बघति त्याकडे जीर्ण चिरगुटें
मडकीं, डबडीं, आणि तवा

दीन बालकें रडुनि झोपलीं
पोटीं आवरुनी वणवा

कृश देहांच्या चिंध्यांवर त्या
नाचति डांस तशा पिसवा

लाज सांवरुनि बसे चुलीशीं
माय, कपाळीं क्रूर उजवा

नसे दारुची तिजला आतां
वा लाखोलीची परवा

मुख पांडुर, अविकारी अविचल
सधवा असुनी ही विधवा

थांब मुशाफिर ! हिच्या मुखावर
वाचूं ये संदेश नवा !

२५-१२-४१

## काळास

या जुळ्या कळ्यांतुनि खुडणें तुज जरि एक
ने मलाच आधीं, हुंगुनि घे वा फेंक
पण नकोच ! सखिला असह्य तें व्हायाचें
अन् फुलण्याआधिंच रूप तिचें जायाचें !

त्याहुनी अशी ही असतांनाच सुरेख
लावण्यें तिच्रिया शिखा तुझी तूं रेख
मरणाहुनि दुःसह कळ ती मी साहीन
सौंदर्य तिचें स्थिरचरांत अन् पाहीन

जळतांना गाउनि दीपक होइन धन्य
मल्हार आळवुनि पाडिन वा पर्जन्य
लावण्य सखीचें उपसुनि हृदयामधुनी
तिज करिन अमर मी अनंत अंतःकरणीं !

दुर्दैवविलसितें परी जरी कधिं काळीं
दिसणार दुपारीं अवस आंधळी काळी
प्रीतिचा जरी सखि-हृदयिं अंत होणार
मज ठार करुनियां भेद तिचें जिव्हार

घण पडतां हीरक पाडिल द्युतिचा सेक
ती होइल अधिकच प्रेरक आणि सुरेख !

१९४१

## लाव दिवा

लाव दिवा ग लाव दिवा
दिवा मुखाचा तुझ्या साजणी पुन्हा पहाया मला हवा

हवा शितळली, शुक्र उतरला, ओसरला सारा थकवा
भाव उमलला नवा, तयावर आठवणींचा झुले थवा
मनीं गोडवा, अंगिं गारवा, शहारला ओठीं हलवा
उजेड कर सखि ! जिकडेतिकडे, सुखा न त्याविण रंग नवा
लाव लवकरी दिवा सहचरी ! जीव खुळा झाला हळवा

१९४१

## दे वर दे हृदयस्थ चिरंतन

दे, वर दे, हृदयस्थ चिरंतन
जीवन माझें अखंड पूजन

शरीर झालें मंगल मंदिर
अभिलाषांचे जळती झुंबर
आकांक्षांचें नर्तन सुंदर
नव आशांचें सुमधुर गायन

प्रीतिसुधेची धार तुझ्यावर
स्मित-अश्रूंचे पदीं तुझ्या सर
अहंपणाचा प्रदीप्त कर्पुर
स्वरपात्रांतुनि नवरसभोजन

सेवुनि हसतां पिंडमूर्ति तव
ब्रह्मांडाचा झाला आठव
अग्निकणीं जणुं प्रकाशलाघव
हे नितनूतन, सत्य सनातन !

या निमिषाच्या दर्शनमात्रें
गमलें मज, तुज विश्वहि अपुरें
सात वितींचीं विफल मंदिरें
अमर्याद तूं, तूं चिरवर्धन

कांपो मंदिर, ढळोत झुंबर
आकांक्षांचे बनोत प्रस्तर
आशा मूर्छित पडोत भूवर
बघुं दे मज तव विराट दर्शन

समिधांतुनि जैसा वैश्वानर
प्रगट तसा प्रभु त्रिभुवनसुंदर
मरणांतुनि मम भंगुर नश्वर
मृत्युंजय मज दे नवजीवन

मडगांव, १२-१-४२

## माझा छंद

माझा छंद दिवाणा
न कळत मन्मुखिं सुंदरतेचा तरळे तरल तराणा

येइ जगा स्वप्नाची कांती
श्रमितांतरिं सुरुचिर विश्रांती
कलहिं फुले ज्योतिर्मय शांती
दूध फुटे पाषाणा !

येइ धार ललनांच्या नयनां
जनसेवानिरतांच्या वचनां
निद्रारत जनतेच्या स्वप्नां
अन् कुदळीस, कृपाणा

जळुनि जाय मोहुनि भस्मासुर
कलि पातालीं करि देशांतर
कालमुखांतुनि उठे युगांतर
जीवन येइ उधाणा

स्वसुखास्तव जरि गुणगुणतों मी
हर्ष कणकणीं उधळी स्वामी
प्रकाश पाडुनि अंतर्यामीं
सोडवि गहन उखाणा

या छंदानें मुकलें घर जरि
रत लोकत्रय पाहुणचारीं
स्वागतार्थ ये धावुनि दारीं
अडला जेथ शहाणा

३०-२-४२

## असशिल जरि रसनिधि तूं

असशिल जरि रसनिधि तूं सृष्टिचा विधाता
होशिल तरि मुदित खचित श्रवुनि मदिय गाथा

सृष्टि तुझी मूर्ति जरी
मानवता कीर्ति खरी
तत्कीर्तनिं रमशिल तरि मजपरी अनंता

प्रिय तुज जरि सुंदरता
जीवांतिल चिर-नवता
तद्वर्धनिं होशिल तूं दिव्य-दीप्ति-दाता

तूं जरि नय-सत्य-पाल
अमितांचें बघुनि हाल
उठतां देशिल सशस्त्र मज सहस्र हातां

मी जरि तव कृति अनुपम
मजहुनि कृति सुंदर मम
लोकुनियां सुखभरांत झुलविशील माथा

प्रेम जरी तव मजवर
येशिल भरिशिल अंतर
शोधणार मागणार मी न कांहिं आतां

केपें, ३-२-४२

## कशास येशी दारीं ?

कशास येशी दारीं देवा होउनि दीन भिकारी ?

लाजिरवाणी घेउनि दीक्षा
किती युगें बघतोस परीक्षा
मानवतेची करुनी रक्षा
अपुल्या भिक्षापात्रीं

या तुझिया दीक्षेच्या पोटीं
भुतें निघालीं अनंत कोटी
मसण जाहलें जग, जगजेठी
दिवसा आणि दुपारीं

असुनी तूं निर्माता ईश्वर
अन्नास्तव कां सदा कलंदर
पहा जरा, तव धनराशींवर
जागति नाग विषारी

ज्यास भिकेचे होति डोहळे
अंध होय तो असुनी डोळे
असो त्रिलोचन, तोही लोळे
निजरक्षेमाझारीं

पहा करींची करटी उलटुन
तिजपरि रुद्रा ! तूंहि त्रिलोचन
उघड नेत्र, येउं दे हुताशन
नरकुलसंकटहारी

लोळण घेतिल भुतें अनावर
भुजंग होतिल कंठिं वळेसर
सुवर्णयुग येईल जगावर
सिंचित सुख संसारीं

मडगांव, ४-२-४२

## समुद्रकांठच्या चांदरातीस

कवण चंद्रकिरणवसन तूं रसज्ञ मालती
शांतिगीत गात गात पातलीस खालतीं ?

सिंधु हा प्रसन्न मोर
नाचतो मुदें समोर
प्रीति तूंच, गीति तूंच, भाससी सरस्वती

हें तुझें सताल गान
ने हरून देहभान
स्वप्नरूप होति सर्व सानथोर आकृती

येति नेत्र पेगळून
जाति अश्रुही थिजन
न्हाति दिव्य अमृतांत इंद्रियांचिया स्मृती

ये फुलोन रोम रोम
त्यांत ये भरोन सोम
पुष्पतुल्य होति तेच इंद्रियां अलंकृती

सोडवूनि गात्रपाश
जीव जाय सावकाश
सेवि जीवनोगमीं रसाळ शीतला द्युती

मंतरून शीणभाग
गा असाच शांतिराग
एकरूप होति ज्यांत नीज, स्वप्न, जागृती

मडगांव, ६-२-४२

## विफलतेंतील सफलता !

असंख्य रे, तव दयिता रमणा ! कसें कळावें तुला ?
लपुनि करावें प्रेम असा हा स्वभाव अमुचा खुळा !

खुळी मीहि रे, दुरून बघतें धुंद तुझे लोचन
सतेज गगनें त्यांत बिंबती सकाळ-सायंतन
वेध कशाचा जडे तयांना, जाति कुठें पाउलें ?
कशामुळें तुडविल्यावरीही दिसती न तुला फुलें ?

जीव वेंचुनी फुलें पसरिलीं तुझिया मार्गावर
पाय तयांवर पडतां गमलें, थांबशील क्षणभर
वळुनी बघशिल आगेंमागें विचल होउनी मन
याचसाठिं लपुनियां भटकलें मी तुझियामागुन

होतें गमलें, पाहिन माझें रूप तुझ्या लोचनीं
आणि नयन तव जडवुनि घेइन हृदयाच्या कोंदणीं
कथिलें जीवा : तृषार्त होउनि धरिशिल तूं ओंजळ
करीन हलका ऊर खोलुनी हें तटणारें जळ

गोड गोड याहुनी किती तरि भरलें होतें मनीं
मुशाफिरा ! गेलास फुलांसह हृदयहि हें तुडवुनी !
तरिही राहिन मूक, पुढें जा, घे तेजोदर्शन
इथेंच मी तव पदमुद्रांचें करीन रे पूजन !

सफलतेंत विफलता शेवटीं दिसेल का पण तुला ?
विफलतेंत सफलता पाहणें स्वभाव अमुचा खुळा !

केपें, १४-३-४२

## वृद्ध होऊं तेव्हां

जेव्हां घालिल काल जातिसुमनें शीर्षीं गडे आपुल्या
जेव्हां होतिल दाट दीर्घ सरत्या वाटेंतल्या सावल्या
जेव्हां पैलथडीहुनी श्रुतिपथीं येतील घंटारव
जेव्हां मांडिल इंद्रजाल अपुलें या सृष्टिचें लाघव

तेव्हां जातिसुगंध कोंडुनि उरीं गे आर्त होऊं गडे
गुंफोनी कर पाहुं थांबुनि जरा तेजाळलेले कडे
त्यांचें दर्शन घेउनी वळुनियां पाहूं सखे मागुतीं
जें पावेल इथें विसर्जन, कधीं येईल ना संगतीं

तेव्हां पुत्रसुता सुखें स्मरवनीं होतील क्रीडारत
त्यांना पाहुनि यौवनक्षण करूं आम्ही पुन्हा जागृत
स्मृत्यालंकृति घासुनीपुसुनियां गे एकमेकांप्रत
लीलेनें स्मरवाटिकेंतच करूं आपाद सालंकृत

सौंदर्यें नव, बोहल्यावर चढूं, साधूं घटीं गोरज
'होवो दंपति ही चिरायु!' सुभगे! गातील देव, द्विज

झारवाग, १४-३-४२

## तूं येणार म्हणून

तूं येणार म्हणून मीं नमविलीं कल्पाद्रिच्चीं मस्तकें
उत्साहें खुडिले स्यमंतक-मणी तद्वक्ष भेदूनियां
त्याच्या दिव्य सुता स्वरूपसरिता मीं दृष्टिनें जिंकिल्या
रत्नें आणि विभूषणें मिळविलीं शस्त्रास्त्रतीर्थोदकें

झुंजोनी गरुडासवें कलविला मीं अमृताचा घट
सारा विश्वविषांतला विझविला विक्राळ दावानल
नक्षत्रें खुडुनी पुनःपुनरपी भूमींत या पेरिलीं
कारंजीं हृदयांतलीं उडवुनी दिङ्मंडलें रेखिलीं

अग्नीचे उपटूनि दांत रचिली ही दीपमाला इथें
इंद्राचें उडतें सुखासन निळें मीं घातलें पालथें
मानव्योदधि मंथुनी सकलही रत्नावली आणिली
कौशल्यें तव अर्चनार्थ ललिते! या मंदिरीं मांडिली

या व्यापांतच यौवनास मुकलों—सर्वस्व झालें वृथा
सम्राज्ञी! वर थोर जे मिळविले ते शाप झाले अतां!

मुंबई, २२-३-४२

## मी चढुनी येतां

मी चढुनी येतां विजयाचीं सोपानें
गौरविसी लोचनदीपारतिच्या मानें
राटांत लोकितां वळते दृष्टी खालीं
दिसती पद भरले शतबांधव-रक्तानें

हें जीवन सुकतां रखरखत्या गद्यानें
कंठाची सुरई भरिसी स्वरमद्यानें
परि त्यांत रंगतां आर्त जनांचे श्वास
टाकितात पोळुनि हृदयांतिल उद्यानें

आणितां पिसडुनी लाख पिसें कनकाचीं
तूं कुशल करांनीं शेज सजविसी त्यांची
परि जरा पहुडतां तींच होउनी ज्वाला
किंचाळत करिती राख सुखस्वप्नांची

रत्नाकर घुसळुनि हृदयाचा दिनरात
मी करितों अद्भुत रत्नांची बरसात
परि त्यांस लोभतां उठे हलाहल त्वेषें
सर्वस्व गिळाया मांडित ये आकांत

जोगेश्वरी, ३०-३-४२

## सागराला आली जाग

क्षमा करीं थांबवेना सागराला आली जाग
चंद्र आला डोईवर ढगांची हो पांगापांग

उजळली आपुलाल्या दिव्य प्रवासाची वाट
मोह घाली परी तुला कांठच्या हा थाटमाट !

चंद्रींचे हे ग दिवे रात्रीसवें विझायाचे
शराबीचे कांचपेले पितां पितां फुटायाचे !

भुलायाचें फसायाचें येथ असेंच व्हायाचें
अनुभवावीण परी तुला नाहीं कळायाचें !

नाहीं राग तुझ्यावर जरी गुंतलीस येथें
जातां सोडुनियां तुला मात्र काळीज तुटतें

सये, जातीच्या नाखव्या वेळ येतां थांबवेना
तुझ्यावीण जाय तारूं परी जिवा जाववेना !

गात गात तुझीं गाणीं संपवीन तरी वाट
तुझ्यासाठीं ठेवीन या शुद्ध रुधिराचा पाट

रात्रीसवें धुंद तुझी जेव्हां सये ओसरेल
क्षितिजांत पांढरें हें टोंक शिडाचें दिसेल

तेव्हां नको बोल लावूं डोळां आणूं नको पाणी
तुझ्यावरल्या प्रीतीची जाण तीच गे निशाणी

वाट काट वेगें जी मीं तुझ्यासाठीं केली सोपी
स्वप्नें संपतां येथलीं तेथें जाऊं गाढ झोपीं

१-४-४२

## सांध्यसुंदरी

इंद्रनील चंद्रकांत सांध्यसुंदरी ही
येइ हसत मधुर मंद विश्वमंदिरीं ही

उंबऱ्यांत धुउनि उन्हें धूळ माणकांची
मूर्ति सजल-पारिजात-कांत पावलांची
नेसुनि ये वसन नरम तलम अंजिरी ही

मंदानिल दुडदुडुनी बिलगले पदांला
उचलुनि त्यां मृदुल करें लाविलें उराला
चुंबुनि त्यां मोहरली स्नेहमंजिरी ही

कुरवाळुनि बोलवि ही बोबड्या खगांना
लावुनि गालांस बोट खुलवि वल्लरींना
एक एक नवलदिवा लावि अंबरीं ही

पिककंठी जलवंती उघडुनी उराला
दावि इंद्रचापवर्णचित्ररत्नमाला
कुजबुजली गुज तिजशीं स्वर्गमाधुरी ही

झाले छायार्द्र नेत्र भूमिमाउलीचे
वात्सल्यें जड झाले पयद गाउलींचे
स्वागत हें भावोत्कट बघुनि बावरी ही

व्यथित मना ! कर जोडुनि स्मर 'शुभं करोति'
स्थिरचर एकाग्रचित्त जाहलें सभोतीं
वाहाया तुजवर ये शांतिनिर्झरी ही

३-६-४२

## त्री स

आवर जळ नयनींचें रमणी
नातरि होइल प्रळय त्रिभुवनीं

चुकुनी पडला थेंब एक जर
पिचेल धरणी, खचेल अंबर
हताश होतिल ब्रह्मा-हरि-हर
पडेल स्वर्गहि कोसळुनी

तुवां भोगिल्या प्रेमयातना
दुःसह दारुण प्रसववेदना
यशीं होमुनि रूपयौवना
दिव्य विश्व सृजिलें हसुनी

आशेसम तूं कन्या सुगुणी
चंद्रकलेसम प्रेमळ भगिनी
प्रिया उषेसम सुखसंजीवनि
गंगेहुनि वत्सल जननी

म्हणुनि उरा तव फुटतां पान्हा
देवहि लोभुनि झाला तान्हा
विसरुनि अपुला पोरकेपणा
चिरंजीव झाला पिउनी

तोच पिउनि परि आम्ही मानव
कृतघ्नतेनें झालों दानव
रक्तस्नानीं गणुनी गौरव
हाय ! तुडविलें तुज चरणीं

स्त्रावें थकलों, थिजले अवयव
शुभगीती करिती करुणारव
तुझ्या दयेचा होउनि आठव
मन अनुतापें ये जळुनी

कितिदां केली तुझी वंचना
दिल्या मदभरें अमित यातना
अंत न जाणे परि तव करुणा
धावत येशी कळवळुनी

केर्पे, ६-९-४२

प्रभुनें रचिलें दूध तुझ्या स्तनिं
अम्ही मात्र गे तोय लोचनीं
कठिण समयिं या परि हें विसरुनि
'क्षमस्व मे' मांगल्यखनी

केपें, ६-९-४२

## कुसुमाग्रजास

घन तमीं प्रगटली तुझी जेधवां कविता
अवतरली गमलें अग्नीची सुरसरिता
कल्लोळत आली नागिण जणुं दुखलेली
ॐकाररूपिणी अवमानित मानवता

हा भागीरथिचा ओघ दिव्य शब्दांचा
यज्ञदग्ध उज्ज्वल अश्रूंचा—रक्ताचा
संजीवक प्राणच्च ये तव वितळुनि किंवा
उद्धार कराया दलित सगरपुत्रांचा

शारदाच्च वा ही कोपुनि झाली काली
व्यथितांची ऐकुनि घोर करुण किंकाळी
साम्राज्य बळींचें स्थापाया जगतांत
हाणीत खड्ग ये बलोद्धतांच्या भाळीं

ही तुडवित येई क्षुद्र भोग-शृंगारा
नव विश्व सृजाया करित निघे संहारा
स्वकरेंच निखारा ठेवुनि स्वार्थावरतीं
ही अतिरति झाली मदनारीची दारा

चालुं दे हिचें रणतांडव विक्रमशाली
उठुं देत स्मशानामधून कोटि मशाली
प्रळयांत जळुनि या नरकासुर अंधार
होउं दे पहाटेआधिं दिशांत दिवाळी

केपें, २६-९-४२

## सागरास

आलों चालुनि वाट युगांची
आणि गांठिला तुझा किनारा
शिणल्या शरिरावरी तरारे
तव लाटांपरि दाट शहारा

गेला दिन मन खोलुनि जळतें
वाहुनि तुज रक्ताची ओंजळ
वितळूं लागे मधु रजनीच्या
निळ्या निळ्या डोळ्यांतिल काजळ

क्षितिजाच्या झिलईत नाहलें
धवल शिडाचें निश्चल तारूं
पडे दिशांच्या अष्टदलावर
भग्नपर्ण जणुं फूलपांखरूं

हरवुनियां कंठांतिल माला
शिणुनी फिरले खग माघारे
छायांच्या रायांत थरकले
हिरवेकाळे लाख मनोरे

चढवित पारा चंद्र चितारी
तरि कांचेची निळी इमारत
चंचलतेनें काढूं पाहे
भंगुरतेवर चित्रें शाश्वत

मींहि कैकदां तव पुलिनीं या
रचिले सुंदर किल्ले, इमले
मोहुनियां रत्नांच्या मोलें
किती वेंचिले शंखशिंपले !

आनंदाच्या निळ्यापांढऱ्या
लाटा नच मावुनियां पोटीं
तुझ्याच परि मी गात लोळलों
कर्पुरकणिकांच्या या कांठीं

सुगंधजाळीं बांधुनि नंतर
जधीं विंधिलें मला फुलांनीं
स्फटिकाच्या पात्रांतुन दिधली
तूंच लाल फेसाळ वारुणी

धुतल्या जखमा आळवीत तूं
क्षितिजींचीं सोन्याचीं गाणीं
विष हृदयांतिल वाहुनि नेतां
तुझें जांभळें झालें पाणी

सखिला मानुनि मानसकन्या
दिले इथें तूं मज नजराणे
छंद तराणे गाउनि झालों
कधीं शहाणे, कधीं दिवाणे

बाल्य निमालें, सरली मादक
तरुणपणाची नवी नव्हाळी
लाख भुकांची, लाख मुखांची
आली कानीं हांक विखाळी

श्वासें त्यांच्या राख उडाली
लकाकलें हृद्यांतिल स्थंडिल
अमृत, वारुणि पुरति न आतां
लाख पशांतुन आण हलाहल

जळो, जळो स्वास्थ्याचें कुंपण
दुबळ्या आकांक्षांचें घरकुल
तुझ्यापरी रुधिरांत उठूं दे—
अखंड धडपड, अखंड तळमळ !

कळे मला कां म्हणती तुजला
रत्नाकर, तीर्थांचें आगर
शिकव जगाचें दुःख गिळुनियां
फळांफुलांनीं भरण्या डोंगर

थकतां माथा असाच दे मज
मायकुशीसम तुझा किनारा
नश्वर नेत्रांपुढें असूं दे
ईश्वरतेचा सदा पसारा

केपें, १९-११-४२

## आमुचें निशाण

चढवूं गगनिं निशाण आमुचें
चढवूं गगनिं निशाण
कोटि मुखांनीं गर्जूं जय जय स्वतंत्र हिंदुस्तान

निशाण अमुचें मनःक्रांतिचें
समतेचें अन् विश्वशांतिचें
स्वस्तिचिन्ह हें युगायुगांचें ऋषिमुख-तेज महान

मूठ न सोडूं जरि तुटला कर
गाऊं फासहि आवळला जर
ठेवूं निर्भय ताठ मान ही झालें जरि शिर्काण

साहूं शस्त्रास्त्रांचा पाउस
आम्ही प्रल्हादाचे वारस
सत्य विदारक आणूं भूवर दुभंगून पाषाण

विराटशक्ती आम्ही वामन
वाण आमुचें दलितोद्धारण
नमवूं बळिचा किरीट उद्धव ठेवुनि पादत्राण

हिमालयासम अमुचा नेता
अजातशत्रू आत्मविजेता
नामें त्याच्या मृत्युंजय हें चढवूं वरतिं निशाण

७-३-४३

## हें नभ नक्षत्रीं भरलेलें

हें नभ नक्षत्रीं भरलेलें
दाटे जगिं जरि काजळ काळें

मना ! पहा वर पुसुनी डोळे
उमले श्रीमुखकमल सावळें
कर गुंजारव, गंध दरवळे
तेजोमय मधु पी भावबळें

मधुपानें या धुंद होउनी
कज्जलवसना बघ ही अवनी
गमेल ती तुज विश्वमोहिनी
नक्षत्रें होती हिचीं मुलें

ज्योतिर्मय जें कमल फुले वर
कंद तयाचा तूं अजरामर
भंवतीं जरि पंकाचा परिसर
जीवनसर सुंदर त्याचमुळें

भ्रमर चतुर तूं, तूं रसभोक्ता
कंद अचल तूं रसनिर्माता
मुक्तस्वर तव वरवर जातां
नवलक्ष वात जगतीं उजळे

न कळे कुठलें नभ, कुठलें जग
तुझीच जिकडेतिकडे झगमग
याच लोचनीं याच देहिं मग
बद्ध असुनि सायुज्य मिळे

केपें, १-४-४३

## मनमोरास

मनमोरा ! कर आनंदुन नवनर्तन रे
निळे निळे जलकलश चालले यक्ष जणूं गगनांतुन रे

असाच कर स्वच्छंद विहारा
फुलवुनि तव नवरत्न-पिसारा
दिग्दर्पणिं बिंबुनि वाङ्मोहिनि दे दर्शन, उत्तेजन रे

छाया लगबग पसरिति मखमल
सुमलतिका शिंपडिती परिमल
शतकंठीं स्वरवाती लावुन त्रिभुवन करि अभिनंदन रे

मोहुनि येती यक्ष धरेवर
होउनि नर्तक नागरूपधर
जडपद तरुव्रालाही सजल्या बांधुनि मौक्तिक-पैंजण रे

कनकहंस बघ क्षितिजसरोवरिं
अनुसरुनी तुज वळे परोपरि
प्रतिपद्मीं रसपराग नाचति अद्भुत कीं माणिककण रे

उल्हासुनियां ये बघ तेथुनि
जीवनदायिनि भुवनविकासिनि
पृष्ठीं तव आरोहुनि अवचित करिल जगीं संमार्जन रे

केर्पे, ५-४-४२

## गुरुवरमूर्तीस

किति लवति शिरें किति कर जुळती
बघ क्षणभर तरि गुरुवरमूर्ती

कृतज्ञ किति बा सजल पापण्या
तटस्थ, उत्सुक तुझ्या दर्शना
किती फुलें तव अंत्य तर्पणा
किति निरांजनें वाती जळती

मराठियेचीं पुरें, मंदिरें
संमार्जित अजि तव सुविचारें
अनुद्वेगकर तुझीं अक्षरें
नंदादीपांसम पाजळती

पारिजातसा सेवातरु तव
धरणीवर ओतित सुमवैभव
दिगंत नेई तव गुणगौरव
सद्‌गंध वंद्य हे दरवळती

स्थितप्रज्ञता, मधुर साधुता
अलांछिता अभिजात रसिकता
बघुनि बृहस्पति डोलवि माथा
देवहि तव मानव्या भुलती

हे चिरशोधक ! स्वयंप्रकाशक !
वाट बघति जरि शुकसनकादिक
कृपाकटाक्षें तव उद्धारक
करिं इथेंच तुजपरि अम्हां कृती

केपें, १८-४-४३

## नकोच पाहुं वळून

नकोच पाहुं वळून, सखे जा
नकोच पाहुं वळून
काल दिलेल्या वचनाखातर नकोच राहुं खिळून

सखये ! पाषाणासहि न रुचे
नीरस पूजन निर्माल्याचें
थांबुं नको जर नववचनांनीं येशि न तूं बहरून

शिकलों करण्या पंख मोकळे
नित्य नवनवें क्षितिज लोकिलें
व्यर्थ सर्व ! मीं धरिलें जरि तुज वचपाशीं बांधून

खरींच होतीं वचनें सारीं
जणूं मंदिरें सरितातीरीं
दुर्दमगति परि आहे जीवन बलवत्तर त्यांहून

अनंत त्या जरि वळणें, वाटा
सकळ धावती सागरकांठा
खिदळत नाचत गात गडे जा मी ऐकेन दुरून

खुळे, वृथा कां नीर लोचनीं ?
अधर कोवळा धरिशि दाबुनी ?
थरथरते कां वात दिव्याची तव पदराआडून ?

धन्य जाहली हृदिंची ज्वाला
तिनें जधीं तूं दीप लाविला
संजीवनसुख मेळविलें मीं अनंत मरणांतून

ज्या स्नेहास्तव सखि तूं आतुर
आण तया तेजाचा मोहर
स्मरपथिकांची वाट उद्यांची आजच जा उजळून

२८-४-४३

## द्राक्षांचा घोस

दिलें रविनें ज्या तेज सोनियाचें
मेघराजें शिंपणें मोतियांचें
अशा द्राक्षांचा गोड गोड झेला
कुण्या आईनें दिला कन्यकेला

बालिका ती तों दूर बंधु पाहे
शिदोरी जो पितयास नेत राहे
"वाट शेताची दूर किती दूर
भाउरायाचा मावळेल नूर

तहानेनें होईल जधीं क्लांत
रसें याच्या होईल क्षणीं शांत."
विचारें या मागून धावली ती
हाक होती घालीत तिची प्रीती

ऐकुनी ती तो थांबला, रिझाला
भेट घेउनि ही तुष्टला, निघाला
सुता आईला कळों न दे वार्ता
प्रीतिमाधुर्यें जाहली कृतार्था

आणि चित्तीं तो स्मरे पितृमूर्ती
सूर्यतापीं घामांत न्हात होती
पिता दिसतां त्या दाटला उमाळा
घास तेणें मग त्यास अर्पियेला

मनीं हर्षुनि तो स्मरे अंगना ती
माय चिमण्यांची, सती, प्रीतिमूर्ती
घरीं आहे उपशीत कष्टराशी
अर्धपोटीं अथवा पुरी उपाशी

प्रेमभावें या गृहा तयें नेला
विश्वमोलाचा भाग्यवंत झेला

केपें, २६-७-४३

## उर्वशीस

कमळशी ये भूवर उर्वशी
मंथनीं उमलुनि आलिस जशी
ज्या निरभ्र रूपीं वेध मला लाविशी

मनांतिल खलुनि ऊनचांदणें
जगांतिल विव्हळणें, हासणें
ये फेनमूर्ति ! ये उधळित हिमदर्शनें

फुलांचें वरुनि स्वप्नमार्दव
कलांचें चंचल रसलाघव
ये गात्रिं मुसावुनि मिथुनोत्सुक आर्जव

झुगारुनि प्रतिभेचीं कुंपणें
प्रभेचीं स्फटिकवर्ण झांकणें
सौंदर्यबंधनें अथवा ऋतलांछनें

विटे मन सांकेतिक जीवना
येथल्या आभरणां-भूषणां
ये उधाण आणीं अमुच्या चिरयौवना

उघड ते नेत्र विषें भिजलेले
ओठ ते वारुणिनें थिजलेले
भर हृदयसुधेनें उभय मदाचे पेले

जाळ हीं पापें तव नजरेनें
विसरवीं दुःखें सुखमदिरेनें
मांगल्य उरींचें फुलवीं अमरसुरेनें

चतुर्दश रत्नांची तूं शोभा
भुकेलें स्थिरच्चर तुझिया लोभा
स्वच्छंद जीवना ये ये कर आरंभा

दावुनी बिंबें नित्य निराळीं
भुलविसी आम्हां स्फटिकमहालीं
स्वर्गांत नेउनी लोटिशि कां पाताळीं ?

धराया तुज रुततों चिखलांत
अश्रुंच्या बुडतों तेजाबांत
कधिं नाहक न्हातों आमुच्याच रुधिरांत

धुरंधर लोळविसी पायांशीं
तुडविसी अमित तपांच्या राशी
कधिं ब्रह्मा-हरि-हर बांधुनि नेशी पाशीं

नसे ही प्रतिमांवर आसक्ती
तुझी ही अनन्य गे पद्भक्ती
कधिं दिव्य विरक्ती, लालस कधिं अनुरक्ती

तुझ्या या कुशल कुटिल लीलांनीं
फुले हें विश्व अनंत दलांनीं
हें हृदय रसाकुल झळके अमित कलांनीं

धन्य करिं त्या तव पदविन्यासें
भरीं हें चित्त अखंड प्रकाशें
रसगंधें भरिं हे अक्षय मदिय उसासे

८-१०-४३

## जपानी रमलाची रात्र

तुझें विजेचें चांदपांखरूं दीपराग गात
रचीत होतें शयनमहालीं निळी चांदरात
रतिरत कुक्कुटसा कुंडीवर आरोहुनि माड
चोंच खुपसुनी फुलवित होता पंखांचें झाड
अद्भुत पंख्यापरि भिंतीवर आंदोलुनि छाया
लावित होती ताप जगाचा नकळत विसराया
धूप उसासत होता कोनीं रजताच्या पात्रीं
विचित्र रेशिमचित्रें होतीं रसावलीं गात्रीं
तुझा पियानो यक्ष जळांतिल होता निजलेला
मनांत गुंफित स्पर्शसुखाच्या स्वप्नांचा झेला

अन् म्यूसेचीं कवनें होतीं माझ्या हातांत
प्रतिचरणाला करीत होती धूम्रवेल साथ
जळत उसासत होतें त्यांसह अंतरांत कांहीं
होता चिमणा श्वान लोकरी घोटाळत पायीं
तोंच वाजल्या तुझ्या सपाता सळसळला घोळ
आलिस मिरवित चालीमधुनी नागिणीचा डौल
करांतुनी तव खिद्ळत आले स्तनाकार पेले
जळता गंधक पाच उकळती यांहिं रंगलेले
अभीष्ट चिंतुनि आम्हीं त्यांचे भिडवियले कांठ
सुरेहुनी तूं गडे भाजिले ओठांनीं ओठ
स्पर्शें तुझिया आणि पियानो थरारला सारा
मजसम त्याच्या कानशिलांच्या झणाणल्या तारा
गंधर्वांच्या दुहिता जमल्या करित पुष्पवृष्टी
हृदय मदाचें मोहळ झालें जडावली दृष्टी
पोहुं लागले तुझ्या रेशमी अलकांतिक मासे
हवा जाहली जड पान्यासम अंगांतिल वासें
आणि तरंगत डुलूं लागली नौकेपरि शेज
तों कांतींतुन तुझ्या निथळलें फेनाचें तेज
नखें लाखिया, दांत मोतिया, वैदूर्यी नेत्र
अवयव गमले चपल चिवट कीं मयवनिंचे वेत्र
कात सोडिल्या नागिणिचें तें नवयौवन होतें
विळख्याविळख्यांतुनि आलापित ज्वालांचीं गीतें
गरळ तनूंतिल गोठुनि झालें अंतरांत गोड
कळलें कां मज जडते देवां नरकाची ओढ
डोळे बांधुनि खेळत होतें जीवन मायावी
अंधपणांतच वितळत होतें भूत आणि भावी
तुझ्या जपानी भाषा-लिपिसम अगम्य सुंदरता
असुनी हातीं उरली दुर्लभ आली ना हाता

आजूहि तुज शोधितां कधीं ती रमलाची रात
पाठींतुनि जंबिया मधाचा घालि काळजांत !

२९-१०-४३

# अशांतीचें गाणें

अशांतिचें गाणें आतां जीवनांत यापुढें
गात रहा व्यथितांसंगें पिळवटून आंतडें

पहा मना जिकडेतिकडे तापला उन्हाळा
आटला जिव्हाळा, उठती चहुंकडून ज्वाळा
मिळे तुझें हिमगृह सगळें वितळुनी धुळीला
ओढुं नको डोळ्यांवरुनी अतां तरी कातडें

आजवरी झालें गेलें, मोह-खेद त्याचा
नको, जाण तोही होता अंक जीवनाचा
कलह सुरू होइल आतां प्रेय-श्रेय यांचा
करूं नको नाट्योत्कर्षी उगिच तोंड वाकडें

शांति कालची ती होती विश्वविस्मृतीची
आजची अशांती आहे आत्मजागृतीची
भूक जळुनि उजळायाची, भव्य प्रत्ययाची
सद्गतीस जाती जेणें यज्ञदग्ध लाकडें

सौख्यभोग या जगताचे कर्मभोग झाले
दलित-दालकांचें नुरलें दैव निरनिराळें
पाय तोडिले हातांनीं, तेहि थिजुनि गेले
तडफडे, झुरे, सुस्कारे विश्वहृदय बापुडें

स्पर्शकंप भरुनी त्याचा तूं असेंच गावें
मधुर आर्त आलापांनीं जग निनादवावें
वृष्टि अमृताची होइल त्याचिया प्रभावें
विझुनि दाह जाइल सारा, निस्तरेल सांकडें

२१-५-४४

## घास भरवतांना

‘दीपका’! मांडिलें तुला सोनियाचें ताट
घडविला जडविला चंदनाचा पाट

घरदार प्रकाशानें भरीं कांठोकांठ
दारीं आलेल्याची सोपी करूं पायवाट

घातली ताईनें तुला रंगांची रांगोळी
पित्यानें रेखिल्या गोड भविष्याच्या ओळी

घाशिली समई मीं ही केली तेलवात
दह्यांत हा कालविला जिरेसाळ भात

गा रे राघू, गा ग मैने, बाळाच्या या ओळी
मुखीं तुमच्याही घालूं दुधांतली पोळी

कुतू, काऊ, चिऊ, माऊ, या रे सारे या रे
सांडलेलीं शितें गोड उचलुनी घ्या रे

गुणी माझा बाळ कसा मटामटा जेवी
आयुष्यानें थोर करीं माये! कुलदेवी!

केपें, २६-७-४४

## निजल्यावर

आतांच लागला कुठें राजसास डोळा
चोरपावलांनीं सारे सानथोर चाला

घरीं बाई झाले फार ‘सरले’ ‘पोलारे’
त्यांत माझ्या लाडक्याची झोप जणूं वारें

खोडकर वाऱ्या, नको वाहूं सोसाट्यानं
पारव्याची झोप याची कवड्याचे कान

पावसा, येणार तरी ये रे मुकाट्यानें
झाडपेड मोडूं नको तोडूं नको पानें

उगी उगी ‘घुगी’ नको बाळा भेडसावूं
‘काक्या’ ओरडत नको उडूनियां जाऊं

काजव्या, रे पोरा, नको पेकाट पाजळूं
डोळ्यांच्या पाकळ्या बाळ लागेल रे चोळूं

उंद्रामामा, करूं नको गडबड हूं चूं
इंद्रचंद्रा घरीं बाळा फुलें दे रे वेचूं

केपें, २६-७-४४

## श्रावणदर्शन

गिरीदरींतुनि झरे—नव्हे हे हिरे उसळती निळे
ढगाढगांतुनि अन् पाऱ्यापरि ऊन गळे कोवळें

उदंड पाणी जिकडेतिकडे पाच फुले मोहरे
सुखें जडावुनि चढण उतरती सुस्त गुरेंवासरें

त्रिदोषशामक श्वास सोडिती मुनिसम वन्यौषधी
कुंकुम चर्चुनि देवगाउल्या न कळे आल्या कधीं

ह्रषी कुणी मंडूक संपवुनि उपनिषदाची ऋचा
रविकिरणांचें भस्म लावुनी उन्नवित बसला त्वचा

हवेंत फिरतें कुणी पांखरूं घुमत भिंगरीपरी
वर्ख रुपेरी लावुनि झुलती सुमनें दर्भांकुरीं

फुलली पत्री सुख सर्वत्रीं जीवन गात्रीं स्फुरे
कुरणांतुनि जल तुडवित-उडवित वागडती लेकरें

सुर्मा अत्तर घालुनि हिंडे वारा स्वप्नामधीं
परी नवोढा धुंदींतच ही गात चालली नदी !

सालंकृत हिरव्या हातावर गोंजारित पारवा
वनदेवी पंखांतुनि पळवी काय ? वदा, आठवा !

वडीलधाऱ्यां पोथी-कीर्तन घरोघरीं, मंदिरीं
सणसे दिन हे क्रमूं सुखानें आपण उघड्यावरी

विसरूं खंती पायांपुढतीं प्राजक्ताचे सडे
हसती युवती कटाक्ष त्यांचे भांगाहुनि वाकडे !

कृतज्ञतेनें उत्साहानें पाहूं मागेंपुढें
स्मरूं, आदरूं, आले, येतिल जे जे अमुच्याकडे !

केपें, २८-७-४४

## सा यु ज्य

लाविला मुला मज किती लळा
तुझ्यामुळें तुजहुनिहि मी खुळा !

तुझें बोलणें, तुझें चालणें
तुझें नाचणें, तुझें हासणें
त्याहुनि न दुजें चतुर देखणें
त्रिभुवनांत शोधुनि मिळे मला

उरलें आतां लेखन, वाचन
परिभ्रमण अन् तत्त्वविवेचन
तुझ्यांत रमलें मन रात्रंदिन
मज तुजविण न दुजा विरंगुळा

तुझ्या सुखें हें चित्त सुखावे
तुझ्या सहज लीलांत विसावे
त्वन्मय मी आजला स्वभावें
रे, तुझ्या व्यथेच्या मला कळा

तुझ्या दृष्टिंतुन मज जग नूतन
अनुभूतींतुन नित नवजीवन
प्रतिक्षणीं आनंद चिरंतन
दर्शनें स्पर्शनें दे उजळा

अनुतापाविण पाप वितळलें
ग्रहतापांतुन संचित फळलें
श्रेयहि प्रेयांतुनि आकळलें
उगवला कलंकांतून मळा

प्रभु ! तूं येउनि माझ्या पोटीं
कुळें तारिलीं शाणव कोटी
असें इथें निज चिमण्या ओठीं
सायुज्य दिलें तूं अजामिळा !

केपें, १९४४

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळ
अनुक्रम ........................ वि: ................
क्रमांक ........................ नों: दि: ............

## जीवनानुभूति

कुणी एकला पाषाण वनीं
विद्रूप, वेढब, भीषण काळा
उपेक्षा जगाची घेऊन भाळीं
खंगत मनांत होता बैसला :

"भाजत, भिजत, थिजत माझें
जीवन देवा ! चाललें झिजत
दुःखावरी डाग द्यावया आणीक
भोवतीं जगतें जगत रिझत

षड्ऋतु उन्मादें नाचत पहा
सर्वत्र वरांची करिती खैरात
उद्दाम परंतु पाउलें त्यांचीं
ठेचीत रहाती काळीज माझें

लतिका खिजवी टाकून फुलें
मेघ ओढिताहे जलाचे आसूड
तप्तमुद्रा सूर्य लावूनियां अंगा
चंद्रास धाडितो कुशल पुसाया

खगांना न सुचे दुसरा धंदा
जमून भोवतीं करिती निंदा
कां हा एकवट सर्वत्रांकरवीं
करूनि तूं माझा छळ हा मांडिला ?"

—पिचत असा पुसे तो पाषाण
प्रभूला आपुल्या छळाचें कारण

दुर्वासापरी तो तपला, क्षोभला
प्रभु न कांहींच तरीहि बोलला
उन्मत्त कोणी एडका मात्र
शिंगें तयावर घासून गेला

—आणि तोंच काय नवल वर्तले
अग्नीची ज्वाला उडाली त्यांतून
निघाली तयाच्या ललाटीं उटी
त्यांतून फुलला तृतीय लोचन

सर्व दुःख त्रास जळून निमाले
आथिलेपणाचाहि जाहला ग्रास
व्यासत्व तत्क्षणीं पावला पापाण
नक्षत्रांचें नातें अंतरीं आणलें

विश्वाकार दृष्टी जाहला लोकीत
वस्तुजातांतलें भारत प्रचंड
जीवन तेंच, दृष्टि ते वेगळी
सृष्टी ते सगळी वाटली आगळी

लतिका वाटलें फुलून आली
लोकून आपुलें आंतर जीवन
फुलांची ओंजळ ओपीत राहे
अंतरीं आपुल्या कृतार्थ व्हावया

गर्मे मेघें त्याला अभिषेक केला
भास्करें लाविलें रश्मींचें भस्म
चंद्रानें चंदन चर्चिलें अंगा
खगांनीं गायिली सांघिक आरती

तोंच चुकलेली कपिला आली
वात्सल्यें त्यावर दुभून गेली
दूध न वाळलें तोंच पावला
संसारसंत्रस्त मानव कोणी

सुखें मिळवून सुखास मुकला
बोलला तयाला पाहून, "अहाहा !
नमस्ते त्रिवार स्वयंभु लिंगा
तापत्रय माझे नेई रे भंगा."

भाकून अशी करुणा त्यानं
रचिलें त्यावर उत्तुंग मंदिर
चालले तेथें रुद्रांचे घोष
त्रिकाल नैवेद्य, त्रिकाल आरती

मंदिरीं आली विश्वाची शोभा
नक्षत्रतुल्य अन् दीपांची सभा
कीर्तनें, पुराणें, गायनें रंभांचीं
झुंबड उठली टाळांमृदंगांची

धन्य माझा जन्म, धन्य माझी कुळी
चार क्षण त्याला धन्यता वाटली
परी ती क्षणांत निमाली धन्यता
स्तंभांभिंतींतून किंकाळी फुटतां

तोडिल्या झाडांची, खुडिल्या फुलांची
भेदिल्या भूमीची, खोदिल्या चिऱ्यांची
तिच्याहिपरीस झाला तो कंपित
सर्वांगीं जाहला सहस्रध्वनित

वैभवीं गमे त्या बंदिस्त कुंठित
अनुतापें होई तप्त दीसरात
होई कधीं त्याला आकाश-आठव
ऋतूंचें स्मरे त्या नर्तन-पाटव

उदास आजला आणि तो पाषाण
पूजेनें तेथल्या होतसे विषण्ण
आणि ऐका काय वैतागून म्हणे
असह्य होऊन वैभवींचें जिणें,

"नको ही पूजा, ती उपेक्षा बरी
विश्वानुभूतींत सांगता खरी
छळांतहि आहे समृद्ध जीवन
पूजनीं या मात्र निरर्थ मरण !

घाल रे देवा, विजेचा पहार
क्षणांत करीं मंदिर-संहार
धरित्री माउली ! पोटांत घे वा
पाताळीं तरी करूं दे सेवा

सेवेंत जें सुख भक्तां या मिळे
पूजेंतहि तें गे मला न आढळे
दयेनें कंपित होई वा दुभंग
पुनश्च एकदां करीं गे निःसंग. ''

बेळगांव, ९-३-४५

## साद

एकच माझा साद ऐक प्रभु एकच माझा साद
पचूं न देई मला कधींही इवलासाहिं प्रमाद

स्वार्थें माझे मिटतां लोचन
घाल त्यांत अविलंबें अंजन
मोहिं गुंततां जरा कुठें मन मागें लाव प्रवाद

परदुःखावर शिजलें जें सुख
विटाळलें जरि तेणें हें मुख
या हृदयांतुनि त्या दुःखाचे उठवीं शत पडसाद

ठेच अचानक लाव पदांला
खोक पडूं दे अभिमानाला
पाज यशाची चढतां मजला चढला जरि उन्माद

कलेंतुनी घसरतां विलासीं
अथवा मुक्तत्वांतुनि दास्यीं
आग लावुनी आत्मसुखाला धुमसत ठेव विषाद

निष्ठा जरि मम दुबळी झाली
खचवीं भू झणिं चरणाखालीं
विकल करीं वरवंचित प्राणा कोंडुनि अंतर्नाद

विश्वनाट्यविकसनीं तुझ्या या
रंगत मजला हवें फुलाया
दयामया ! कविपति ! निजनियमा न करीं मज अपवाद

पापासरशीं देउनि शापा
सन्मार्गीं मज लावीं बापा !
जाणतसें मी तुझ्या घरीं प्रभु ! शासन हाहि प्रसाद

१५-३-४५

## भिडली रात्र पहाटे

माझें सुख मोठें, सुख मोठें, ठेवुं कळेना कोठें

उरीं उगवला आत्मसुधाकर जनीं चांदणें दाटे
बाग बहरले जिकडेतिकडे बोथट झाले कांटे
छायेसम मज गमलें खोटें, सत्यचि तें उफराटें
रसलंपट मी, तरि मज अवचित गोसावीपण भेटे
वाट उजळली चिरयात्रेची भिडली रात्र पहाटे
आटे आतां तृष्णा, वाटे त्रिभुवन मनिं कोंदाटे

बेळगांव, १६-३-४५

# घालुं नको मज जन्मा तेथें

घालुं नको मज जन्मा तेथें स्वत्व निमालें प्रभो ! जिथें
लोकमानसा 'शक्ति' लागुनी शरीर उरलें मात्र जितें

परहितविन्मुख जो तो जेथें तत्त्वपराङ्मुख व्यवहारी
स्वार्थी होउनि चूर नोळखी सगा, सोयरा, शेजारी

जिथें लेखिती हीन स्त्रियेला, एक दुजाला अन् दीन
परी उद्धटापुढें जेथले वीरपुरुष होती लीन

जिथें मुलांना प्रीति न देतां भीतीखालीं वागविती
तुच्छ मानुनी पाठ नीतिचे अविरत देती देवविती

सती जुनेरा महाग जेथें कुलटेला शालू-चोळी
शेतकऱ्या नच घास दुपारीं धनिकश्वाना परि पोळी

श्रमा जिथें अपमान प्रत्यहीं ढोंग-आळसा बहुमान
कृपेस लत्ता परि दंडाला दंडवतांनीं सन्मान

धर्म जिथें सत्कर्मा मुकला भूषण केवळ ग्रंथांचें
पुकारुनी एकता मुखानें रान माजवी पंथांचें

तत्त्वाच्या थडग्यावर जेथें सदर्प ठाकुनि व्यवहार
म्हणे, "जनांनो, जगण्यासाठीं करा गुणांचा व्यभिचार !"

दासपणाचे तुरे लावुनी जिथें मिरविती सुखें शिरें
तुडवित बहुजन जिथें महाजन अंधारींतुन मुदें फिरे

परि दीनां त्यां जिथें न वाली, खंत न त्याची कुणा मुळीं
एका ठायीं अकरा नेते बारा त्यांच्या परी चुली

अहंकार नेत्यांचा जेथें स्वजनहिताचा देइ बळी
सेवेविण मिळवितो प्रतिष्ठा धनसत्ता करुनी जवळी

मान जुंपली जिथें जोखडा इमान या नांवाखालीं
स्थैर्यासाठीं ध्येया-धैर्या बुद्धि जिथें ओढी खालीं

स्वत्त्वपालका जिथें अहर्निश उपास, निंदा, उपहास
देशवंचकां, देशकीचकां मखरें आणिक आरास

सैरंध्रीपरि जिथें शारदा बटीक झाली सत्तेची
कला नाचुनी कंचनीपरी पात्रें भरिते मदिरेचीं

नको अशा नरकांत पुनरपि घालूं जन्मा प्रभो! मला
त्वरित ना तरी तव वज्राचा या वाणीला दे उजळा!

मडगांव, २६-३-४५

## सायंप्रार्थना

आतांच संपली सांध्य-वंदना त्याची
जो नवयुग-जनिता करुणामूर्ति दधीची
जनलाटा हटल्या, नटल्या तत्तेजानें
जणुं कांचनरविच्या स्पर्शें सागरवीची!

परि मंद अम्ही या दिव्य सुखा मुकलेले
हरिजनसे प्रभुमुख पहावयास भुकेले
डोळ्यांत घेउनी प्राण तिष्ठलों दारीं
ओवीत अंतरीं भावभक्तिचे झेले!

श्रुति धन्य! अहाहा! उठला जयजयकार
सुखकंपें फुलला गात्रांचा परिवार
राजमार्ग झाला उघडा बारा हात
शुभसंचित फळलें, दिसला प्रभु साकार!

ती मूर्ति साजिरी ज्योती कर्पुरगौर
ऋत-शांति-अहिंसा दलित-स्फूर्ति गभीर
गंगेपरि गेली पुढुनी संथ गतीनें
निःशब्द प्रीतिनें जिववुनि दोन्ही तीर !

जन सर्व पांगला, मी खिळलों परि धरणीं
पदमुद्रा प्रभुच्या चुंबित अंतःकरणीं
जनसेवक पथ तो कृतार्थ झाला आज
धजलों न तया मी तुडवाया या चरणीं !

प्रभु ! तुमचें दर्शन घडलें, झडलें पाप
अन् क्षणीं युगांचा जाणवला अनुताप
तें भाग्य पथाचें द्या हो या जीवाला
तुडवोत तया मग सुखें व्यापसंताप

ही अशी प्रार्थना उठली हृदयीं तेव्हां
दिन सरतां स्मरतों मी ती केव्हां केव्हां
चाहूल श्रुतींवरि ये त्या दिव्य पदांची
जनपदाघात मज दुःसह होती जेव्हां

केपें, ३१-७-४५

## गृहलक्ष्मीस

आर्ये ! भार्ये ! मत्प्रियदर्शिनि ! मधुगात्रे ! सुखदात्रे !
कौस्तुभगर्भे ! जीवनसुरभे ! चिन्मात्रे ! गृहधात्रे !
विमलचरित्रे ! परमपवित्रे ! जननांतरसन्मित्रे !
चिरजननी ! चिरतरुणी ! रमणी ! यशमांगल्यधरित्रे

सखे ! श्रमांतीं तूं विश्रांती नित्य दिनांतीं शांति
पूजामूर्ती हो या हृद्या कवितास्फूर्ति निवांतीं
पद्मदेहिनी ! ठेवुं नको मज गुंतवुनी निज गात्रीं
मरंद देउनि गंध न चोरीं स्थित जो तव हृत्पात्रीं

खग जे रतले पार्थिव भोगा मुकले ते दिग्भागा
त्यासह मंगल आत्मपरागा, स्वपराच्या अनुरागा
यास्तव नवरविच्या गे स्पर्शें उमल अनंत दलांनीं
नव कवनें, भुवनें, गगनें मज आकळुं दे पंखांनीं

रूपांतुनि तव मुक्त करुनि मज दावीं दिव्य स्वरूपा
पतनापासुनि सांभाळीं गे माझ्या शुभसंकल्पा
त्रिविध सुखें गे त्रिविधा विपदा अनुभविल्या सहभावें
अतीत त्यांना होउनि आतां वाटे गात रहावें

सुतकन्यांनीं अंगण भरलें, सुवर्ण चढलें दारा
वात्सल्यानें कृतार्थ केलें सखि ! अपुल्या शृंगारा
आजवरी घरिं जगत पाहिलें, यापुढतीं घर जगतीं
घ्याया याची शुभप्रचीती करिं मज अतिरति, विरती

तेजें तव दे मज चिरनवता, अमर्त्यता, रसवत्ता
वरदानें करिं मंगलतर मज गृहपति, नर, उद्गाता

केपें, ७-८-४५

## स्पर्श

फुलल्या लाख कळ्या
स्पर्शसुगंधा घन अंधारीं फुटल्या ग उकळ्या

ध्वनिकंपित तनुच्या शततंत्री
बंदी मन रतिमोहनमंत्रीं
लय लागुनियां नाचुं लागल्या स्वप्नींच्या पुतळ्या

धूप जळे तिमिराचा पवनीं
विनिद्रनयना व्याकुळ अवनी
पिकुनी लवल्या नक्षत्रांच्या द्राक्षलता पिवळया

मुई वाळुची संगमरवरी
तीवर काळ्या फेनिल लहरी
व्यथेंतुनी सुख मंथित ग्रंथित झाल्या मधुर निळ्या

सुटल्या अवचित जटिल समस्या
फुटला रव स्मरकुटिल रहस्या
जननांतरिंच्या स्मृतिंच्या ज्योती पाजळल्या सगळ्या

द्रवलीं नयनें, स्रवलीं हृदयें
दो चंद्रांच्या संगम-उदयें
दुणी पौर्णिमा, रसा न सीमा, उसळ्यांवर उसळ्या

२७-१०-४५

## सजवूं कार्तिकमास

सखे ! चल सजवूं कार्तिकमास
चांदणें भुललें आज उन्हास

पाजळती दिवजांसम झाडें
खुलीं नभाचीं रत्न-कवाडें
दिशा त्यांतुनी ओलेत्यानें बघती सांग कुणास

झळझळती गवताच्या गंजी
हवेंत भ्रमती चतुर किरमिजी
अहा ! पिसोळीं पुष्पदळांसम वहात भिडति तृणास

गुरांवरी मोहरली मखमल
पालवींत जरतारी किलबिल
झुळुक नदीवरली ये शीतल लाळुचवीत मनास

निवळ कोवळें तेथिल पाणी
शिळा गळे भरिती मोत्यांनीं
पोहत आंतुनि लता पोपटी कवटाळिति चरणास

तिथें कुठें तरि दडुनि केवडा
पातींतुन वाजवी चौघडा
करूं तिथें चल खजिना उघडा, रिझवुं मना-नयनांस

नवरात्रांतिल मादक जाग्रण
अन् नंतरचें सीमोल्लंघन
त्यांतुनि सखि ! जें मेळविलें धन दावूं सुरललनांस

अंगिं थंडिचा फुलतां मोहर
आणिक झुलतां दिवे घरांवर
स्वप्नें रेखित अंधारावर जाउं सवें सदनास

केपें, १४-११-४५

## आंसवांचीं गाणीं

मूक आंसवांचीं त्यांना सांगा म्हणूं गाणीं

मुलें अनंताच्या कळ्या
प्रकाशाला भुकेलेल्या
छायेखालीं विरसल्या
अंगणांत खेळवोनी फुलविल्या ज्यांनीं

कुण्या नागें फुंकिलेलीं
प्रेमपांखरांचीं जुळीं
मंत्रबळें शुद्ध केलीं
स्वमुखाच्या गोड ताटीं ज्यांहिं जेववोनी

उडावया जन्मलेले
परी पाशीं गुंतलेले
ओळखुनी सोडविले
नभीं वसाहती त्यांच्या पहावया ज्यांनीं

पूजेसाठीं येथें जरी
जीव मागेंपुढें करी
नेत्र तरी परतीरीं
ज्यांहिं आणिल्या यांसाठीं परड्या भरोनी

पुत्र सूर्य गिळूं उडे
दग्ध होउनियां पडे
माता समाधानें रडे
तिच्या आंसवांनीं झाले जे कृतार्थ मौनी

अशा आंसवांचीं गाणीं
दीसरात ज्यांच्या कानीं
वर्षतांच त्यांची वाणी
तृणांकुरीं नक्षत्रांच्या हासतील खाणी

१९४५

## कृतार्थ जीवित

ओळखतिल जे मला आणि मज
दावितील मम यथार्थ ओळख

कणकणिं माझ्या, देतिल किंवा
अवघ्या ब्रह्मांडाची पारख
असीम त्यांवरि प्रेम करुनियां
करीन मी हें कृतार्थ जीवित

निसर्गसम जे संतत सुंदर
नित्य निरामय जे बाह्यांतर
सुखदुःखाच्या स्थित्यंतरिं जे
अखंड आनंदाचे निर्झर
असीम त्यांवरि प्रेम करुनियां
करीन मी हें कृतार्थ जीवित

आकाशापरि कवळिति जग जे
उजळिति, जिवविति तेजें अविरत
ढग जे येती भाळीं त्यांच्या
धुळींत पिकते त्यांनीं दौलत
असीम त्यांवरि प्रेम करुनियां
करीन मी हें कृतार्थ जीवित

सागरसम जीं विशाल हृदयें
गगन धराया करिती तडफड
अपेश जडलें तरी जयांना
धडपडण्याची दुर्दम आवड
असीम त्यांवरि प्रेम करुनियां
करीन मी हें कृतार्थ जीवित

१९४५

## शांतीचा जयजयकार

घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार
दिव्यत्वानें दाहि दिशांचा उजळा हा प्राकार

पाप मिरवलें रात्रीं घेउनि पुण्याचा वेष
देशांचे ध्वज इथें नाचले ओकित विद्वेष
अन् स्पर्धेनें सहोदरांनीं केले नरमेध
पुन्हा मांडिला उभ्या जगाचा अखंड उच्छेद
हवेंत लढती भुतें मृतांचीं, मुक्तीविण लाचार
द्विजांनो, मुक्तीविण लाचार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

पहाट झाली, निज घरट्यांतुन खुले करा प्राण
मानव्याच्या महदाकाशीं त्वरें करा स्नान
निर्विष होउनि उपनिषदांचे सुरू करा घोष
अन् शांतेचा रोष घालवा ओतुनि संतोष
अर्चाशुद्धी करा जगाची संन्यासून विकार
अमंगल संन्यासून विकार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

आनंदाचे वसंत तुम्ही, श्रेयांचे घोंस
चोहींकडुनी सत्त्वरसाचा पाडा पाऊस
हृदयीं तुमच्या चराचराचें अनंत कल्याण
घर्में कर्में सार्वत्रांचें करा परित्राण
परमात्म्याच्या स्वप्नां आणूं रंग-रूप-आकार
मनोरम रंग-रूप-आकार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

सर्वोदयधात्री ही भूमी सकलांची माता
पिता प्रभाकर उजळी, क्षाळी अखिलांचा माथा
उन्हा, चांदण्या, उदका, पवना सर्वीं समभाव
प्राणाचें संगोपन आहे विश्वाचा भाव
आंध्य फेडुनी या सत्याचा करा प्रचार पुकार
अहर्निश करा प्रचार पुकार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

जगन्मुक्तिचें महाकवींचें म्हणा महागान
बुद्धाख्रिस्तापरि कृष्णार्पण करा सुखें प्राण
प्रतिष्ठापनेस्तव शांतीच्या मरणाचें वाण
घेउनियां वाढवा महीवर जीवन-महिमान
अभ्यंतरिंच्या भगवंताचा घडवा साक्षात्कार
प्रत्यहीं घडवा साक्षात्कार
घुमवा जयजयकार शांतिचा घुमवा जयजयकार

केपें, २८-१-४६

## भंग्यांच्या घरीं

हरि आला हो, हरि आला हो
भंग्यांघरिं हरि आला हो
हरिजन झालों सर्वार्थांनीं सगळा पंक गळाला हो

झाडा रस्ते, झाडा अंगण
न्हाउनि या हो, लावा चंदन
दसरा समजुनि दिवस आजचा आनंदानें पाळा हो

घरधनिणींनो घेउनि बाळां
लावा कुंकुमटिळक कपाळां
सौभाग्याची आज दिवाळी रंगी फुगडी घाला हो

या, पोरांनो धमाल उडवा
टाळ ढोलकीं मृदंग बडवा
हरिनामाचा लेजिम खेळत स्वर भिडवा आभाळा हो

छळ गिळिला तो येइ फळाला
बळ चढलें गळल्या गात्रांला
चोखोबांना घेउनि नाचे भागवतांचा मेळा हो

पडती आनंदाश्रू त्यांचे
पायपोस पसरा हृदयाचे
त्यावरुनी हरि आणूं या घरिं चला करूं दहिकाला हो

प्रज्वळल्या नयनां-प्राणांनीं
गाउनि ओव्या गाउनि गाणीं
उजळित सदनें उजळित गगनें या हरिला ओवाळा हो

मुंबई, २७-३-४६

## रसवंतीस

उजळ नितळ स्वच्छंद मासळी स्फटिकजळांत जशी
तशी निरंजनरूपीं मजला दिसशिल सांग कशी ?

प्रसाधनाचीं चतुर साधनें मींच दिलीं तुजला
लावण्यानें नटवुनि त्यां तूं धुंदविलें मजला !

अभिमानें तुज मिरवियलें जनिं मीं त्या धुंदपणीं
धुंदपणीं—छे ! निज विभवाच्या मादक अंधपणीं !

ज्योत्स्नारति ! तुजभवतिं विजेची करुनी आरास
रसलोलुप या हृदया दिधला स्वकरें वनवास

अष्टांगांची दावुनि अपुल्या शाश्वत सुंदरता
मळलेल्या या हृदया नयनां दे गे सार्थकता

जलवंतीपरि ये रसवंती होउनि निरुपाधी
उःशापानें तार आपुला जिवलग अपराधी

अनसूयेपरि ये ये सदये होउनियां विरती
उद्धर जे विधिहरिहर माझ्या हृदयीं तळमळती

मुंबई, २७-३-४६

## माडाचें भावगीत

ताठ उंच मी उभा नभास नित्य बाहुनी
राहिलों तुझ्याचसाठिं बाहु हे उभारुनी

स्वर्ग सांडिला मुदें तुझ्याच मुक्तिकारणें
देव वाहिला तुला, तुलाच वाहिलें जिणें

तापतां उन्हीं तुला दिली प्रशांत सावली
भागवावया तहान गोड गार शाहळीं

मेघ वारिले किती सुरम्य बांधुनी मठी
खावया दिलीं तुला फळें रसाळ गोमटीं

स्नान उष्ण घातलें तनूस तेल लावुनी
घास लाविले मुखा मुठेल त्यांत वाहुनी

रात दाटतां घरीं सुवर्णदीप लाविले
कुंतलीं प्रभातकालिं दैन्य सर्व झाडिलें

लग्नकारणीं, सणासुदीस, दुःखसंकटीं
साह्य मीं दिलें तुला सदैव बांधुनी कटी

स्वर्ग दाविण्या तुला स्वतःच जाहलों शिडी
चांदण्यांचिया तुला दिल्या भरून कावडी

गीत ऐकुनी तुझें तरारलों थरारलों
नी चितारुनी भविष्य मी सहर्ष डोललों

तूं परी कृपेमुळेंच होसि नित्य आंधळा
अन् सुखामुळेंच जासि दुर्गतीचिया तळा

शंभु ठाकतां समोर गांगतीर्थ सांडुनी
कंठिंच्या हलाहलास जासि शीघ्र मोहुनी

कोटितीर्थ, मानवा ! असून माझिया शिरीं
तूं विषार्थ लाविली गळ्यास माझिया सुरी

स्वर्ग लाभतां करीं तयास नेसि रौरवा
धन्य धन्य बुद्धि रे तुझी विचित्र मानवा !

दुर्गतींतही परी तुला करीन साथ मी
भावबद्ध मी तुला, तुझाच मित्र नेहमीं

भाविलें तुझ्यासवें रमेन दिव्य गौरवीं
स्वप्न तें विरून आज मी विषण्ण रौरवीं

मुंबई, २६-५-४६

## स्वातंत्र्याची सिंहगर्जना

त्रिवार मंगल वार आजला त्रिवार मंगल वार
स्वातंत्र्याची सिंहगर्जना अतां इथें उठणार

सह्यपर्वता ! भार्गवसिंधो ! उभारुनी हात
लाख मुखांनीं ललकारुनियां द्या तिजला साथ
हे राण्यांच्या उठा शिळांनो लावा लाल टिळे
अन् वायूंनो फुलवा अमुच्या हृदयांतिल इंगळे
कुलदेवांनो, या वक्षांतुनि करा त्वरें संचार

लिहिल्या या ज्या ओळी त्यांची वाळली न शाई
डोळे भरुनी तोंच देखिली उडलेली लाही
धन्य लोहिया, धन्य भूमि ही, धन्य तिचे पुत्र
धन्य तयांचा त्याग देखते जनतेचे नेत्र
धन्य घेउनी लिहिलेल्याचा मीही साक्षात्कार

कौल मिळाला, फुटला नारळ, गुढी उभी झाली
आणि माउली, चढला कुंकुम पुन्हा तुझ्या भाळीं
झडली भीती, चढली नीती, तुटला गे लोभ
सामर्थ्यांचा अतां अंतरीं उफाळला क्षोभ
यापुढतीं तव पायांवरतीं या रक्ताची धार

१८-६-४६

## शांता-दुर्गा

शांता झाली दुर्गा रे
जागृति आली दीन-दुबळां सगळ्या पीडित वर्गा रे

रुद्रशक्ति ही राष्ट्रदेवता
उठे पुकारित शुचिता, समता
दशलक्ष करें घडवी अभिनव मानवतेच्या सर्गा रे

सत्य, अहिंसा, शिस्त, शांतता
मोक्षास्त्रें फेकीत ऋतरता
भूगर्भांतुन हृद्गर्भांतुन आणी अक्षय स्वर्गा रे

सायुध तिजसम या रे सारे
दिव्य दृष्टिनें दर्शन घ्या रे
व्यापुनि ती मग राहिल अनुदिन देउळ, इर्गिज, दर्गा रे

केपें, २१-६-४६

## हुतात्म्यांची जागृति

धुळीधुळींतुनि सकळ हुतात्मे चवताळुनि उठले
अन् जुलमाचे चिरे चुनेरी खळखळ कोसळले

लक्षजनांच्या मनिंच्या पणत्या क्षणांत पाजळल्या
दुःशंकांच्या पतंगपंक्ती जळल्या हो जळल्या

उत्साहाच्या नद्या खळाळत सुटल्या आरक्त
दुभंगलेलीं ज्योतिर्लिंगें झालीं अभिषिक्त

गर्भवतींचे गर्भ पुकारित सुटले 'जय हिंद'
स्वातंत्र्याच्या जयघोषांनीं गिरीदरी धुंद

स्वार्थ जाळुनी त्याचें अंजन नयनीं हो घाला
धुळींतुनी ज्या पूर्वज उठले लावा ती भाळा

याच धुळींतुनि अन्नांतुनियां जाउनियां पोटीं
ज्योतिर्मय निज प्राणांतुनियां अवतरतिल ओटीं

व्हाल तुम्ही हो त्यांचे पुतळे उद्धारक भव्य
निटिलीं तुमच्या दिसतें मजला मंगल भवितव्य

कॅसलरॉक, १०-७-४६

## सोळा वर्षांनंतर

वर्षें सोळा झालीं गोळा तुझिया डोळां भावमयी !
तयासवें आसवें तुझीं तीं पाझरलीं माझ्या हृदयीं

झांकियल्या प्रणयाची लाली गालिं तुझ्या सखि झळझळली
दाहें तिचिया घर्मजलें या भाळावरुनी ओघळलीं

संकल्पांचे घुमट वाटलें मजला क्षणभर थरथरले
परी दृष्टिंतिल तुझ्या स्मितानें क्षणांत ते सखि सावरले

"यश घेउनियां या लवलाहीं !" वदलिस अस्फुट कांहिं असें
गमलें मजला जीवन सारें नटलें पुनरपि वीररसें

रमे ! यापुढें उमा मला तूं दिव्य मंत्रसे शब्द तुझे
स्मरतां त्यांतें लोचन माझे कडकडत्या भिडतात विजे

मिटतां ते अन् गळतां गात्रें हृदय गडे अवचित उघडे
आणि अश्रुंचें तुझ्या मंगले ! मौक्तिकदर्शन मजसि घडे

निजकांतीनें सांत्वन करिती विरघळतों जेव्हां विरहीं
अन् तार्‍यांपरि पथ दावुनियां सावरिती ढळतां प्रलयीं

मुंबई, २८-७-४६

## धृतराष्ट्रास

संजय द्रष्टा म्हणे, "अभाग्या, अंधा बलिवंता
कथा हरीची पुन्हां सांगतों घे रे तिचि संथा

तुझ्या कुळाला शकुनी भंवला एकदां ते काळीं
कृतकर्मानें लिहुन आणलें तेंच पुन्हा भाळीं
पांडवकुळविध्वंस मांडिला तुझिया रे लेकांनीं
किंकाळ्यांनीं गगन फाटलें, शिसें तुझ्या कानीं
खिळेबंद अर्भकें भिंतिला, चितेवरी भर्ते
सतिंची घेउन लाज तुझे सुत झाले शककर्ते

गळ्यांत घालुनि गळा स्फुंदल्या कुंती गांधारी
विकर्ण वदला, 'सावर आई, आली अंधारी !'
'हरि या, हरि या, या वेळेला तुम्ही तरी पावा.'
उभय सतींनीं जीव तोडुनी केला रे धावा
ऐकुनि टाहो शांतिब्रह्म प्रभु क्षण खचला, ढळला
तुझ्या कुलाचा पात पाहुनी द्रवला, कळवळला

मानव मेले, देव झोपले, जर्जर हरि उठला
'हरहर' त्याच्या हृद्‌घोषानें स्वर्गहि थरथरला !
योगेश्वर निःशस्त्र चालला, क्रुद्ध कुरुक्षेत्रीं
उरीं दाटुनी अश्रु आटले सतिंच्या जे नेत्रीं !
खडे निखारे त्या आगीनें झाले भारतांत
तो काळाशीं पैज लावण्या उठला भगवंत !

माथें भडकुन भीम उसळला पांडव गडबडले
असंख्य कौरव त्याच्या पायीं चिरडुन तडफडले
कुलक्षयाची आग पाहुनी अधिकच हरि द्रवला
द्रवला कसला वज्र होउनी अग्नि गिळूं सजला
हिरमुसला भाबडा वृकोदर भानावर आला
पायधूळ लावुनी प्रभूची चळलेल्या भाळा

सस्यश्यामला सुजला सुफला दग्धभूमि झाली
कोटिमुखें आक्रंदत उठली, 'धाव घाल काली !'
नवकाली जयकाली गर्जत विकट घोर घोष
शेषमुखांनीं धुमसत होता दडलेला द्वेष
सर्वसंग वर्जून हरी तो वज्रदंडधारी
प्रेममंत्र घोषीत चालला कलीचिये द्वारीं

द्वार लंघिलें, पुढें उसळला गरलाचा सिंधू
हरि त्यावरुनी जात राहिला जणुं मौक्तिकबिंदू
रक्ताचा पर्जन्य लागला त्यावरतीं वरसूं
असुरमुखें आ वासुनि आलीं पुरा त्यास ग्रासूं
कवट्यांतुनि शत हिलाल जाळित काजळकलि आला
अग्निकणांवरि वाढत हरि तो रजतशिखा झाला

काळोखाचीं अस्त्रें आलीं चक्रांपरि पुढतीं
हाक प्रकाशा घालित उरला तरिही अभयगती
'चाल एकला, चाल एकला' ध्वनि उठला पाठीं
पाप लंघुनी हरी पावला पुण्याच्या कांठीं

पाजळला तों नवरविच्या परि हटला कलि मागें
स्वर्ग चमकला दिशा उजळल्या अरुणाच्या रागें.

रक्त ठिबकलें हरिपद्मांतुनि स्रवली सुरगंगा
सत्य अहिंसा उजळुनि आल्या स्वर्णरूपरंगा
भगीरथांनो या, या भू ही पुन्हा गार झाली
व्या काढुनि आसेतुहिमाचल पाट याच कालीं
या देवांनो, मानव होउन अन् तूं, धृतराष्ट्रा,
क्षणीं याच जल लावुनि नेत्रां हो चिन्मय द्रष्टा"

मुंबई, ३-१-४७

## मरायचें नाहीं, उरायचें आहे

एक दिवस केव्हां तरि हो असे मरायाचें
म्हणुनि काय त्याच भयानें रोज जगायाचें ?

उगिच त्यास जगणें म्हणणें गुंतुनियां मोहीं
मृत्यु नित्य जागंत असतो आपुलिया देहीं
त्यांत निमित्तांच्या आपण पोहतों प्रवाहीं
मृत्यु अटळ; कां टाळावें तरी करायाचें ?

किती एक खाल्लेप्याले, राजभोग ल्याले
शरीरेंच मिरवुनि केवळ शरीरेंच व्याले
धरित्रीस आत्मद्रोहें भार मात्र झाले
हसत त्यांपरी का आपण उरीं झुरायाचें ?

ध्यास जगावें हा घेउन विसरलों 'कसें ?' 'कां ?'
सौख्यसेवनाच्या छंदीं निर्मियलें शोकां
बंधु असुनि वैरी झालों आज एकमेकां
निरयदरींतच का असल्या जिणें सरायाचें ?

नाहिं, नाहिं, स्थिति ही असली मानणार नाहीं
अहोरात्र होमुन जीवन करूं दिव्य कांहीं
साहि जिंकुनी, कलिकाला बांधुं दोहिं पायीं
तारुनी तयांना आम्हां असे तरायाचें

मस्तकांतलीं नक्षत्रें लक्षिती भविष्या
तें धरावया आत्म्याची मांडिली परीक्षा
घेतली दधीची-शिबिची उग्र अग्निदीक्षा
वज्रमंगलीं आम्हांला असे उरायाचें

मुंबई, १९-१-४७

## खंजीर हे मारीत जा!

उद्धटां ऐटींत या खंजीर हे मारीत जा
लाळघोट्या लोचटांना अन् खडे चारीत जा
खंजीर हे मारीत जा

अल्लडे, चोहींकडे जा हुंदडोनी केवडे
कर्वती झाडीत ही गर्दी दुरी सारीत जा
खंजीर हे मारीत जा

विक्रमा दे प्रेरणा, आव्हान दे गे यौवना
काष्ठपाषाणांतुनी चैतन्य संचारीत जा
खंजीर हे मारीत जा

पंचभूतांच्या परी नाना विलासीं फांकुनी
आधिव्याधी अन् जरामृत्यूस संहारीत जा
खंजीर हे मारीत जा

देवदैत्यां जागवीं अन् मांड गे हृन्मंथना
कोष रत्नांचे झणीं तारीत उद्धारीत जा
खंजीर हे मारीत जा

मुक्त मी संजीवनी ! विश्रांतिची हो रागिणी
आणि माझ्या अंतरींची तार झंकारीत जा
खंजीर हे मारीत जा

मुंबई, ६-२-४७

## आकाशमाउलीस

कोर बिलोरी तुझ्या कपाळीं शिरिं मोत्यांची जाळी ग
तुझ्या लोचनीं मुक्तात्म्यांची शाश्वत नित्य दिवाळी ग

हरिकांतीचें वस्त्र तनूवर त्यावर ज्योतिश्चित्रें ग
स्रवती त्यांतुन परम पवित्रें अलिखित संतचरित्रें ग

पाप जाळुनी काजळ त्याचें गौरविसी निज नयनीं ग
पाणी सतिंच्या मुद्रेवरचें गाळुनि उजळिसि वदनीं ग

कूस तुझी नवरत्नकेतकी पराग भास्वत कोटी ग
अन् चंद्रांनीं भरुनी वाहे तुझी सुवासिन ओटी ग

वात्सल्याची तूं गायत्री, देवदयार्णव पोटीं ग
दुभुनी निशिदिनिं पोशिसि साम्यें भूतें लहानमोठीं ग

तूं ऋषिचें तप, तूं कविप्रतिभा, तूं मुनियोगसमाधी ग
तूं श्रमसुखरत निष्पापांची शुभनिद्रा निरुपाधी ग

कर पावन तव या शिरिं असतां घर आम्हां नित जवळी ग
अमृतकमळें फुलुनी येती या तापत्रय-गरळीं ग

माते ! निजकरिं जग हें अमुचें पक्ष्यापरि कुरवाळीं ग
हृदया त्याच्या शर लागुनियां आली लाल जिव्हाळी ग

सुखशांतीचा, विश्रांतीचा फुंकर सांजसकाळीं ग
घालुनि, त्याला शिकव म्हणाया दिव्य अनंतभुपाळी ग

मुंबई, २८-३-४७

## पंढरीस वाजे घंटा

पंढरीस वाजे घंटा पांडुरंग झाला जागा
झाडा मागाया उठल्या गोदा भीमा चंद्रभागा

भटा पंड्या बडव्यांनो! डोळे उघडून बघा
हात कटींचे हालती राग आला पांडुरंगा

देव भावाचा भुकेला त्यास काय दिलें सांगा ?
लाख मारुनी उपाशी काय ताटांचिया रांगा ?

देव दीनदुबळ्यांचा डाग कसे त्यांच्या अंगा ?
दारें लाविलींत कशीं भंगी-धेड-म्हार-मांगा ?

काय काजळ फासिलें तुक्याचोख्याच्या अभंगा ?
विटाळिली करंट्यांनो! काय ज्ञानयाची गंगा ?

प्राण झरेला टाकून पांडुरंग रागें उगा
रडा रडा पश्चात्तापें दीनां आलिंगाया लागा

न्हात न्हात आसवांनीं जोडा तुटलेला धागा
महारांच्या महाराष्ट्रीं लावा ब्रह्मत्वाच्या बागा

दारें मोकळून सारीं सानथोरां करा जागा
भरा आषाढी-कार्तिकी लाजवा हो यज्ञयागा

मुंबई, ३०-३-४७

# अंतरींच्या अश्रुंनो !

अंतरींच्या अश्रुंनो ! निष्ठूर व्हा हो, शूर व्हा
अग्निच्या जिव्हांप्रमाणें उग्र व्हा, अत्युग्र व्हा !

बिंदु व्हा तेजाबचे, द्या रुद्रदीक्षा जीवना
उग्र कारुण्यें स्वयंभू कांचनाला वांचवा

कोवळे पाण्यापरी तुम्ही जरी माझे सखे
आज आर्ताकारणें हो तीव्रसे शस्त्राग्र व्हा

गोजिऱ्या मुद्रेंतुनी दावूं नका—दावूं नका
मत्सखीचीं कोवळालीं साश्रुबिंबें या जिवा

आइचें वात्सल्य माझ्या नी पित्याचा संयम
आणि माया अर्भकांची मागुती हो पाठवा

मोह हे आप्तादिकांचे लोभ, आशा, वासना
भस्मुनी संन्यस्त व्हा, निःसंग व्हा, अव्यंग व्हा

पुण्य माझें आठवा अन् पिंड माझा पेटवा
होउनी या हो प्रभूच्या स्वप्नपक्ष्यांचा थवा

या करंट्या जीवनीं संजीवनीचे बोल व्हा
अन्‌ृतीं या हो ऋताच्या अन् अणूंचे गोल व्हा

जाळुनी संसार हा शाहीर व्हा हो, वीर व्हा
संचितानें संकटीं या वंचितांचे धीर व्हा !

मुंबई, १०-७-४७

## रात निळी रात निळी

रात निळीं रात निळी
त्यांत सखे ! तूं जवळी
धवल विहगयुगुल जळीं
मवतिं लहर सोनसळी

सजल हरित गार धरा
शिरशिर भिडते अधरा
वीज तुझ्या अन् पद्रा
तांबुस हिरवी पिवळीं

पोटांतुन गंध सुटे
ओठांतुन ध्वनि उमटे
तेजानें मन विनटे
निटिलिं फुले दीपकळी

गात्रांतुन विश्व पिऊं
नेत्रांतुन विश्व स्त्रवूं
मिसळूं रसराग नऊ
रात्रीच्या पुष्पदळीं

मुंबई, ११-७-४७

## स्वातंत्र्याचा दीपोत्सव

घाम आपुल्या शिरीं, बापुजी, घाव आपल्या उरीं
स्वातंत्र्याची अशा दिवाळी कशी करूं साजरी ?

दुभंग झाली वास्तुदेवता
दुभंग झाली मायाममता
भावांच्या घावांतुन निघती नव्या विषाच्या झरी

भाउभाउ वेगळे निघाले
खडे जाहले होउनि भाले
कसे दाखवूं दिवे तयांना, पायस रांधूं घरीं ?

चक्र इथे अन् चंद्रिम तिकडे
द्वैत बघुनि हें तुटे आंतडें
हें रक्ताचें वैर वाकडें, गमे जिव्हारीं सुरी

अशोक येथें अकबर तेथें
येतिल का हो स्मरुनी नातें
चंद्र सुदर्शन मिळवित मिरवित सबाह्य अभ्यंतरीं

क्षमा करा मन झालें शंकित
आणि व्यथेनें चित्त कलंकित
हसा पिताजी, भविष्य मजला पाहूं द्या अंबरीं

घाम पिळा, आवंदा गिळा हो
फुलतिल हृदिंच्या शिळा शिळा हो
दिवे लागतिल, व्यास-वाल्मिकी गातिल उच्च स्वरीं

पापें अमुचीं विसरा क्षणभर
प्रसन्नतेची घाला पांखर
तुमच्या आनंदांतच अमुची प्रभो दिवाळी खरी

मुंबई, ३०-७-४७

## भगवती स्वतंत्रतेस

गोजिऱ्या कळ्याफुलांत लाव गे दिवे
लाजऱ्या गळ्यांत गीत जागवीं नवें

दे गे झाडास गती
दे दे पक्ष्यांस धृती
दे गे माशांस मती ज्यांस जें हवें

आण गे श्रमास मान
आणखी कलेंत प्राण
दे मना भुईसमान स्वप्न पाचवें

दे गे सर्वांस घास
अन् सुवास वासनांस
नी निचेष्ट भावनांस गोड आसवें

प्रीतिची जिवास ओल
मुक्तिचा कृतीस डौल
जीवना नवीन मोल यज्ञवैभवें

आण पालवी यशास
अन् घरोघरीं प्रकाश
खेळण्यास दे मुलांस मोर, पारवे

वाहनास देइं मेघ
अन् भुजांस वायुवेग
लंघण्यास विश्वरेघ गे विजेसवें

दे मज रवि-वेदमंत्र
दाखव विधि-विश्व-यंत्र
अन् शनिचें घाल मला दिव्य जानवें

मुंबई, ७-८-४७

## गुरुवर अनुसर रे

गुरुवर अनुसर रे मन
गुरुच्या ठायीं दत्त निरंतर ब्रह्मा हरिहर रे

जननीहुनिही गुरु ममताळू
जनकाहुनिही गुरु कनवाळू
सन्मित्राहुनि गुरु स्नेहाळू
चिरसुखसागर रे

गुरुच्या नेत्रीं सूर्य तळपती
गुरुच्या हास्यीं चंद्र झळकती
गुरुच्या एका वचनाअंतीं
शतयुगविष उतरे

गुरुकृपेनें स्मृती उजळती
त्रिकाळ डोळ्यांपुढतीं दिसती
पिंडिं मिळे ब्रह्मांडप्रतीती
हृदयीं विश्व तरे

नत गुरुनामीं अंतर्यामीं
अनुसर गुरुला धर्मीं कर्मीं
भृंगापरि गुरुवर-पदपद्मीं
अविरत हो रत रे

काकावाडी वर्धा, १४-८-४७

## जीवन त्यांना कळलें हो

जीवन त्यांना कळलें हो
मीपण ज्यांचें पक्क फळापरि
सहजपणानें गळलें हो

जळापरी मन निर्मळ ज्यांचें
गेलें तेथें मिळलें हो
चराचराचें होउनि जीवन
स्नेहासम पाजळलें हो

सिंधूसम हृदयांत जयांच्या
रस सगळे आकळले हो
आपत्कालीं अन् दीनांवर
घन होउनि जे वळले हो

दुरित जयांच्या दर्शनमात्रें
मोहित होउनि जळलें हो
पुण्य जयांच्या उजवाडानें
फुललें अन् परिमळलें हो

आत्मदळानें नक्षत्रांचें
वैभव ज्यांनीं तुळिलें हो
सायासाविण ब्रह्म सनातन
घरींच ज्यां आढळलें हो
—उरींच ज्यां आढळलें हो

मुंबई, १७-९-४७

## डोळे तुझे बदामी

डोळे तुझे बदामी देती मला सलामी
त्यानेंच हा असा मी झालों गडे निकामी

लागे न चित्त धामीं लागे न चित्त कामीं
मोठे लबाड लुच्चे डोळे तुझे बदामी

जखमी करून जीवा हसती वरून नामी
भरितात मीठ ऐसे डोळे तुझे बदामी

बोली मिठास त्यांची कावा तरी गनीमी
भुलवून मारणारे डोळे तुझे बदामी

होती क्षणांत भोळे होती क्षणीं वहीमी
छळिती परोपरींनीं डोळे तुझे बदामी

जरि हाल चालती हे दे नित्य ही गुलामी
सुल्तान मोंगली हे डोळे तुझे बदामी

मी धुंद मोर कामी फुलवून रोमरोमीं
हे नाटकी इमानी डोळे तुझे बदामी

मुंबई, २९-९-४७

## माझ्या परी

अंतरीं माझ्यापरी गे मुक्त तूं संन्यस्त तूं
जीवनीं माझ्यापरी संयुक्त तूं बंदिस्त तूं

वृत्तिनें माझ्यापरी स्नेहाळ तूं स्वच्छंद तूं
मुक्त हस्तें वाटिसी माझ्यापरी आनंद तूं

घालिसी माझ्यापरी नाना मिषें गे वाद तूं
हासुनी माझ्यापरी अन् आणिसी संवाद तूं

वाणिनें माझ्यापरी गे लाघवी अन् गोड तूं
वर्तनें माझ्यापरी गे लाविसी अन् ओढ तूं

संयमें माझ्यापरी गे निर्मिसी सौंदर्य तूं
आणि त्यानें संयमाला आणिसी माधुर्य तूं

वारिसी माझ्यापरी अन् जीवनींचें द्वैत तूं
भावनांचें साधिसी माझ्यापरी अद्वैत तूं

होमुनी माझ्यापरी होसी जगाचें दिव्य तूं
होउनी माझ्यापरी गासी विधीचें काव्य तूं

मुंबई, २९-९-४७

## अमृत खेचुनि आणूं भूवर

समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी
धुंद तुझ्या साथीवर गाते मत्प्रतिभा लहरी

तुझें चांदणें माझें गाणें ये ये चल मिसळूं
माधवींत हिम, दुधांत केशर ये ये चल मिसळूं

नको नको संकोच—झोपलें जग सगळें शहरीं
जागे आपण दोघे असल्या स्वर्गोत्सवप्रहरीं

रसिक खरोखर जे कुणि या क्षणिं गिरिवरि वा पुलिनीं
जाग्या ज्या या वेळीं त्या रे ऋतुमति रसनलिनी

कुणि शरविव्हल, कुणि स्मरविव्हल, कुणि अनलीं जळती
आणि कुणी पापाच्या दंशें रुधिरीं तळमळती

व्याख्या नकळुनिही सख्यानें जीवन त्यां कळतें
जीवन ज्यांना कळतें त्यांना काव्यहि आकळतें

काव्य जयांना उमगे त्यांचा तूं रे रसराज
त्यांत आज तुजवरतीं माझा चढला स्वरसाज !

गड्या तुझ्यापरि मीही प्यालों सूर्याची आग
परि दर्यापरि आहे वाहे अपुला अनुराग

कळो ना कळो महती अपुली दुर्मुखल्या जगता
त्यासाठीं नच अडली केव्हां अमुची रसवत्ता

जहरप्राशन करुनी जेव्हां हर उरिं कळवळला
खेळवुनी तुज निटिलीं त्यानें अतिरस मेळविला

सामर्थ्याची चंदनउटि जी ती सौंदर्य-कला
वन्हि तिच्यांतच हिम होउनियां रसरूपीं थिजला

नीतीला रेखुनि प्रीतीचा लावूं सुभग टिळा
शक्तीच्या शिरिं ये भक्तीचा चढवूं मुकुट निळा

ही श्रीमंती आहे तोंवर चल आनंद करूं
ये उभयांच्या हृदयसुधेनें विश्वकटाह भरूं

समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ निळ्या लहरी
अमृत खेचुनि आणूं भूवर दडलें जें जहरीं

मुंबई, २७-११-४७

## तव नयनाचें दल हललें ग

तव नयनाचें दल हललें ग !
पानावरच्या दवबिंदूपरि
त्रिभुवन हें डळमळलें ग !

तारे गळले, वारे ढळले
दिग्गज पंचाननसे वळले
गिरि ढासळले, सुर कोसळले
ऋषि, मुनि, योगी चळले ग !

ऋतुचक्राचे आंस उडाले
आकाशांतुनि शब्द निघाले,
"आवर आवर अपुले भाले
मीन जळीं तळमळले ग !"

हृदयीं माझ्या चकमक झडली
नजर तुझी धरणीला जडली
दो हृदयांची किमया घडली
पुनरपिं जग सावरलें ग !

मुंबई, २८-११-४७

## कवि आम्हां हवा महान

कवि आम्हां हवा महान ध्वज धरावयाला
भारतासमान भव्य गीत गावयाला

व्यास जो विशालधी
बुद्ध जो दयानिधी
जो अगस्ति सागरास, शिव हिमालयाला

गर्भि ज्या दिसे भविष्य
असुनि देव जो मनुष्य
शब्दि ज्याचिया सदैव साद आत्मयाला

मूर्तिमंत जो प्रमोद
अन् जिवंत जो प्रबोध
हासुनीच द्वेष-भीति-खेद ने लयाला

भक्षुनीहि पापपुण्य
अग्निमाजिं जो हिरण्य
ज्यासवें विराट राष्ट्र ये महोदयाला

जो सदा यशांत छत्र
संकटांत वायुपुत्र
अन् तमीं स्वतःच जो हवीहि आणि ज्वाला

मुंबई, ३-१२-४७

## तुझ्याजवळी

तुझ्याजवळी माझिया मनीं जागते विरक्ति
डोळ्यांआड होतां मात्र पुन्हा ओढिते आसक्ति

तुझ्याजवळी पूर्वीची अकस्मात उठे तेढ
दुरावतां तुझी मूर्ती परी अंतरांत ओढ

तुझ्याजवळी जिवाचे उलतात घाव घाव
एकांतांत जिव्हारींचे फुलतात भाव भाव

तुझ्याजवळी कळेना कसा होतों मी कठोर
परी आठवानें तुझ्या होतों पोराहुनी पोर

कोण अशी सांग तूं गे सहवासीं छेडणारी
आणि वेड्या स्वप्नभासीं दीसरात वेढणारी

दादर, १९४७

## ये संध्ये जा कथुनी

ये संध्ये जा कथुनी यामिनिचें गुज गहिरें
छायांच्या रायांतिल उलगडुनी मधुर झरे

येइं जरे उरले किति दिन माझे सांगुन जा
मृत्यूच्या कलशांतिल जल शीतल पाजुन जा

अन् कविते ! निद्रेपरि शामक गा कांहिं तरी
हेलावत नेइं मला जागृतिच्या पैलतिरी

घरट्यांतुनि अवकाशीं नकळत मज घेउनि जा
श्वसनासम सहज मला आश्वासन देउनि जा

अन् भवतीं तम चढतां कनकाचा लाव दिवा
विझतां हृदयांत धूप फुलवीं अंगार नवा

१९४७

## हासत लावा वज्रटिळा

रडते आई धाईधाई ताडित दीन ललाटा हो
ग्रहनक्षत्रें फोडिति टाहो, हिमनग पेटत वाहे हो

या मंगल रक्तानें भूमी लांछित कंपित झाली हो
या घायांनीं हरिच्या हृदया शतकांची कळ आली हो

खिस्त गाळितो मूक आसवें, दुःखीं बुद्ध बुडाला हो
डंख कलीचा सात युगांचा जडला वंशवडाला हो

या हत्येचें पातक खडतर किती पिढ्यांना जाळिल हो ?
कोण तुम्हांविण निज हृदयानें तात ! तयांना क्षाळिल हो

जीवन तुमचें नाहीं कळलें आम्हां अंधपणानें हो
यापुढतीं तरि कळेल का तें या तुमच्या मरणानें हो ?

तुम्हींच लिहिल्या नक्षत्रांच्या ओळी अमुच्या भाळीं हो
डोळ्यांविण त्या व्यर्थ म्हणुनि हा अनर्थ आतां जाळी हो

पंचत्वांतुनि हृत्तत्वांतुनि आतां तरि ते उघडा हो
उदयांतुनि वा प्रलयांतुनिही धडा वांचवा निधडा हो

क्षमा तुम्हीं शिकविली क्षमेला निर्मल निजरुधिरानें हो
ती अमुच्या या पिंडीं भिनवा तिच्यांतल्या अन्नानें हो

प्राक्तन यमुनेचें उजळविलें तुम्हींच निज भस्मानें हो
तिच्या जळाच्या आचमनांतुनि त्रिवार या नेमानें हो

व्हा अमुच्या जठरांत हुताशन, अनृत सगळें जाळा हो
पाप न शमलें तोंवर फुलवा सर्वांगांतुन ज्वाळा हो

या वायूच्या प्रतिश्वासांतुनि हृदयांतिल विष वारा हो
आणि स्पंदनांतुनि प्राणाच्या व्हा परमामृतधारा हो

आकाशांतुनि ओंकारत या शांतिः शांतिः शांतिः हो
या ज्योतिर्मय स्वप्न होउनी निजतां नित्य निवांतीं हो

कोटिगुणित होउनि ह्या राष्ट्रीं विराटरूपीं प्रगटा हो
हासत लावा वज्रटिळा अन् सकळांच्या अदृष्टा हो

मुंबई, १-२-१९४८

## रुमडाला सुम आलें ग

तुला मला उमगला जिव्हाळा जन्मांचा पट फिटला ग
अन् शब्दांचा प्रपंच सगळा कमळांसम हा मिटला ग

तुला पहातां पहाट वाटे		ओती कुरणीं मोतीं ग
प्रभेस मिळती कृतार्थ होती	अभिलाषांच्या ज्योती ग

देखियल्याविण तव तनु मजला	बाग फुलांची उघडी ग
खुडिल्याविण त्यां मन्मन झालें	अन् सोन्याची परडी ग

मन तव चंद्रापरि करि सोबत	जेथें संचित नेतें ग
चराचरांतुन प्रेमळपण तव	हासत जवळी येतें ग

तुझ्या लोचनीं पावन सरिता	क्रांती आणिक शांती ग
मदन अंतरीं जळला, पडल्या	अस्थी प्रयागतीर्थी ग

आलिंगन-चुंबनाविना हें		मीलन अपुलें झालें ग
पहा, पहा, परसांत हरीच्या	रुमडाला सुम आलें ग

मुंबई, २१-२-४८

## आणखीन् काय ?

विचारिसी परोपरी मला 'आणखीन् काय ?'
शब्द मावळती सारे माझा होई निरुपाय

बोलायचें खूप खूप मनीं येतों मी योजून
तुला पहातां पहातां जातों परी विसरून

कांचनाचीं निरांजनें तसे तुझे गडे डोळे
त्यांत कापरासारखा माझा जीव जळे, पोळे

खव्याळ त्या ओठांतून तोंच गुलाबाचें पाणी
गार गार सुगंधांत माझे पंचप्राण न्हाणी

क्षणोक्षणीं ओलांडितों असें जीवन-मरण
जन्मतांना मरतांना कुणा शब्दांचें स्मरण ?

असें मुकाट्यानें वाटे तुला आजन्म पहावें
उदकांत विस्तवांत न्हात जळत रहावें

आणि तूंहि विचारावें मला 'आणखीन् काय ?'
शब्दवैभव असून माझा व्हावा निरुपाय

मुंबई, २३-२-४८

## खाईतला स्वर्ग

मखमली या अंतरीं तूं नेत्ररत्नें खोविलीं
तीं निखाऱ्यांसारखीं पेटावयाला लागलीं

तूं गडे अंगा, रुमाला लाविला जो केवडा
त्यांतुनी फूत्कारती गे लक्ष नागांच्या फडा

थंड तूं पाणी जुईचें जें दिलें चांदींतुनी
मस्तकीं त्याचीच झाली मस्त वेडी वारुणी

गार तूं हस्तांबुजांनीं गाल हे गोंजारिले
गंधकाचें चूर्ण आतां त्यांतुनी वाटे जळे

घालितां तांबूल तोंडीं बोट हें तूं दंशिलें
आज त्याच्या गे विषानें स्वास्थ्य सारें भ्रंशिलें

बाहुंची नी पुष्पमाला जी गळां तूं घातली
घात घाली तीच आतां तांत जीवा वाटली

आणि तूं जी पुष्पमुद्रा ठेविली ओठांवरी
तप्तमुद्रा होउनी ती डाग देई अंतरीं

जाणसी तूं शेज कां ही अग्निशय्या जाहली
रेखिसी जीं आज स्वप्नें काल मीं तीं पाहिलीं

राहुनी खाईंत या मी स्वर्ग येथें पाहतों
कालकूटीं पोहतांही अमृतानें नाहतों

मुंबई, २९-२-४८

## या उत्तररात्रीं

या उत्तररात्रीं तूं सखये असशिल खचितचि जागी
अन् शंकेचा व्यंकट वृश्चिक असेल मारित नांगी
नकळत किंवा व्यथेंत माझ्या असशिल तूं सहभागी
असेल तुजला दिसला कवि तव हासतमुख वैरागी

कापुरसा सखि गार तिखट ये तुझ्या गांवचा वारा
झोंबुनि आणी नयनीं पाणी अंगीं आणि शहारा
कोसळती चित्तावर स्मृतिंच्या कातरणाऱ्या गारा
डोळे मोडित विनोद करिती काळोखांतुन तारा

वाघिणशी ही गाडी जाते टाकुन तुजला मागें
तिच्या वाढत्या वेगासरशीं आग जिवाला लागे
प्राक्तन आहे विणीत माझ्या भवितव्याचे धागे
तुझ्याचसाठीं शाल सखे ती...नीज नीज सुमनांगे

१२-३-४८

## पुढें काय ?

पुढें काय, पुढें काय ? तप्त दीर्घ वाळवंट !
उद्यां जायचाच आहे माझ्या जीवनाचा उंट

पिऊन जें घेतलें मीं तुझ्या सौहार्दाचें पाणी
आणि पोटीं गोळा केल्या गोड गोड आठवणी

क्षुधा-तृषा आतां त्यांच्या भागवाव्या रवंथानें
भाग्य माझें ठरविलें वेड्या-खुळ्या प्राक्तनानें

वाटेंत जे वास्तवाचे कांटे येतील यापुढें
चघळीत गिळीन मी माझ्या रक्ताचे आवंढे

जगासाठीं तुझ्या नांवें माझ्या पावलांची वाट
ठेवूनियां परत्राची जेव्हां गांठीन पहांट

उरीं फुटतांना तेव्हां डोळां आणीन तें पाणी
आणि क्षितिजांत पुन्हां पाहीन त्या आठवणी

पुढें काय, पुढें काय ? तप्त दीर्घ वाळवंट !
आज पिऊं दे ग मला तुझें जीवन आकंठ

१९-३-४८

## करीं मला वज्रदेही

अंधार हा धृतराष्ट्र, पृथ्वी ! भाससी गांधारी
ज्योतिष्मती माये कां गे डोळा बांधिसी अंधारी ?

मौनाचिया शिंपल्यांत फळे मुक्ताफळ-वाणी
बंद लोचनीं तुझ्या का तशा प्रकाशाच्या खाणी ?

डोळे असून मी आई ! कां गे अजून आंधळा ?
ठेचाळतों पदोपदीं, पाय असून पांगळा ?

मद्य काळोखाचें प्यालों त्याची झाली उरीं आग
ब्रळावले बिळांतले झोपलेले काळनाग

ज्वाला ओकीत मी झालों साऱ्या जगत्रया धाक
अंतरींच्या ओकेपणीं उठे विनाशाची हांक !

आतां सामर्थ्यचि माझें मला उठलें खावया
तुझी आठवली आई ! अमर्याद दयामाया

नाहीं आतां व्हावयाची पूर्वजन्मींची ती चूक
अनुतापाच्या या क्षणीं झालें संचित ठाउक

जसा जन्मलों तसा गे, तुझ्यापुढें उभा ठेलों
सर्व लज्जा, अहंकार स्वयें ओलांडून गेलों

काढ डोळ्याचें बांधप मला सारा पुरा पाही
आणि उभाच जाळून करीं मला वज्रदेही !

पुणें, ८-६-४८

## समजावणी

उगीच कां ग उदास घेउनी इंद्रवनींचा ध्यास ?
येति न जरि करिं तेथिल सुमनें अलभ्य तरि न सुवास
साजणी, उगीच कां ग उदास ?

त्याच वनांतिल कस्तुरिहरिणी
ती अपुली जननी ही धरणी
धुंदपणें नीलारुण कुरणीं
निज नाभींतिल भासांमागुन मुरडत करी प्रवास

स्तन्य तिचें लुचुनी रात्रंदिन
तिजपरि करुं त्रिभुवन क्रीडांगण
सेवित नवनव किरणांचें तृण
निज देहांतिल स्वर्गरसानें गोड मुखीं करुं घास

इथल्या रत्नीं तेथिल ज्योती
इथल्या नयनीं तेथिल मोतीं
प्रेम तेथलें इथें कपोतीं
भंगुरतेमधि इथें तेथल्या सुंदरतेचा वास

इथल्या हृदयीं तेथिल प्रीती
व्यथेंत इथल्या तेथिल गीती
येथिल मीलनिं तेथिल तृप्ती
इथल्या ज्वानीमधें तेथला घुमत फुले मधुमास

स्वप्नें तिथलीं इथल्या रात्रीं
तिथली विद्युत् इथल्या गात्रीं
मधु तिथला इथल्या मुखपात्रीं
मिठींत इथल्या गंधर्वांच्या मिथुनांचा इतिहास

सुगंध तिथले येथिल सद्गुण
मोहन तिथलें येथिल जीवन
मुक्ती तेथिल येथिल अर्पण
संजीवन तेथलें येथला रसनिर्भर सहवास

उणें करूं जग क्रीडुनि आपण
क्षणहि न दवडूं आनंदाविण
सहज हुपूं अंतीं हें कुंपण
हास, सखे, चल स्वर्ग खुला करुं जोंवर इथें निवास

अहमदाबाद, १२-७-४८

## शिव ते, द्या त्यांस पिंडावळ

"गा गा धुंदपणें प्रसन्न कवनें गा प्रीतिच्या कोकिळा
तूं गंधर्व तुझ्यामुळें गवसला आम्हां रसांचा मळा
तूं चिंतामणि बोलका तुजपुढें आम्ही मुके पामर
झालों धन्य परंतु ओवुनि तुझ्या कंठीं फुलांचे सर"

ऐकोनी वचनें सुकोमल अशीं डोळ्यांत आलें जळ
स्नेहाचें स्मरलें घरांतिल मला माझें गुणी मोहळ
ज्यांनीं विस्मरुनी स्वतःस मजला सौख्यें दिलीं नेहमीं
छाया-छत्र मला, त्रिताप सहिले प्रेमें श्रमीं-उद्यमीं

नांवें तीं इतिहासमान्य न जरी, तीं चालतीं पुस्तकें
माझे बोल सुलोल सर्व समजा त्यांचींच हो स्मारकें
सामान्यांतच जें तळें वसतसे स्नेहामृताचें मुकें
त्याच्यांतूनच आमुचीं उगवती हीं बोलकीं साळकें

गाती मुक्तपणें अखंड कवनें काकांमुळें कोकिळ
त्यांचा वाढवितात वंश, शिव ते, द्या त्यांस पिंडावळ

मुंबई, १८-७-४८

## साबरमतीच्या कांठीं

कर बांधाबांध गडे मांडूं पुन्हा नवी चूल
संपली ग तातातुटी विणूं आतां घरकूल

काढ तुझी लगबग आवडती साडीचोळी
बांध केस, माळ फूल, लाव टिकली वाटोळी

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 28226 वि: काव्य
नों: दि: 15/3/5

तुपाची ग फुलवात लाव भावें. देवापुढें
लाव अंगारा मुलांना आतां संपलें सांकडें

कर आई-वडिलांना तीन वार नमस्कार
त्यांच्या आशीर्वादें असा आज सांधला संसार

तुझा उधळिला जो मीं गडे संसार देखणा
त्याच्यामुळेंच तयाचा सरे आज उणेपणा

खवळल्या समुद्रांत जरी घातली मीं उडी
मायमाउलीनें आज मला उचलिलें तडी

येथें आहे महात्म्याच्या पुण्याईचें तपोवन
आहे शांती आहे तृप्ती सर्व मुक्तीचें साधन

येथें पावनतीर्थांत रमे सारसांची जोडी
साऱ्या आसमंतीं आहे गोव्यामधलीच गोडी

मोरपारव्यांची येथें दीसरात आहे दाटी
खारी, माकडांचीं पिलें धीट 'दीपका'च्या साठीं

'चंद्रनाथ' 'भारती'ला दुधा कांहीं नाहीं उणें
तुझ्यामाझ्यासाठीं आहे वाळवंटांत चांदणें

महात्म्याच्या पावलांनीं येथें धूळ झाली बुका
हवेमध्यें श्वास त्याचे धूप यायचा न तुका

तुझी भक्ती, तुझा त्याग, तुझें तप आलें फळा
माझ्या भविष्याचा मार्ग मला झाला ग मोकळा

महात्म्याच्या संगतीचा मला लाभला एकान्त
सहा महिन्यांत झाला खरा स्वप्नींचा दृष्टांत

त्यानें उचलिला भार सारी निरसली चिंता
त्याच्या पावलींच्या जळीं सोडूं आसक्तिअहंता

पुण्यक्षेत्रीं राहून या त्याचें स्वरूप आठवूं
साऱ्या गात्रांतून त्याला उरीं-जीवनीं साठवूं

गाऊं त्याचीं ओव्या-गाणीं शेकड्यांनीं, सहस्रांनीं
त्याच्या पावलांच्या खुणा उमटवूं पानोपानीं

चरक्याच्या तालावर रचूं त्याचें रामायण
जीवनांत पदोपदीं करूं त्याचें पारायण

आण यादस्तीनें परी एक येतांना नारळ
आणि बांध पदराला चार गोव्याचे तांदुळ

त्यांत आहे आपुलाल्या जीवनाची फलश्रुति
पितरांची, वंशजांची आम्हां सर्वांचीच मुक्ति

मुंबई, २३-७-४८

## यमदर्शन

अकस्मात असें
कळेना कसें
लागतें पिसें
आणि माझ्याच अनंत जन्मांचें भूत
येतें, मालवितें श्वासेंच ज्योती
आणीक सर्वांगीं
भरून कंप
कुदत कुदत भंगीत राहे
स्फटिकचूर्णांची रांगोळी माझी

घर माझें असें
करून उजाड
पिळून अष्टांग गाळितें घाम
तेलांत बुडवी काळोख सारा
बडवी ऊर
काढित गळा
व्याकुळ होऊन
भारितें मला
बोलत शब्द तुटक वाक्यें

कळतें कांहीं
लागतें वेड
परका निरर्थ वाटून संसार
माझ्याहि अंगांत संचार होई

थातारुनि त्याला
लाथाडितों सारें
हिंडतों त्यासंगें
होऊनी वारें
जातों उधळून गृहपुत्रदारा
तुडवून आणि पसारा सारा
खांद्यावर त्याच्या
टाकून हात
नशेंत जातों तरून सागर

चढून डोंगर
लंघून दऱ्या
भेदून मेघ
जातों सवेग
पाहून हसतों जगाचीं सुखें
जिभा टाकणारीं आशाळ मुखें

वाळूचे किल्ले
काचेचीं घरें
आणि मग तेव्हां
अमृतवाणीचे गहन मंत्र
श्रवणीं येती
भारून घेती
पांगळे गति
पाजळे मति
जळून गात्रें होतात ज्वाळा
तेजांत त्यांच्या नाहती स्मृति

काजळी तमाच्या
कृष्णकमळांत
कृष्णनील दिसे यमाची मूर्ति
ललाटीं त्याच्या रक्ताची उटी
ज्योतीची शिखा
अग्नीचीं कुंडलें
गळ्यांत तेजस्वी प्राणांची कंठी
वक्षस्थलीं शुभ्र भस्माचें स्वस्तिक
मांडींत घेऊन
प्रकाशपुस्तक
अश्रूंच्या शाईनें
लिही जीवात्म्यांच्या असंख्य व्यथांची—
अनंत कथा
आणि त्यांच्यावर
सिंचीत राहे
मुक्तात्म्यांची रक्षा
उलटित पान
पालटीत युग
मुखानें म्हणत
अथर्वमंत्र

दर्शनीं अशा
उमगे मला
विश्वाचें या साऱ्या अद्भुत रहस्य :

रहस्य कानडें
सांगतां न ये
सर्वांग जाळितां
सर्वांगीं दिसे
पोटांत हसे
लावुनी पिसें
ज्याविण सारें असून नसे
ज्यामुळें सारें नसून असे

मुंबई, २८-७-४८

## उःशाप

करूं नकोस विलाप हृदया, करूं नकोस विलाप
वरासवें रे तुझ्या कपाळीं एक भयंकर शाप

जगांत इथल्या तूं परदेशी
तुझें वागणें इथें विदेशी
जे जे निर्मल भाव शिंपिशी त्यांतुनि उगवे पाप

असेल गतजन्मींचें संचित
जिथें तिथें तुज करीत वंचित
परी कांचना ही जनगंगा संजीवक तेजाप

कवण ग्रहाची भीषण छाया
अथवा मायाविनिची माया
मधांतुनी विष पाजित अनुदिन घडवितसे अनुताप

अशीच आपण शिकूं विरक्ति
निरभिलाष करुं जीवनभक्ति
लाथाडुनि मग जाऊं अंतीं ऐहिकतेचें माप

मरण न कधिं हृन्मांगल्याला
असंख्य फुटतिल कोंभ तयाला
मृत्यूनंतर शतवर्षांनीं मिळेल तुज उःशाप

मुंबई, २४-८-४८

## हिमालयाची हांक

श्रवणिं ये गभीर हांक कवण सुंदराची
काय गहन असह्य सह्यशैलगव्हरांची ?

नाभींतुन प्रणव उठे
रोमांतुन कोंभ फुटे
झुळझुळती दरवळती कंपनें स्वरांचीं

ध्यानांतिल सिद्ध मुनी
कोरित अनुपम लेणीं
करिति वज्रलेप नर्तनें नटेश्वराचीं

रत्नांचे द्रव स्रवती
स्वप्निल रस लवलवती
त्यांवरतीं फुलति गुजें यक्षकिन्नरांचीं

डुगडुगतो आदिताल
नाचे कटिबद्ध काल
डमरूंतुनि उपनिषदें घुमति शंकराचीं

वळल्या गंगायमुना
आतुर माहेरपणा
हिमगिरिंतुन हांक मला परमसागराची
श्रवणिं ये गभीर हांक भुवनसुंदराची

वेरूळ-अजंठ्याच्या प्रवासांत, १०-११-४८

## माझ्या मनाची 'माउ'ली

माझ्या मनाची 'माउ'ली फिरे वाटोळीवाटोळी
स्वतालाच धरण्याचें तिला वेड तिन्ही काळीं

शेज चुलीची दिवसा उशी राखेची रात्रीला
पीत सर्वांगानें वही जाते स्वप्नांत यात्रेला

वाढणाऱ्या काळोखांत तिचे उजळती डोळे
घर माझें सांभाळाया तिचीं जागती पाउलें

करी घुशीउंदरांचा लाल-मंगल शेवट
पाजी पोटींच्या वहीला खाऱ्या रुधिराचे घट

विष बाधतां त्यांतलें अमृताचा घेई शोध
खुडी अंकुरामधोनी निवडून आयुर्वेद

पतंजलीची ही आई घाली योगाचीं आसनें
ओढी अशौचावरोनी शुद्ध भूचीं पांघरुणें

तिची रती अगोचर तिचा अज्ञात भ्रतार
तिच्या रसनेंत आहे शुद्ध साष्टांग शृंगार

लक्ष प्रसवांचें वाहे तिच्या भोगांत क्रंदन
एका युतींत ती राहे आठ पिलांची गाभण

अष्टपुत्रा धुंडाळिते घरीं काळोखाचा कोन
पिसावते कातावते दिवे विजेचे पाहून

घेते आक्रसून गात्रें पाहे होऊन व्याकुळ
घाली लावी गळ मला तिच्या मातृत्वाची कळ

दिवे मालवितों सारे शहारतों अंगोपांगीं
रव ऐकून पिलांचे ओलावतों अंतरंगीं

फुटावया त्यांना डोळे थांबतों मी कांहीं काळ
तोंच आक्रोश ये तिचा, "बाप पोरां झाला काळ!"

दिवे लावितां दिसेना, काळोखांत सापडेना
अशी माझ्या 'माउ'लीच्या होई संसाराची दैना

तरी तशांतून वांचे पोर एखादें दुसरें
मरणाच्या वेदीवर खेळे जीवन हांसरें

तिचें यौवन राखाया पोरें खाई का भ्रतार ?
काय एकासाठीं वाहे माय आठांचा हा भार?

त्याग-भोगाचा हा खेळ कळे परी आकळेना
मात्र सृजनाकारणें अर्थ जीवना-मरणा

पुणें, १४-१२-४८

## मला आपुलें म्हणावें

स्नेहें तव जळत प्रभो, उजळतों स्वभावें
हरुनि दुरित सकळ मला आपुलें म्हणावें

भोगांतुनि मथुनि त्याग
त्यागांतुनि कनक-राग
रुधिरांतुनि चिन्मय पय सतत पाझरावें

या मंगल चांदण्यांत
सुख तुजला डुंबण्यांत
उधळित निज रंग निळा त्यांत तूं नहावें

तवपणिं हें माझेंपण
वितळुनि हिमसम कणकण
लोचनिं तव होउनि जळ विश्व मीं पहावें

बनुनीं आनंदबिंदु
आकळुनी विश्वसिंधु
धुंदींतच दीनबंधु मीं तुझ्या रहावें

सरुनि सकळ द्वैतपणा
नटवुनि जीवन-मरणा
होउनि निःश्वास तुझा नसुनि मीं असावें

मुंबई, २०-१२-४८

## छेड अशीच शरीरसतार

तूं छेड अशीच शरीरसतार
कधिं करित मृदुल कधिं कठिण-प्रहार

भैरव छेडित कधिं मज जागव
जाळित कधिं मज दीपक आळव
काढ जोगिचे कधिं करुणारव
पीळित तार न् तार

पड्यांपड्यांतुन दिडदा दिड
ताडित माझी आवडनावड
जडाजडाची ओलांडित तड
उलगड स्वरशृंगार

करांगुलीचें तुझिया ताडन
मृदु-मादक कधिं दाहक दारुण
तेणें परि मम स्फुंदन क्रंदन
स्रवतें जीवनसार

तव किमयेच्या कनकरवांनीं
व्यथेंत रसरत्नांच्या खाणी
तुझ्या दयेचें त्यांतुनि पाणी
निथळे अपरंपार

तव स्पर्शाविण जाई जो क्षण
तो मजला मरणाहुनि दारुण
कृतांतसें मम वंध्य रितेंपण
ओकित ये अंधार

करिं ही तनु तव करिंची कांडी
विश्रांतीला दे तव मांडी
नश्वर पिंडांतुनि ब्रह्मांडीं
करीं अखंड विहार

मदिय निबंधनिं रे, तव मुक्ती
विरक्तींत मम तव अनुरक्ती
विलोपनीं मम तव संतृती
घेई ध्वन्याकार

सरूं पाहतां हिची टवटवी
सद्गति दे हिज तुझ्या गौरवीं
मृत्यूची आनंद-भैरवी
झणकारित ने पार

मुंबई, २४-१२-४८

## उषावतरण

निळ्या तलावांतुनी फुलावें लाल कमल सुंदर
भावदलांतुनि कलारती वा यावी लोकोत्तर
दया प्रभूची कविहृदयांतुनि उसळत शब्दांतुनी
वा सत्याची पुतळी यावी सोज्ज्वळ त्यागांतुनी

अहा प्रगटली तशी उषा ही, उघडिं नयन लौकर
देवद्वारीं उभी देवता स्वर्गदेहलीवर
दोहींकडुनी सुवर्णसमया प्रक्षाळिति पाउलें
भुवनश्री करिं घेउनि हसते चैतन्याचीं फुलें

भावभक्तिनें शतकंठानें गातें जग आरती
कर जोडुनि वरदान मागतें जीवनमय जागृती
प्रार्थनेंत या रत हो प्राणा विशाल करिं अंतर
हृदयाच्या मापानें तुजला मिळतिल वर नंतर

१९४८

## क्षितिजाकडे

जरा गोलसर जरा ओलसर हिरव्या माळावर
रांगत पांगत होती सरकत थरथरती लोकर

असेंच होतें चित्र त्रिबलें निळसर क्षितिजावर
उभयांना कुरवाळित होते प्रभावतीचे कर

चित्त हरिखलें तोंच देखिलें झाड छत्रसें खडें
सकल तमाला उरीं कवळुनी खिन्नहृदय त्रापुडें

मीं खिळलेला खिस्त देखिला त्याच्या बुंध्यावर
होती त्याची माता चारित मेंढ्या कुरणावर

जखम अंतरीं घेउनियां मी हसत चाललों पुढें
वेदनेंतुनी वात्सल्याच्या विशाल क्षितिजाकडे

१९४८

## तिरंगी झेंड्यास गोव्याचें निमंत्रण

लहरत ये, विहरत ये, हिंदवी ध्वजा रे
आतुर तुज कवळण्यास आमुच्या भुजा रे !

अमुच्या गोव्यांत फुलें
दुर्वांकुर मधुर फळें
तांदुळ नारळ सुसज्ज पूजना तुझ्या रे

तुजसम वन हरित तिथें
तुजसम भू लाल तिथें
तुजसम शुभ्र फेनधवल सिंधु-शैलजा रे

शुचि असून शापविद्ध
बल असून दीन बद्ध
द्रौपदिसम आहे तुज शांभवी प्रजा रे

चक्रें तव दनुजदमन
नमव शकुनि दुःशासन
लाज रक्षिण्या न आज तुजविणें दुजा रे

तुजविण संचित जळतें
तुजविण सौभाग्य रितें
तुजविण बंदींत देव भोगिती सजा रे '

आशांनीं निज हिरव्या
भावांनीं धवल नव्या
गौरव रुधिरें भगव्या रंगवूं तुझा रे

दगड तिथें तडफडती
ऋत, धृति, मति तळमळती
अंधारीं घोर भयद, तळपती विजा रे

ये जय जय राजेश्वर
उद्धर जन, देव, पितर
अन् माझी व्यथित बद्ध शब्दसारजा रे

मुंबई, २९-५-४९

## स्वातंत्र्यलक्ष्मीस

स्वर्णारुण अंशुमालि भाग्यतिलक भालीं
कोटिचंद्र कोटि अरुण इंद्रनील गालीं

नयनिं हिच्या गहन निशा
बिंबाधरिं उदित उषा
मुदित करित दाहि दिशा चारुता निघाली

प्रलयाच्या प्रहरांतुन
कलहाच्या जहरांतुन
मंथनांतुनी महान लक्ष्मिसम आली

वाम करीं अनल वरी
सव्य करीं कमल धरी
क्रांति, शांति खेळवीत पाप-ताप जाळी

चिंतामणि चरण हिचे
कौस्तुभमणि या महिचे
रत्नजडित करि भविष्य सहज चरणचाली

माप पावली तपास
त्रास संपले उपास
माप भक्तिचें भरून मुक्तिदान घाली

जाळुनि मनिं दीपधूप
होउनि शुचि एकरूप
स्वागता सुसज्ज सर्व होउं पर्वकाळीं

अन् हिचें पसायदान
सेवुनी सर्वे समान
साजरी करूं चला महान ही दिवाळी

मुंबई, ५-७-४९

## माझी पूजा

हे मित्रांनो ! भाग्य न माझें तुमच्यासम जळण्याचें
मुख मंगल निज मातृदेविचें युग युग पाजळण्याचें

तुम्हि श्रद्धेच्या ज्योती
तुम्हि धैर्याच्या मूर्ती
नमन तुम्हांला त्रिवार माझें, पुढच्या सर्व पिढ्यांचें

भाग्य न माझें तुम्हांपरी जन ! मुकेपणीं जळण्याचें
अखंड अपुल्या निःश्वासांनीं परिसर दरवळण्याचें
धूप तुम्ही उदबत्त्या
हरण सदैव असत्या
स्मरण आपुलें श्वसन अखंडित संजीवन हृदयांचें

अन् भगिनींनो ! भाग्य न माझें तुमच्यासम फुलण्याचें
सर्व समर्पुनि निर्माल्याचें मंगल धन व्हायाचें
तुम्हि रसपुष्पें शोभा
सौंदर्याची आभा
स्मृतींत तुमच्या सत्य उद्यांचें स्वप्न होउनी नाचे

अन् वडिलांनो ! भाग्य न माझें तुमच्यासम झिजण्याचें
नित्य उगाळित जीवनकाष्ठें शामकता देण्याचें
तुम्हि चंदन, हित, शांती
आश्वासन, विश्रांती
पुण्योदक नयनांतिल तुमच्या पाणी अभिषेकाचें

भाग्य न माझें अन् श्रमिकांनो ! तुम्हांपरी खपण्याचें
पीक काढुनी ताट भराया षड्रस-नैवेद्याचें
तुम्ही फळें सेवेचीं
उदंड आरोग्याचीं
तुमच्या बीजांमध्यें युगंधर सारे वृक्ष उद्यांचे

महापूजनीं स्थान न कळुनी या दुबळ्या जीवाचें
रितेपणीं निज निश्चल बसलों मुख पाहत देवीचें
हललें हृदयीं कांहीं
निनादले स्वर देहीं
घंटा झालों, स्रवलों स्तोत्रें, यश तुम्हां सर्वांचें

२४-७-४९

## असलें हें फळ केविं तपाला ?

असलें हें फळ केविं तपाला ? कुठलीं पापें झालीं गोळा ?
बसोत बसले कान आमुचे, तात, तुम्ही पिंडांतुन बोला

पुण्य मुहूर्ती घरांत शिरलों, तोंच वास्तु ही दुभंग झाली
तुटून पडली देवघरांतिल युगायुगांची अन् माठोळी

गोड तुम्हीं जी आळ लाविली, आंबा होउनि पाडा आली
फळांतुनी पहिल्याच्च कशी हो तुम्हांस डसली तक्षक-आळी ?

तुमचें पडलें रक्त शिरावर आणि आमुचीं फिरलीं माथीं
हातीं आलें सोनें त्याची बघतां बघतां झाली माती

हिंसेवांचुन शौर्य दिसेना, सत्तेवांचुन सत्य पटेना
कपिला दुभते दारीं तरिही संशय अमुचा कसा फिटेना ?

थेटर झालें अमुचें देउळ, मकानामधें दुकान आलें
आणि आमुचें शील मिरवितें पांढऱ्यांत गुंडाळुन काळें

कमळें तुडवुनि गाळ निवडिते नवी 'युगंधर' अमुची कविता
धुणीं धुण्यांतच्च रंगुनि वाहे अमुच्या साहित्याची सरिता

कसतो त्याला ना घड भाकर, श्वान धनाचा चघळी पोळी
कुलटेच्या न्हाणींत सारिते पतिव्रता गंधाची मोळी

खाकी जाउनि आली खादी तरी न सरल्या लाथा, गोळ्या
अजून रडती काळोखांतुन पिचल्या मळल्या साड्या-चोळ्या

परार्धलक्ष्मी पडली भूमी, तरि काखेला अमुच्या झोळी
स्वातंत्र्याच्या पारावरतीं अमुच्या चारित्र्याची होळी

स्वर्णमालिनी फुटली अंगीं नखें कातडी स्रवती धारा
आणि चालला कली पुकारित दिवसाढवळ्या अमुचे बारा

खतासारखी तरीहि तुमची मुळांत अमुच्या वसते भाषा
श्रद्धा तुमची अमुचें जीवन, तुमचें जीवन अमुची आशा

द्या हो द्या उःशाप अम्हांला, झाडा हृदयांतली काजळी
रुधिरांतिल नरकासुर जाळा, प्राणांतुन पाजळा दिवाळी

पुणें, १३-९-४९

## दे अंतीं तव गोडी

क्षेत्र परम दावुनि नयनां कां घालिसि वेड्या पायीं
विशाल देउनि पंख मनाला कोंडिसि कां या देहीं ?

दरवळ उधळुनि अवतींभवतीं मोडिसि कां उरिं कांटा ?
पळभर उजळुनि काजळिसी कां चिरयात्रेच्या वाटा ?

मागसि कमळें कंद तयांचे ठेवुनियां कां पंकीं ?
विफल तयां मग गणिसी कां रे, पडतां पाय कलंकीं ?

प्राक्तन लिहुनी भाळीं कां रे, खिळविसि डोळे खालीं ?
उमगे तें नच म्हणुनि पुन्हा कां शिक्षा देसि निराळी ?

घनतिमिरीं सोडून घालिसी तेजाच्या कां हाका ?
मरणाच्या जबड्यांत दाविसी कां कनकाची अलका ?

खेळ चालला तुझा परी प्रभु ! जीव चालला माझा
जावो तो परि क्षेम देउनी घेउनि मजला जा जा !

देह उरो उपकारापुरता, पाश सकल हे सोडीं
संसाराच्या कटुतेंतुनि परि दे अंतीं तव गोडी !

पुणें, २३-९-४९

## 'आमार जीबनइ आमार बानी'

'आमार जीबनइ आमार बानी'
वहाणीं बोलतें गंगेचें पाणी
क्षाळितें पाप
वारितें ताप
खालचें जीवन वरतीं आणी
'आमार जीबनइ आमार बानी'

'आमार जीबनइ आमार बानी'
उषेच्या उद्गमीं द्विजांचीं गाणीं
इंदिरा श्रमे
धरित्री नमे
ओटींत घेऊन रत्नांच्या खाणी
'आमार जीबनइ आमार बानी'

'आमार जीबनइ आमार बानी'
कर्मांत श्रद्धा जागे प्रमाणीं
लाविते दीप
आत्म्यासमीप
भविष्य रेखीत युगांच्या ध्यानीं
'आमार जीबनइ आमार बानी'

'आमार जीबनइ आमार बानी'
शब्दां न उसव, जहालों मौनी
आर्तांचे डोळे
पाहून ओले
श्रद्धा, उषा आणि जहालों पाणी
'आमार जीबनइ आमार बानी'

पुणें, ९-१०-४९

## घेऊं लक्ष्मीला घरीं

काल अवसेला केली घरीं पुनव साजरी
ओवाळिले आप्तइष्ट सगेसोयरे शेजारी

संसाराच्या या गाड्याला ज्यांनीं दिला खांदा, हात
बालकांच्या हातें त्यांना केली चांदीची खैरात

परी एक विसरलों सये चुकलों पायरी
बुंद लाथाडुनी गेला सर्व पुण्याच्या घागरी

कालच्या त्या आनंदाचा आज केर झाला दारीं
तेथें मंगल कराया आली लक्ष्मीची स्वारी

तीरापरी उरीं माझ्या रुते तिची ललकारी
जगापरी आपणही झालों स्वार्थांध बाजारी

विसरलों पुरातन वाडवडिलांची रीत
पायीं मोडियली त्यांनी हातें घातलेली नीत

वर्षभरी आपुलालें जिनें अंगण झाडिलें
उपेक्षेच्या कोपऱ्यांत तिला आपण सांडिलें

आरोग्याची पावित्र्याची जिनें वाहियली चिंता
तिची सेवा तुडवून गेली आपुली अहंता

संबोधून केरसुणी केली तिची हेटाळणी
कृतघ्नतेमुळें झाली व्यर्थ सारी ओवाळणी

खंत-खेद नाहीं तिला ती गे सेवापरायण
आतां तरी आण वेगें राट, कुंकू, निरांजन

घेऊं फोडूनियां गाल घासूं कपाळ भुईला
पश्चात्तापाच्या अश्रूंनीं चल ओवाळूं या तिला

काल जनांची दिवाळी केली आपण साजरी
आज मनांतली करूं : घेऊं लक्ष्मीला घरीं

पुणें, २६-१०-४९

## आळंदीची वाट

झाली भगवी दारापुढची आळंदीची वाट
आली सिंचित मृदुल धुळीवर दहिंवर गार पहाट

खडखड किणकिण ध्वनि गाड्यांचे गमले टाळमृदंग
अंगीं जागले भागवतांचे ओव्या आणि अभंग

किलबिल पक्ष्यांची ही नकळत मिसळत गेली त्यांत
पूर्वेवरचें सोनें वितळत ओघळलें हृदयांत

पुढची भगवद्गीता गमली यज्ञकमल नयनांस
अनुवादांतिल तिन्ही विभूती बसल्या कोंडुनि श्वास

मुनी विनोबा, कवि ज्ञानेश्वर, योगी मोहनदास
त्रिविध त्यांचिया मुद्रांमधुनी प्यालों ब्रह्मविलास

घालों, आलों भानावरतीं समोर निद्रित बाळ
दिसलें, गमलें ब्रह्म सनातन सहजसुलभ वेल्हाळ

करांगुली रवि फिरवित होता त्याच्या कुरळांतून
शांतीवरचें कांचन पाहुन गेलों मी भुरळून

सुकृत फळलें फळली माझी आळंदीची वाट
आज अमृतें सहज पाहली माझी सोनपहाट

पुणें, २०-११-४९

## वास्तवता मज न दिसे

पागल मी पागल मी वास्तवता मज न दिसे
वस्तूंचे प्राण मला लाविति दिनरात पिसें

पुष्पांतुनि मोहविती शीतल मज अग्निशिखा
कधिं बाळें देवांचीं लाविति निज ओठ मुखा

पर्णांतुनि लसलसत्या चमचमती मोरपिसें
खुदखुदतें त्यांतुनि कधिं गोपींचें गोड हसें

तृण कोमल ये वरतीं नमवित जधिं खडक चिरे
मरणाला जिंकुनियां श्रद्धा हृदयांत शिरे

दगडादगडामधुनी जळ जेव्हां झुळझुळतें
आईचें हृदय मला सहजपणें उलगडतें

मूकांच्या जखमांतुनि जेव्हां जड रुधिर गळे
वाल्मिकिचें रामायण पढल्याविण मजसि कळे

गरुडजन्म मजसि उषा, कृष्णमृत्यु मजसि निशा
रुद्राचें भस्म मला जळणाऱ्या दाहि दिशा

व्यासाच्या प्रणवाचें मंथन मज सिंधुमधें
प्रीतीची जीवकळा मेघाच्या बिंदुमधें

बद्धासन बुद्ध मला क्षितिजांतिल गिरिमधुनी
सूर्यास्तांतुनि दिसते दधिचीची नित्य धुनी

खंडित वृक्षांत उभ्या खिळलेला खिस्त दिसे
'जूडा'चा दंश मला मृत्यूहुनि खोल डसे

भोगविलासांत दिसे कलिची मज रक्तपिती
अप्सरेंत मी बघतों जळणाऱ्या लक्ष सती

भिक्षेच्या करटींतुनि भस्मासुर भिववि मला
मी रडतों, ओरडतों, 'उघड तिळा, उघड तिळा!'

ऐकेना परि कोणी अग्नि उरीं धडधडतो
ज्वालांपरि मी निरर्थ हा अनर्थ बडबडतों

शापित मी शासित मी, वास्तवता मज न दिसे
वस्तूंतुन ठेचाळत धुंडित मज हिंडतसें

पुणें, ३-१२-४९

## चिरंतनाचा ध्यास

अम्हांला चिरंतनाचा ध्यास
महानतेच्या ज्योतिर्जगतीं अखंड अमुचा वास

महानतेस्तव अमुची काया
महानतेस्तव अमुची माया
महान बघतां लहानांतही म्हणुनि तयांचे दास

क्षमा जान्हवी अमुची माता
सत्य प्रभाकर अमुचा जनिता
भ्राते अमुचे समग्र भूतें, घर अमुचें आकाश

दारिद्याची अमुची दीक्षा
सत्त्वाची प्रतिपर्ळी परीक्षा
विपर्यास, छळ, निंदा यांतुन अमुचा योगाभ्यास

जें जें देवें दिधलें हातीं
खडे, कोळसे अथवा माती
त्यांतुनि त्याच्या स्वप्नमूर्तिचा घडवूं उदय-विकास

संकल्पाचें वरितां कंकण
स्वर्गाचेंहि न अम्हां विलोभन
निर्मूं नूतन स्थान दिगंतीं वितरित ध्रुवप्रकाश

ज्या सेवेचा मणी बांधिला
सतिसम जीवन वाहुं त्याजला
ती अपुरी तोंवरी विटेवरि तिष्ठवुं भगवंतास

अंगिकारिली ज्यांची निष्ठा
त्यांच्यास्तव ठोकरूं प्रतिष्ठा
परलोकाहुनि प्रियतर आम्हां श्वानाचा विश्वास

या जगताची व्यथा हराया
राजमंदिरीं रचूं सराया
स्वयें वरूं वनवास यौवनीं, पुत्रोत्सविं संन्यास

क्रांतिप्रसवा अमुची शांती
श्रद्धंतच अमुची विश्रांती
विश्व आमुचें शरीर आम्ही त्याचे श्वासोच्छ्वास

मौनीं अमुच्या मंत्र मुक्तिचे
तपांत अमुच्या सृजन शक्तिचें
कोमल करुणेंतुनी कलांचा दिव्यानंदविलास

जाळा अथवा उटणीं लावा
क्षय वृद्धी ना अमुच्या भावा
चित्त आमुचें नित्य विदेही स्मितमुख आणि उदास

समिधांसम या तनुचीं काष्ठें
जाळुनि येथिल हरूं अरिष्टें
निज भस्मांतुन ऊर्ध्व दिशेंतुन अमुचा पुढें प्रवास

पुणें, १९४९

## खवीस

खोप बेचिराख झाली
        बिया साळ्याच्या भाजल्या
स्वतः फोडून सोलून
        त्यानें आवडीनें खाल्ल्या

सांत्वनार्थ जे जे आले
        त्याला ‘ खवीस ’ म्हणाले
बायाबापड्यांचे मात्र
        डोळे पाणावून आले

कपें, १६-१-५०

## धन नाहीं हें पाणी

        धन नाहीं हें पाणी
कोटि भगीरथ खपले तपले मग फुटलें पाषाणीं

        खेळत खेळत त्यानें जावें
        जग आशांनीं हिरवें व्हावें
मानव्याचे वृक्ष फळावे, वेली आणि फुलांनीं

        याच्या घाटाकांठावरतीं
        पुरें मंदिरें यावीं वरतीं
रमेउमेचीं त्यांत घुमावीं भक्तिमुक्तिचीं गाणीं

        वाहतसे हें सगरांसाठीं
        इतुक्यांतच कां करितां दाटी ?
त्यांच्या शापें ओठीं पोटीं होइल हो विषवन्ही

भिडतां क्षणिं हें त्यांच्या ओठां
फुटेल घो घो बारा वाटा
खुशाल तें मग तुम्हीहि घोटा हर्षे लाख पशांनीं

संचयांत हो हासें नासें
तीर्थ असुनिही होइल बासें
कलशाकलशांतुनी शनैश्चर उठतिल भर माध्यान्हीं

रवि घारेला जाण्याआधीं
पात्रीं द्या कलशांस समाधी
हटवा आधी, मिटवा व्याधी, माझि न ही युगवाणी

पुणे, १७-२-५०

## कानफाट्याचा फटका

अश्वत्थामा तेल मागतो खिस्त मागतो पाणी
धनिक मागतो अन् प्रेताच्या टाळूवरचें लोणी
रक्त मागतो सुभाष आणिक सूत मागती गांधी
खादी घालुन लाच मागती वजीर आणिक प्यादीं

कर्ज मागतो किसान आणिक खोत मागतो सारा
भुई मागते खतें-आउतें, गुरें मागती चारा
मजूर मागे काम मुशारा, न्याय मागतो कैदी
नेता मागे गर्दी-टाळ्या, लोड मागती ऐदी

अन्न मागती फुकटे भटके, आग मागती भाई
भगवा मागे नवा पेशवा अन् ब्राह्मणबाच्छाई
दाता मागे मोड दहाची, अंध मागतो दिडकी
पोटासाठीं सती मागते एक रिकामी खिडकी

लेक मागतो माधुकरी अन् नवरा मुलगा खोली
नवरी मागे अर्धा हिस्सा, शिक्षणसंस्था झोळी
घरमालक मागतो पागडी, मतें मागती लुच्चे
गाल फुगवुनी खुळचट पोरी दोन मागती गुच्चे

कलावंत मागतो प्रसिद्धी शिवाय आणिक कांहीं
कोण मागतो काय याजला हिशेब उरला नाहीं
एक मागतों माणुसकी मी पुरे एवढी भिक्षा
रुद्र येतसे मागुन माझ्या घ्याया सत्त्वपरीक्षा

पुणें, १८-२-५०

## अजून थोडें सोस मना

रे, अजून थोडें सोस मना

जळल्यावांचुन नाहीं ज्योती
कढल्यावांचुन नाहीं मोती
रडल्यावांचुन नाहीं प्रीती
नच घणांवांचुनी देवपणा

प्रसववेदनांविण ना सृष्टी
तपनावांचुनि नाहीं वृष्टी
दुःखाविण ना जीवनदृष्टी
मेल्याविण मिळला स्वर्ग कुणा

क्षुधेविणें रसनेंत न गोडी
छलनाविण ना सुकृत-जोडी
उरिं फुटल्याविण सुटति न कोडीं
रस नसे यातनेविण कवना

दातांनीं जरि जीभ चाविली
कुणी बत्तिशी सांग तोडिली
सगळी ही अपुलीच मंडळी
मग शब्द कशाला उणादुणा ?

घरटें तुटतां, खुलें दिगंतर
मोह संपतां, आप्त चराचर
सोससोसतां सासर हो घर
अद्भुत यापरि हरिची करुणा

पुणें, २-२-५०

## खिडक्यांवर वाजे वारा

खिडक्यांवर वाजे वारा ग
चल उघड सुंदरी दारा

रस्त्यांत धुळीचे भंवरे
नभ क्षणांत झालें गहिरें
रवि ठिबके होउनि पारा ग

खोडांतुनि फुटले भास
दगडांतुनि सुटले श्वास
रजताच्या झडल्या धारा ग

सांभाळित अंचल-ओचे
उघडलें दैव कोणाचें?
निर्बंध वेचुं या गारा ग

करुं मुखांत त्यांचें पाणी
आकळूं ऋतू गात्रांनीं
दो क्षणांत निववुं सहारा ग

उच्छृंखल यौवन नाचे
भय सरे जरामरणाचें
ये बहर पुन्हा शृंगारा ग

मातींतुनि खिद्‌ळे पाणी
पाण्यांतुनि फुटती गाणीं
गाण्यांत हिरवळे चारा ग

प्राणांत नवीनच ज्योती
पावलींत झालर मोतीं
नवतोरण घरसंसारा ग

पुणें, १०-७-५०

## माझ्या गोव्याच्या भूमींत

माझ्या गोव्याच्या भूमींत
गड्या नारळ मधाचे
कड्याकपारीमधोनी
घट फुटती दुधाचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
आंब्याफणसांची रास
फुलीं फळांचे पाझर
फळीं फुलांचे सुवास

माझ्या गोव्याच्या भूमींत
वनश्रीची कारागिरी
पानाफुलांची कुसर
पशुपक्ष्यांच्या किनारी

माझ्या गोव्याच्या भूमींत
उन्हाळ्यांत खारा वारा
पावसांत दारापुढें
सोन्याचांदीच्या रे धारा

माझ्या गोव्याच्या भूमींत
येतें चांदणें माहेरा
ओलावल्या लोचनांनीं
भेटे आकाश सागरा

माझ्या गोव्याच्या भूमींत
चांफा पानावीण फुले
भोंळाभाबडा शालीन
भाव शब्दांवीण बोले

माझ्या गोव्याच्या भूमींत
गड्या साळीचा रे भात
वाढी आईच्या मायेनें
सोनकेवड्याचा हात

माझ्या गोव्याच्या भूमींत
सागरांत खेळे चांदी
आतिथ्याची अगत्याची
साऱ्या षड्रसांची नांदी

माझ्या गोव्याच्या भूमींत
जिव्या सुपारीचा विडा
अग्निदिव्यांतुन हसे
पाचपोवळ्यांचा चुडा

माझ्या गोव्याच्या भूमींत
काळे काजळाचे डोळे
त्यांत सावित्रीची माया
जन्मजन्मांतरीं जळे

माझ्या गोव्याच्या भूमींत
लाल माती, निळें पाणी
खोल आरक्त घावांत
शुद्ध वेदनांचीं गाणीं

माझ्या गोव्याच्या भूमींत
खड्गा जडावाची मूठ
वीर-शृंगाराच्या भाळीं
साजे वैराग्याची तीट

माझ्या गोव्याच्या भूमींत
उंच घूड देवळांचे
ताजमहाल भक्तीच्या
अश्रूंतल्या चांदण्याचे

माझ्या गोव्याच्या भूमींत
तृणीं सुमनांचे गेंद
सिद्ध कुणब्यांच्या तोंडीं
शुद्ध सौंदर्याचे वेद

माझ्या गोव्याच्या भूमींत
सुखाहुनी गोड व्यथा
रामायणाहुनी थोर
मूक उर्मिलेची कथा

माझ्या गोव्याच्या भूमींत
सारा माझा जीव जडे
पुरा माझ्या कवनांचा
गंध तेथें उलगडे

पुणें, ११-७-'५०

## काळ बोले

काळ बोले टक टक
उरलेसुरले मोह झटक

काळोखांतच दिसतें खरें
कोण भलें, कोण बुरें
पाहिलेंस खूप, आतां उमज
जशी नेक तशी निपज
निजलेल्यांना घोरूं दे
शिरलेल्यांना चोरूं दे
जीभ आवर, मरशील फुकट
जगणें नंतर त्याहुन बिकट
अशा जगाचें नको सुतक
काळ बोले टक टक

कुठवर त्याचा घेशील भार
वजनानेंच होशील ठार
शेतांत तण वारंवार
कष्ट सोळा, दाणे चार
ज्याला मृत्यू त्याला घाई
सृष्टि अमृताची आई

म्हणून धीरे गाडी हाक
जमेल तितकें करून टाक
आंतल्या आंत लाव टक
काळ बोले टक टक

तिथेंच सर्वस्वाची मूस
आपलाच देह आपलाच क्रूस
त्यावर स्वेच्छें खिळेठोक
डोक्यास कांटे आणि खोक
याचेंच नांव खरें मरण
याचेंच नांव खरें जीवन
असलें रक्त अनासक्त
जातें जगास करून मुक्त
नंतर प्राणा नाहीं अटक
काळ बोले टक टक

पुणें, १५-७-५०

## जळीं पहाटे शुक्र बिंबला

स्फटिक-शिळेसारख्या बिलोरी
जळीं, पहाटे शुक्र बिंबला
निज चंचूनें त्यास टिपाया
वेडा कुणि तरि हंस धुंदला

थरारलें माझिया लोचनीं
त्या बिंबापरि सोज्ज्वळ पाणी
निश्चळ शीतळ देह जाहला
नितळ निळा त्या स्फटिकावाणी

खेड, १२-८-५०

## तुझी माया

भूमीपरी तुझी माया मुकी साठूनियां पोटीं
वृक्षापरी आणी माझ्या फुलें बोलकीं हीं ओठीं

हवेपरी तुझी माया वेढुनीहि निराकार
माझ्या श्वासाउच्छ्वासांत एक तिचा आविष्कार

नभापरी तुझी माया नित्य आणि निरंजन
घाली सौंदर्याचें निळें माझ्या डोळ्यांत अंजन

ऐसी गडे तुझी माया नये पहाया मापाया
जग विसरून देवा लागे भक्ताच्याच पायां

पुणें, ३१-८-५०

## मानिनीस

आज तुझ्या नयनांत मानिनी! शरणागति अनुताप
हास्यविनोदामध्यें तुझ्या अन् सलज्ज मूक विलाप

व्यथा परी मम आज मानिनी तिला न करवे दान
नव्या विलासामधें तिच्या गे जुना तुझा अभिमान

पुणें, ३१-८-५०

## वरिष्ठांचीं दुरुत्तरें

वरिष्ठांचीं दुरुत्तरें स्मितें कनिष्ठांचीं खोटीं
धनिष्ठांचीं मतलबी स्नेहप्रदर्शनें मोठीं

याद्या बायकोमुलांच्या बिलें, भाड्याचीं-वाण्याचीं
आणि तगादे-स्मरणें विम्या-क्लबा-वर्गण्यांचीं

घावांवरल्या या माशा झाडण्यांत आयु सरे
सह्य केलेंस निर्मून, देवा, झाडें जनावरें

जेव्हां चाटून नाचून पडे मोत्या अंगावर
मखमल घाशितें वा स्नेहें पायांत मांजर

सुक्या डोळां येई ओल सारा ओसरतो भार
तप्त जीवा गार वाटे फांद्या हेलवतां चार

एका झाडाची ही छाया एका पशूची ही माया
संसाराचे तापत्रय पुरे सुखानें सोसाया

पुणें, ३१-८-५०

## ताज

ताज न मम अश्रुराज हा विराजला गे

हा माझा मूक शोक
आकळून घे त्रिलोक
शुक्तिशोक मौक्तिक या बघुनि लाजला गे

स्वप्नस्मृतिरंग तरल
विरहस्वन मृदुल विकल
सृजिती रसराजकलश, राग उगवला गे

हा तव चिरकाल-शांति
जीवन-लावण्य-कांति
प्राण यांत पाजळावया तुझाच लागे

कलिजांतुनि तव ढळला
क्षितिजांतरिं घुटमळला
मम हृदयीं विरघळुनी येथ ओतला गे

कवळुनि गे रति ! तुजला
अश्रुराज हा थिजला
अधुनि या निवेल मदन हृदयिं भाजला गे

मृत्यु अधर करि दुभंग
परि अभंग आत्मसंग
हा चुंबनगुच्छ साक्ष यांत डवरला गे

स्तब्ध, चकित येथ काल
लुब्ध, मुग्ध विश्वजाल
भूमिभालिं भाग्यतिलक आज साजला गे

केपें, १०-९-४०

## आज तुझ्या घरिं आल्यें

आज तुझ्या घरिं आल्यें

लाज जगाची सख्या तुझ्यास्तव कोळुनियां मी प्याल्यें
सोडुनि सासर, मोडुनियां घर, तोडुनि पाश निघाल्यें

लाथाडुन धन आल्यें धावुन, सांडुनि पोरेंबाळें
घरबुडवी मी, कुळबुडवी मी, माझें दैव निराळें

तूं रिघतां उरिं, पाय नुरे घरिं, सौख्यच होय विखाळें
सुटली ही तड, दूर तीहि कड, नदी मधेंच उमाळे

खुशाल दे दडि, मीं दिधली उडि, सांवर वा कर काळें
पणास लावुन तुझें थोरपण थोर तुझ्याहुन झाल्यें

पुणें, ६-१०-५०

## हिरवळ आणिक पाणी

हिरवळ आणिक पाणी
तेथें स्फुरती मजला गाणीं
निळींतुनी पांखरें पांढरीं किलबिलतात थव्यांनीं

सुखांत चरती गुरेंवासरें
लवेंतुनी लहरतें कांपरें
हवेंतुनी आरोग्य खेळतें गार नि आरसपानी

उरीं जिथें भूमीची माया
उन्हांत घाली हिरवी छाया
सांडित कोमल आनंदाचे पाझर पानोपानीं

जिथें अशी समृद्ध धरित्री
घुमति घरें अन् पुत्रकलत्रीं
रमे श्रमश्री माहेरींच्या स्वाभाविक लावण्यीं

सख्यापरतें जिथें न बंधन
स्मितांत शरदाचें आमंत्रण
सहजोद्गारीं गाढ चांदणें, स्पर्शीं स्नेह हिमानी

ऋतूऋतूंतुन जिथें सोहळे
तसेच उघड्यावरी मोकळे
आणि अंगणीं शृंगाराची निर्मळ अमृतवाणी

माणुस जेथें हवाहवासा
अभंग-ओवीमधें दिलासा
विश्वासावर जीवन सुस्थिर, श्रद्धा नेक इमानी

देव जिथें हृदयांत सदाचा
भार मनाला नसे उद्यांचा
सुखें दुज्याच्या हिरवळ चित्तीं, दुःखें डोळां पाणी

पुणे, ६-१०-५०

## अद्भुत वारा

आज अचानक नकळे कोठुनि आला अद्भुत वारा
खिडक्या दारें उघडुनि ओतित स्वर्णिल अमृतधारा

भांड्यांच्या उतरंडी पडल्या भुइभर झालीं धान्यें
भेदरुनी त्यांवरलें उठलें शनैश्वरांचें ठाणें
राख झाडुनी लखलखला अन् समिधांमधिल निखारा

काळोखाचा धूप जळाला, घर भरलें गंधानें
वातीवरची झडुनि काजळी अंकुरलें अन् सोनें
जुन्या विषावर सोडित असला नवीन मंत्र-उतारा

कवितांवरची धूळ उडाली, फडफडलीं अन् पानें
शब्दांचे गज तोडुनि झालीं मुक्त अनावर गानें
ध्यानांतच घुमल्या दुमदुमल्या स्थिरवीणेच्या तारा

भिंतीवरचे लेप वितळले, मावळला मळ सारा
स्फटिक तयांतुन पाजळला अन् घेउन पोटीं पारा
एकच तारा करि करुणेचा सगळीकडुन पहारा

मृत्यूविण हा जन्म नवा मज, हांकेवीण इषारा
कृतीविणें निर्मिती क्षणोक्षण घराशिवाय निवारा
अतां रवीपरि चराचरांतुन बघेन निज अवतारा

पुणें, २६-१२-५०

## मी नंदाघरची बावडि ग

नंदाघरची बावडि ग, मी नंदाघरची बावडि ग
दिसुनी क्षणभर श्याम मनोहर त्यासम झाल्यें लालडि ग

अष्टांगांनीं पाझरल्यें मी
व्योमींचे रस आले रोमीं
मातीमधुनी स्रवुनी साखर झाल्यें वेडी भावडि ग

गाय पाडसाविण पान्हेली
तशी भरूनहि मी तान्हेली
तुमच्या जलभरणाविण तृष्णा गोड असुनिही कोरडि ग

घाली रवि सोन्याचीं लेणीं
चंद्र विणी मोत्यांनीं वेणी
लावी उटणीं पवन तरीही न पुरे माझी आवडि ग

घेण्यांतिल सुख कळलें बाई !
देण्यांतिल : त्या मितीच नाहीं ! !
तुमच्या कलशांसंगें भरती माझ्या जीवन-कावडि ग

घट तुमचे ते रिघतां पोटीं
दुवा सुखें पुटपुटल्यें ओठीं
प्रीतीची गत अशीच उलटी आणिक बोली बोबडि ग

करुनी करुणा पुरवा तृष्णा
मिळवा तुमच्या उरिंच्या कृष्णा
कुब्जेपरि होईन उजू, जरि आठ ठिकाणीं वाकडि ग

युगायुगांची मी ग गोपी
पडल्यें सांपडल्यें या कूपीं
कुंजवनांतिल तृणातृणाशीं घाला माझी सांगडि ग

पुणें, ११-१-५१

## मुक्या माझ्या व्यथा-कथा

आतां माझ्या व्यथा-कथा जनां न येती जाणतां
वृथा त्यांना कां दूषण न ये मलाच सांगतां !

येथें वाणी पडे थिटी ध्वनी माघारे हिंपुटी
बोलूं जातां व्हावयाची आपसांत ताटातुटी !

तेणें झाडें पक्षियंतीं झालीं पांखरें सोयरीं
त्यांच्या श्वासांतून जाती माझे ध्यास वाऱ्यावरी

निवळल्या पाण्यापरी माझें निळावतें मन
चंद्र हेलावे नभांत आणि ओलावे गगन

कुणी चुकलें वासरूं येतें घ्यावया आसरा
जातें घायाळ पांखरूं चोंच भिजवुनी जरा !

कोणी कांठाशीं बसून गाळी लांछित वेदना
श्वसे क्रौंचाची कामिनी विद्ध वंचित-कामना

त्यांच्या व्यथा-कथा अशा सुखें सांठवितां पोटीं :
त्यांचा ओसरतो शीण माझ्या सुटतात गांठी !

मुक्या माझ्या व्यथा-कथा सार्थ होती बोलांविणें
मग कशास मी घालूं व्यर्थ शब्दांचे उखाणे ?

१९५०

## पावलें धारेच्याही पुढें

ओलांडुनि सांकडें पावलें धारेच्याही पुढें

सहज कराया गेलें क्रीडा
तोंच जळाचा आला वेढा
निरीस ओढित गेला वेडा भडकत भलतीकडे
पावलें धारेच्याही पुढें

तयास सखये गेलें जिंकूं
नेलें त्यानें काजळ-कुंकूं
खरें कशाला आतां झाकूं ? नुरलें लुगडें, चुडे
पावलें धारेच्याही पुढें

लज्जा भीती आतां फिटली
पाठीमागिल ममता मिटली
नवी नव्हाळी अंगीं नटली उरीं पांखरूं उडे
पावलें धारेच्याही पुढें

येथिल ऊन परांची दुलई
जळास इंद्रमण्यांची झिलई
पवनीं गंधर्वांची सनई, हवेंत अमृतसडे
पावलें धारेच्याही पुढें

नकोस डोळां आणूं आसूं
हसेल त्याला दे गे हासूं
नको धपापूं नको उसासूं कोंडुनि पोटीं रडें
पावलें धारेच्याही पुढें

पाण्यांतिल गे प्रीत निराळी
जिच्या एकदा आली भाळीं
ती नच परते गे कधिं काळीं सुटल्या भूमीकडे
पावलें धारेच्याही पुढें

एक काम कर सखये ! माझें
तुला जरि न हें वाटे ओझें
घेउनि जा घरिं तुझ्याजवळ जे घासुनि भरले घडे
पावलें धारेच्याही पुढें

पुणें, १७-९-५१

## मी अश्रांत प्रवासी

नांव गांव कुळगोत न त्याला उपजत जो संन्यासी

असतों निमिषीं चवदा देशीं अगणित रूपीं वेषीं
खेळवितों मी मलाच माझा होउनियां दरवेशी

भूताचें खत शिवरित फिरतों अधीर सजल भविर्ष्यां
कणांतलीं मी कणसें नेतों तिमिरांतून प्रकाशीं

लक्षजनांसह अन्न भक्षुनी असतों नित्य उपाशी
मुखराशीवर आणि अनलसा असतों पडुन उदासी

सृजनेश्वर मी असतों जरि रत रतिरसरंगविलासीं
मी चिरपावन मुक्त अनिलसा असून श्वासोच्छ्वासीं

जागृतिच्या मी जगांत तुमच्या जरी सदा परदेशी
स्वप्नीं फुलल्या हृदिं तुमच्या परि मधमाशी अविनाशी

१७-९-५१

## मज लोभस हा इहलोक हवा

स्वर्ग नको सुरलोक नको मज लोभस हा इहलोक हवा
तृप्ति नको मज मुक्ति नको पण येथिल हर्ष नि शोक हवा

शोक हवा परि वाल्मिकिच्या परि सद्रव अन् सश्लोक हवा
हर्ष हवा परि स्पर्शमण्यापरि त्यांत नवा आलोक हवा

शंतनुचा मज मोह हवा अन् ययातिचा मज देह हवा
पार्थाचा परि स्नेहविकंपित सार्थ सदा संदेह हवा

इंद्राचा मज भोग हवा अन् चंद्राचा हृद्रोग हवा
योग असो रतिभोग असो अतिजागृत त्यांत प्रयोग हवा

आयु हवें आरोग्य हवें यशभाग्य तसा प्रासाद हवा
श्लाघ्य हवें वैराग्य तयास्तव त्यांत विरोध विषाद हवा

तापासह अनुताप हवा मज पापासह अभिशाप हवा
शिळांत पिचतां जळांतुनी मज निळा निळा उःशाप हवा

मार्क्साचा मज अर्थ हवा अन् फ्रॉइडाचा मज काम हवा
या असुरां परि राबविण्या घरिं गांधींचा मज राम हवा

लोभ हवा मज गाधिजमुनिचा अखंड आंतर क्षोभ हवा
पराभवांतहि अदम्य उज्ज्वल प्रतिभेचा प्रक्षोभ हवा

पार्थिव्यांतच वास हवा परि दिव्याचा हव्यास हवा
शास्त्रांचा अभ्यास हवा परि मानव्याचा ध्यास हवा

विश्व हवें सर्वस्व हवें अन् मृत्यु समोर सयंत्र हवा
शरांत परि ही विव्हळतां तनु उरांत अमृतमंत्र हवा

हविर्भुक् सुरमुख मी वैश्वानर नित्य नवा मज ग्रास हवा
हें सुख दुर्लभ वाढविण्या मज चौऱ्यांशींत प्रवास हवा

पुणें, २०-९-५१

## माझें घर

तृप्त स्वतंत्र गोव्यांत केव्हां तरी केव्हां तरी
फेसाळत्या लाटांपाशीं सिंधुसरितेच्या तीरीं
बांधीन मी छोटेंसेंच लाल चिरेबंदी घर
गार विलायती वेल चढवीन भिंतीवर

मागें विहीर कांठाची वर प्राजक्ताचें खोड
गर्द हिरवें न्हाणीशीं नीरफणसाचें झाड
केळबनाच्या कडेला स्वच्छ छोटासाच गोठा
त्यांत सवत्स कपिला, ओल्या चाऱ्याचा नि सांठा

फूलपांखरांच्यासाठीं पुढें फुलझाडें चार
आंबा एकादा कलमी यावी म्हणूनियां खार
गारव्याच्यासाठीं कांहीं गार नाजूक पोफळी
नागमोडी त्यांच्यावर पानवेली मिरवेली

वर पश्चिमेला गच्ची अभ्यासिका पूर्वेकडे
शेजारच्या माडावर पाहीन मी सोनसडे
कानीं समुद्राची गाज पुढें ग्रंथ स्वर्णाक्षरी
पारव्यांची कुजबुज खिडकीच्या गजांवरी

असा पहाटेला घेत हुक्क्या-चहाची लज्जत
लिहीन मी भावगीतें तेथें घुमत घुमत
आणि येतां थोडा शीण बसूनियां गच्चीवर
रेखाटीन भोवतींचें चित्र एखादें सुंदर :

जाळीं फेकणारे कोळी त्यांच्या मासळीच्या होड्या
खपणारे वावराडी त्यांच्या विसाव्याच्या विड्या
कधीं काजळता कूस कधीं उजळ घुमट
नांगड्यांशीं खेळणारा कधीं ओलेतीचा घट...

आणि मग सेवीन मी जाईजुईचा गे भात
पोईतल्या मासळीचा स्वाद घेत साथ साथ
वेताचिया खाटेवर थोडा बागेंत दुपारीं
झोपेन मी घोळवीत तुझी अमली सुपारी

आणि सूर्यास्तास माझा रंगी घेऊन शिकारा
तुझ्या संगें जाईन मी इंद्रचंद्रांच्या माहेरा
कुणी भविष्याचा कवि आम्हां ऐकवील गाणीं
ऐकेन तीं समाधानें डोळां घेऊनियां पाणी

थंडीवाऱ्यांत पश्मिनी शाल स्कंधीं घालशील
कांठीं उद्यांचा तो कवि प्रेमें मला सांभाळील
घरीं येतांच नातरें नाचतील आनंदानें
म्हणतील, "सांगा गोष्ट किंवा म्हणा नवें गाणं."

रचूनियां सांगेन मी त्यांना गाण्यांतच कथा
जेणें जाणवेल त्यांना उद्यां दुसऱ्याची व्यथा
मग रेलून गच्चींत टक लावीन आकाशीं
दाट काळोखांतही मी चिंब भिजेन प्रकाशीं

असें माझें गोड घर केव्हां तरी, केव्हां तरी
अक्षरांच्या वाटेनेंच उतरेल भुईवरी

पुणें, २६-९-७१

## बारा मास एका क्षणीं

फुलवीत चित्रें चैत्र तुझ्या अंगीं झाला धुंद
वक्षीं फळून वैशाख उरीं लोटी दाह गंध

सौम्य जाईची माधवी भरी ज्येष्ठ तुझ्या गात्रीं
नेत्रीं आषाढ सांठवी ओल्या काजळाच्या रात्री

मुखीं घालितो श्रावण ऊनपावसाची जाळी
रोमरोमीं भाद्रपद ढाळी साळीची नव्हाळी

तुझ्या शब्दीं आश्विनाच्या आकाशाचे चमत्कार
हावभाव ल्कारांत करी कार्तिक शृंगार

तुझ्या चालीच्या डौलांत मार्गशीर्षाची श्रीमंती
गोड कांतींत पौषाच्या स्निग्ध चांदण्याची शांती

तुझ्या स्पर्शांत माघाचें मोहरतें अंतरंग
आणि हर्षांत फाल्गुन उधळितो संध्यारंग

तुझ्यामुळें बारा मास आलिंगितों एका क्षणीं
साऱ्या सृष्टीचें लावण्य पितों ओष्ठांच्या यौवनीं

पुणें, १५-१२-५१

## मलयसमीर

न कळे कोठुनि आला सजणी ! मृदुगति मलयसमीर
क्षणांत झालें कदंबकुसुमित किसलयकांत शरीर

कधिं न पाहिला तसला दिसला गगनिं गुलाल अभीर
अवचित सजणी पडली चरणीं कनकाची जंजीर

घमघमलें वन, निळावले घन, घुमला ध्वनि गंभीर
अन् भवतींच्या छायांपरि मन झालें विकल अधीर

चंद्राविण सखि चंद्रोज्ज्वल मज दिसलें जमुनातीर
बघतां बघतां तिजहुनि शीतळ जमलें नयनीं नीर

असेल जो या हिमकिमयेचा अद्भुत कारागीर
नेइल का घरिं लावुनियां उरिं देत क्षणोक्षणिं धीर ?

पुणें, २२-१२-५१

## श्यामा

तूं शरत्कथेंतिल अमललोचना श्यामा
प्राजक्तमानसा मृदुगंधा अभिरामा
अष्टादश फुलवित पुलकीं प्रणयपुराणें
या आलिस माझ्या वयस्क आश्रमधामा

तूं आलिस पेलित अंगीं वेल विजेची
अधरावर झेलित अमृतकोर बिजेची
घन कुटिल कुंतलीं गुंतवुनी स्मरसेना
पापण्यांतुनी अन् सिंचित धुंद निजेची

श्रमलीस इथें कधिं दक्ष होउनी शिष्या
छेडिलेंस कधिं मज ताणुनि कृष्णधनुष्या
वटतळीं कधीं तर कधीं जळाच्या कांठीं
गाउनी मांडलिस माझी सत्त्वपरीक्षा

दो प्रहरीं आली घडी तुझी जायाची
वाटलें परतली थंड झुळुक वाळ्याची
वाजली शिटी अन् मी वदलों कांहींसें
तों डोळ्यांतुनि तव झडली सर मोत्यांची

कर फिरवित शिरिं तव म्हटलें मीं तुज ‘वेडी’
तों कळींत फुलली तुझ्या फुलाची गोडी
किति वेळ लोचनांसमोर उरले रूळ
पावलांत पडली त्यांहुनिही जड बेडी

त्या क्षणें आजपरि तरारले कडुनिंब
या सांकळल्या जळिं थरथरलें विधुबिंब
भिंतीवर श्यामल लसलसल्या दलवेली
अन् हिरवळ झाली दवांत ओलीचिंब

महाबळेश्वर, ८-५-५२

## सुटलेलें वेड

सुटलेलें वेड माझें कुणी मला द्या हो
संसार हा आहे तसा राहो किंवा जावो

वेडानें त्या कणिकोंडा झाला तेव्हां गोड
चांदण्याच्या खव्यालाही काढितों मी खोड

काळोखीं वेंचिल्या तेव्हां नक्षत्रांच्या वेली
आतां विजेंतही डोळां सांचते काजळी

मातींत सोन्याचा तेव्हां उगवला चांफा
आतां सोन्यांतही काळनाग टाकी वाफा

तृणाफुलांतही तेव्हां देखिले मीं देव
देवांतही आतां मला दिसती दानव

हांकेस धावला तेव्हां गोविंदाचा पावा
आतां गातांही तो नये, करीतांही धावा

लोक बोलतात जरी झाला हा शहाणा
स्मरतां तें वेड परि टिकेना बहाणा

जाणीव शाणीव सारी सारें कांहीं न्या हो
मात्र माझें वेड गोड परतुनी द्या हो

२७-७-५२

## भिजले घुंगुर

भिजले घुंगुर तसें वाजलें कांहीं तरि अंधारीं
आंसवांतले ध्वनि निजलेले नाचत आले दारीं

नव्हतें कळलें आजवरी किति सुखांत होतों दुःखी
तसेंच कळलें अवचित मजला किति सुख असतें शोकीं

ज्योतिमधें जी असते छाया तिच्याविणें नच ज्योती
हृदय असो कीं असो शिंपला व्यथेविणें नच मोती

काळ्या काळ्या जळांतुनी त्या तसे उजळले मोती
रितेपणाच्या घरीं मनाच्या तशा उमलल्या ज्योती

त्या ज्योतींचे, त्या मोत्यांचे घुंगुर घुमले दारीं
नयनीं मोतीं हृदयीं ज्योती थरथरल्या अंधारीं

पुणें, ३१-७-५२

## डाळिंबीची डहाळिशी

डाळिंबीची डहाळिशी नको वाऱ्यासवें झुलूं
सदाफुलीच्या थाटांत नको सांजवेळीं फुलूं

मऊ शुभ्र जांभापरी नको गुलालांत रुसूं
सोनकेतकीशी नको कुशी उसवीत हसूं

बोलतांना लाटेपरी नको मोतियांनीं फुटूं
सावल्यांच्या पावलांनीं नको चांदण्यांत भेटूं

नको चांफ्याच्या श्वासांनीं संगें चालत लगटूं
गर्द झाडींत विजेचें नको लाघव प्रगटूं

नको घुसळूं पाण्यांत खडीसाखरेचे पाय
नको गोठवूं ओठांत दाट अमृताची साय

नको वितळते लावूं डोळे एकांताच्या पारीं
उसासून धपापून नको होऊं गोरीमोरी

नको सावरून पुसूं जुन्या कवितांचें मूळ
नको उकरून काढूं पुन्हा सोन्याचे ते सूळ

नको फळत्या वयांत घेऊं संयमाचें माप
वर दिलास तयाचा नको करूं अभिशाप

६-९-५२

## यौवनाचें झाड

या नदीच्या पार वेड्या यौवनाचें झाड आहे
अमृताचा चंद्र त्याच्या पालवीच्या आड आहे

मेदिनीच्या रोमरोमीं रेशमी उन्मेष आहे
केशरी त्याला उषेचा कस्तुरी आशीष आहे

मखमली प्रत्येक पुष्पीं अंबराचें बिंब आहे
चुंबुनी त्यांना हवेचा जीव ओलाचिंब आहे

धुंद तेथें रे परेच्या पारव्यांचा वृंद आहे
नाचऱ्या आनंदमोरा घुंगुरांचा छंद आहे

तेथल्या पाण्यांत वीणा-रागिणींची ओढ आहे
सावल्यांना कांचनाच्या नागिणींची मोड आहे

तेथ जाया वेगवेडी पारजाची वाट आहे
शांतवाया ताप अंतीं गोकुळींचा माठ आहे

वृक्षशाखेला युगांच्या मंगलाची घांट आहे
बुद्धदेवाच्या तळाशीं हस्तिदंती पाट आहे

सत्यवानाच्या सखीच्या अंतरींचा दीप आहे
ख्रिस्त-मीरा-मोहनाच्या जीवनाचा धूप आहे

ज्ञानियांच्या माउलीची नित्य ओवी एक आहे
कान्हयाच्या गाउलीचा दुग्धगंगा-सेक आहे

कोवळ्या ज्वाळादळांचें भारताचें फूल आहे
हासरें तेथें उद्यांच्या मानवाचें मूल आहे

त्याजला मीं चुंबिल्यानें आंतही तें झाड आहे
अमृताचा चंद्र माझ्या पालवीच्या आड आहे

७-९-५२

## अजब आगळी

कितिक भेटल्या हिची परंतू अजब आगळी तऱ्हा नवीन
ओठांतुनिही नटेल डोळे छटेल भाषेमध्यें प्रवीण

नसे भरंवसा कशा मिषानें हसून पाडिल फशीं कुणास
कधीं अकारण करून गहजब रुसून लाविल जिवास फांस

होकाराची हिच्या न खातर हमेश कातर धरा जमेस
धीरधिटाई असेल तर मग तशीच वाणहि नसे क्षमेस

नकारांतहि प्रकार अगणित नित्य जागवी नवे विकार
चुकार शब्दांतुनी परंतू सर्वेंच विझवी आग विखार

पाण्यापरि ही अवखळ चंचळ क्षणाक्षणाला नवीन रंग
कधीं निथळती, कधीं विथरती हिचे सांवळेनिळे तरंग

असे तरी ती तशीच निर्मळ कधि न मावळे हिचा प्रसाद
कसेंहि जग बोललें तरी तिज नसे तयाचा खंत-विषाद

जळपूजक मी बसुनि सांजचा जळीं पूजितों तिचेंच रूप
काळोखाच्या तशा निवांतीं मनांत माझ्या जळतो धूप

अशा घडीला येउन मागुन गळ्यांत ही मम घाली हात
वळुनी बघतां दिसे लोचनीं पाण्यांतहि जळते फुलावत

१९५३

## काळी माया

काळे काळे केश तुझे काळे काळे डोळे
काळा काळा मेघ तुझ्या माथ्यावरी डोले

काळीं काळीं ढोरें तुझीं काळ्या डोहाकडे
जेथें काळ्या जांभळांचे जागोजाग सडे

काळींतुन वाट तुझी काजळत्या वेळे
काळ्या काळ्या सावल्यांचें सभोवतीं जाळें

अशा धुद काळेपणीं तीट हवी गालीं
काळी चंद्रकळा, काळ्या किनारीची चोळी

काळी काळी पोत हवी कंठिं तुझ्या पोरी
सावांसही सुचे अशा काळोखांत चोरी

काळ्या काळ्या वाघळांची घेरी इथें माया
काळ्या काळ्या वासनांची घोंगावते छाया

ये ग घरीं, काळा तुझा साज तिथें सारा
काळ्या घडींत या अशा हो गऽ उरीं तारा

२८-७-५४

## माझी हाला

जा सखि, जा सखि
मंतरलेल्या निज अंतरतम दूरांत जरा
वसुं दे मज अस्वस्थ अकेला
काळोखाचा कडुनिंब असा
क्वचित् सखे ओथंबुनि लवतो
जळाजळांतिल हलाहलाची
स्मरते सुरई, भरतो पेला
आणि प्राशितां, क्षणाक्षणांतुन
नक्षत्रांचीं युगें फुटुनियां
स्मृतिधींतिल वडवानल दारुण
दक्षयज्ञसा लक्ष फणांनीं
शतजन्मांची ग्रासित निद्रा
क्वचित् असा फुंफाटत उटतो
तेजाबानें भिजवित, रुजवित
विस्मृत वंचित संचित-वेला
क्वचित् आणि या अशा द्रुतलयीमधें घणघणे
संकटसूचक, मृत्युविमोचक
रौद्र, भद्र, शाश्वत गजघंटा
स्वरमथनानें हिसळित गात्रें
घुसळित स्वास्थ्यसुखांचें विरजण
पिळुनि आणिते कणाकणांतुन
हरजहराची व्याकुळ तृष्णा
ऊष्ण दीप्त कंठाच्या कांटा

तनुवर खिळला प्राण खिस्तसा
रक्ताळत असतांहि पंचधा
असा मुळाला क्वचित् जागतो
आणि मागतो
ही मृत्युंजय सुरा हराची
हिची रुची कुणि विरळा जाणे
कृत सुकृत सुक्रात सभागी
अथवा मीरा दर्द-दिवाणी
लालचलेलें शोणित त्यांचें
भगीरथाच्या शत पितरांपरि
नसानसांतुन तीव्र उताविळ घालित हांका
म्हणतें, "वत्सा,
तूं भृगु, मनु, 'प्रमथेश' सनातन
अमुच्या कटु वारुणिचा वारस
रसविद्, विधि अन् उपजत दर्दी
मुळिं न मिसळल्याविण गंगाजळ
वर्दी घेउन बृहद्व्यथेची
स्वयेंच भर, घे अपुला पेला
त्यांत विसर्जुनि निजसृजनाचें भस्म चिमुटभर
सेवित निमुटपणें ही हाला
हो झणिं हरनेत्रांतिल ज्वाला
तिच्या स्पंदछंदांत डुगडुगे
निरंकाल भद्राचा डमरू
तालावर धावति चक्राकृति
विद्युद्गति विश्वांचे वारू
या कायाकल्पांत हिरण्मय
कल्प उद्यांचे अम्हां बघूं दे
पेटत पेटत अशांतींत तव
पश्यंतीचा मंत्र स्रवूं दे."
त्या ज्वालेचा भास असा सखि,
या पेल्याचा ध्यास लावितो

किती दिसांनीं ! किती दिसांनीं !
आणिक तरिही
विधि भंगुनि हा उठलों मी जर
पितृशाप बाधुनियां खडतर
स्नेहच इथले उठुनि जिवावर
पाश कसे मज अचेतनाच्या जड खडकाला
पुन्हा जखडतिल, पुन्हा जखडतिल
आणि ध्यासही गिधाड होउन
फाडित, कोरुनि काढित काळिज
चालित राहिल चिरंत घिरट्या
येथें जो 'प्रमथेश' आणितो
जन्मासह देवांचा वन्ही
स्मरसौख्यांतहि चिरतान्हेला !
चिरतान्हेला ! ! चिरतान्हेला ! !
म्हणुनि विनवितों, जा सखि, जा तूं
जरा तजेला घेत नव्यानें
पीत बसूं दे मला अकेला

१२-१०-५४

## मामाचा वाडा

आहे वाडा चिरेबंदी परि नाहीं तो मामाचा
एका खोलीपायीं जातो अर्धा पगार घामाचा

भागलेल्या चांदोबाला नाहीं लपायाला झाड
झाडतुट्या वाड्यामुळें सारें आकाश उजाड

झाड यापुढें बापुडें चित्रांतच करवंदी
वाड्यामाड्यांत त्यापरी सारें जिणें चिरेबंदी

रोज चांदोबा भागतो तुटे शनैः शनैः जीव
काव्य घोकतों ओकतों, "जपा प्रौढत्वीं शैशव"

१५-१०-५४

## मीलनक्षेत्र

संध्या राधा तांबुस गोरी उन्मदपद गतिमंद
यमुना-स्नाना धापत आली जपत मनीं गोविंद

न सहुनि मोहनदाह सोडितां श्वास कंचुकी-बंध
सहज तिच्या चाळ्यांतुन सुटले वाळ्याचे रतिगंध

अंचल उडतां कंपित स्तंभित चंचल पवन-कदंब
धर्मजलानें सचैल भिजला झाला ओलाचिंब

यमुना वदली, "नको राधिके उघडी टाकूं पाठ
लोचन पापी सोडवुं दे मज कचभाराची गांठ."

हरिप्रतिबिंबें लहरत होती यमुना उतट तुडुंब
डुंबत होती धुंद राधिका पिळींत पिवळे लिंब

वंशवनांतुन व्यंकटलोचन तिमिर चोरटा कृष्ण
उष्ण उसासे टाकित खिळला बघत तिला सतृष्ण

निळीं होउनी उठली राधा पिळूं लागली केश
मोर होउनी गिळूं लागला जलमौक्तिक हृषिकेश

पिसापिसांतुन फुटूं लागले नक्षत्रांचे नेत्र
या चित्रानें रात्र जाहली अक्षय मीलन-क्षेत्र

१५-१०-५४

## मृदुमदगति ती येते जेव्हां

मृदुमदगति ती येते जेव्हां
निनादवित निज सजल पैंजणें
दहिंवर ध्वनिचें पारदकांती
मलईसम अति गार मुलायम
विलयलयींचीं फुलवित वलयें
विरघळवी धुंदींतच गहिऱ्या
अचरचरांच्या कायिक रेखा
आणि तयांच्या जळछायांसम
तरल विकंपित नवदलदेहीं
उमलुनि कांहीं, विरल विदेहीं
स्पंदु लागती कणाकणांतुन
मूक क्षणांतिल छंद तराणे
गिरि अंतर्हित मंत्र गिरेनें
लाटांसम ओलावत झुलतीं
तरुशाखांतुन वैशाखाचीं
कुसुमित होती काष्ठतरंगें
दगडांतुनि द्रुतगति पाण्याची
दिडदिडते मकराकृति वीणा
घुमती वंशवनांतुनि वंशी
धुंद मृदंगीं गंध-मृदंगें
अन् स्पर्शांच्या मलयवल्लरी
हर्षाच्या अमृतलहरींतुन
मुक्ताफळसम उधळित जाती
गंधर्वांच्या शत मिथुनांच्या
प्रणयार्कांतिल फेन-फवारे
एकार्णविं या स्वरवलयांच्या
तलगत गात्रें समेंत बुडती
स्फटिकांचीं होउनियां पात्रें
मृदुमदगति ती येते जेव्हां...

मृदुमदगति ती येते जेव्हां
वितरित हिमकिमयेची फुंकर
अमरवनांतिल अमल लता नव
अति चेतनगंधा अन् अमली
गाळित निज अलकोपम मोहर
मंद मघाच्या पर्जन्यापरि
चराचरीं भरितात उन्मनी
आणिक नंतर
मंतरल्यापरि मंथर वारे
वळिती निज अलसाकुल अंगं
देती गिरिदरि संथ जांभया
जांभळणाऱ्या हिरव्या राया
हलकेहलके मिटीत पलकें
छाया होउनि डुलक्या घेती
नशा दिशांना चढत निशेची
परस्परां त्या बिलगत कलती
झुलतझुलत अन् आकाशाचा
रसभारानें लवतो मांडव :

अंधाराच्या त्याच्यावरल्या
लवलवत्या ओलेत्या वेली
हसती, कधिं मुसमुसुनि स्फुंदती
नावरुनी मधुभाव तयांना
यौवन-उन्मद-लावण्याचे
द्युतिबिंदू होउनि टपटपती

त्या तालावर वितल तलताल
फुलत राहतें, झुलत राहतें
मृदुमदगति ती येते जेव्हां...

१९५४

## शारदेचा भुत्या

प्राणरागिणी सरली, उरला केवळ शब्दतराणा
भाव दिवाणा सरे, उरे परि स्वभाव मात्र पुराणा

अन्न असुनिही उपास काढुन जागविलें तुज मातें !
मींच कोरडे ओढित मजवर तुझें जोडिलें नातें

भुत्या तुझा होऊन लाविला तेल-कांकडा अंगा
तृष्णा पेटविली ज्वाळांनीं असून पोटीं गंगा

तुझिया छंदें स्फुंदस्फुंदुनी धरिला धुंद धुमारा
शिरीं ठेविला धुनींतला तव जळजळता अंगारा

आलिस अंगीं श्रीजगदंबे थयथय घालित गात्रीं
दावित नेत्रां सूर्यसंभवा रुद्रमंगला रात्री

करांतले कोळसे तेधवां झाले दीप्त निखारे
वठल्या खोडां शिवतां फुटले कोमल कोंभ धुमारे

आणि बरळलों त्याची झाली मंतरणारी वाणी
कौल जयांना दिला तयांच्या घरांत भरलें पाणी

भुत्या तुझा हा रिता आज परि जागवितो देव्हारा
विझून गेलों तरी अजूनहि गणिती जन अंगारा।

उभेंच जळलें झाड परंतू अजून जळते श्रद्धा
प्राण चितेंतहि पंख पाखडित झोंबतसे निःशब्दा

प्राणरागिणी सरे, उरे परि केवळ शब्दतराणा
हाहि पुजेचा प्रकार मानुन प्रसाद दे या प्राणा

२८-२-५६

..ाठा ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थ
अनुक्रम .............. विः ........
क्रमांक .................... नोंः दिः ........

## झाडें झालीं निळीं निळीं

झाडें झालीं निळीं निळीं करांगुळीं गोवर्धन
धुंद आकाशच झालें मंद अस्मानी पर्जन्य

जागोजाग पांगुळलें काळें कालिंदीचें पाणी
अंधाराच्या कालियाचे त्यांत चमकले मणी

गंधपिसाऱ्यांचे मोर वारे थबकले सेकीं
आर्त केकावली त्यांची थप्प झाली एकाएकीं

घरें कांबळीं ओढून टक लाविती मुकाट
ओलावले उजेडानें त्यांच्या पापण्यांचे कांठ

युगें पिकून वाकलीं जग जांभळांचें बन
धरित्रीच्या आठवणी उसवल्या कुशींतून

कानीं माझ्या वाजे वेणू प्राण घुमे रुणूझुणू
उरीं कालियाचे डोल गात्रीं हंबरती धेनू

शांताचिया वृष्टीमधें अशी अद्भुताची सृष्टी
कां या लावण्यांतही मी असा सुखानेंहि कष्टी !

२३-५-५६

## हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली

हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली तुझी मूर्ति वाढून स्वर्गा भिडे
तडे पाडुनी मत्त इंद्रासनाला द्युती धावते सर्व बद्धांकडे

तुझी तृप्त-कारुण्य-विक्रांतमुद्रा गमे क्षोभल्या नारसिंहापरी
विदारूनियां स्तंभ कारागृहाचे कडाडे तडित्खड्गशी वैखरी

महागर्जनेनें तुझ्या राष्ट्रसिंहा ऋषींची चिरंजीव मंत्रावली
तृणीं शुष्क काष्ठीं तशी भग्न वृक्षीं वदूं लागली अग्निजिव्हादलीं

असें दंडकारण्य पेटून त्याच्या हिमाद्री-समुद्रान्त झाल्या शिखा
अरी वक्र जे नक्रसे सागरींचे तयांची ढळूं लागली पिंडिका

महामुक्तिचा शंख फुंकूनि जीवें शवीं प्रेरिल्या वीरअक्षौहिणी
नवें मोल आणावया जीवनाला स्वयें सिद्ध केल्यास आत्मार्पणीं

अगा कर्मयोगेश्वरा ! मोक्षद्रष्ट्या ! अगा निर्भया ! जन्ममृत्युंजया !
भयांतून काढून राष्ट्राप्रती या जया रूढ आत्मस्थ केलें तया

तुला गुह्य सांगून गीताभवानी गमे त्वच्चरित्रांत आली गुणा
जिथें ठेविला हस्त वा पाद तूं गा तिथें दीपिका, स्वस्तिकांच्या खुणा

प्रवक्ताच तूं आमुच्या प्राक्तनाचा तुझा शब्द तो आज झाला शक
तुला बाहुनी राष्ट्र जें थोर झालें तुझ्या गौरवीं वाकवी मस्तक

महत्ता तुझी लोकितां लोकमान्या ! सदा चित्त नक्षत्रलोकीं जडो
झडो अल्पता लोचनांची मनाची, जिण्याची गती ऊर्ध्वमार्गी चढो

असा कांहिं आशीष द्या या घडीला महत्कारणीं प्राण हा पाखडो
महा राष्ट्रिं जन्मास आल्याप्रमाणें महादिव्य हातून कांहीं घडो !

१-८-५६

## सुवर्णकेशी

क्षितिजामधल्या सुवर्णकेशी
        गडे जरा वर कर मुखडा
गाण्यानें जड झालेल्या या
        सांजढगाच्या उजळ कडा

गडे घडीभर गढीगढीवर
लावण्याचा घाल सडा
सावल्यांतुनी उमलूं दे जर
गडे जरा वर कर मुखडा

तुला आणिला किरणविणीचा
जलवलयांचा रंगचुडा
श्रुतिंचा हा खण, स्मृतिंची पैठण
जखमांचा कुंकुमकरंडा
जरा पाहुनी जरा हासुनी
अहेर माझा कर उघडा
नजराण्यावर नजर चढूं दे
गडे जरा वर कर मुखडा

सायंतारक द्युतिचा लोलक
तुझ्या कुंडलांतला खडा
उरा लावुनी करीं जरा हा
प्रकाशमंडित स्फटिकघडा
तव भारानें त्यास अचानक
अंतीं पडतां गोड तडा
पळांत भिंबुन जळांत त्या मग
गडे जरा वर कर मुखडा

७-१०-५६

## तूं तुझाच दीप

तूं तुझाच दीप आणि तूं तुझीच वाट
तूं तुझाच क्रूस आणि तूं तुझाच घाट

घास तूं दिलास ज्यास तो करील घात
एकटेपणीं अखेर तूं तुलाच साथ

पूजितात आज तेच काढितील धिंड
जन्मतांच तूं तुझाच जाण काकपिंड

रे, विश्रांत पीत रहा तूं तुझेंच गीत
घाट जागवीत जाइं वाट पानवीत

१९५६

## ज्ञानदेव गेले तेव्हां

ज्ञानदेव गेले तेव्हां कोसळली भिंत
वेद झाले रानभरी गोधळले संत

ज्ञानदेव गेले तेव्हां आटे इंद्रायणी
मराठीच्या वडातळीं जळूं लागे पाणी

ज्ञानदेव गेले तेव्हां ढळला निवृत्ति
आसवांच्या डोहीं झाली विझू विझू ज्योती

ज्ञानदेव गेले तेव्हां तडा विटे गेला
बापरखुमादेवी वरू कटींत वाकला

ज्ञानदेव गेले तेव्हां बापुडला नामा
लागोपाठ भावंडें तीं गेलीं निजधामा

माझ्या ज्ञानराजा! तें रे कळों आलें आज
भर दुपारीं ही तशी झाली तीनसांज

तेव्हांच्यासारखा पुन्हा बावला मोगरा
भुईभर झाल्या कळ्या तुटला आसरा

इथें आळंदींत आतां ऊर मात्र फाटे
पंढरीच्या वाटेंतही बाभळीचे कांटे

कळ्यांचाहि वास जिवा जाहलासे फांस
एकाकी प्रवास आतां उदास उदास

पुणें, २८-३-५७

## तिमिरांतुन ज्योतिकडे

रात्र ही सरेल कधीं खंत नको प्राणा
पावला-नखागणीक नेत्र चालतांना

अंधारीं लावित टक नेत्र दीप झाले
अंधारीं तपत मौन दिव्यमंत्र व्यालें
आंध्य घेतल्याविना न ज्योत मिळे ध्याना

झाला तुज गर्भगृहीं तोच एक साथी
पढविला तयेंच अग्निमंत्र तुज प्रमाथी
तोच विरूपाक्ष घालि विकट हा उखाणा

चालतां जपीत मंत्र बरिंत वज्र पेटे
महिषासन धर्मराज ये स्वयेंच भेटे
सावित्रीसम धीरां करि वरप्रदाना

अभयहृदय तेच होति सूर्यचंद्र-पाणि
स्पर्शनेंच रचिति भव्य श्वेतारुण लेणीं
विस्मयमय हा प्रवास असुनियां पुराणा

कधिं तरि ही सरुनि रात्र खचित उजाडेल
स्वर्णजलीं जग-युग हें उजळुनी निघेल
विरळा परि कोणि धन्य बघुनि उदय-वेणा

सोहळा असा मिळो, मिळो न वा कधींही
चालण्यांतला प्रकाश पाहण्यांत नाहीं
'तिमिरांतुनि ज्योतिकडे' हाच तुझा बाणा

२७-७-५७

## कामद्रुमाची डाहळी

कामद्रुमाची डहाळी आज एकाएकीं न्हाली
झोपावला माझा रावा झेपावला अंतराळीं

याच डहाळीखालतीं झालें उन्हाचें चांदणें
आणि छायेनें प्रकाशा तिढे घातले उखाणे

उष्टीं घोळवितां बोरें रामा उमगली सीता
भोळ्या मिठींत राधेच्या कृष्णा गवसली गीता

सुजातेची खीर येथें झाली मुक्तीहून गोड
बोधिसत्त्वाची फळली पूर्वसुकृतांची जोड

माग्दालीनेच्या पूजेनें ख्रिस्त येथें झाला होता
सुळीं जाण्याच्या पूर्वींच सुखें मरूनियां जिता

क्रौंच पक्ष्याच्या रक्तानें हीच डहाळी भिजली
फळ हिचेंच चाखून ईव्ह आपाद लाजली

घामा-रक्ता-आसवांचें हिच्या मुळा झालें आळें
आज अचानक तिला फळ अळुवार आलें

रावा आकाश पिऊन आला, निळा निळा झाला
फळ चाखतां चाखतां स्निग्ध प्रकाशांत न्हाला

"रती असून मी सती" बोले हेलावत फांदी
माझ्या शुकाच्या मुखांत नवी ओलावते नांदी

१३-९-५७

## हृदयच जेव्हां होतें कोकिळ

हृदयच जेव्हां होतें कोकिळ
जरठ वनांतहि फुले वसंत
हृदयच होतें भजन जेधवां
तृणांतही भेटे भगवंत

हृदयच जेव्हां घनीं बहरतें
जिणें बाहतें बनुनी मोर
हृदयच जेव्हां भरुनि वाहतें
गंगेहुनि तें होतें थोर

आज अचानक असें जहालें
सांजहि भासे मला सकाळ
प्राजक्ताच्या आसवांत सखि
सर्वें मौक्तिकें आणि प्रवाळ

सर सोन्याची होउन आलिस
गाढ कालची झाली ओढ
आज लाभल्यामुळें हृदय तव
विषहि कालचें झालें गोड

२४-९-५७

## तोच पूर्वींचाच सुर्मा

तोच पूर्वींचाच सुर्मा आजही या लोचनीं
तो अचंबा, तींच स्वप्नें, तीच धुंदी रोशनी

कुंभ तेव्हांचा वहातो आजही आहे तसा
त्या कथेचा त्या व्यथेचा ना दिसायाचा ठसा

यौवनीं ज्या डोळसाला गौतमाचीं दर्शनें
मृत्यु, व्याधी अन् जरेचें फेडितो तो पारणें

दुःखही माझें सुखाचें होत राहे चांदणें
रागिणी होऊन गातें अन् तुझें रागावणें

घेउनी जात्याच आलों मी उरीं हा चंद्रमा
तो झुरे तेव्हांहि होतो गाढ माझा नीलिमा

मात्र सुर्मा शीतळे हा तूं तशी आल्यामुळें
मौक्तिकें होऊन आतां दुःख माझें सांकळे

३०-९-५७

## हीच हीच ती सागरवेला

आठवतें का ?
हीच हीच ती सागरवेला
अशीच होती अर्धी भिजली
हळद उन्हाची लावुनि अंगा
चोळित अन् चंद्राचें उटणें

आणि त्या तिथें
महाकाय अन् काळ्या काळ्या
होडीच्या एका कानावर
भिकबाळीशीं झुलत झुलत तूं
ओठावरतीं ठेवित होतिस
चंद्रकोरशी पातळ नाजुक
शहाळ्याच्या मलईची शीतल
निळसर नवथर फाक कोवळी

तशी तुला निरखून तेधवां
दिशा अवंढे गिळित्या झाल्या
अधिकच फुटल्या जिभा समुद्रा
वाळूचीही झाली साखर
त्या तसल्या साखरवेळेला
खरोखरच का खांकरलों मी ?
असेल !
वय तें तसेंच असतें
प्राक्तन अपुलें माहित नसतां
सहजच तें त्या जाउन भिडतें

म्हणुनच नच का
नजर तुझी ती पाकोळीशी लहरी चंचल
असुनहि ठरली स्थिर माझ्यावर ?
आठवणींचे दुवे सांडले
कधिं काळीं जे चार ठिकाणीं
क्षणीं कसे ते गुंफुनियां तूं
समूर्त केलिस अमूर्त ओळख ?

कवण जाण ती
जिच्यामुळें तूं बळेंबळें ओढीतच मजला
होडीवरतीं गेलिस घेउन ?
—आणि विनंती, नंतर आग्रह,
तो सरल्यावर हट्ट नि रुसवा

असे निरागस खेळ करित तूं
भरविलेंस मज पुरें शहाळें
आणि मीहि खुळचटाप्रमाणें
खात राहिलों तुला न देतां !
आणिक तरिही मला न कळतां
देउन बसलों सगळें कांहीं

हषें मग तूं मला म्हणालिस
"बसूं गोल त्या ढगासारख्या
फुरशासम वेलींनीं भरल्या
नरम वाळुच्या थिट्या ढिगावर
माडांच्या झावळ-छायांनीं
जया घातलें कोमल कुंपण."
मुकाट मी मग मंतरल्यागत
तुझ्यासंगतीं बसलों तेथें
तूंच तेवढी बोलत होतिस

स्मरे न त्यांतिल शब्द एकही
अजून स्मरतें परी खडक हा
पाण्याच्या होऊन गुदगुल्या
कसा शहारत हासत सुटला
आणि असा हासतां हासतां
कसा सुखें घामाघुम झाला !
अजून स्मरतें त्या माडांच्या पात्यांवरुनी
पाणी होउन कसें झिरपलें
'शेवा' गेल्या भंडाऱ्याचें
कुणबाऊ प्रीतीचें गाणें...
अजून स्मरतें वाळूंतिल बोटांत माझिया
पडलीं कोमल कशीं जोडवीं
आणि तत्क्षणीं कसे अचानक
होउनियां कापूरबाहुल्या
पेटुन आपण झालों ज्योती

—चंद्रज्योति सुखसौगंधाच्या
आणि कशा कायांच्या छाया
स्वस्तिक करुनी झाल्या अक्षर
होउनियां अशरीर तेधवां
कृष्ण मर्मरीं कोरियलें तें
चांदण्यांतलें अनुपम लेणें
अहा रेखिलें अनुपम आपण !

वाळूवरचें सगळें कांहीं पुसून जातें
म्हणोत कितिही लाख शहाणे
त्या डोळ्यांनीं पुन्हा पहा सखि
अजुन चित्र तें तसेंच दिसतें
त्या ज्योतींचा गंध तरळतो

पुणें, २७-१०-५७

## आतां नाहीं जवळ नि दूर

आतां नाहीं जवळ नि दूर
सगळीकडुन दिशांना पूर
गगन वितळलें
भुवन निवळलें
मिळून गेले सुरांत सूर
आतां नाहीं जवळ नि दूर

उरे न आतां खेद नि खंत
खळांतही हसतो भगवंत
प्रकाशलाटा
उधळित वाटा
रचिती एकच पंथ अनंत
उरे न आतां खेद नि खंत

आतां सरलें भलें नि गैर
क्षणीं युगांचें गळलें वैर
मैत्र ओघळे
प्राण मोकळे
उधळिति गंध अनावर स्वैर
आतां सरलें भलें नि गैर

आतां आनंदहि अवधूत
तृप्तीलाही ओला ऊत
आतां शांति
किसलय-कांति
ऋतूवांचुनी नवप्रसूत
आतां आनंदहि अवधूत

स्वरांशिवायच आतां गीत
मिठीशिवायच मीठी प्रीत
एकीं दोन्ही
मिटले मौनीं
नवसृजनाची उलटी रीत
स्वरांशिवायच आतां गीत

आतां मी माझ्यांतच चूर
तरि तुमच्यांतच वाहे ऊर
स्वरांत तुमच्या
माझी वाचा
जरी भासलों मुका नि दूर
आतां नाहीं जवळ नि दूर

पुणें, ७-५-५७

## आकाशाचा छंद

छंद आकाशाचा होता तेव्हां जग होतें माझें
तेंच वेंधूं जातां आज झालें आकाशाचें ओझें

माझें खुळेंपण तेव्हां निळी शहाणीव व्यालें
तीच खणी परी आतां मुळा काळोखाचें आलें

वेंचलेल्या नक्षत्रांचे झाले रांजणींच खडे
तास घालूं जातां त्यांना जाती क्षणोक्षणीं तडे

तेव्हां भणंगपणांत रमा झाली होती दासी
आतां झालों तिच्या नादें मीच मला परदेसी

दुःख दिवसा आंधळें सुख रात्रीचें पांगळें
वाळूंतली मासोळीसें जिणें आकाशावेगळें

नेत्र आकाशाचा येथें होतो ठेचाळत धोंडा
गरुडही गारुडानें होई कुंपण-कोंबडा

रोज पहाटे बिचाऱ्या येतें आठवानें रडें
जग म्हणतेंच आहे : देतो जागृतीचे धडे !

पुणें, २१-५-५८

## झालें हवेचेंच दहीं

झालें हवेचेंच दहीं माती लोण्याहून मऊ
पाणी होऊनियां दूध लागे चहूंकडे धावूं

आज जगाचें गोकुळ आज यमुना पांढरी
आणि कालियाच्या उरीं घुमे कृष्णाची बांसरी

स्वैर चुकूनियां वाट खुळ्या हंबरती दिशा
भोंवळून धारानृत्यीं वेळा झाल्या वेड्यापिशा

आज समुद्राच्या पोटीं वाजे प्रसवाचा शंख
पालवती तुटलेले पुन्हा पर्वतांचे पंख

लक्ष आंचळांनीं दुभे निळी आकाशाची गाय
भिजणाऱ्या तृतीवरी दाटे संतोषाची साय

झुरुमुरु झुरुमुरु धारा लागती या झरूं
हरपलें होतें तें तें पाहे हळूच अंकुरूं

७-७-५८

## अपरिचिते

अपरिचिते ! तूं चिरपरिचितशी परोपरी मज भाससि कां ?
गालिं जिभेचा धरुनि आवळा डोळ्यांनिच अशि हाससि कां ?

'ब्रसीं'त दिससी कधिं रुसल्यागत अधर काढुनी पुढें जरा
अन् झटक्यानें उडवित जाशी तुरगपुच्छसा अलकतुरा
लगेच पण तूं थांबुन क्षणभर दुखावल्यागत पाहसि कां ?

आवडिचे मम ठावठिकाणे अचूक ठाउक तुला कसे ?
जळांत तारे मोजायाचें तुलाहि जडलें कसें पिसें ?
तरिहि लागतां माझी चाहुल निळींत पाहत राहसि कां ?

ठेच लागली वळणावरतीं होतिस तेव्हां तूंच कडे :
घाट घालुनी तूंच काय हा इथें पसरिले असे खडे ?
आणि 'आइ गऽ' किंचाळुनि वर बोट आपुलें चाविसि कां ?

अपरिचयीं परिचय बहरावा हीच तुझीही काय तऱ्हा ?
धडा घेउनी जवळ असुनही बळेंच राहुन दूर जरा
चंद्र उगवतां उरांत माझ्या करांत त्याच्या नाहसि कां ?

पुणें, ११-९-५८

## विरले सगळे सूर

विरले सगळे सूर तरी ही उत्तर-रात्र सुरेल
ओसरल्यावर आपण सजणे अशीच ओल उरेल

श्वास आपुला वास होउनी हवेंत या तरळेल
ध्यास आपुला भास होउनी तमांत या उजळेल

गीत आपुलें शीळ होउनी या माडांत घुमेल
प्रीत आपुली वेल होउनी या वाळूंत रुजेल

सरेल अपुली वाट तिथें ही अशीच लाट फुटेल
पहाट होतां स्वप्न आपुलें फुलांत ओलावेल

पुणें, १४-९-५८

## तोंवरी गाऊन घे

तापल्या आहेत तारा तोंवरी गाऊन घे
स्वप्न आहे लोचनीं हें तोंवरी पाहून घे

रे फुलांचा बाण आहे, अमृताची वेदना
नी सुखाच्या आंत आहे शापणारी यातना
त्राण आहे तोंवरी सप्राण हें साहून घे

आग आहे लागलेली अंतरींच्या मोहळा
आणि आकाशांत आहे आंसवांचा सोहळा
चालल्या आहेत धारा तोंवरी न्हाऊन घे

वादळीं अंधारल्या पाण्यांतुनी तेजाळुनी
कामिनी आवेगवेडी येत आहे दामिनी
जाग आहे तोंवरी रे दीप हा लावून घे
—राग हा लावून घे
तापल्या आहेत तारा तोंवरी गाऊन घे

पुणें, १५-९-५८

## कळकाचें पातें

भगव्या आकाशांत डोलतें पिकलें पिवळें कळकांचें बन
निळें निळें आळींतिल पाणी बसलें जवळच विळखा घालुन

"शिवालयांतिल घुमली घंटा" वदलें कांपत शीतळ वारें
मावळलें जळ, मावळलें बन : क्षणांत अन् पालटलें सारें

होता पिकला पिवळा जोगी हिरवा हिरवा छेडित पांवा
मुक्तनीलकच विकललोचना स्वताच झाली निळा विसावा

—तोंच अचानक झडलें माझ्या अंगावर कळकाचें पातें
अजून तें कधिं संध्याकाळीं त्या जोग्याचें गाणें गातें

२५-१०-५८

## वळून बघतां मागें

वळून बघतां मागें आतां घडलें तेंच पसंत
व्याप वाढती परंतु त्यांतच असे उदंड उसंत

पहाटशी ही वाटे संध्या, निर्मळ उजळ दिगंत
करुणाघन होऊन वोळती सगळे खेद नि खंत

द्वांत भिजुनी दगडहि आतां हरित तृणें श्रीमंत
आतां कोणी उरे न परकें भेटे तें गुणवंत

शिशिरांतहि या स्पर्शुनि जातो कधिं अशरीर वसंत
आणि शहारुनि बोलूं बघतो हृद्यांतिल रसवंत

बोलावेंसें वाटे तें तें बोलुन गेले संत
अमृतसिंधू किति उपसावा आणि कोठपर्यंत ?

कांट्यांतुनि चाललों तिथें हा उमले कुसुमित पंथ
असेंच लिहितो मोडीमधुनी बालबोध भगवंत

पुणें, २८-१०-५८

## तत्त्वज्ञानी

जवळच व्याकुळ पाण्यावरतीं
झुकली होती दवांत फांदी
अन् भिजल्या पुळणीवर होती
पारा होउन खेळत चांदी

जुनावलेली लाल वारुणी
तशीच अर्धी होती पात्रीं
अर्धी होती व्यथा होउनी
जळत राहिली अपुल्या गात्रीं

कथेंत तुझिया नव्हता नायक
होतें पण गालांवर पाणी
असें निसरडें घडतां कांहीं
भ्याडच बनतो तत्त्वज्ञानी !

तें माझें अध्यात्म ऐकुनी
तूं खिस्ताच्या जोग घेतला
पोरांनीं घर भरलें असतां
माझा आहे रिताच पेला

१९५८

## प्रार्थना

प्रार्थना तीच
जी कवितेसारखी
अचल असून स्पंदशील
शब्दाच्या स्थावर शिल्पांत
बद्ध न झालेली
ती उगवते झाडासारखी
प्राणाचें बीज भेदीत
चढत रहाते
हिरवीगार अग्निशिखा होऊन
सतत सहज
असीम ऊर्ध्वाचा शोध घेत
ती प्राणांत उमलूं लागतांच
माणसाचाच होतो
अवधूत अश्वत्थ
त्याच्या पायांना मुळ्या फुटतात
आणि शोषूं लागतात
संचिताचें अवाक् आंधळें रसातळ
ज्याच्या दाहक रसामुळेंच
त्याची पालवी झडूं लागते
मौनाचा जप करीत

निष्फळतेच्या उपासनेंत
तो होतो आपादमस्तक
संपूर्ण सफळ
अंगांतून ढाळीत
प्रकाशाचे स्रोत
अशा शिशिरांत न्हाल्यानंतरच
वसंताचा स्पर्श होतो
प्रार्थनाच प्रसाद होऊन
तेवूं लागते ज्योतीसारखी
पण काजळीशिवाय
सावलीशिवाय

५-१-५९

## वाढत्या सांजवेळे

वाढत्या सांजवेळे नये ग पाण्या जाऊं
भरल्या कळशीला वेढिती शनि-राहू

ढळते कांसवशी पायींची जड शिळा
बुजून पंचप्राण कंठांत होती गोळा

पाण्यानें भिजे कटी घामानें भिजे चोळी
भाळींचें भोळें कुंकू भिऊन आसूं गाळी

पेरीत गंध वेडे चेटूक करी वारा
अंगांत यक्ष कोणी छेडितो लक्ष तारा

पुरिलें तुळशींत होतें ग स्वप्न जागें
वैरीण पायवाट ओढिते पाय मागें

काळोखीं चपापून काढिते फणा शंका
स्वप्नींचा राजपुत्र वारीत येतो पंखा

पाण्यानें होते आग पंख्यानें होते लाही
नाहीं ग कधीं होत जीव हा उतराई

फुटतो बाई घडा संसारा जातो तडा
ओखटी वेळ मोठी छंद हा सोड वेडा

३१-५-५९

## सुखा नाहीं चव

सुखा नाहीं चव
लव वठलेली आहे
दुःखा नाहीं भार
धार बोथटली आहे

ओसरला गंध
वारा पडलेला आहे
झाड बंद आतां
पाला झडलेला आहे

हवेमध्यें कुंद
छंद गोठलेला आहे
पावसाचा थेंब
वाटे आंत वाट पाहे

१-७-५९

## फांद्यांमधुनी चंद्र दिसावा

फांद्यांमधुनी चंद्र दिसावा
    मुळ्यांतुनी घुसळावें पाणी
सावल्यांतुनी अन् वाऱ्यानें
    शिंपित जावें अत्तरदाणी

पाषाणाला स्वप्न पडावें
    खुळी कळ्यांना यावी डुलकी
पदर ढळावा तुझा जरासा
    झुळुक लागुनी हलकीफुलकी

तुला तयाचें भान नसावें
    सांगत असतां होउनि कष्टी
त्या तेव्हांच्या धुंदपणांतिल
    माझ्या मूर्खपणाच्या गोष्टी

तुझ्या व्यथेनें होतां व्याकुळ
    'तिळा' अचानक उघडा व्हावा
जवळ अशी तूं असतांनाही
    तसाच पुन्हा विसर घडावा

हलवुनि मज तूं चिडुनि म्हणावें
    "जन्माचेच तुम्ही बैरागी!"
मींही घ्यावी चूक सुधारुन
    होउनि व्यवहारी अनुरागी

फांद्यांमधला चंद्र तेधवां
    पानांमागें जरा दडावा
डोळ्यांमधला थेंब तुझ्या अन्
    माझ्या खांद्यावरी पडावा

३-७-५९

## दीस कसा तरी जातो

दीस कसा तरी जातो मन उन्हांत पांगून
पण काजळतां दिशा भितें जातें बावरून

नोहे रातीचें हें भय; गूढ माझ्याच वातीचें
तेल-खायऱ्या आंधळ्या मूढ आधार-मातीचें

माती तापून तापेना, वात पेटून पेटेना
ऐन वेळीं विरजती कांठीं जीवघेण्या वेणा

'शुभं करोति' म्हटली तरी घडेना अद्भुत
शापें मातीच्या का होतें असें ज्योतीचेंहि भूत ?

३-१०-५९

## क्षितिजीं आलें भरतें ग

क्षितिजीं आलें भरतें ग
घनांत कुंकुम खिरतें ग
झालें अंबर
झुलतें झुंबर
हवेंत अत्तर तरतें ग

लाजण झाली धरती ग
साजण कांठावरतीं ग
उन्हांत पान
मनांत गान
ओलावुन थरथरतें ग

नातें अपुलें न्हातें ग
होउनि ऋतुरस गातें ग
तृणांत मोतीं
जळांत ज्योती
लावित आलें परतें ग

८.१०.५१

## चित्रवीणा

निळ्या जळावर कमान काळी
कुठें दुधावर आलीं शेतें
थंडाव्याचीं कारंजींशीं
कुठें गर्द बांबूचीं बेटें

जिकडेतिकडे गवत बागडे
कुठें भिंतिच्या चढे कडेवर
ती म्हातारी थरथर कांपे
सुखासवें होउनी अनावर

तारांमधला पतंग कोठें
भुलून गेला गगनमंडला
फणा डोलवित झोंबूं पाहे
अस्तरवीच्या कवचकुंडला

उंचवट्यावर म्हशी गोठल्या
तसेच कोठें कातळ काळे
वर्खे तृप्तिचा पानोपानीं
बघून झाले ओले ओले

कोठें तुटल्या लाल कड्यावर
चपळ धीट बकरीचीं पोरें
एक त्यांतलें लुचे आइला
सटीन-कांती गोरें गोरें

फुलपांखरी फूलथव्यावर
कुठें सांडलीं कुंकुम-टिंबें
आरसपानी पाण्यावरतीं
तरत्या बगळ्यांचीं प्रतिबिंबें

कुठें आवळीवरी कावळा
मावळतीचा शकून सांगे
पूर्वेला राउळ इंद्राचें
कोरिव संगमरवरीं रंगे

घाटामध्यें शिरली गाडी
अन् रात्रीचा पडला पडदा
पण चित्रांची विचित्र वीणा
अजून करिते दिडदा दिडदा

७-१०-५९

## मागणें

माझें थकलें मागणें तुझें सरेना रे दान
गिमामागून अमाप तुझें पिके समाधान

दिसा वरुषे चांदणें स्वर्ग रात्रीचा आंदण
दाही दिशांच्या तीर्थांनीं माझा तुडुंबे रांजण

आतां खुंटली रे तृष्णा माझें कुंठलें मागणें
मीच झालों तुझ्या हातीं तुझें लाडकें खेळणें

तुझें माझें दयासिंधो जगावेगळालें नातें
तुझ्या माझ्या जिव्हाळ्यांत उभें त्रैलोक्यच न्हातें

माझ्या मागण्याहुनी रे तुझें देणेंच शहाणें
'तुझें-माझें' हेहि आतां फक्त शब्दांचे बहाणे

६-१२-५९

## पेटलों मी फार

पेटलों मी फार; आतां भीति वाटे पेटण्याची
टाळितों एकान्त, छाया, चांद्-वेळा भेटण्याची

फार आहे पाहिलें मीं, साहिलेंही फार आहे
शांतल्या या सागरीं जें सांचलें तो क्षार आहे

चांदण्या-गाण्यामुळेंही या जळाची आग होते
पीयुषाला गे विषानें दंशिल्याची जाग येते

जोग खोटा, भोग वेढी खोड झाल्या चंदनाही
पेटल्या ओल्या-सुक्याची शुद्ध का राहील कांहीं ?

५-४-६०

## भगवी रतन-अबोली

भगवी रतन-अबोली वेणी अस्त-विधूची उमथी कोर
लाल कडांची समुद्र-साडी मयूरपंखी चोळी भोर

स्वप्नबिंदीच्या वळणावर तूं वळुनी क्षणभर झालिस दूर
घुमट उजळुनी, सज्ज्यावरुनी ओघळले सनईचे सूर

सांज-कुळागर झुललें फुललें नाचुं लागलें होउनि मोर
घटाघटांतुन सांडे कांचन अशी घनघटा आली थोर

झडे सुरंगी धुंद-तरंगी, नागचंपका मादक दर्प
हिर्वळलेल्या उन्हीं पसरले दर्वळते कनकाचे सर्प

स्वरनक्षीचा सुनील पक्षी झुले फांदिवर स्वप्नविभोर
हाय! उडाला...तशी भडकली काळी काळी रात्र कठोर

६-४-६०

## मंद असावें जरा चांदणें

मंद असावें जरा चांदणें कुंद असावी हवा जराशी
गर्द कुंतलीं तुझ्या खुलाव्या शुभ्र फुलांच्या धुंद मिराशी

दूर घुमावा तमांत पांवा, जवळच व्याकुळ व्हावें पाणी
तूंहि कथावीं रुसुन अकारण सासू-नणदांचीं गाऱ्हाणीं

सांगावें तूं दुःख आगळें माझ्यासाठीं गिळिलें कैसें
आणि आंधळ्या भलेपणीं मीं तुला केधवां छळिलें कैसें

उदासतां अन् सुखांत, कोठें कौलारावर धूर दिसावा
असें निसटतें बघून कांहीं विषाद व्हावा जिवा विसावा

मंद असावें जरा चांदणें कुंद असावी हवा जराशी
करुणाभरल्या मुकाटपणिं अन् तुला धरावें जरा उराशीं

६-४-६०

## भिजून आल्या ग

भिजून आल्या ग काजळराती
काजुल्यांचीं झाडें झेलीत हातीं
मागती मागलें दान

झडती गारा ग वेढिती धारा
दीप आळवितो वादळ-वारा
आगींत जागलें रान

पोळती मुकाट मधाचीं पोळीं
अंतीं परंतु ही रितीच झोळी
पाण्यांत झुरे तहान

तहान देण्याची जरी ग अशी
जागून जागून भिजली उशी
सुटेना तरी गिराण

काजळरात्रीं ग वादळ-रात्रीं
जोगुल-जागल्या जळाच्या पात्रीं
अबोध वाजतें गान

शापाचें ओझें ग घेऊन शिरीं
गंधित हाकांच्या भरून भरीं
सैराट हिंडतो प्राण

२२-५-६०

## मोकळें किती वाटे

मोकळें किती वाटे
तृप्तीची धुंद दाटे
देहींच्या गंधपुष्पीं कोंवळे झाले कांटे

उजळ ओल्या वाती
नितळ निळ्या राती
स्वरांचे सर कोणी ओवितें मृदु हातीं

फेसाळ चांदलाटा
खेटती वाळुकांठा
माडांच्या रायांतल्या पाऱ्यांत न्हाल्या वाटा

छायांचें चांदण्याशीं
लग्न हें अविनाशी
दूर मी जरी असा तरीही तुझ्यापाशीं

२२-५-६०

## पाऊस रात्रीं होऊन गेला

पाऊस रात्रीं होऊन गेला
रानांमाळांवर सोन्याचें ऊन
अजून माती कोवळी ओली
पानापानांतून कालची धून

मावलें नाहीं कवेंत तें हें
हवेंत फांकलें होऊन गंध
तापला होता हाडांत तो हा
झाडाझाडांतून कांपतो छंद

कणीसरें हें मोत्यांत डोले
तमांतलें सखि हात्याचें प्रेम
अमृतसें हें जमून आलें
ओलेत्या पात्यांत हिरवें क्षेम

लोचनीं गालीं साजणी तुझ्या
माझिया ओठांची लाजरी खूण
उन्हांत तसें मनांत असें
अजून खिरतें साखर-चून

२३-५-६०

## घनसगर्भ नजर एक

घनसगर्भ नजर एक, स्मित सूचक फुलणारें
संकेतक वाक्य एक विविधार्थें छळणारें

दे अथवा विद्युद्वत स्पर्श जरा ओझरता
त्याविण सखि खिन्न जिणें दिवस सुन्न व्यर्थ रिता

ये नेसुन वसन धवल, माळुन ये धवल फुलें
भाळावर खेळवीत नवलाचें स्वप्न निळें

उजळ उजळ कांतिरसें सांध्यगूढ श्यामलता
फुलव मधुर कुटिल वचें प्रतिभेची पुष्पलता

दूरांतुन पण रात्रीं निःश्वासित गुज अधुरें
गाळित ये हृत्पात्रीं तिमिराचें विष गहिरें

अन् भिडतां क्षितिजाला ज्वालांतुन मूक व्यथा
एकाकीपणिं तसल्या ज्योत्स्नारति हो कविता

१६-६-६०

## मंदावतां सगळीं उन्हें

मंदावतां सगळीं उन्हें आलीस कां उशिरां अशी ?
थंडावतां जळुनी वनें झडलीस कां सर गारशी ?

शृंगारला स्वप्नें झुला केव्हांच तो गे वाळला
सरतां वसंत असा उरीं झंकारशी कां तारशी ?

आल्या घडी वळल्या सुन्या पेल्यांस अन् गेले तडे
तरि त्यांत कां धुंदावुनी ओसंडशी मधु-धारशी ?

सुकतां दळें कमळें जळें झुकतां निराशुन चांदणें
प्रतिभेंतलें हुकलें जिणें कां वास्तवीं आकारशी ?

जें जें मिळालें जीवनीं उशिरांच तें आलें असें
छळलाट ही हृदयांतली सखि तूंहि कां ग उभारशी ?

तुजसाठिं जें जें जोडिलें वैतागुनी लाथाडिलें
पथ पाहुनी थकल्या जिवा भिडलीस कां तलवारशी ?

रुधिरांत या स्वरवाहत्या जरि उर्वशीशी बिंबशी
म्हणणार मी न तरी पुन्हा आलीस कां उशिरां अशी

१७-६-६०

## कौलारांवर लाल खेळतो

कौलारांवर लाल खेळतो निळा निळा सखि धूर
हिरव्या तरुराजींत दाटलें काजळतें काहूर

दिशादिशांतुन आषाढाच्या श्यामघनांना पूर
तृणाप्रमाणें मनेंहि झालीं चंचल तृणमयूर

गडे लागला विलासखानी-तोडीचा उरिं सूर
गोड अधिर या क्षणींच कां तूं जवळ असूनिहि दूर ?

२३-६-६०

## सरिंवर सरी आल्या ग

सरिवर सरी आल्या ग
सचैल गोपी न्हाल्या ग
गोपी झाल्या भिजून-चिंब
थरथर कांपति निंब-कदंब
वनांमनांतुन टाळ-मृदंग
तनूंत वाजवि चाळ अनंग

पानें पिटिती टाळ्या ग
सरिंवर सरी आल्या ग

मल्हाराची जळांत धून
वीज नाचते अधुनमधून
वनांत गेला मोर भिजून
गोपी खिळल्या पदीं थिजून
घुमतो पांवा सांग कुठून ?
कृष्ण कसा उमटे न अजून ?
वेली ऋतुमति झाल्या ग
सरिंवर सरी आल्या ग

हंबर अंबर वारा ग
गोपि दुधाच्या धारां ग
दुधांत गोकुळ जाय बुडून
अजून आहे कृष्ण दडून
मी-तूं-पण सारें विसरून
आपणही जाऊं मिसळून
सरिंवर सरी आल्या ग
दुधांत न्हाणुनि घाल्या ग
सरिंवर सरी : सरिंवर सरी...

२४-६-६०

## तुला पहावें

तुला पहावें कधिं भिजतांना
कधिं अथवा पुरती भिजलेली
नजर जाउनी माझ्यावरतीं
क्षणभर लज्जेनें थिजलेली

तुला पहावें कधिं एकान्तीं
        उदी मुक्त कच विंचरतांना
अन्यमनस्कपणें अपुल्याशीं
        अरळ ओळ मम गुणगुणतांना

तुला पहावें कधिं मेजाशीं
        रेखित असतां व्यथा कथेंतुन
मंद निळ्या विद्युद्दीतीनें
        रेघ मुखाची निघतां उजळुन

तुला पहावें उन्हांत केव्हां
        वेगवतीवरुनी वळतांना
कटाक्ष सूचक टाकुनि मजवर
        उडत्या कुसुमासम हसतांना

तुला पहावें काव्य परिसतां
        चकित विकल कधिं सभय बावरी
अधिर व्हावया माझ्या मुखिंची
        अक्षय-मधुची नवलपांवरी

तुला पहावें छायानर्तनिं
        कधिं स्वप्नांनीं थरथरतांना
झुकुनि वेलशी खांद्यावरतीं
        अधरानें मंज मंतरतांना

३-७-६०

## आज पहाटे

'आज पहाटे निष्पाप पापण्यांवर
        उमलत असतांना सोनेरी जाग
तुझीं सानुराग अंगुळें खेळवीत होतीं
        माझ्या थकल्या अलकांतून एक मुलतानी राग

अनावर निःश्वासांतून ठिबकत होते गालावर
　　　सुगंध-शीतळ पुष्पराग
खरेंच तूं कुजबुजली होतीस,
　　　"या घटकेला वाटेल तें माग."

लडिवाळपणानें लगडत रचलीस अंगावर
　　　तिशीच्या लुसलुशीत उश्यांची मखमली गर्दी
अर्धतंद्रावस्थेंत राहिलों कुरवाळीत
　　　एक रेशमी अभ्र्याची मत्तोन्नत गिर्दी
रंभोरूच्या अनावृत स्पर्शांतून
　　　देत होतीस जलतरंगाच्या नांदीची वर्दी
वाटलें मी केवळ स्वरांचा पागल
　　　तूंच या तरल संगीतांतली खरी दर्दी

राजहंसीच्या राजस सहजतेनें
　　　गळ्यांत गुंतवीत ओवळ-सराची मान
डाळिंबाच्या उदकाळ ओठांनीं
　　　भरवलेस मला माझेच मुकलेले प्राण
माधुर्याची शींग होऊन नकळतच
　　　गळला उरांत रुतलेला तृष्णेचा बाण
तजेल्याच्या नद्या उतून
　　　उजाडल्याचें झालें भान

गुलाबी धुकें वितळून गेलें
　　　सर्वत्र तरिही तुझाच भास
पाचोळ्यांतहि ओलाचिंब
　　　तुझाच वास, तुझाच श्वास

६-७-६०

## नजर तुझी

नजर तुझी लागुन झालें घायल विकल आज
काजळ डोळां घालतां जिवा उगिच वाटली लाज

विट्टुनि सुखा इतुके दीस बासनीं बांधिला साज
काढुन पुन्हा लागलें नटूं सोडुन रीतरिवाज

लावुन ज्योत माळुन फुलें रचुन शेज-बाज
बघत वाट जागलें किती असून घरंदाज

दिसाया किती सालस माझा राजीव-लोचन-राज
धरुनि धीर जपुनि तीर हेरितें तिरंदाज

७-७-६०

## वाटच होती बघायची तर

वाटच होती बघायची तर
मज माझें का घर नव्हतें ?
घाट सुचविला मला कशाला
पायिं तुझ्या बळ जर नव्हतें ?

गांठभेट जर नकोच होती
बघुनी मज तूं ओझरतें
थांबुनि दारीं केलें कां रे
उंबरठ्यावर हृदय रितें ?

ओलांडुनि तो निघतां मी का
तुला तुझें घर आठवलें ?
ठावें का मीं किति तुजसाठीं
ओठीं अमृत साठविलें ?

घर हुपल्यानें गड चढल्यानें
मी माझी मज सांपडल्यें
भान हरपुनी कशी अचानक
तुझ्याच हातीं पण पडल्यें ?

कसे कळावे तुझे बहाणे ?
जरा लाविला बोल खरा
सरला तो पण, सरलें मीही
कुठें अशी शिकलास तऱ्हा ?

१२-७-६०

## घाव राहो वाहता हा

घाव राहो वाहतो हा लाव पण त्यानें टिळा
दाह वाढो, त्यांतलें गे तेज पण लाभो तुला

वेदना प्राणास भेदी ती न कधि भावो जगा
भक्तिचें हें त्यांतलें तूं गीत पण रंगून गा

देह खंगूं दे क्षयानें उग्रतर वा दे सजा
मात्र माझी अंत्ययात्रा शांतपणिं पहून जा

त्या तिथीला मध्यरात्रीं मात्र होउनि कोमला
दीप दारीं लावण्याची आठवण होवो तुला

१७-७-६०

## तें स्वप्न एक होतें

तें स्वप्न एक होतें पडलें मला दुपारीं
मारून मात्र गेलें अंतीं सुरी जिव्हारीं

जडलीं करीं कराग्रें बुडली दिठी दिठींत
तों वाजल्या हजारों झाडांतुनी सतारी

आपाद चिंब न्हालों धारांत चांदण्याच्या
झरले झरे दुधाचे स्रवुनी कडेकपारी

वाटा पुसून गेल्या लाटांत आसवांच्या
तारूं बनून आलें घर दृष्टिच्या किनारीं

गजघांट तों जगांची वाजून जागली ती
ठेवून मात्र गेली मागून नागरात्री

अजुनी तरीहि गातों शरपंजरीं विषारी
"तें स्वप्न एक होतें पडलें मला दुपारीं"

१०-१०-६०

## जळण्यांतहि सुख आहे

जळण्यांतहि सुख आहे ज्वालांतुन फुलण्याचें
ढळण्यांतहि गुज आहे हित अंतिम कळण्याचें

स्रवण्याचा वर भेटे जळणाऱ्या अधराला
हृदयींचा हर भेटे ढळलेल्या पदराला

पडणाऱ्या गति लाभे अपुल्यांतच चढण्याची
कढणाऱ्या युति लाभे रतिवांचुन बुडण्याची

जळतों मी, ढळसी तूं आव्हानित मरणाला
अमराचा अळिता सखि अपुल्या पण चरणाला

१४-१०-६०

# परिशिष्टें व सूचि

मराठी ... ठाणे.

परिशिष्ट पहिलें

बोरकरांचें हस्ताक्षर

जळण्यांतहि सुख आहे —

जळण्यांतहि सुख आहे ज्वाळांतुन फुलण्याचें
ढळण्यांतहि गुण आहे अंतीम हित कळण्याचें
सरण्याचा वर भेटे जळणाऱ्या अधरांत
हृदयींचा हर भेटे ढळलेल्या पदरांत
पडणाऱ्या ज्योती जसे अश्रूंतुन जळण्याची
कळणाऱ्या युती जसे रातीवांचुन कुढण्याची
जळतों मी, ढळसी तूं आळवीत मरणाला
अमराचा अविता सारे अपुल्या पण चरणाला

२४-१०-६०

बा. भ. बोरकर

## (अ) आसवांची ओंजळ

बागेंतील निर्व्याज फुलें, स्वच्छंदी फुलपाखरें व आनंदी निर्झर आपल्या अनिर्बंध विहाराने रसिकांचीं हृदयें रिझवीत असतात. परंतु ही दुनिया दुरंगी आहे. फुलें मलूल व्हावीं, फुलपाखरें विच्छिन्न व्हावीं व निर्झर आटून जावे, हा सृष्टीचा क्रम आहे. मानवी सृष्टींतील काव्योद्यानांतहि हींच दृश्यें आपणांस प्रतीत होत असतात. आणि वरील कटु सत्याच्या जाणिवेने प्रतिभासंपन्न कवींच्या विहाराला भीतीची छटा जडून त्याला पायबंद पडतो. अशा परिस्थितींत माझ्यासारख्या एका अशिक्षित, अल्पवयी व अननुभवी खेडवळानें आपलें वेडेंवाकडें गीत बोबड्या भाषेंत आळवणें म्हणजे लहानतोंडीं मोठा घास होय. परंतु महाराष्ट्रशारदेला सेवेच्या सार्थकतेपेक्षा भक्तीच्या भावनोत्कटतेची किंमत जास्त वाटते, या जाणिवेने गोमंतकीय साहित्यभक्तांच्या प्रोत्साहनामुळे अंतःकरणाच्या उमाळ्याने माझी लाडकी 'प्रतिभा' मी आळवीत आहें. संमेलनाच्या रूपांत माझ्या झोपडींत पायधूळ झाडणाऱ्या देवतेला रिझविण्या-साठीच माझा हा प्रेमाचा प्रयत्न आहे. कौतुकाच्या आशेने तर मुळीच नाही; कारण गीताच्या योग्यतेबद्दल मला आत्मविश्वास नाही. असो.

प्रस्तुत संग्रहांतील कविता कुठल्याहि नियतकालिकांत प्रसिद्ध झालेल्या नाहीत—किंबहुना, त्या त्या लायकीच्या नसतीलहि—परंतु असा प्रयत्न मीं केलेला नव्हता व करणारहि नव्हतों. परंतु ईश्वरी घटना मानवी संकेताहून निराळी असते.

या संग्रहांत या तीन वर्षांतील कविता संकलित केलेल्या आहेत. शिक्षण-संपादनाबरोबर झालेल्या या मनोरंजनांत त्यांच्या भवितव्याची कांहीच कल्पना नसल्याने बरेच दोष राहिले आहेत याची मला जाणीव आहे. परंतु सर्वच घाई झाल्यामुळे त्यावरून नाजुक हात फिरविणें अशक्य झालें, याबद्दल क्षमेची अपेक्षा करतों. शिवाय कोकणींतील सार्थ शब्दप्रयोगहि ठिकठिकाणीं वापरले आहेत. हा नूतन उपक्रम महाराष्ट्रियांस कितपत आवडेल हा प्रश्नच आहे.

प्रस्तुत कार्यात मला, माझी योग्यता नसतांनाहि, उदार अंतःकरणाने साहित्याच्या न्यायमंदिरांत प्रस्तावनारूपाने माझी वकिली करणाऱ्या पूज्य श्रीपादरावांचे (श्रीपाद महादेव वर्दे यांचे) मी मनःपूर्वक आभार मानतों. या कार्यात शेवटपर्यंत सक्रिय प्रोत्साहनाने मला यश मिळवून देणारे माझे पूज्य हितचिंतक,

साहित्यभक्तांचे परिचित प्रेमळ भाई—श्री. यशवंतरावजी सरदेसाई—व मुंबईचे सुप्रसिद्ध आर्टिस्ट श्री. गणपतराव वि. लाड यांचेहि कृतज्ञतापूर्वक मी आभार मानतों. शेवटीं आमचे प्रिय मित्र व प्रस्तुत पुस्तकाचे प्रकाशक श्री. काशिनाथपंत नायक यांचे पदरीं या पुस्तकाचें श्रेय टाकून ही भक्तिभावाची 'प्रतिभा' आसवांच्या ओंजळीने व घाबऱ्या अंतःकरणाने श्रीशारदादेवीच्या सेवेस सादर करीत आहें.

१९३०

सर्वांचा नम्र पाईक
**बा. भ. बोरकर**

[ 'प्रतिभा' संग्रहाचें प्रास्ताविक ]

## (ब) दोन गद्य शब्द

लहानपणीं मोठ्या समारंभांतहि धिटाईने तानबाजी करूं शकणारा मुलगा मोठेपणीं मैफलीतलें गाणें करण्याचें भाग्य लाभल्यावर ऐन प्रसंगीं बावरून गेलेला दिसत नाही का? जी मंडळी त्याचे दोष पोटांत घालून गुणांचेंच कौतुक करीत आली, तीच समोर दिसत असतांनाहि त्याला आपलें मन शांत ठेवतां येत नाही. या मनःस्थितीच्या मुळाशीं रसिकांच्या वाढत्या अपेक्षांची जाणीव हें एक कारण असतेंच. पण ज्या गायकीचें नांव सांगून त्याला गावयाचें असतें, तिच्या थोरवीची जाणीव हें त्याहूनहि जास्त सबल कारण असतें.

महाराष्ट्र-शारदेच्या दरबारांत माझें हें 'जीवन-संगीत' आळवतांना माझी स्थिति त्या मुलासारखीच झाली आहे. मी 'प्रतिभा' या माझ्या कवितासंग्रहाकडे किशोरावस्थेंतली तानबाजी म्हणूनच पाहतों. त्याला गाणें म्हणतां येणार नाही. रसिकांनी त्याकडे कौतुकाने पाहिलें, त्यामुळे मीहि वाढत्या उत्साहाने अभ्यासाला लागलों. कविवर्य तांब्यांच्या घराण्याची गायकी पुढे चालविण्याच्या निष्ठेने मी कलेच्या उपासनेला लागलों व बराचसा आत्मविश्वास आल्यावर महाराष्ट्राच्या रसिकतेला रिझविण्याच्या महत्त्वाकांक्षेने माझें 'जीवन-संगीत' आळवावयाला सिद्ध झालों. पण आपल्या वाढत्या अपेक्षा व तांब्यांच्या गायकीची थोरवी यांची योग्य जाणीव असल्यामुळे मला या क्षणीं महत्त्वाकांक्षेएवढीच भीतीहि पण वाटत आहे. तयारी केवढीहि असली तरी आपला ताल चुकेल का, अशी भीति नवख्या गवयाला असतेच. तशी ती मलाहि आहे. पण

सांभाळून घ्यावयाला भाऊसाहेब खांडेकरांसारखे दर्दी वस्ताद्जी पाठीशीं आहेत हें जाणून मात्र मला तितकाच धीरहि वाटतो. त्यांच्या गोड हातांतून निघणाऱ्या मधुर बोलांची साथ असल्यावर गाण्याच्या यशस्वितेबद्दल कुणाला शंका राहील? ज्यांनी आपल्या बहुविध मधुर बोलांनी माझ्या जीवनाला ताल दिला त्यांनीच माझ्या संगीतालाहि साथ द्यावी हें मी माझें भाग्य समजतों. अशा साथीला सुदैवाने रसिक व चतुर टीकाकारांच्या तरल अनुभूतीच्या सारंगीची जोड मिळाली, तर मला मोठा आनंद होईल. ती न मिळाली तर सामान्य रसिकतेचा तंबोराहि मला पुरेसा वाटेल. पण महाराष्ट्रांत तंबोऱ्याला गवसणी पडून बाजाच्या पेट्यांचाच सुकाळ झाला आहे, हा प्रवाद मात्र मला अस्वस्थ करतो. तो खरा असेल का?

आज हें 'जीवन-संगीत' आळवितांना अनेक व्यक्ति, प्रसंग, घटना व दृश्यें यांचा प्रकाश आणि परिमल यांनी मला भोवतालचें वातावरण धुंद वाटतें. अशीच प्रतीति रसिकांनाहि झाली, दैनंदिन व्यावहारिक जीवनापेक्षा जास्त सत्य, सुंदर व मंगल असें जीवन कांही क्षण जरी आपणांस अनुभवितां आलें आणि तांब्यांच्या अभिजात गायकीचा लौकिक व प्रसार वाढला, तर हें 'जीवन-संगीत' सार्थकीं लागलें असें मी समजेन.

शेवटीं, ज्यांनी हा योग तोशीस सोसून उत्साहानें व औदार्यानें घडवून आणला व आपली सेवा करण्याची मला सुसंधि दिली त्या मंगेशरावजींचे मी मनःपूर्वक आभार मानतां.

रसिकांचा नम्र
**बा. भ. बोरकर**

[ 'जीवन-संगीता'चे प्रास्ताविक ]

(क) माझ्या भावसंगीताची ही भैरवीहि असेल, पण मीं ती आनंदानें गायलेली आहे.

१ १०-५०　　　　**बा. भ. बोरकर**

[ 'आनंदभैरवी'चें प्रास्ताविक ]



मराठी

## परिशिष्ट तिसरें

(अ) ' जीवन-संगीता 'ची अर्पणपत्रिका : **कविवर्य भास्करराव तांबे यांस—**

(ब) ' दूधसागर 'ची अर्पणपत्रिका : **आदर्श गोमंतकीय विदुषी दॉन प्रॉपेर्सिय कुरैय आफाँसु ई फिगैरेदु यांच्या मातृनिर्विशेष वात्सल्यास**

(क) ' आनंदभैरवी 'ची अर्पणपत्रिका : **आमचे अहमदाबादचे कविमित्र उमाशंकर जोशी आणि वसंत हेबळे यांस—**

## परिशिष्ट चौथें

**जन्म** : ३० नोव्हेंबर १९१०; गोव्यांतील कुडचडें या गावीं.

**शिक्षण** : मॅट्रिक १९२८; धारवाडच्या सरकारी हायस्कूलमधून.
टीचर्स डिप्लोमा १९३६; गोव्याच्या नॉर्मल स्कूलमधून.

**विवाह** : ९ मे १९३०.

**व्यवसाय** : १९३० ते १९४६ गोव्यांत शिक्षकाची नोकरी.
१९४६ गोव्याच्या राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनांत भाग घेण्यासाठी सरकारी नोकरीचा त्याग.
१९४६ ते १९४८ मुंबईत वास्तव्य; 'आमचा गोमंतक', 'आमचें गोंय', व 'प्रजेचो आवाज' या नियतकालिकांचें संपादन आणि गोमंतकाच्या चळवळींत प्रमुख भाग.
१९४८ ते १९५४ लेखन व वृत्तपत्रव्यवसाय.
१ नोव्हेंबर १९५५ पासून आकाशवाणीच्या पुणें केंद्रावर वाङ्मय-संयोजक (spoken word producer) म्हणून नेमणूक.
१२ सप्टेंबर १९४८ पासून पुणें येथे वास्तव्य (१८ रानडे ब्लॉक्स, शिवाजीनगर, पुणें ५).

पहिलें जाहीर काव्यगायन कोल्हापूरच्या साहित्यसंमेलनांत १९३२ सालीं. भा. रा. तांबे यांची तिथे पहिली (व शेवटची) भेट. १९३४ सालीं बडोद्याच्या साहित्यसंमेलनांत उत्कृष्ट कवितेबद्दल ('मुशाफिरा', 'तेथें कर माझे जुळती') सुवर्णपदक. बेळगावच्या गोमंतक साहित्यसंमेलनांत 'भावीण' कादंबरीबद्दल सुवर्णपदक.

साहित्य : *कविता :* (१) प्रतिभा—१९३०; (२) जीवनसंगीत—१९३७; (३) दूधसागर—१९४७; (४) आनंदभैरवी—१९५०; (५) चित्रवीणा—१९६०; (६) बोरकरांची कविता—१९६०.
*कादंबरी :* (१) मावळता चंद्र—१९३८; (२) अंधारांतली वाट—१९४३; (३) भावीण—१९५०.
*लघुनिबंध :* (१) कागदी होड्या—१९३८.
*कथा :* (१) प्रियदर्शिनी—१९६०.
*अनुवाद :* (१) जळतें रहस्य—१९४५ : स्टीफन झ्वाइग; (२) कांचेची किमया—१९५१ : स्टीफन झ्वाइग; (३) बापूजींचीं ओझरतीं दर्शनें—१९५० : काका कालेलकर; (४) आम्हीं पाहिलेले गांधीजी—१९५०; (५) माझी जीवनयात्रा—१९६० : जानकी-देवी बजाज.

कोंकणी साहित्य : (१) गीताय्—१९६० : (२) पांयजणां—१९६०.

# पहिल्या ओळींची सूचि


| | |
|---|---|
| अकस्मात असे | २५८ |
| अगडबंब बंब भयाण नाद | १२५ |
| अनंता तुला कोण पाहूं शके ? | ९ |
| अपरिचिते ! तूं चिरपरिचितशी० | ३२८ |
| अमृतघट भरले तुझ्या घरीं | ९९ |
| अम्हांला चिरंतनाचा ध्यास | २७८ |
| अशांतिचें गाणें आतां० | २०६ |
| अशि मारिशील न कुणाला ग ? | १४४ |
| अश्वत्थामा तेल मागतो | २८१ |
| असलें हें फळ केंवि तपाला ? | २७२ |
| असशिल जरि रसनिधि तूं | १८३ |
| असंख्य रे, तव दयिता रमणा ! | १८६ |
| आगीचें पांखरूं खुळें हें० | १७८ |
| आज अचानक नकळे कोठुनि | २९३ |
| आज तुझ्या घरिं आल्यें | २९१ |
| आज तुझ्या नयनांत मानिनी ! | २८९ |
| आज पहाटे निष्पाप पापण्यांवर | ३४६ |
| आठवतें का ? | ३२२ |
| आतांच लागला कुठें० | २०७ |
| आतांच संपली सांध्य-वंदना० | २१७ |
| आतां नाहीं जवळ नि दूर | ३२५ |
| आतां माझ्या व्यथा-कथा | २९५ |
| 'आमार जीबनइ आमार बानी' | २७४ |
| आर्त धावा तुझा ऐकुनी सुंदरी | १५९ |
| आर्यें ! भार्यें ! मत्प्रियदर्शिनि ! | २१८ |
| आलों चालुनि वाट युगांची | १९४ |
| आवर जळ नयनींचें रमणी | १९१ |
| आहे वाडा चिरेबंदी | ३१० |
| आहे विश्वच नंदनोपवन हें | ४९ |
| इतुक्या लौकर येई न मरणा | ८० |
| इतुक्यांतचि आणि न तव कणव० | ९५ |
| इंदुकले ! नवलाची तव० | ९४ |
| इंद्रनील चंद्रकांत सांध्यसुंदरी ही | १९० |
| उगीच कां ग उदास | २५४ |
| उजळ नितळ स्वच्छंद मासळी | २२६ |
| उद्धटां ऐटींत या खंजीर हे० | २३४ |
| एकच माझा साद ऐक प्रभु | २१४ |
| एक दिवस केव्हां तरि हो असे | २३३ |
| ऐक ! ऐक ! ऐक्य तुझें तुजसि० | ८८ |
| ऐसेंच गीत गावें विश्वास रंजवावें | ६ |
| ओलांडुनि सांकडें पावलें० | २९६ |
| ओळखतिल जे मला आणि मज | २२२ |
| अंतरींच्या अश्रुंनो ! निष्ठूर व्हा० | २३७ |
| अंतरीं माझ्या परी गे मुक्त तूं० | २४३ |
| अंधार हा धृतराष्ट्र, पृथ्वी !० | २५३ |
| अंधारिं उभा मी बघत नभा | १६३ |
| कढे सिंधु टाकी वाफा नारलिका० | ६९ |
| कधिं कधीं वाटतें दूर कुठें तरि० | १०६ |
| कमळशी ये भूवर उर्वशी | २०२ |
| कर बांधाबांध गडे | २५६ |
| करिं सुंदरि स्वरशृंगार | ९० |
| करूं नकोस विलाप, हृदया | २६१ |
| कवण चंद्रकिरणवसन तूं रसज्ञ० | १८५ |
| कवण तूं सुरतरसाची गंगा | ११५ |

काव्य आम्हा हवा महान २४६
कविवर भास्कर गावा १२४
कवी कुणीसा सालाधाला ८
कशास येसी दारीं देवा० १८४
कशि तुज समजावुं सांग ? ७८
कामद्रुमाची डहाळी आज० ३२०
काल अवसेला केली घरीं० २७५
काळ बोले टक टक २८७
काळाच्या वागेत किती ५
काळा जीव तुला कुरवान ५०
• काळे काळे केश तुझे० ३०७
काळें अंबर नेसली कलिसुता ५७
• काळोखाची काळी मखमल १७६
• कां अशी अकारण हससी सखि १३६
कां ग घेतलास सांग भृंग हा० १६७
कितिक भेटल्या हिची परंतू० ३०३
किति दयाघना करितोस ऋणी १००
किति नवल तुला सांगूं सखया ? १०९
किति लवति शिरें किति कर० १९९
कुणि बोललें कुणातें २२
कुणी एकला पाषाण वनीं २११
केलास मुखवट्या ! तूंच० १७१
कोठवरी सांग खुळे ! धरिशिल० १७४
कोण वेळ साधियली श्रीरंग० ८२
कोमल बिल्वदलांवर हिरव्या० ७५
कोर विलोरी तुझ्या कपाळीं० २३५
कोळी मी विणितों हृदांतुनि० ४१
कौलारांवर लाल खेळतो ४४
खिडक्यांवर वाजे वारा ग ८३
खोप बेचिराख झाली ८०
गगनश्रीच्या मानसांतलें ५५
• गडद निळे गडद निळे जलद० १३९
गडे हो सुरम्य रजनी खरी ३९
गड्या उद्यांच्या दिसा, लागले० १६९
गवसेल कुठं हरली नाजुक माया ३२
"गा गा धुंदपणें प्रसन्न कवनें २५६
गाणें भृंगा गुणगुण तें १०
गिरीदरींतुनि झरे–नव्हे हे हिरे २०८
गुरुवर अनुसर रे मन २४१
गे अमर तुझी ही सुंदरता १४३
गेला मानव बाळ विश्वजानिशीं १०५
गोजिऱ्या कळ्याफुलांत० २४०
गोड लबाडी झाली उघडी० १२९
गोमंतकदेवते, प्रभातीं० ६०
• घन तमीं प्रगटली तुझी० १९३
घनसगर्भ नजर एक ३४३
घरांत पडलें आज चांदणें १६१
घाम आपुल्या शिरीं, बापुजी २३८
• घालुं नको मज जन्मा तेथं २१६
घाव राहो वाहता हा लाव पण० ३४९
घुमवा जयजयकार शांतिचा २२३
घेई पुष्पांजली प्रभूजी २६
• चढवूं गगनिं निशाण आमुचें १९६
चपल तुझे चरण जरा या घरीं० ११०
चल सये चल ग ४७
चालसी किती जगं किती युगं० १०२
चिमणें इवलालें बीज १४६
छंद आकाशाचा होता तेव्हां० ३२७
जगाच्या आत्मयज्ञींच्या० ९८
जन म्हणोत तुज दुसऱ्याची ग १५२
जरा गोलसर जरा ओलसर २६७
जरी पुन्हा यावयाचें सत्य सुंदर० ७६

| | |
|---|---|
| जवळच व्याकुळ पाण्यावरतीं | ३३१ |
| जळण्यांतहि सुख आहे | ३५० |
| जळावें अनंतांत माझें जिणें हें | १४१ |
| जादूची माझी वाग | १९ |
| जा सखि, जा सखि | ३०८ |
| जिथें ऐश्वर्यवंतांचा फुकटचा० | ३ |
| जीव तृषेनें अजुनी व्याकुळ | १५१ |
| जीवन त्यांना कळलें हो | २४१ |
| जेव्हां घालिल काल जातिसुमनें० | १८७ |
| झाडें झालीं निळीं निळीं | ३१५ |
| झाली आतां कातरवेळ | ४५ |
| झाली भगवी दारापुढची० | २७६ |
| झाली सांज नभीं सुहास्य० | १८ |
| झालं हवेचेंच दहीं | ३२७ |
| झंझावाताच्या शौर्याला मेघराज० | ३० |
| डाळिंबीची डहाळीशी नको० | ३०४ |
| डोळे तुझे बदामी | २४२ |
| तव नयनाचें दल हललें ग ! | २४५ |
| तव परिस-हृदय लागुनि सजणा | ८४ |
| ताज न मम अश्रुराज० | २९० |
| ताठ उंच मी उभा नभास० | २२७ |
| तापल्या आहेत तारा तोंवरी० | ३२९ |
| तीन सांजा जाहल्या मी बावरें० | ७२ |
| तुला पहावें कधिं भिजतांना | ३४५ |
| तुला मला उमगला जिव्हाळा | २४९ |
| तुझी माझी ग प्रीत साजणी | ९१ |
| तुझें विजेचें चांदपांखरूं० | २०४ |
| तुझ्या गोड सहवासानें भूल० | ४३ |
| तुझ्याजवळी माझिया मनीं० | २४७ |
| तूं आहेस मदीय मातृनिटिलीं० | १०४ |
| तूं छेड अशीच शरीरसतार | २६५ |
| तूं जरि स्वर्गाची सांगाती | १६२ |
| तूं तुझाच दीप आणि० | ३१७ |
| तूं प्रेमिक मी तव प्रियकरणी | ७३ |
| तूं मान स्वताला थोराघरचा० | १७३ |
| तूं येणार म्हणून मीं नमविलीं० | १८८ |
| तूं वासंत उषा प्रभातसमयीं० | १३० |
| तूं शरत्कथेंतिल अमललोचना० | ३०२ |
| ते कर मन्मातेचे | १८२ |
| तेथें कर माझे जुळती | ८५ |
| तें स्वप्न एक होतें पडलें० | ३४९ |
| तोच पूर्वीचाच सुर्मा आजही० | ३२२ |
| तोड ही माळ | २ |
| तोडुं नको माळ गडे काव्यसुंदरी | ४४ |
| तृप्त स्वतंत्र गोव्यांत केव्हां तरी | २९९ |
| त्रिवार मंगल वार आजला | २२८ |
| दिली मला हिरकणी | ११२ |
| दिलें रविनें ज्या तेज सोनियाचें | २०१ |
| 'दीपका'! मांडिलें तुला० | २०७ |
| दीस कसा तरी जातो | ३३६ |
| दीस गिमाचे वरंच सुकलं० | १०१ |
| दुखणाइत हा जळे दिवा ! | १७९ |
| देई हरित्सावली कल्पवृक्ष | ४१ |
| देख भाई, मर्द तूझे चालले० | ३८ |
| देवलसी जीव सदाचा उदासी | २८ |
| दे, वर दे, हृदयस्थ चिरंतन | १८१ |
| धन नाहीं हें पाणी | २८० |
| धाड देवा ऐशा संकटांच्या० | १०३ |
| धुळीधुळींतुनि सकळ हुतात्मे | २२९ |
| न कळे कोठुनि आला सजणी ! | ३०१ |
| नकोच पाहुं वळून, सखे जा | २०० |
| नको मजला ऐश्वर्य मान कांहीं | ६३ |


मराठी ग्रंथ ... ग. ठाणें. स्थळप्रत.

अनुक्रम २८२२८ ... ४१०५.....

नजर तुझी लागुन झालें ३४८
नभीं मेघ काळा काळा १२७
नाच ऊड पांखरा भरारा ४७
नाजुक वर चवथीची कोर १३२
नादांत गुंगसी जें शब्दांत सांग० ६८
नांव गांव कुळगोत न त्याला २९७
निळावतीच्या दीपकळ्यांनो० १२३
निळ्या जळावर कमान काळी ३३७
निळ्या तलावांतुनी फुलावें० २६७
निष्ठुर किति हृषिकेशी ? रे तूं ७७
नंदाघरची बावडि ग, मी २९४
परलोकींही दुर्मिळ सजणा ८७
परसांतिल आंबा बघ आला० १११
पराधीन जीवा समाधान नाहीं ४६
पलीकडे शेतांत तुंबलें ९६
पाऊस रात्रीं होऊन गेला ३४२
पागल मी पागल मी २७७
पाठमोरी मूर्ति तूझी पाहिली० १५६
पुढें काय, पुढें काय ? २५३
पुनवेची रात मजेची १
पेटलों मी फार; आतां० ३३९
पंखांवरतीं रंग झेलुनी गळ्यांत० ११७
पंढरीस वाजे घंटा पांडुरंग० २३६
प्रमत्त तुजपरि सखि ! ही धरणी १७०
प्राणरागिणी सरली, उरला० ३१४
प्रार्थना तीच ३३२
प्रीति तुझी राहिल स्मरणीं १२२
प्रीति तूझी अंतरीं या दाटुनी० १६५
प्रीतीचा कनकदीप पुनरपि० १५८
प्रीतीची प्रतिभा कुठें हरपली १२
प्रीय देवते नमन तुला ६६
प्रेम तिचें जरि होतें मजवर १२३
प्रेमपूर्ण स्वानंदाची ज्योत पाजळून ३७
प्रेमा, चुंबनधुंदि जी विलसते ४२
फांद्यांमधुनी चंद्र दिसावा ३३५
फुलल्या लाख कळ्या २१९
फुलवीत चित्रें चैत्र तुझ्या अंगीं० ३०१
बालपणींच्या चिमण्या जगतीं १५
बालहृदया भावीक गुणी ताई २१
बाळ जन्मा आलें, आज० १२८
वांगड्या बघा या १५५
बंधूभगिनी ! चला, चला १४०
भगवी रतन-अबोली वेणी ३३९
भगव्या आकाशांत डोलतें ३३०
भाकरीचा तूं भिकारी कैदियाचा० ६२
भिजले घुंगुर तसें वाजलें० ३०४
भिजून आल्या ग काजळराती ३४०
भूमीपरी तुझी माया मुकी० २८९
मेसुर शांती पेहरलेल्या भयाण० ३५
मख्मली या अंतरीं तूं० २५१
मत्त आज चांदरात धुंदि० १६४
मदिय आली प्रियतमा सखी दारीं ५२
मन मार उगिच जें चुकचुकतें ७१
मनमोरा ! कर आनंदुन० १९८
मनाची मोहिनी कोणी म्हणे० ५४
मम जिविताची नाव चालली ६५
माझा छंद दिवाणा १८२
माझी आगबोट चालली दरियांत० ४८
माझी बेगम आली—प्यारी १५८
माझें अंतर फाळितां मज दिसे ५०
माझें थकलें मागणें ३३८
माझें सुख मोठें, सुख मोठें २१५

माझ्या गोव्याच्या भूमींत २८४
माझ्या मनाची 'माउ'ली फिरे० २६३
मी चढुनी येतां विजयाचीं० १८९
मी दुःखाचा राणा आणिक० १३५
मी सुर्मा विकणारा १५३
मूक आंसवांचीं त्यांना सांगा० २२१
मृदुमदगति ती येते जेव्हां ३१२
मोकळें किती वाटे ३४१
मंद असावें जरा चांदणें ३४०
मंदावतां सगळीं उन्हें० ३४३
या उत्तररात्रीं तूं सखये २५२
या जगा कंटाळुनी स्वार्थी० ५९
या जुळया कळ्यांतुनि खुडणें० १८०
या नदीच्या पार वेड्या० ३०५
यापुढं संपली नीज १०७
या वळवाच्या सरीपरी तूं० १६०
येइं सखी हसतमुखी हलुहलु० ७९
येतां जवळी मी पळशिल का? ६९
ये पुढल्या दारानें, ये रे हरि १३४
"येशी सांग कुठून? दिव्य० १३७
ये संध्ये जा कथुनी यामिनिचें० २४८
रडते आई धाईधाई २४८
रात निळी रात निळी २३८
रात्र ही सरेल कधीं खंत नको० ३१९
रे, अजून थोडें सोस मना २८२
रे, घोर तुझी तरुणा मृगया १३३
'रे हिऱ्या माझिया झळक घरीं! १२७
लहरत ये, विहरत ये० २६८
लाल केशरी गुल्मोहरचे० १७७
लाव दिवा ग लाव दिवा १८१
लाविला मुला मज किती लळा २०९
लीला गुणी प्रेमांगणीं कुंजीं० १७
लोकसागरा! स्थिरपद कां तूं? ११८
लोचनीं ये आज पाणी० १६८
वरिष्ठांचीं दुरुत्तरें स्मितें० २८९
वर्षे सोळा झालीं गोळा तुझिया० २३०
वर्षांत तव शिरीं वर्षफुलें ८९
वळून बघतां मागें आतां० ३३०
वाटच होती बघायची तर ३४८
वाढत्या सांजवेळे नये ग० ३३३
वास्तव्य कुणाचें तेथ असे ८३
विचारिसी परोपरी मला २५०
विरले सगळे सूर तरी ही ३२९
विराट तरुवर नटवर शंकर ११७
विश्व हें दिसे मला क्षणोक्षणीं० ७४
विश्वामित्रा! व्यर्थ न तप तव १४९
विहगा जाच उडून ३३
वेड लाविलें असें कशास० ७१
शरच्चंद्र तारागणिं वितरी० ४०
शरदृतूचें ऊन सांडलें होतें० ११६
शारदिंच्या चंद्रकलेनें शिंपडिलीं० ५३
शांता झाली दुर्गा रे २२९
श्रवणीं ये गभीर हांक० २६२
सखि ये गे, सखि ये गे १६६
सखे! चल सजवूं कार्तिकमास २२०
सखे मी गेलें भिउनि मनांत! १०५
समुद्रवीणा छेडित चंद्रा उधळ० २४४
सये साजणी भरल्या नयनीं २४
सरिंवर सरी आल्या ग ३४४
सागरा! हिरा मम नेला० १२१
सानुल्या फुला! तान्हुल्या० १४८
सावल्यांचें नृत्य माझ्या० १३६

सुखा नाहीं चव ३३४
सुटलेलें वेड माझें कुणी मला० ३०३
सूर्य गेला देशांतरा० ८५
सृष्टिदेवते, एकच्च का तुज० २९
सोड सखि ! येतें काकुळती १७५
सोन्याची द्वारका पाहुं या १४७
सोन्याच्या फुलपांखरापरि वनीं ५६
संजय द्रष्टा म्हणे, "अभाग्या, २३१
संध्या राधा तांबुस गोरी ३११
स्नेहें तव जळत प्रभो० २६४
स्फटिक-शिळेसारख्या विलोरी २८८
स्वर्ग नको सुरलोक नको मज० २९८
स्वर्गसुंदरी, परी, लिले ! ५८
स्वर्णारुण अंशुमालि० २६९
स्वैर करीं संचार ! प्रतिमे ! ६७
"हद्द तुझा बेहद्द पाहुनी० ९४
हरि आला हो, हरि आला हो २२५
हसत हसत वर वर जा पांढऱ्या० १५०
हास खदखदून असा हास० १३१
हासें हस वाळा १५
हिमाद्रीहुनी भव्य नक्षत्रमौली ३१५
हिरवळ आणिक पाणी २९२
हुषार भाई, हुषार भाई ! ११२
हृदयच जेव्हां होतें कोकिळ ३२१
हे कन्हया, वेणुगानीं ती छेड० २७
हे माउली दे साउली दिनरात० २३
हे मित्रांनो ! भाग्य न माझें० २७०
हें नभ नक्षत्रीं भरलेलें १९७
हं, हास राजसा चिमण्या० १३
क्षणभंगुर जरि जीवन सखे० १२१
क्षमा करीं थांबवेना सागराला० १८९
क्षाळी पद संध्या १४५
क्षितिजामधल्या सुवर्णकेशी ३१६
क्षितिजावर आली लाली ९२
क्षितिजीं आलें भरतें ग ३३६
क्षेत्र परम दावुनि नयनां २७३
ज्ञानदेव गेले तेव्हां कोसळली० ३१८



मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत
अनुक्रम 22224 वि: ...
क्रमांक 15913 नों: दि: ...

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 99266
ग्रंथ शाखा (स्थळ प्रत)

REFBK-0011248
REFBK-0011248

REFBK-0011248

REFBK-0011248

# बोरकरांची